वेपत्र निबंध
सं. नं. ४४

# ाी–दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. ३२६० | विभाग निबंध | क्रमांक २३५
पुस्तकाचें नांव गांधी-दर्शन.
लेखक ग. धा. निरंतर.
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

म. ग्रं. सं. ठाणें.
ता. ७.५४
REFBK-0006825

किंमत ४ रुपये

# गांधी-दर्शन

'आचार्य कृपलानी यांच्या
*Gandhian Way*
या ग्रंथाचा अनुवाद

२७ंग. २२४५
८८२५
REFBK-0006825
कि० वा० नं० ३२८

संपादक :
प्रा. गं. भा. निरंतर

अनुवादक :
शरच्चंद्र गुणे

किंमत चार रुपये

प्र का श क
**रा. ज. दे श मु ख**
देशमुख आणि कंपनी
१११ शनिवार पेठ, पुणें २.

१. सर्व हक्क स्वाधीन.

२. मुखपृष्ठावरील चित्र दीनानाथ दलाल यांचें आहे.

मु द्र क :
बाकी पृष्ठें :
**श्री. हे. बा. गुर्जर**
आयुर्विद्या मुद्रणालय
२६१।२ सदाशिव पेठ, पुणें २
१ ते १७६ पृष्ठें :
**श्रीपाद रघुनाथ राजगुरु**
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण पेठ, पुणें २

१९४७

# प्रास्ताविक

'शास्त्रीय काटेकोरपणानें मी गेल्या पन्नास वर्षांहून अधिक वर्षें अखंडपणें अहिंसा व अहिंसेच्या शक्यतेची साधना करीत आलों आहे. कौटुंबिक, संस्थाविषयक, आर्थिक व राजकीय जीवनांतील सर्व क्षेत्रांत मी अहिंसेचे प्रयोग केले आहेत. मला एकाहि बाबतींत अहिंसेनें दगा दिला नाहीं. जेथें अहिंसा फसते आहे असें मला वाटलें तेथें ती फसवणूक माझ्या अपूर्णतेमुळें होते आहे असें मी मानलें. मी स्वतः परिपूर्णावस्थेला पोहोचलों आहे असें समजत नाहीं. पण मी स्वतःला एक सत्याचा कळकळीचा संशोधक मानतों. सत्य हें ईश्वराचेंच दुसरें नांव आहे. माझ्या या संशोधनांत मला अहिंसा सांपडली. तिचा प्रचार करणें हें मी माझ्या जीवनाचें कार्य मानतों. या कार्याव्यतिरिक्त जीवनांत मला गोडी नाहीं.'

**म. गांधी.**

गांधींच्या जीवनाचें सारें रहस्य त्यांच्या वर दिलेल्या उताऱ्यांत पहावयास सांपडतें. सत्याचें संशोधन करतांना गांधींना अहिंसा सांपडली म्हणजे काय झालें ? सत्य म्हणजे परमेश्वर कसा ? सत्याचा व अहिंसेचा संबंध काय ? आाणि ती अहिंसा जीवनाच्या सर्व क्षेत्रांत कशी आणावयांची, वगैरे प्रश्न अनेकजण विचारतात. परमेश्वर हा व्यक्त होत असला तर सत्याच्या स्वरूपानेंच व्यक्त होतो. जेथें सत्य आहे तेथें ईश्वर आहे.

ईश्वर हा असत्यांत, हिंसेंत राहूं शकत नाहीं. पण सत्य ही अशी वस्तू नाहीं कीं जी दाखवितां येईल. ती अंतःकरणानेंच पहावयाची असते, अनुभवावयाची असते. जेथें सत्याचा साक्षात्कार होतो तेथें ईश्वराचें दर्शन होतें. सत्य म्हणजे अविनाशी तत्त्व. तें सर्व काळाला, सर्व स्थळांना व्यापून राहिलें आहे. इतर सर्व नष्ट झालें असतां जें नाश पावत नाहीं, ज्यावर विकार होत नाहीं तें सत्य होय. या सत्याच्या आधारावरच जग चाललें आहे. व्यावहारिक सत्य हें त्या सत्याचा बारीकसा अणू आहे, कण आहे. ज्यांना हें बुद्धीनें पटलें आहे ते त्या सत्याच्या मागें सारखे धांवत असतात. हें सत्य कसें सांपडणार? गांधीजी म्हणतात, या सत्याच्या शोधांत मला अहिंसा सांपडली. अहिंसा किंवा प्रेम हें त्या सत्याचें साधन आहे. जो अहिंसात्मक आचरण करतो, त्याचें अंतःकरण सर्व प्राणिमात्राबद्दलच काय पण स्थिर आणि चर वस्तूंबद्दल प्रेमानें भरून जातें. त्याच अंतःकरणाला सत्याची प्राप्ति होते. सत्य कुठें रहातें? जेथें भूतमात्राबद्दल प्रेम आहे तेथेंच सत्य रहातें, इतर ठिकाणीं सत्य रहात नाहीं. म्हणून ज्यांना सत्य किंवा ईश्वराची प्राप्ति व्हावयास पाहिजे असेल त्यानें प्रेममय झालें पाहिजे. शेवटच्या अवस्थेप्रत पोहोंचलेला ह्या द्वैतांतून मुक्त होतो आणि सत्य व प्रेम हें कार्यकारणात्मक न रहातां एकरूपच होतात. सत्य म्हणजे ईश्वर, सत्य म्हणजे प्रेम आणि प्रेम म्हणजे ईश्वर असा तो बनतो. ही अहिंसा प्राथमिक अवस्थेंत साधन म्हणून असते; पण ती पूर्णावस्थेला पोहोंचली म्हणजे साध्य होते. मग अहिंसा, सत्य आणि ईश्वर हे एकच होतात व साध्य साधनांत फरक रहात नाहीं.

ह्या अहिंसेची आराधना गांधी अरण्यांत जाऊन करीत नसून ऐहिक जगांत करीत आहेत. समाज ही त्यांची प्रयोगशाळा आहे. या प्रयोग-शाळेंत अहिंसेचें आचरण करीत असतांना हिंसेबरोबर त्यांना प्रचंड झगडा करावा लागत असतो. त्या झगड्यांत कधीं कधीं अहिंसा ही पराभूत झाल्यासारखी वाटते. लोक म्हणतात, अहिंसेनें काय होणार?

ॲटम बॉम्बपुढें अहिंसेचें काय चालणार ? पण ही विचारसरणी कोती व अपूर्ण आहे. हिंसा हा जीवनाचा धर्म होऊं शकत नाहीं. तो जीवनाचा अधर्म आहे. धर्माप्रमाणें वागणें म्हणजे नीतिनियमांचें कडकडीत पालन करणें. जो नीतिनियमानें चालतो तो नष्ट कसा होईल ? नष्ट कोणी होणार असेल तर हिंसा करणारा. सर्वांना मारून मी जगावें असें म्हणणारीं नीतिवान, धार्मिक आहे असें कोणी म्हणत नाहीं. म्हणून अहिंसा हाँचे धर्म आहे व त्याचें आचरण करणारा हा जगणार आहे.

अहिंसेचें तत्त्व ज्याला पटलें तो तें तत्त्व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत लागू करणार नसला तर तो ढोंगी आहे. घरांत खोटें बोलणारा आणि संस्थेंत खरें बोलणारा,: व्यापारांत फसवणारा आणि राजकारणांत खरें बोलणारा असा माणूस नाटकी आणि असत्याचरणीच होय. कोण कोणाला फसवतो ? स्वतः शिवाय दुसऱ्या कोणाचीहि वंचना अगर हिंसा आपण करीत नाहीं. दुसऱ्याची हिंसा करणारा हा स्वतःचीच हिंसा करतो, दुसऱ्याचा द्वेष करणारा हा स्वतःचाच द्वेष करतो. तेव्हां सत्य आणि अहिंसा याला मर्यादा नाहींत, त्यांत तरतमभाव नाहींत, त्यांत विभाग नाहींत.

गांधींना पूर्वीच्या साधुसंताप्रमाणें जगापासून अलग राहून हें सत्य-संशोधन करतां आलें असतें. असें संशोधन करून निर्वाणपदाला पोहो-चलेले ज्ञात व अज्ञात किती तरी महात्मे असतील. पण त्यांच्या प्रका-शाला जग मुकलें आहे. गांधींना हा शोध सर्वत्र फैलवावयाचा आहे. गरिबापासून श्रीमंतापर्यंत, निर्बुद्धापासून सुबुद्धापर्यंत त्यांना ह्या नव्या शोधाचें दान करावयाचें आहे. सर्वांनीं प्रेममय व्हावें, सर्वांनीं सत्याचे उपासक व्हावें व सर्वांना सत्य सांपडावें अशी त्यांची उदार व विशाल वृत्ति आहे.

हा श्रद्धेचा दिवा हातांत घेऊन ते या हिंसक जगांत एकाकी असे हिंडत आहेत. निराशा, अपयश, उद्वेग वगैरेंनीं त्यांची श्रद्धा विचलित होत नाहीं. राजकारण हें गांधींच्या कल्पनेचें राजकारण आहे, तसेंच

अर्थकारण, समाजकारण आणि इतर प्रश्न हे ते अहिंसेच्या भूमिकेवरून हाताळतात. अहिंसा किंवा सत्य याला एकदां मर्यादा नाहीं असें म्हटल्यानंतर जीवनांत येणारे निरनिराळे प्रसंग व उद्भवणारे निरनिराळे प्रश्न हे पृथक नाहींत. त्यांची विभागणी करतांच येत नाहीं. सत्य किंवा नीति यांचें पालन सर्व क्षेत्रांत अशक्य होऊं लागल्यामुळें चाणाक्ष माणसानें जीवनाचे निरनिराळे विभाग पाडले. येथें सत्य बोलावें, येथें असत्य बोललें तरी चालतें, येथें नियमित सत्य बोलावें, येथें केलेली हिंसा ही अहिंसाच आहे, वगैरे भेदाभेद स्वतःच्या दुर्बलतेमुळें करून मनुष्यानें निरनिराळ्या प्रश्नांचीं शास्त्रें बनविलीं. कशाला अर्थशास्त्र नांव दिलें, कशाला राज्यशास्त्र तर कशाला समाजशास्त्र असें नांव दिलें. पण हीं सर्व शास्त्रें अशी स्वतंत्र मानूं नयेत, एकच मानावींत अशी गांधींची शुद्ध विचारसरणी आहे. सर्व प्रश्नांच्या मुळामध्यें जर आपण सत्य अहिंसा किंवा मानवता पाहूं लागलों तर ते एकाच स्वरूपाचे होतात. गांधींनीं जगांतील निरनिराळ्या प्रश्नाकडे एकाच दृष्टीनें, अहिंसेच्या दृष्टीनें बघितलें आहे.

राजकारणांत सत्य व अहिंसा आली म्हणजे सनातन राजकारण हें धर्मत्व पावतें. अर्थकारणांत सत्य व अहिंसा आली म्हणजे अर्थकारण ही सेवेची साधना होते. तसेंच इतर प्रश्नांचें. मानवी मनावरील जुने संस्कार हे लवकर नष्ट होत नाहींत, आणि नवे संस्कार हे लवकर बसत नाहींत. म्हणून आपण गांधींच्या राजकारणाचें यशापयश हें जुन्या मापानें मोजतों. हिंसावृत्ति वाढली आणि स्वातंत्र्य मिळालें तर तें स्वातंत्र्य नाहीं असें गांधी म्हणतील. उलट अहिंसावृत्ति वाढली आणि स्वराज्य दुरावलें तरी स्वराज्य मिळालें आहे असें ते म्हणतील. अहिंसक इंग्रज हा परका म्हणून शत्रू आणि हिंसक हिंदी माणूस हा आपला म्हणून मित्र अशी दृष्टि त्यांच्याजवळ नाहीं. मानवता ही एकच आहे. ती स्थलकालानें बद्ध कशी होणार? जो मानवतेचा शत्रू तो खरा शत्रु

आणि जो मानवतेचा मित्र तो खरा मित्र असें त्यांचें मत. यशा-पयशाचीं त्यांचीं वजनें व मापें हीं त्यामुळेंच भिन्न आहेत.

गांधीजींचा विधायक कार्यक्रम हा ह्या विचारावर उभारलेला आहे. खादी वापरा सांगणारे गांधीजी खादींत फायदा किती होतो किंवा तोटा किती होतो या भावनेनें ती वापरावयास सांगत नाहींत. खादी वापरणारा हा कोणाचे श्रम चोरीत नाहीं, तो कोणाची आर्थिक हिंसा करीत नाहीं; म्हणून खादी ही विकत घेतां कामा नये, ती स्वतःच तयार करावी. त्यांचें सर्व अर्थकारण हें याच विचारावर आधारलेलें आहे. अस्पृश्यता नष्ट करा असें सांगणारे गांधीजी समतेचा पुरस्कार करा असें सांगतात. हिंदु-मुसलमानांचें ऐक्य इच्छितांना, गांधीजी मानवता ही समान आहे, ती प्रेममय आहे, याच तत्त्वाचा पुरस्कार करीत असतात. आपली अहिंसा ही जसजशी विकास पावेल, पूर्णावस्थेप्रत जाईल, तसतसे अवघड वाटणारे प्रश्न सोपे व व्यवहार्य होतील. सर्व प्रश्नांच्या मुळाशीं असलेली मानवता ही आपण भुलीनें झोंपवून ठेवली आहे; तिला आपण निर-निराळ्या नियमांच्या आवरणाखालीं झाकून टाकलें आहे. गांधीजींचें जीवनकार्य कांहीं असेल तर या झोंपलेल्या मानवतेला जागृत करण्याचें आहे. ती मानवता अहिंसक व सत्य स्वरूपाची आहे.

गांधींच्या जीवनाकडे आपण याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे, त्यांचे विचार याच दृष्टीनें वाचले पाहिजेत, म्हणजेच आपल्याला गांधीजी समजूं शकतील. आपल्या सनातन दृष्टीनें गांधी आपण पाहिले तर त्यांचें सम्यक् दर्शन होणार नाहीं. पण गांधी नुसते समजूनहि भागणार नाहीं. ते समजले पाहिजेत, हें जसें महत्त्वाचें, तसेंच त्यांनीं सांगितलेल्या गोष्टींचें आचरण करणें, हें जास्त महत्त्वाचें आहे.

'खरें बोला आणि कोणाची हिंसा करूं नका.' ह्या एका वाक्यांत गांधी समजतात; पण या एका वाक्याचें आचरण आजपर्यंत जगांत होऊं शकलें नाहीं म्हणून जग हें दुःख-दैन्याच्या फेऱ्यांत गिरक्या खात आहे. मधून मधून जगाला आत्मप्रतीत करण्याकरतां कांहीं द्रष्टे निर्माण

होतात. जग त्यांची हेटाळणी करतें. कारण जगांतला माणूस हा स्वत.ला धर्मशाळेंतला उतारू मानतो. तो आपल्यापुरतें पाहतो आणि स्वत:ची जीवनयात्रा सुखाची झाली—ती कधीं होत नाहींच—म्हणजे निघून जातो.

गांधीवाङ्मय हें मराठीमध्यें अद्याप फारच अल्प प्रमाणावर आलें आहे. तें वाङ्मय जितकें जास्त निर्माण होईल तितकें हवेंच आहे. चांगल्या गोष्टींचा कधीं वीट येत नाहीं.

'गांधीयन् वे' ला गांधी-दर्शन हें नांव अत्यंत योग्य आहे. गांधी-दर्शन म्हणजे गांधी-तत्त्वज्ञान. आचार्य कृपलानी यांना ह्याच तत्त्वज्ञानाचा परिचय करून द्यावयाचा आहे.

ता. २६।२।४७

त्र्यं. र. देवगिरीकर

# गांधी-दर्शन

आचार्य कृपलानी यांच्या
***Gandhian Way***
या ग्रंथाचा अनुवाद

ग्रा. क्र. ६८२५

## खादी आणि औद्योगीकरण

१

चरखा आणि खादी या दोन गोष्टींना विरोध करतांना सुशिक्षित आणि विशेषतः समाजसत्तावादी लोक आपलें अतिशय आवडतें आणि त्यांच्या मतें अतिशय बिनतोड असें एक कारण पुढें करतात. तें असें कीं, आधुनिक प्रगतीचें चाक चरख्यामुळें थांबतें—नव्हे उलटें फिरूं लागुन पुच्छप्रगति सुरू होते. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या भरभराटीकडे पाहून असें त्यांना वाटूं लागलें आहे. हिंदुस्थानाचें औद्योगीकरण केलें म्हणजे येथील दारिद्र्याचा प्रश्न मिटेल असें त्यांना वाटतें. आधुनिक पाश्चात्य यांत्रिकीकरणाचा सूक्ष्मपणें अभ्यास करण्याची संधी या मित्रांना कधींच लाभली नाहीं असें उघड दिसतें. तशी संधि जर त्यांना मिळाली असती तर त्यांनीं वरील मत इतक्या आवेशानें मांडलें नसतें. यांत्रिकीकरण जेथें जेथें करण्यांत आलें तेथें तेथें, आणि त्या प्रयोगाच्या प्रत्येक अवस्थेंत—मग तें पूर्वेकडे असो वा पश्चिमेकडे असो—अल्पलोकसत्ताक राज्यपद्धतीचें सामर्थ्य त्या यांत्रिकीकरणाच्या

मार्गे होतें. एवढेंच नव्हे तर बहुतेक राष्ट्रांत अशा राज्यांची धुरा वाहणारे लोक मोठमोठे कारखानदार आणि त्यांना भांडवल पुरविणारे सावकार होते किंवा त्यांचेच पगारी हस्तक होते. आजहि परिस्थिति हीच आहे. साम्य-वाद्यांचा हल्लींच्या आधुनिक राज्यपद्धतीवरील मोठा आक्षेप, तिचीं सूत्रें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें भांडवलदारांच्या हातांत असतात हा आहे. एखाद्या शेतकीप्रधान देशाचें औद्योगीकरण करण्यासाठीं अल्पलोकसत्ताक राज्यकर्त्यांच्या हातीं सत्ता देण्याखेरीज दुसरा उपाय इतिहासाला ठाऊक नाहीं. रशियाचें ताजें उदाहरण तर ही गोष्ट सिद्धच करीत आहे. तेथें एका प्रभावी, सामर्थ्यवान् अल्पलोकसंख्येनें देशांतील सर्व उत्पादनावर ताबा बसविला असून कांहीं ठिकाणीं तर देशाच्या इच्छेविरुद्ध त्याचें औद्योगीकरण केलें आहे. हें औद्योगीकरण इतर भांडवलदार देशासारखें कांहीं थोड्या लोकांच्याच—भांडवलदारांच्या—फायद्यासाठीं नसून बहुजन-समाजाच्या फायद्यासाठीं करण्यांत आलें आहे खरें. परंतु त्यासाठीं अवलंबि-लेला मार्ग मात्र तोच आहे. तो मार्ग म्हणजे—साऱ्या राजकीय सत्तेचें आणि आर्थिक सामर्थ्याचें, सुसूत्रबद्ध अशा सुटसुटीत अल्पलोकसत्तेच्या हातीं केंद्रीकरण करणें. त्या थोड्याशा लोकांना आपला हेतु आणि योजना स्पष्टपणें कळत असतात. हिंदुस्थानांत अल्पलोकसत्ताक राजवटच चालू आहे, परंतु हे लोक विदेशी असल्यामुळें, या देशांतील भांडवलदारांच्या हिताच्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न नसतात, तर हे इंग्लंडमधील भांडवलदारांच्या हितासाठीं असतात. सध्यांची नोकरशाही जाऊन तिच्याजागीं अल्पलोक-सत्ताक पद्धती आली तर तिला इतर देशांतून भांडवल आणि शास्त्रज्ञ यांची मदत देऊन त्या दिशेनें प्रयत्न करतां येईल. परंतु या दोन्ही गोष्टी मिळवि-ण्यासाठीं विदेशीयांना कांहीं खास सवलती दिल्याशिवाय भागणार नाहीं. आणि त्यामुळें हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वास बराच काळपर्यंत वाव मिळणार नाहीं.

आधुनिक औद्योगीकरणांतील दुसरा महत्त्वाचा भाग परदेशी बाजारपेठा हा आहे. ह्या बाजारपेठांत कांहीं फक्त कच्चा माल पुरविणारे, मागासलेले

असें नामाभिधान मिळालेले असे देश असून ते तयार पक्क्या मालाचें गिऱ्हाईक आहेत. ह्या आर्थिक पिळवणुकीचें क्षेत्र सध्यां मर्यादित होत चाललेलें असल्यामुळें ( आणि त्याचीं कारणें सर्वविश्रुत आहेत ) युरोप, अमेरिका आणि आशियाचा कांहीं भाग येथील उद्योगधंद्यांतील अडचणी वाढतच आहेत. ह्या अडचणीमुळेंच वीस वर्षांपूर्वी महायुद्धाचा भडका उडाला आणि वेळेवर अतिशय धडाडीच्या अशा साधनांचा अवलंब केला नाहींतर याहून अधिक व्यापक आणि विध्वंसक महायुद्ध उभें राहील. अशीं एक दोन युद्धें झालीं, म्हणजे मग, भविष्यकाळीं, औद्योगीकरण करण्याची इच्छा धरण्याइतपत तरी सुधारलेला असा एकही देश या भूतलावर शिल्लक उरणार नाहीं.

परंतु उद्योगप्रधान देशांत तरी बहुजनसमाजाच्या दारिद्र्याचा प्रश्न सुटला आहे काय ? जेथें परिस्थिति अनुकूल आहे अशा कांहीं थोड्या देशांत तो प्रश्न सुटण्याच्या अगदीं बेतांत आलेला दिसत होता, पण त्याच वेळीं पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील इतर देशांनीं औद्योगीकरण केल्याबरोबर पुनः सारा घोटाळा उडाला. जेथें बेकारी ही कायमची व्याधि होऊन बसण्याची भीति उत्पन्न झाली नाहीं असा एकही भांडवल-शाहीवाला उद्योगप्रधान देश आजच्या जगांत नाहीं. ह्या परिस्थितीच्या दोषाचें खापर भांडवलशाहीच्या राजवटीमुळें झालेल्या, संपत्तीच्या बेबंद वांटणीच्या आणि बेसुमार उत्पादनाच्या माथीं फोडण्यांत येतें. सुसंयोजित राष्ट्रीय अर्थव्यवस्थेनें हा रोग दूर होईल अशी अपेक्षा केली जाते. रशिया, अमेरिका, यांसारख्या मोठ्या देशांत, जेथें कच्च्या मालाचें उत्पादन त्या देशाला पुरेसें आहे, आणि देशांतील बाजारपेठ खूपच मोठी आहे, तेथें हें शक्य आहे. परंतु इंग्लंड, युरोपांतील लहान राष्ट्रें आणि जपान यांचा विचार केला तर त्यांची ती साम्राज्यान्तर्गत बाजारपेठ नाहींशी झाल्यास, आर्थिक नियोजनाचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. आणि जरी ते कांहीं थोडें करूं शकले तरी त्यांना त्यांचा सध्यांचा राहणीचा दर्जा बराच खालीं उतरवावा लागेल आणि तसें

समाजांतील एखाद्याच वर्गाच्या बाबतींत करून भागणार नाहीं; सर्वच समाजाचा दर्जा खालीं उतरवावा लागेल. परंतु अनुकूल परिस्थिति मिळाली तर स्वतंत्र हिंदुस्थानांत राष्ट्रीय आर्थिक नियोजन कठीण असलें तरी शक्य आहे. फक्त एकच गोष्ट करावी लागेल ती म्हणजे दुहेरी क्रांति. एकीनें आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवावें लागेल आणि दुसरीनें फॅसिस्ट किंवा बोल्शेविक पद्धतीचें राष्ट्रीय नियोजन करावें लागेल. ही दुहेरी क्रांति घडून येईपर्यंत औद्योगिकरणाच्या गोष्टी बोलणें गोंडस असलें तरी तें वायफळ ठरणार आहे.

कांहीं प्रांतिक विधिमंडळांतून या ना त्या बाबतींत राष्ट्रीय नियोजन करण्याची नुकतीच चर्चा झाली. अशा चर्चेमुळें भयंकर अज्ञान मात्र उघडकीस येतें. साधारणपणें या विधिमंडळांतील नामदारांचा वर्ग विशेषसा हुषार असत नाहीं; त्यांतून हिंदुस्थानांत तर गंभीरता आणि वास्तवता या दोन्ही गोष्टींचा जिथें पत्ता नाहीं, अशा विधिमंडळांत हें अज्ञान फारच मोठ्या प्रमाणांत दिसतें. अशा नामदारांच्याच तोंडून ह्या कल्पना बोलल्या जातात यांत आश्चर्य तें काय ? फक्त उत्पादना-बाबतच नियोजन करणें किंवा एखाद्या दुसऱ्याच धंद्याबाबत नियोजन करणें संभवतच नाहीं. आर्थिक नियोजन अमलांत आणण्याचें लहानांत लहान क्षेत्र म्हणजे एक राष्ट्र हें होय. उत्पादन आणि वांटणी ह्या दोन्हींचा अंतर्भाव त्यांत झाला पाहिजे. यावांचून खऱ्या अर्थानें तें अमलांत येणें शक्य नाहीं.

हिंदी उद्योगधंद्यांच्या गेल्या कांहीं काळाच्या इतिहासाकडे पाहिलें तर आजच्या परिस्थितींत हिंदुस्थानाच्या औद्योगीकरणाची शक्यता आणि मर्यादा कितपत आहे हें दिसून येतें. स्वदेशी चळवळीचें केवढें तरी मोठें संरक्षण असतांही कापसाच्या धंद्याला अजूनही सरकारी संरक्षणाची गरज आहेच. सरकारला पूर्ण सहकार्य देण्याच्या अटीवरच या धंद्याला सरकारी संरक्षण मिळालें आहे. पण सरकारच्या योजना या आधीं लँकेशा-यरच्या आपल्या धंद्यांना मदत करणाऱ्या आणि नंतर साम्राज्याच्या

संरक्षणासाठीं जपानचा संतोष टिकविणाऱ्या अशा आहेत. आणि ह्या सर्व योजना अंमलांत येत असतांना हिंदी कापडाच्या धंद्यानें त्यांना मदत केली पाहिजे. ओटावा करार आणि लँकेशायरशीं व जपानशीं केलेले दोन करार ह्याच गोष्टी स्पष्ट करीत आहेत. सरकारच्या संरक्षणानें कापड धंद्याला जें कांहीं मिळालें त्यापेक्षां वरील करारांनीं जास्त घालविलें आहे. तो धंदा बसण्याची जी धास्ती पूर्वीं होती ती आज अजूनही कायम आहे. आणि हें संशयित संरक्षणही गिरणमालकांनीं कॉंग्रेसशीं सरकारच्या तर्फे भांडून मिळविलें आहे. कॉंग्रेस हीच आपला खरा मित्र आहे हें समजण्याइतकी अक्कल त्यांच्याजवळ नव्हती. इतर हिंदी उद्योगधंद्याचा इतिहासदेखील हीच करुणाजनक कथा सांगत आहे. महायुद्ध चालूं असतां सरकारच्या उत्तेजनावर आणि पुरस्कारावर उभारलेल्या उद्योगधंद्याचा आधार महायुद्ध संपतांच काढून घेतला गेल्याचें आढळलें. ब्रिटिशांच्या बाजारपेठेंत ते व्यत्यय आणतात असें सरकारला वाटलें. सरकारचें हिंदुस्थानांतील संपूर्ण, व्यापारी, औद्योगीक व आर्थिक धोरण इंग्लंडमधील धंदेवाल्यांच्या म्हणण्याप्रमाणें चाललेलें आहे, ही सर्वत्र गाजलेली गोष्ट आहे. आणि ती स्वभाविकही आहे. इंग्लिश लोक त्याच्यासाठींच येथें आले. ते ब्रिटिश उद्योगधंद्यांविरुद्ध किंवा साम्राज्यान्तर्गत धोरणाविरुद्ध हिंदी उद्योगधंद्यांना उत्तेजन देतील अशी अपेक्षा करणें म्हणजे आत्मवंचना आहे.

हिंदुस्थानांतील कांहीं औद्योगीकरण सरकारच्या मदतीनें आणि मदतीवांचूनही लोकांच्याच भरपूर सहाय्यानें गेलीं चाळीस वर्षें तग धरून आहे. त्याची आंकडेवारी पाहूं या.

**शेतीवर उपजीविका करणारी लोकसंख्या :—**

| | |
|---|---|
| १८९१ मध्यें | शें. ६१ |
| १९०१ मध्यें | शें. ६६ |
| १९११ मध्यें | शें. ७१ |
| १९२१ मध्यें | शें. ७२·८ |

१९३१ चे आंकडे खानेसुमारीच्या अहवालांत स्पष्ट दिलेले नाहींत, पण वरील आंकड्यावरून पाहिलें असतां तो आंकडा शें. ७३ पर्यंत जाईल.

ह्या आंकड्यांवरून पुष्कळ गोष्टी स्पष्ट होतील. जमीनीवर येत असलेलें वाढतें दडपण त्यांत दिसून येत आहे. सध्यांच्या राजवटींत हिंदुस्थानाचें औद्योगीकरण होण्याचा काळ येण्याची मुळींच आशा नाहीं हें त्यावरून स्पष्ट दिसून येतें.

हा विचार थोडा बाजूस ठेवला तरी औद्योगीकरणाची तरफदारी करणाऱ्यांनीं सध्यांच मोडकळीस येऊं घातलेल्या ह्या धंद्यांना उत्तेजन देणें हें नवीन उद्योगधंदे सुरू करण्यापेक्षां अधिक उचित नव्हे काय? आजच्या वस्तुस्थितीचा विचार केला तर हिंदुस्थानाच्या औद्योगीकरणाच्या दृष्टीनें खरोखर उपयुक्त होईल अशी कोठलीही गोष्ट, राष्ट्रीय सरकारशिवाय दुसरें कोणींही करूं शकत नाहीं. अर्थातच असा प्रश्न उद्भवेल कीं, उपाशींपोटीं रहाणाऱ्या आपल्या लक्षावधि देशबांधवांना मदत करण्यासाठीं राष्ट्रीय सरकारच्या आगमनाची आपण वाट पहात बसावयाचें कीं काय? बहुजनसमाजाचें दारिद्र्य दूर करण्यापूर्वीं जर आपल्याला आधीं औद्योगीकरण करावयाचें असेल तर आपणास पसंत पडो वा न पडो आपण राष्ट्रीय सरकारची वाट पहाण्यावांचून गत्यंतर नाहीं.

तरी या दरम्यानच्या काळांत समाजाला भरडून काढणारें हें दारिद्र्य आणि तज्जन्य भीति आणि संकटें दूर करण्याची कांहींच खटपट न करणें-सुद्धां हृदयशून्यतेचें लक्षण ठरेल. बहुजनसमाजाच्या दारिद्र्याविषयीं ज्यांना खरी कळकळ वाटत आहे, त्यांच्याच हातून स्वराज्याचें कार्य परिणामकारकरीत्या होऊं शकेल. स्वराज्याचें कार्य करतांना आपल्या देशबांधवांची स्थिति सुधारण्याचा अल्पांशानें कां होईना ते जर प्रयत्न करणार नाहींत, तर ते आपल्या श्रद्धेला जागले नाहींत असेंच म्हणावें लागेल. कारण वरील कार्य म्हणजेच स्वराज्याचें कार्य होय. हें कार्य

चरखा आणि खादी यांच्या द्वारेंच सध्यांच्या परिस्थितींत उत्कृष्टपणें होईल. ज्या बहुजनसमाजाच्या सक्रिय मदतीवांचून अथवा अप्रत्यक्ष मान्यतेवांचून राष्ट्रीय क्रांति होणें शक्य नाहीं, त्याच्याशीं अधिक जवळचे संबंध प्रस्थापित करण्याचें आणि त्यांच्यावर वजन पाडण्याचें कार्यही त्यानें साधेल.

या चर्चेंत मीं गांधीजींचें व्यक्तिमत्त्व आणि त्यांचीं मतें हीं कटाक्षानें बाजूस ठेविलीं आहेत. त्याचें कारण एवढेंच कीं चरख्याचे विरोधक नेहेमींच यंत्रें, पाश्चात्त्य सुधारणा, संयम आणि धर्म या विषयांवरील गांधीजींचीं मतें मध्येंच घुसडून साधा प्रश्न गुंतागुंतीचा करून टाकतात. तसें होऊं नये आणि ही चर्चा केवळ ऐतिहासिक, आर्थिक आणि शास्त्रीय व्हावी म्हणून गांधीजींचीं मतें आणि व्यक्तित्व हीं या चर्चेच्या कक्षेंत येऊं दिलीं नाहींत.

—गांधीजयंति १९३४

## समाजसत्तावाद आणि खादी

१

समाजसत्तावाद अजून हवेंतच आहे. देशांत सगळीकडे समाजसत्तावादी संघ आणि संस्था स्थापन होत आहेत. फक्त हिंदुस्थानांतच नव्हे तर साऱ्या जगांत हेंच चालू आहे. सध्यांच्या काळांत समाजसत्तावाद हाच आवडता विचार दिसत आहे. जगांतील कित्येक चांगल्या लोकांचीं मनें त्यानें वेधून घेतलीं आहेत. या वादाचे विरोधक जे नाझी आणि फॅसिस्ट त्यांनींही आपल्याला त्याच पांघरुणाखालीं झांकून घेतलें असून त्यांनीं समाजसत्तावादाचीच परिभाषा आणि वाक्प्रचार यांचा अवलंब केला आहे. आणि म्हणून प्रत्येक नव्या सुधारणेला आणि चळवळीला समाजसत्तावादाच्या ध्येयाची भाषा उपयोगांत आणूनच आपल्या अस्तित्वाचें समर्थन करावें लागतें. खादीला स्वयंसिद्धपणें आपलें समर्थन करतां येईल कीं नाहीं तें आपण पाहूं या. मानवसमाजाचा दर्जा उंच करूं इच्छिणाऱ्या दोन चळवळींमध्यें आपापसांत विरोध नसावा ही गोष्टही तितकीच आवश्यक आहे.

ही चर्चा पद्धतशीर आणि शास्त्रीय व्हावी या दृष्टीनें प्रथम समाजसत्तावादाचीं मूलतत्त्वें आपण स्पष्टपणें पाहूं. आपल्या या अभ्यासांत कोणतीही गोष्ट गृहीत न धरतां वा पूर्वग्रह करून न घेतां जर आपल्याला चर्चा करावयाची असेल तर धर्म, लैंगिकनीति, कुटुंब, सरकार, औद्योगीकिरण, इत्यादि, अर्धवट सुशिक्षित आणि अर्धवट चिकित्सक अशा लोकांकडून समाजसत्तावादाशीं निगडित केल्या जाणाऱ्या या गोष्टी हे त्याचे मूळ हेतू नव्हत हें आपण मान्य केलें पाहिजे. ‘ अतिरिक्त मूल्या ’चा सिद्धान्त—मग तो चुकीचा असो वा बरोबर असो—हें समाजसत्तावादाचें सारसर्वस्व आहे. ह्या अतिरिक्त मूल्याकरवींच समाजाची पिळणूक चालू असते. नफा, भाडें अथवा व्याज या स्वरुपांत आतिरिक्त मूल्य प्रकट होत असतें. ज्या धंद्यांतून अथवा व्यापारांतून हें ‘ अतिरिक्त मूल्य ’ निघत नाहीं तो साम्यवादी समजण्यास हरकत नाहीं. शास्त्रीय चर्चेच्या दृष्टीनें अशा व्यापारधंद्याचे उत्पादक आणि प्रचारक देवावर विश्वास ठेवतात कीं जडवादी आहेत; लैंगिक नीतीचे अमूक नियम त्यांना मान्य आहेत कीं नाहींत; औद्योगीकिरणावर त्यांचा विश्वास आहे किंवा नाहीं; या गोष्टी मुळींच महत्त्वाच्या नाहींत. त्यांना समाजसत्तावादाचे मूळ हेतू मान्य असतात एवढीच गोष्ट महत्त्वाची आहे.

खादीच्या धंद्यांत या ‘ अतिरिक्त मूल्या ’ला मुळींच जागा नाहीं. भाडें, व्याज अथवा नफा यांना त्यांत मुळींसुद्धां स्थान नाहीं. मिळणारा सर्व नफा त्यांतील कामगारासाठींच खर्च होतो. दुसऱ्या कोणाहि काल्पनिक अगर खऱ्या कामगारास त्यांत वांटणी मिळत नाहीं. या व्यवसायांतील बहुतेक सर्व नोकरांना साधारण सारख्याच प्रमाणांत वेतन मिळतें. विणकराचें सरासरी मासिक उत्पन्न १३ ते १५ रु. असून धोब्याचें १२ ते १५ रु. रंगाऱ्याचें २५ ते ३० आणि सुताराचें २५ ते ३० रु. आहे. सूतकांतणाऱ्याचें उत्पन्न यापेक्षां कमी आहे परंतु हें काम दिवसांतून कांहीं वेळ करण्याचें आहे. शिवाय तो जोडधंदा आहे. या उलट या चळवळीच्या

प्रचारकांना त्यांपैकीं कांहीं चांगले सुशिक्षित असतांही अवघा २० च रु. पगार मिळतो. ( संयुक्त प्रांतांतील गांधी आश्रमाचे आंकडे. )

अतिरिक्त मूल्याच्या सिद्धान्तावरून निघालेला उपसिद्धान्त उत्पादनाच्या साधनांतही समतावाद आणण्याचा अट्टाहास पाळणारा आहे. खादीविषयीं विचार केला तर चरखा आणि माग हीं दोनच उत्पादक साधनें आहेत. त्यांचें समाजसत्तीकरण करावयास नको. कारण सामान्यतः कोणाही गांवकऱ्याला विकत घेतां येईल इतकी त्यांची अल्प किंमत आहे. जेथें ह्या साध्या आणि ओबडधोबड साधनांकरितां लागणारा खर्च करण्याची इच्छा असूनही ऐपत नाहीं असे लोक आहेत तेथें त्यांच्या मदतीसाठीं चरखासंघ ही सार्वजनिक संस्था आहेच. म्हणून या ओबडधोबड अशा उत्पादनाच्या साधनांचें राष्ट्रीयकरण झाल्यासारखेंच आहे.

उत्पादनाचें दुसरें प्रभावी साधन म्हणजे भांडवल होय. तें सर्व चरखासंघाच्या हातीं असल्यामुळें तें देखील राष्ट्रीयच आहे. ती सार्वजनिक मालमत्ता असून तिच्यांतून भाडें, व्याज अगर नफा यांपैकीं कांहींच काढलें जात नाहीं. ह्या धंद्यांत काम करणारे जे खासगी उत्पादक आहेत त्यांनाही चरखासंघानें ठरवून दिलेल्या नियमांप्रमाणेंच किंमतीचें प्रमाण ठेवावें लागतें. त्यांचे हिशेब आणि किंमती यांची तपासणी होतच असते. याखेरीज त्यांना चरखा—संघाच्या चढाओढीशीं तोंड द्यावें लागतें. त्यामुळें त्यांना त्यांच्या स्वतःच्या श्रमाच्या किंमतीइतका सामान्य प्रमाणांत नफा घेऊन समाधान मानावें लागतें. वस्तुस्थिति अशी आहे कीं, खादीचा सबंध धंदा हा समाजसत्तावादाचाच एक धाडसी प्रयोग आहे. सध्यांचें परदेशी सरकार जाऊन त्याच्या जागीं एतद्देशीय सरकार आलें म्हणजे राष्ट्रीय सरकारतर्फे बहुजनसमाजाच्या हितार्थ चालविलेला खादी हा एक राष्ट्रीय धंदा होऊन बसेल यांत मला मुळींच शंका वाटत नाहीं.

समाजसत्तावादांतील तर्कशास्त्र प्रत्यक्ष वस्तुस्थितीवर आधारलेलें आहे. एखाद्या हिंदी विद्यार्थ्यानें पाश्चिमात्य देशांतून वाढत्या प्रमाणांत येत असलेल्या बोल्शेविक आणि साम्यवादी वाङ्मयाचा कितीहि

अभ्यास केला आणि कितीही हांवरेपणानें आणि लोभानें तें आत्मसात् केलें तरी वस्तुस्थितीच्या अभ्यासाची गरज त्यामुळें भागणार नाहीं. समाजवादाचे सिद्धांत वास्तववादी आहेत असें शास्त्रीय साम्यवाद मोठ्या अभिमानानें प्रतिपादन करितो. दुसऱ्या कोठल्याही चळवळीपेक्षां खादीच्या चळवळीबद्दल असें खास म्हणतां येईल कीं, कोठल्याही पूर्वगृहीत कल्पनांवर, जुन्या वा आधुनिक, धार्मिक वा शास्त्रविषयक अंधश्रद्धेवर ती आधारलेली नाहीं. हिंदुस्थानांतील सात लक्ष खेड्यांतून जी वस्तुस्थिति आज प्रत्यक्ष दिसते तीवरच ही चळवळ आधारलेली आहे.

समाजसत्तावादाचा क्रांतीवरही विश्वास आहे. चरखा चालवणाऱ्यांना आढळून येणाऱ्या अखंड क्रांतीबरोबरच त्यापेक्षां अधिक तात्त्विक क्रांति घडवून आणण्यालाही चरखा कारणीभूत होत आहे. असंस्कृत लोकांना क्रांति म्हणजे समाजांत उठणारी लहानमोठी आवेशपूर्ण खळबळ असें वाटत असतें; परंतु क्रांतीचा गाभा म्हणजे मूल्याचें पुनः मूल्यमापन हा होय. या दृष्टीनें पाहिलें तर मूल्यांच्या उत्क्रांतीचें हें कार्य या चळवळीपेक्षां अधिक योग्य प्रकारें दुसरी कोणतीच आधुनिक हिंदी चळवळ करूं शकली नाहीं. कापडधंद्यांतच नव्हे तर इतरत्रही खादी हें कार्य करूं शकली. मानापमान्या कल्पनांत खादीनें उलथापालथ केली आहे. सुंदरांना तिनें कुरूप केलें असून कुरुपांना सुंदर बनविलें आहे. खादीच्या आगमनानें सभ्यता, कला, गरज आणि आरोग्यशास्त्र याविषयींच्या कल्पनाही बदलून गेल्या आहेत. खादी ही एका ठराविक तत्त्वासाठीं आणि मनोवृत्तीसाठीं झगडत आहे. तिच्या तत्त्वाशीं आपण एकरूप झालों किंवा न झालों तरी किंमतींचें नवीन मूल्यमापन करून तिनें जी प्रचंड क्रांति केली आहे, तिजकडे अनुदारपणें बघणें किंवा तिकडे दुर्लक्ष करणें हें कृत्य फक्त कमालीच्या पूर्वग्रह दूषित मनुष्यांकडूनच घडूं शकेल. अशी वृत्ति समाजसत्तावादी, शास्त्रीय आणि वास्तववादी मनोवृत्ती यांनाहि तोंड देऊं शकणार नाहीं.

—गांधीजयंति १९३४

## खादीबद्दलचे हेत्वाभास

3

एखाद्या गांवकऱ्यापुढें चरखा ठेवला तर त्याच्याविरुद्ध तो मुळींच झगडत नाहीं. त्याचें कारण त्याला वाद घालतां येत नाहीं हें नसून त्याला आपोआपच असें वाटूं लागतें कीं, या चरख्यामुळें आपली उत्पादनक्षमता अधिक वाढेल आणि आपल्या प्राप्तींत तेवढी भरच पडेल. हें त्याला कळतें. त्याची आवश्यकता त्याला पटत नाहीं असें नव्हे तर त्याची चरख्याची संवय गेलेली असते म्हणून त्याला अडचण वाटते. सध्यां चरखा प्रचारांत नाहीं आणि त्याचें सारें आयुष्य रूढींनीं बद्ध असतें. 'रूढिविरोधी गोष्ट ! छेः ! ती कशी करावी ?' हा त्याचा पेंच असतो.

पण शिक्षित लोकांच्या बाबतींत असा प्रश्न नाहीं. आर्थिकदृष्ट्या त्यांना खादीचा मार्ग जर पटला तर मग त्यांचा कांहींच आक्षेप नसतो. त्यांच्याही आयुष्यांत रूढींचा प्रभाव जवळजवळ खेडुतांइतकाच असतो. तरी त्यांची विचारसरणी मात्र वरील पद्धतीची असते. आपल्या रूढि-

प्रियतेचें आणि क्षुद्र स्वार्थी वृत्तींचें खेडुतांस समर्थन करतां येत नाहीं पण शहरी मनुष्य आपल्या ज्ञानाच्या जोरावर असें समर्थन बऱ्याचशा परिणामकारक रीतीनें करूं शकतो. शास्त्रीय अथवा तात्त्विक चर्चा करून आपली कृति समर्थनीय आहे असें ठरवितां येईपर्यंत तो कोणतीच गोष्ट करीत नाहीं. पण बहुतेक वेळां त्यानें दिलेली आत्मसमर्थन करणारीं स्पष्टीकरणें विवेचक दृष्टीनें पाहिलीं असतां अर्धवट ज्ञानावरच आधारलेलीं असतात. तें एक गोंडस अज्ञान असतें.

खादीविरुद्ध सुशिक्षितांनीं घेतलेल्या कांहीं आक्षेपांचें निराकरण कसें करतां येईल तें येथें आपण पाहूं.

खादीविरुद्ध पहिला आक्षेप असा आहे कीं, ती आर्थिकदृष्ट्या समर्थनीय नाहीं. हे आक्षेपक अर्थशास्त्र आणि खाजगी कौटुंबिक काटकसर यांच्यांत घोटाळा करीत आहेत. पण हा हेत्वाभास त्यांच्या तर्कपद्धतींत त्यांना दिसून येत नाहीं. त्यांच्या एकंदर तत्त्वज्ञानाचा मथितार्थ असा आहे कीं, एकवार खादी, एकवार गिरणीच्या अगर परदेशी कापडापेक्षां महाग आहे. परंतु ह्या विधानाचा आणि अर्थशास्त्राचा अर्थाअर्थी कांहींही संबंध नाहीं. त्यांचें म्हणणें खरें असूनसुद्धां राष्ट्रासाठीं एक उत्कृष्ट आर्थिक योजना या नात्यानें अर्थशास्त्रदृष्ट्या खादी मान्य होईल. वस्तुस्थिति अशी आहे कीं, अर्थशास्त्र हें राष्ट्रीय संपत्तीचें शास्त्र आहे. त्याला राजकीय अर्थव्यवस्था असेंही कांहीं काळ म्हणत असत. ॲडम स्मिथनें या विषयावरील आपल्या ग्रंथाचें नांव "राष्ट्रांची संपत्ति" (Wealth of Nations) असें ठेविलें आहे.

कांहीं अर्थशास्त्रज्ञांना असें वाटूं लागलें होतें कीं, अर्थशास्त्राची मजल जागतिक मर्यादेपर्यंत आतां येऊन पोंचली आहे. आतां राष्ट्रांच्या संपत्तीचा प्रश्न स्वतंत्ररीत्या विचारांत न घेतां जगाच्या संपत्तीच्या विचारांत तो प्रश्न समाविष्ट केला पाहिजे. या सर्व क्षेत्रांतील उत्पादन, व्यय, वांटणी आणि संपत्तीची देवघेव या सर्व गोष्टींबाबत मानवजात हा एकच घटक ठरेल. आजचीं निरनिराळीं राष्ट्रें

त्यांतले लहान लहान विभाग होतील; राष्ट्रीयत्वाचीं कुंपणें नाहींशीं होतील; जकातीच्या भिंती दूर होतील. स्वदेशांत संरक्षण मिळाल्यानें बाहेर स्वस्त दरानें विकण्याचा प्रघात थांबेल आणि एका देशांतून दुसऱ्या देशांत जाणाऱ्या व येणाऱ्या संपत्तीचा प्रवाह रोखठोक राहील; त्याला अटकाव होणार नाहीं. परंतु हें सुखस्वप्न खरें झालें नाहीं. आज तर तें पूर्वीपेक्षांही दूर गेलें आहे. अर्थशास्त्र फक्त आज असलेल्या वस्तुस्थितीचा विचार करतें. भविष्यकाळीं येणाऱ्या संभवनीय किंवा कल्पनीय जगाशीं अर्थशास्त्रास कांहीं कर्तव्य नाहीं.

हिंदुस्थानांत आज असलेल्या परिस्थितीच्या दृष्टीनें आपण खादीचा विचार करूं या. राष्ट्रीय संपत्तीमध्यें खादीच्या उत्पादनानें भर पडत आहे काय? ह्या उत्पादनानें काहीं संपत्ति उत्पन्न होत आहे यांत शंकाच नाहीं. पण हें उत्पादन करण्यांत जो वेळ आणि जी शक्ति खर्च होत आहे तिचा यापेक्षां जास्त चांगला व्यय होऊं शकला असता काय? खादीची सर्व चर्चा शेतकऱ्यांच्या वर्षांतील कमींतकमी ३ महिन्यांच्या रिकाम्या वेळाचा विचार करूनच चाललेली असते. अर्थशास्त्राच्या दृष्टीनें हा अनिवार्य रिकामा वेळ म्हणजे बेकारी होय. अर्थातच खादीच्या उत्पादनामुळें हा रिकामा वेळ म्हणूनच राष्ट्रीय संपत्ति मिळविण्याच्या उद्योगांत खर्च होत आहे. म्हणूनच राष्ट्रीय बेकारीच्या निर्मूलनाकडे त्याचा थोडा कां होईना पण उपयोग होत आहे. आणि राष्ट्रांतील बेकारीचें निर्मूलन हें अर्थशास्त्रदृष्ट्या एक भक्कम आणि भरीव प्रमेय आहे.

उत्पादनांत वाढ होत आहे. प्रत्येक माणसाची उत्पादनाची शक्ति वाढेपर्यंत हिंदी राहणीचा दर्जा वाढणार नाहीं असें कांहीं अर्थशास्त्रज्ञांना वाटतें. खादीनें या उत्पादनांत भर पडत आहे. आणि तीमुळें दुसऱ्या कोठल्याही मोठ्या उत्पादनाला धक्का न लावतां हें कार्य चालू आहे. त्यामुळें हिंदुस्थानांतील गिरण्या थांबल्या नाहींत. कारण तें उद्दिष्टच नाहीं. आजच्याच किमान दर्जानें राहावयाचें ठरविलें तरी आणखी कित्येक वर्षें आज चालू अस-

लेल्या गिरण्यांतून निघणारें सर्व कापड, तयार होत असलेली खादी आणि आणखी नवीन गिरण्या सुरू होऊन त्यांतून निघणारें कापड देखील हिंदुस्थानाला पाहिजे आहे.

खादीनें राष्ट्राची क्रयशक्ति वाढते. राष्ट्रीय संपत्तीचें मान ठरविण्याचा क्रयशक्ति हा मानदंड आहे. चरखा न चालविणारा गांवकरी कापडासाठीं जो खर्च करतो त्यापेक्षां तो चालविणाऱ्याला कमी खर्च लागतो. अर्थातच त्याच्याजवळ कांहीं जादा संपत्ति गोळा होते, आणि तिचा उपयोग तो स्वतःच्या राहणीचा दर्जा सुधारण्यांत करूं शकतो. श्रीमंत लोक खादी विकत घेतात तेव्हां त्यांचा खर्च थोडा जास्त होत असेल परंतु त्यांच्या राहणीचा दर्जा वाढविण्याची जरूर नाहीं. वस्तुस्थितीच पाहिली तर श्रीमंत लोक ही खादी घेण्यानें पैसा वांचवितातच. तें कसें होतें हें सांगण्याची आतांच जरूर नाहीं.

राष्ट्राबाहेर जाणाऱ्या संपत्तीचा ओघ खादीमुळें थांबतो. कारण ती परदेशी कापडाची जागा भरून काढीत असते. ह्याचाही अर्थ असाच होतो कीं, राष्ट्रीय संपत्तीच्या गंगाजळींत अधिक भर पडत आहे. त्यामुळें प्रत्येक व्यक्ती त्या गंगाजळींतून अधिक पैसा घेऊं शकेल आणि भविष्यकाळीं उत्पादनांत वाढ होईल. गिऱ्हाइकाच्या खिशांतून खादी थोडें जास्त नेते असें म्हटलें तरी खादीमुळें एकंदर श्रीमंती वाढते, यांत शंकाच नाहीं. एका दृष्टीनें खादी घेणारा जें घालवितो त्याच्या कितीतरी पट अधिक दुसरीकडून त्याला मिळतें.

( १ ) बेकारीचें निर्मूलन ( २ ) राष्ट्रीय उत्पादनांत वाढ ( ३ ) गरीबांच्या क्रयशक्तींत वाढ आणि ( ४ ) राष्ट्राच्या एकंदर संपत्तींत भर या चारही दृष्टींनीं चरखा आणि खादी या गोष्टी अर्थशास्त्राच्या भक्कम पायावर उभ्या आहेत.

—गांधीजयंति १९३४.

## खादी आणि जीवन-निर्वाह-वेतन ४

खादी कामगाराला जीवन-निर्वाहाला पुरेल इतकें मिळत नाहीं असा आक्षेप खादीविरुद्ध घेतला जातो. जीवन-निर्वाह-वेतन म्हणजे काय ? ज्या देशांत दृढमूल बेकारी मोठ्या प्रमाणावर माजलेली आहे त्या देशांत वस्तुतः रोजमुऱ्यावर जागणाऱ्या जनतेला जीवन-निर्वाह-वेतन मिळणें शक्यच नाहीं. त्या ठिकाणीं ठराविक वेतनच मिळूं शकतें. आणि यांत किती तरी काळपर्यंत कांहींहि फरक होत नाहीं. तें जीवनास पुरेसें असो वा नसो. सुरळितपणें चालणाऱ्या आणि सुसंघटित अशा धंद्यांत वा व्यापारांतच आजच्या वेतनास जीवन-वेतनाचा दर्जा प्राप्त होणें शक्य आहे. परंतु सर्व सामान्य कामगार वर्गास कदाचित् रशियाखेरीज दुसऱ्या कोणत्याही आधुनिक राष्ट्रांत जीवनापुरतें वेतन मिळूं शकत नाहीं आणि रशियांतील वेतन हें इतरत्र अर्थशास्त्रदृष्ट्या संमत होणार नाहीं. केवळ ध्येयवादीपणानें रशियानें आज त्या वेतनाला मान्यता दिली आहे. कांहीं थोड्या धंद्यांत आणि

व्यापारांत अर्थशास्त्रावर उभारलेलें नामधारी जीवन-निर्वाह-वेतन वस्तुतः बेकारीवरच आधारलेलें आहे.

परंतु आक्षेपक असें विचारील कीं, खादी, पूर्वापार चालत आलेलें वेतन तरी श्रमाच्या मानानें देते काय ? यासंबंधीं कांहीं आंकडे पहा. विणकराला दरमहा १२ ते १५ रु. मिळतात; धोब्याला १२ ते १५ रु., सुताराला २५ पासून ३० रु.; रंगाऱ्यास २५ ते ३० रु. ( हे आंकडे मीरतच्या गांधी आश्रमांतले आहेत. ) ज्यांना या कामगारांच्या वेतनाविषयींची माहिती असेल त्यांना वरील वेतन या व्यवसायांतील तज्ज्ञ कामगरांच्या रूढ वेतनाइतकें आहे हें मान्य होईल. सूत कांतणें हा फावल्या वेळांतला दुय्यम धंदा आहे. तरीसुद्धां जर एखाद्यानें दिवसाकांठीं ८ तास सूत कांतलें तर त्याला ६ ते ८ पैसे मिळतील. केवळ श्रम करणाऱ्या मजुराला कित्येक प्रांतांत खेडोपाडीं सरासरी दोनच आणे रोजीं मिळतात. कांहीं प्रांतांत यापेक्षां जास्त वेतन मिळतें. पण सर्वच ठिकाणीं मजुरवर्गाची स्थिति मोठी कष्टप्रद असते आणि पुन्हां त्यांना वर्षभर काम मिळतेंच असें नाहीं; फक्त हंगामापुरतीच त्यांची जरूर. गुजराथ, सिंध आणि पंजाबच्या कांहीं भागाखेरीज इतर सर्व प्रांतांत रोजीं दोन आणे कां होईना पण ते तरी कायम मिळत राहिले तर त्यांतहि श्रमजीवी खेडुतांस समाधान लाभेल. तेव्हां जीवन-वेतनाच्या प्रश्नांतून उद्भवलेला आक्षेप हिंदी ग्रामीण परिस्थितींत उत्पन्नच होत नाहीं. येथें तो गैरलागू ठरतो.

परंतु शहरांतील जनतेचें काय ? शहरांत काय अथवा खेड्यांत काय ज्या लोकांना कोठल्याहि प्रकारचें निश्चित आणि कायम प्राप्तीचें म्हणजेच पगारी काम मिळालेलें आहे त्यांना तें सोडून चरखा हातांत धरण्याचा कांहीं कोणी कधींही उपदेश केलेला नाहीं. चरख्याची संपूर्ण आर्थिक योजना शेतकऱ्यांच्या दृष्टीनें, अत्यंत उपयुक्त असा एक दुय्यम जोड-धंदा आहे याच गोष्टीवर आधारलेली आहे. इतर कोणत्याही मार्गानें

अधिक पैसा मिळविण्याची शक्यता असली तरी तो व्यवसाय सोडून चरखा हातीं धरावा अशी कोणाचीही इच्छा नाहीं. खेडोपाडीं चरखा दुय्यम धंदा होऊं शकतो तसाच तो केवळ श्रमजीवी मजुराला जवळजवळ रूढ वेतनाइतकें वेतनही देऊं शकतो हा तर त्याचा विशेष गुण मानला पाहिजे.

टीपः—हें लिहिल्यानंतर गांधीजींनीं आपली नवीन योजना आंखून चरख्यावर कांतण्याचें काम करणाराला आठ तासांचें ३ आणे वेतन मिळण्याची सोय केली आहे. परंतु हें तरी जीवन-वेतन आहे असें कोण म्हणूं शकेल ? त्याच्याबद्दल एवढेंच म्हणतां येईल कीं, एका व्यक्तीला कमींत कमी लागणारें अन्न आणि वस्त्र या वेतनांतून मिळूं शकेल. "जीवन-निर्वाह-वेतन" या शब्द-समुच्चयाचा हाच अर्थ असेल तर, १९३५ च्या या नव्या योजनेनें तें मिळालें असेंच म्हटलें पाहिजे.

## स्वदेशी आणि घरगुती धंदे

## ६

प्रचंड प्रमाणावर होणाऱ्या यांत्रिक उत्पादनामुळें माणूस यंत्राचा गुलाम होऊन बसला आहे. संख्येनें नेहमीं घटत जाणाऱ्या एका लहानशा समाजाच्या हातांत सर्व संपत्ति केंद्रीभूत होत गेल्यामुळें त्यांतून वर्गयुद्धाचा प्रादुर्भाव झाला आहे, समाजाचा समतोलपणा कायमचा टळला आहे, आणि त्यामुळें क्रांति आणि प्रतिक्रांति होऊं लागल्या आहेत. या कारखान्यामुळें येणाऱ्या सामाजिक आणि नैतिक आपत्ति इतक्या जगजाहीर आहेत कीं त्यांची येथें नोंद करण्याची आवश्यकता नाहीं. परंतु यांत्रिक शक्तीच्या मालकांच्या हातीं असलेली सत्ता जर सुज्ञ आणि सुजन अशा लोकहितवादींच्या हातीं देतां आली तर या गोष्टींचें नियंत्रण करतां येईल. समाजसत्ताक अथवा समाजाचें प्रातिनिधीक अशा सरकारला संपत्तीचें उत्पादन आणि वांटणी यांची योग्य व्यवस्था करून विषमता नष्ट करतां येणें सहज शक्य आहे; आणि विषमता नष्ट झाली म्हणजे प्रचंड यांत्रिक उत्पादनामुळें निर्माण होणाऱ्या नैतिक व सामाजिक

आपत्ति दूर होतील. जेथें उत्पादन आणि वांटणी यांची व्यवस्था वैयक्तिक उपयोसाठीं न होतां सामाजिक हितासाठीं होते, तेथें भौतिक शास्त्राचे तोटे टाळून त्याचे सर्व फायदे समाजास उपभोगतां येतात. यंत्राला आपले धनी होऊं न देतां माणूस त्यालाच गुलाम करूं शकतो. परंतु असें सरकार स्थापन होईपर्यंत किंवा आपण निर्माण करीपर्यंत सध्यांचीं मानवसमाजाचीं दुःखें फारशीं कमी होण्याची आशा नाहीं.

सामाजिक आणि औद्योगिक कायदे कितीही चांगले असले तरी भांडवलशाहीनें उत्पन्न केलेली विषमता ते दूर करूं शकत नाहींत हें अनुभवानें सिद्ध केलें आहे. ती विषमता कायम राहते आणि तींतून वैषम्य, असंतोष, दुष्टावा, आणि धनिक आणि बेकार यांमधील वर्गयुद्ध या सर्वांची वाढ होते. मानवसमाजाच्या प्रगतीच्या आणि कल्याणाच्या दृष्टीनें आर्थिक जीवनाचें शास्त्रीय नियमन व्हावयाचें असेल तर शास्त्रानें उत्पादन आणि त्याच्याहि थोडया भागाचें नियमन करून भागणार नाहीं तर खप, वांटणी, संपत्तीची देवघेव हीं देखील नियमित झालीं पाहिजेत. सध्यां भांडवलशाही समाजांत उत्पादन वाढविण्याच्या कामीं शास्त्राची शक्ति खर्च होते. आणि तें उत्पादनसुद्धां उपयुक्तच नव्हे तर निरुपयोगी आणि अपायकारक अशाहि वस्तूंचें असतें ! विज्ञानानें यंत्र आणि तंत्र हीं निर्माण केलीं आणि तेथेंच त्याची प्रगति खुंटली. यंत्रांची मालकी बऱ्यावाईट मार्गानें बहुतेक वेळां वाईटच अशा नेहमीं घटत जाणाऱ्या मूठभर लोकांच्या हातीं गेली आहे. मनुष्यजातीला जर विज्ञानाचा चांगला उपयोग करून घ्यावयाचा असेल तर अनावश्यक आणि अपायकारक वस्तू बाजूस करून फक्त उपयुक्त वस्तूंच्या उत्पादनाचें जरूर तें नियंत्रण करण्याचा अधिकार विज्ञानास मिळाला पाहिजे. आणि चालू पिढीच्याच नव्हे तर भावी पिढीच्याही कल्याणाच्या दृष्टीनें हें आवश्यक आहे. जी संपत्ति विज्ञानाच्या सहाय्यानें उत्पन्न झाली आहे तिची वांटणी, देवघेव आणि विनियोग यांवरही विज्ञानानेंच नियंत्रण घातलें पाहिजे. आज भौतिक शास्त्रांनीं निसर्गावर हुकुमत बसविली आहे. त्याचप्रमाणें

सामाजिक शास्त्रांनीं विज्ञानप्रणीत अर्थव्यवस्था समाजांत प्रस्थापित करण्याची शक्यता निर्माण केली आहे. म्हणून जर विज्ञानवादी विज्ञानाचा उपयोग एका शाखेंत करण्यास तयार असतील, स्पष्टच सांगावयाचें म्हणजे कारखानदारीपुरतेंच विज्ञानाचें नियंत्रण त्यांना पाहिजे असेल तर आणखी एक पाऊल पुढें जाऊन संपूर्ण आर्थिक आणि सामाजिक जीवनदेखील विज्ञानाच्या हुकमतीखालीं आणलें पाहिजे. आजच्या जगांत असलेला विज्ञानाचा अर्धवट प्रसार मानव-जातीच्या आर्थिक आणि म्हणूनच सामाजिक व राजकीय जीवनांतही विलक्षण गोंधळ आणि कोलाहल माजविण्यास कारणीभूत झाला आहे.

यंत्रें आणि कारखाने यांचा प्रादुर्भाव होण्यापूर्वीं कृषिप्रधान आर्थिक जीवनांत घरगुतीधंद्यांमुळें सध्यांच्या भांडवलदार पद्धतींतल्या जीवनापेक्षां अधिक समता नांदत होती. तेव्हां आतां प्रश्न असा आहे कीं, जुन्या अर्थव्यवस्थेनें नियंत्रित असलेल्या देशांत आणखी गोंधळ उत्पन्न करणें श्रेयस्कर आहे काय ? जुनी पद्धति रूढीनें नियंत्रित केली गेली असून नैतिक आणि सामाजिक मान्यतेमुळें तिचा दुरुपयोग होण्याचा संभव नाहीं आणि ही मान्यता झुगारून देण्याचें धाडस बलिष्ठाला-देखील करवत नाहीं.

आपलें आर्थिक जीवन सध्यांपेक्षां अधिक घोंटाळ्याचें आणि गुंता-गुंतीचें झालें कीं, त्यांतून द्वेष, वैषम्य आणि वर्गयुद्ध या सर्व गोष्टी निर्माण होणारच. नंतर शेवटीं रक्तपातमय क्रांति होणार ! " अशी परिस्थिति निर्माण होण्यास आपण सहाय्यक व्हावें काय ? सामाजिक विषम-तेच्या तराजूचीं पारडीं अशा रीतीनें आपोआप एका पातळीवर येईपर्यंत आपण वाट पहात बसावें काय ? " असा वास्तववादी समाजसुधारकापुढें प्रश्न आहे.

सध्यांचे दिवस वाईट तर आहेतच. अधिक नियमित, शास्त्रशुद्ध आणि संयोजित आर्थिक योजना अंमलांत येईपर्यंत त्या जीवनकलहां-

तच स्वतः राहून लढत राहणें आणि दरम्यानच्या काळांत जुन्या जीवन-पद्धतींत अधिक जिवंतपणा आणि उत्साह आणण्यासाठीं जी जी संधि येईल तिचा उपयोग करून घेणें हें श्रेयस्कर नव्हे काय? समाज-सुधारकाची मतप्रणालि अशी असणें शक्य आहे. जे लोक विज्ञानाचे आणि यांत्रिकीकरणाचे चहाते आहेत त्यांनीं विज्ञानानें आर्थिक आणि सामाजिक जीवनाच्या सर्व शाखा नियंत्रित करण्याची नुसती शक्यता दाखवून काम भागणार नाहीं; त्या नियंत्रणाचें सामर्थ्य देखील आपल्या अंगांत आहे हें त्यांनीं दाखवून दिलें पाहिजे.

फक्त हिंदुस्थानापुरतें पाहिलें तर भांडवलदार पद्धतीवर चाललेल्या इतर देशांत असलेले कामगारविषयक आणि सामाजिक कायदे करून आपल्या बहुजनसमाजाचें भयंकर पिळणुकीपासून संरक्षण करण्याचे थोडेसेहि अधिकार आपल्याला नाहींत. अहमदाबाद येथें असलेली बऱ्याच अंशीं रूढिप्रिय आणि स्पष्टतया क्रांतिविरोधी अशी कामगार संघटना गांधीजींच्या सलोख्याच्या धोरणानें वागणारी असूनही कामगारांच्या अगदीं मामुली आणि तर्कशुद्ध हक्कांचें देखील संरक्षण होऊं शकत नाहीं. निर्दय आणि अदूरदर्शी धोरण अनुसरणारे कारखान्यांचे प्रतिनिधि गेल्या कांहीं वर्षांत मजुरांच्या पगारांत कपात घडवून आणण्याचे उद्योगांत चूर आहेत. गेल्या कांहीं वर्षांत अहमदाबादेंतील गिरण्यांची संख्या वाढत असून त्यांना फायदाही चांगला होत आहे. सध्यां स्वदेशी चळवळीमुळें हिंदी गिऱ्हाईक जपानी किंवा लँकेशायरच्या मालाला पडणाऱ्या किंमतीपेक्षां अधिक किंमत न कुरकुरतां देऊन स्वदेशी माल घेत आहे.

गिरण्यांनीं सरकारकडे अमूक अमूक सवलती आम्हांला द्या अशा मागण्या केल्या आणि त्यांना पाठिंबाहि मिळाला. गिरण्यांनीं आपल्या स्वतःच्या अंतर्गत व्यवस्थेंत सुरळितपणा आणण्याचा यत्किंचित्हि प्रयत्न केला नाहीं; आणि गिरणीमालकांच्या प्रतिनिधींनीं आपल्या प्रतिनिधित्वा-बद्दल मिळणाऱ्या पैशांत अथवा पगारांत कपात करून घेण्याची कधींही

तयारी दाखविली नाहीं; असें असतांही कामगारांच्या पगारांत मात्र कपात करण्यांत येते. सार्वजनिक कार्यकर्ते गिरण्यांचे हस्तक आणि बिनपगारी प्रतिनिधि होऊन बसले. त्यांनीं स्वतःची वाहवा करून घेतली आणि सार्वजानिक पैशाचा अपव्यय करून स्वतःच्या फायद्यासाठीं प्रदर्शनें भरविलीं. या सर्व स्वदेशी, सार्वजनिक आणि देशप्रेमी चळवळींचा फायदा थोड्या भांडवलदारांनीं उचलला. त्यांनीं कॉंग्रेसला दिलेलीं सर्व गंभीर अभिवचनें मोडलीं. राष्ट्रांत स्वदेशी आणि बहिष्कार या दोन चळवळींचा पुरस्कार झाल्यादिवसापासून गिरणीवाल्यांनीं नीच, अराष्ट्रीय आणि आत्मघातक वृत्तीचें प्रदर्शन केलें आहे. विभक्तीकरणाच्या या चळवळीच्या वेळीं त्यांनीं किंमती इतक्या बेसुमार वाढवल्या कीं, त्यावेळच्या स्वदेशी चळवळीचाच त्यांनीं नायनाट केला. १९२१ पासून कमी नंबराचें कापड अधिक प्रमाणावर उत्पन्न करण्यांत आलें. जे लोक खादी घेऊं शकत नव्हते, त्यांनीं गिरणीच्या कापडावर समाधान मानण्याचा प्रयत्न केल्यामुळें गिरण्यांना या चळवळीनें मदतच केली. पण १९२१ पासून खालच्या नंबराचें कापड अधिक प्रमाणावर उत्पन्न करून त्यांनीं खादीशींच सरळ चढाओढ सुरू केली आहे. कांहीं गिरण्यांनीं तर याच्याहीपुढें जाऊन आपल्या निकृष्ट कापडाचेंच ‘ खादी ’ असें नामकरण केलें. १९३२ पासून राष्ट्रीय चळवळीला उघडपणें विरोध होत आहे. गिरणी मालकांच्या हस्तकांनीं भरभराटीच्या काळांत कॉंग्रेसशीं केलेले करार किती मग्रूरपणानें धाब्यावर बसविले तें सार्वजनिक कार्यकर्त्यांना ठाऊक आहे. हें राष्ट्रीय कार्य आपल्याला अंतिम संरक्षण देण्यास समर्थ आहे हें समजण्याची अक्कल त्यांना नाहीं. आपला आकुंचित अदूरदर्शी स्वार्थच आपल्याला बरा वाटतो असें त्यांनीं इतर निरनिराळ्या मार्गांनीं दाखवून दिलें आहे. कायदेमंडळांतील त्यांच्या पुढाऱ्यानें कॉंग्रेस दडपून टाकण्याला पाठिंबा दिला एवढेंच नव्हे तर तिचा नायनाट करण्याची मागणी केली. ओटावा कराराला असलेला त्यांचा पाठिंबा आणि जपान व लँकेशायरशीं त्यांनीं केलेले करार, हीं पाहिलीं म्हणजे

स्वतःचे हितसंबंध रक्षण करण्यासही ते नालायक आहेत, हें सिद्ध होतें; मग राष्ट्रीय हिताची गोष्ट तर दूरच. कापडाच्या धंद्याचा एक उदाहरण मी उल्लेख केला पण साखर आणि इतर धंद्यांतही सार्वजनिक हिताची होत असलेली आबाळ अशा लोकांनीं उघडया डोळ्यांनीं पाहिली. त्यांत त्यांची तीच असामान्य लोभवृत्ति दिसून येते.

जेथें आपल्याला करार लादतां येत नाहींत, कामगारांचें संरक्षण करतां येत नाहीं, गिऱ्हाइकाचें संरक्षण करतां येत नाहीं, थोडक्यांत म्हणजे जेथें आपण बीं पेरतों तेथील उत्पादन आपल्याला घेतां येत नाहीं, अशी आपली केंविलवाणी परिस्थिति आहे तेथें प्रचंड प्रमाणावर चालणाऱ्या यांत्रिक उत्पादनाला मदत करणें आणि प्रोत्साहन देणें इत्यादि बडबड वायफळ आहे. आपल्या हातांत असलेल्या सर्व शक्ती-निशीं आणि राष्ट्रप्रेमानिशीं आपण तसा प्रयत्न करून पाहिला. परकीय चढाओढीपासून आपण मोठ्या धंद्यांचें रक्षण करण्याची पुष्कळ याता-यात केली. क्रांतिकारक समाजवाद आणि साम्यवाद यांपासून त्यांचें रक्षण करण्याचा आपण प्रयत्न केला आहे, तरीसुद्धां कृतघ्नपणा आणि फसवणूक यांखेरीज आपल्या पदरांत कांहींहि पडलें नाहीं. घाऊक आणि किरकोळ व्यापाऱ्यांनीं संपूर्ण स्वदेशी म्हणून परदेशी मालच आपल्या गळीं नेहमींच उतरविला आहे.

हें सर्व लक्षांत घेतां जे लोक आपल्याला यंत्रोत्पादित मालाला विज्ञान आणि सुधारणा यांच्या नांवाखालीं उत्तेजन आणि संरक्षण देण्याबद्दल सांगतात ते आपल्याला राजकीय आणि आर्थिक आत्म-घाताचाच सल्ला देत आहेत असें म्हटलें पाहिजे. या मित्रांनीं प्रथम सत्ता काबीज करावी आणि मग बहुजनसमाज, शेतकरी, मजूर आणि गिऱ्हाईक यांचें संरक्षण करण्याचे हक्क मिळवावेत हेंच अधिक श्रेयस्कर आणि सयुक्तिक होईल. आपल्या अर्धपोटी, असहाय देशबांधवांनीं राष्ट्रहिताला बाध आणणाऱ्यांना शासन करण्याची आणि जरूर पडल्यास निर्मू-लन करण्याची शक्ति प्रथम आपल्या अंगांत आणावी. ती सत्ता हातीं

आल्यावर मग यांत्रिक उत्पादनाच्या वाढीचा प्रचार करावा; नाहींतर विज्ञानाच्या वेडामुळें, ते स्वतः भयंकर, पढतमूर्ख ठरतील. त्यांच्या डोक्यांतलें तें भलतेंच वेड पाहिलें तर त्यांच्यापुढें गांधीजींच्या वेडाची काय कथा ? गांधीजी निदान भांडवलदारांचें हित आणि बहुजनसमाजाचें हित यांत फरक तरी करूं शकतात. भांडवलदारांचें सहकार्य त्यांना हवें होतें पण भांडवलदारांना असें सहकार्य नको आहे. त्यांना गांधीजीच नको आहेत. स्वार्थ आणि लोभ यांनीं अंध बनून, समान कार्यहेतूसाठीं गांधीजींनीं पुढें केलेला सहकार्याचा हात ते झिडकारीत आहेत. सध्यांच्या उच्च स्थानापर्यंत चढण्याकरितां ज्या शिडीचा त्यांनीं उपयोग केला तीच ते आतां लाथाडीत आहेत. कांहीं अपवाद माझ्या चांगले लक्षांत आहेत, परंतु ते फारच थोडे आहेत. जेथें परिणामी सत्ता हातांत नाहीं, अशा कोणत्याहि ठिकाणीं हेंच झालें असतें, ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु या सर्वांतून एकच गोष्ट सिद्ध होते. ती म्हणजे, मध्यम आणि नित्कृष्ट वर्गानें स्वतःच्या पिळणुकीस आणि गुलामगिरीस गाफिलपणें उत्तेजन देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. गरीबांनीं श्रीमंतांच्या श्रीमंतींत आणखी भर घालणें श्रेयस्कर नाहीं. मोटारवाल्याला आणखी मोटार, बंगले-वाल्याला आणखी एखादा बंगला मिळवून देण्यानें कांहींच साधणार नाहीं. ज्यांच्याजवळ पुष्कळ आहे त्यांना आणखी दिलें आणि ज्यांच्याजवळ कांहीं नाहीं त्यांचें आहे तेंही हिरावून घेतलें असें ठरण्याचा प्रसंग येऊं नये. त्या श्रीमंत भांडवलदारांच्या ‘ खेळांत ’ भाग न घेतां राष्ट्राचें जीवनसत्त्व जें स्वदेशी त्यालाच आपण चिकटून राहूं या.

म्हणून ज्यांना बहुजनाच्या हिताची खरी काळजी आहे, त्या सर्व विचारी आणि जागृत राष्ट्रप्रेमी लोकांनीं, घरगुती उद्योगधंद्यांच्या चांगल्या आणि खऱ्या कार्याला मदत करावी. सत्ता हातांत येऊन अर्थसंपत्तीचें सर्व उत्पादन, देवघेव आणि वांटप व व्यय हीं अधिकांत अधिक लोकांच्या योग्य कल्याणाच्या अधिकांत अधिक कामीं लावतां येत नाहींत तोंपर्यंत, वर सांगितलेल्या मदतीची अतिशय आवश्यकता आहे.

# विधायक कार्यक्रम आणि क्रांति

६

समाजसत्तावादी आणि कम्युनिस्ट या पंथांतील एका गटाची विचारसरणी अशी आहे कीं, चरखा, ग्रामोद्योग आणि एकंदरींत कॉंग्रेसचा सगळाच विधायक कार्यक्रम लोकांची स्थिति सुधारण्यास भागशः मदत करितो. लोकांची गरीबी, अधोगति आणि गुलामगिरी यांवरील खरा उपाय क्रांतींतूनच जन्मास येईल. बहुजनसमाजाच्या उन्नतीसाठीं ज्या कांहीं उपाययोजना अंशतः अमलांत आणण्याचा प्रयत्न होत आहे त्यामुळें क्रांतीच्या मुख्य प्रश्नाचा विसर पडेल, एक प्रकारची भूल मिळाल्यासारखें होऊन दुःखाचा विसर पडल्यासारखें वाटेल एवढेंच. सुधारणांनीं त्यांना कांहींसें संतुष्ट ठेवलें जातें. असंतोषाची धार त्यांमुळें बोथट होते. बंधनें अंगवळणीं पडतात. वस्तुस्थितीशीं निगडित असा जो वर्गविग्रह आणि मूलभूत झगडा आहे त्यांचा सुधारणामुळें विसर पडतो. आतांपर्यंत परिस्थिति पूर्णपणें असह्य झाल्याखेरीज क्रांतीचा उद्भव गतकालांत कधींहि झालेला नाहीं. ती जितकी जास्त अन्यायी होती तितकीच

तिची प्रतिक्रियां तीव्र होती आणि क्रांतीनंतरची परिस्थिती त्याच प्रमाणांत सुधारलेली आढळते.

मानवतेच्या दृष्टीनें अगदीं खालच्या कोटीला पोचलेल्या समाजाची फक्त सुधारणा करण्यासाठींच प्रयत्न करावेत असें नाहीं, अशी सहेतुक आणि विवेचक दृष्टि ठेविली आणि तिचा परिणाम जर गरीबी आणि अधोगति यांची वाढच होण्यांत झाला; नव्हे तीमुळें कांहीं जीव गमावले तरी तिचा समतोल मनानें, आणि तात्त्विक व शास्त्रीय भूमिकेवरून स्वीकार केला पाहिजे आणि तसें करतांना ज्यांच्यावर आपली कांहीं हुकमत नाहीं अशा गोष्टींनीं घेतलेली आवश्यक किंमत म्हणून स्वतःचें समाधान करून घेतलें पाहिजे. असे सहन केलेले कष्ट, प्रसूतीच्या वेळीं सहन कराव्या लागणाऱ्या वेदनासारखे, रोगनिवारणासाठीं केलेल्या शस्त्रक्रियेसारखे मानले पाहिजेत. मानवतेनें अधोगतीचा आणि दुःखाचा पेला अगदीं शेवटल्या बिंदूपर्यंत प्राशन केला असेल तरच आपलीं बंधनें तोडून ती बाहेर पडूं शकेल.

समाजपुरुषाचा प्रलयापासून बचाव करण्यासाठीं एक क्रांति, सर्व परिस्थिति आणि मूल्यें आमूलाग्र बदलूं शकणारी नवी योजना होणें अपरिहार्य होईल अशी परिस्थिति प्राप्त होणें सहज शक्य आहे. सगळ्याच गोष्टी इतक्या समूळ सडल्या असतील कीं, प्रश्न सोडविण्याचे कुठलेहि उपाय निष्फळ ठरावेत. मूल्याचा आणि परिणामाचा आमूलाग्र बदल आवश्यक व्हावा. जुनी समाजव्यवस्था नव्या काळाच्या दृष्टीनें इतकी निराशाजनक झाली असेल आणि अधःपाताकडे, प्रलयाकडे आणि विनाशाकडे इतक्या वेगानें घसरत चालली असेल कीं, कसलेंहि सुव्यवस्थित, सरळ, सुज्ञ, सयुक्तिक आणि उत्क्रांतिमय कार्य तें सावरूं शकणार नाहीं आणि सुधारणा मागें पडून दररोज समाज अधिकाअधिक घसरगुंडीस लागेल. अशी परिस्थिति हीच शस्त्रक्रियेची वेळ असते आणि समाजांत त्यालाच क्रांति म्हणतात. अशी शस्त्रक्रिया आणि क्रांति अपरिहार्य ठरण्यासारखी एखादी परिस्थिति असूं शकेल.

हें सर्व जरी मान्य केलें तरी परिस्थितीचा बिकटपणा अगदीं पराकोटीला पोंचून त्याहून वाईट परिस्थति उत्पन्न होणें अशक्य झालें म्हणजेच क्रांति होते काय अशी शंका येणें साहजिक आहे. परंतु क्रांतीच्या इतिहासांत अशी अट असलेली दिसत नाहीं. कित्येक वेळां परिस्थिति क्रांतीला अत्यंत अनुकूल असतांही कांहींतरी निराळ्याच गोष्टीमुळें क्रांति टळल्याचें दिसून येतें. कांहीं वेळां परिस्थिति वाईट नसतांही कांहीं उत्साही लोकांनीं किंवा गटांनीं क्रांति घडवून आणिली असल्याचें दिसतें आणि कांहीं वेळां तर परिस्थितींत सुधारणा होत असतांनाच त्याचाच एक परिणाम म्हणून क्रांति घडून आली असेंहि आढळतें.

प्राचीन युगांतील गुलामांच्या परिस्थितीपेक्षां अधिक वाईट परिस्थिति असणें शक्य नाहीं. त्यांची संख्या पुष्कळ वेळां त्यांच्या धन्यांच्या संख्येपेक्षां जास्त होती. तरींही क्रांति झाली नाहीं. सध्यांच्या युगांत अमेरिकेंतील नीग्रो लोकांचें स्वातंत्र्य हा कांहीं नीग्रो चळवळीचा परिणाम नाहीं. त्यांचीही परिस्थिति मानवी आत्म्याला आणि शरीराला असह्य वाटावी अशीच आहे. प्राचीन रोममधील बहुजनसमाजाची परिस्थिति गुलामांच्या इतकी खराब नसतांही त्यांनीं क्रांति घडवून आणली. मध्ययुगीन युरोपांत आजच्या युरोपांतील बहुजनसमाजापेक्षां अधिक वाईट परिस्थितींत असलेला बहुजनसमाज होता. तरीसुद्धां कांहीं थोड्या शेतकऱ्यांच्या उठावापलीकडे ते कांहींच करूं शकले नाहींत आणि त्यांचा तो उठावहि रक्तपातानें बंद करण्यांत आला. राजे आणि जमीनदार यांच्याविरुद्ध आधुनिक कालांत होत असलेली समाजवादी क्रांति घडवून आणणारे लोक आर्थिक दृष्टच्या अधोगतीस गेलेले नव्हते. उलटपक्षीं त्यांची परिस्थिति बरी होती, उत्तरोत्तर चांगली होत होती आणि पैसा जास्त मिळून त्यांची सुखासीन वृत्ति वाढत होती. अमेरिकन राज्यक्रांति गरीबीचा राक्षस ठार करण्यासाठीं नव्हती तर स्वतःच्या हक्क—जो त्यांना आपला जन्मसिद्ध हक्क वाटत होता तो—स्वतःचें राजकीय आणि आर्थिक भवितव्य ठरविण्याचा हक्क—स्वतःकडे असावा यासाठीं ती राज्यक्रांति

झाली होती. आपल्या समाजसत्तावादी मित्रांनीं आधार म्हणून जर फ्रेंच राज्यक्रांतीचें उदाहरण आपल्या डोळ्यापुढें ठेवलें तर तेंहि गैरलागू ठरेल. खालच्या गरीब वर्गांतील शेतकऱ्यांची परिस्थिति त्यावेळीं सुधारत होती. जे त्या कालापूर्वीं त्यांनीं शांततेनें सहन केलें तें सहन होईना म्हणून राज्यक्रांति घडून आली असें नव्हे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या जन्मसिद्ध हक्काबद्दलच्या लोकांच्या कल्पना आणि ज्या परिस्थितींत ते रहात होते ती परिस्थिति यांत जमीन-अस्मानाचा फरक होता. या तत्त्वांची त्यांना बरोबर कल्पना नव्हती किंवा त्याच्यामागील तर्कशास्त्र त्यांना स्पष्ट समजलें नसलें तरी त्या काळच्या तत्त्वज्ञान्यांनीं या तत्त्वांचा प्रचार केला. यांपैकीं कांहींचा तर प्रत्यक्ष वस्तुस्थितीशीं कांहींही संबंध नव्हता. तरीहि मोठ मोठ्या इतिहासकारांनीं एक अद्वितीय गोष्ट म्हणून फ्रेंचराज्यक्रांतीचा उल्लेख केला नाहीं का? अगदीं परवां घडलेली रशियन राज्यक्रांति ही एवढीच एक अशी घटना आहे कीं, जिच्या पूर्वींच्या काळांत बहुजनसमाजांची आर्थिक परिस्थिति अतिशय बिकट झाली होती. परंतु ती परिस्थिति महायुद्धानंतरच्या परिणामांतून उत्पन्न झालेली आणि बजबजपुरींतून निर्माण झालेली होती. महायुद्धापूर्वीं गुलामगिरीचें उच्चाटन झाल्यामुळें रशियांतील शेतकरीवर्गाची परिस्थिति गुलामगिरीच्या आणि उद्योगधंद्याच्या पूर्वींच्या काळापेक्षां सुधारली होती. मध्ययूरोपांतील इतर देशांतली सर्व साधारण आर्थिक परिस्थिति जवळ जवळ तशीच होती. जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी वगैरे सर्व देशही रशियाप्रमाणेंच संत्रस्तावस्थेंत होते. तरीपण तेथें क्रांति झाली नाहीं आणि आजही ते देश तसेच आर्थिकदृष्ट्या संत्रस्त आहेत; तरी पण क्रांतीचीं पूर्वचिन्हें अजून तेथें दिसूं लागलेलीं नाहींत. रशियन राज्यक्रांतीचा सूक्ष्मपणें अभ्यास करणारा विद्यार्थी त्यांत योगायोगाचा खेळ कितीतरी आहे हें ओळखल्याशिवाय राहाणार नाहीं. त्या वेळीं कित्येक प्रसंग असे होते कीं, एखादा जरी डाव हुकला असता तरी

समळें ऑफस झालें असतें. कांहीं वेळां तर योजकांनीं ठरविल्याबरहुकूम योजना पार पडल्या नाहींत म्हणूनच यश मिळालें.

वरील उदाहरणें पाश्चिमात्य देशाच्या इतिहासांतून मी घेतलीं आहेत. कारण *तिकडील इतिहासच ऐतिहासिक उत्क्रांति योग्य रीतीनें दाखवितो*, अशी आधुनिकांची समजूत आहे. आशियाच्या इतिहासांत अव्याहत चढउतार *दिसतात. त्यामुळें कोणत्या विशिष्ट दिशेनें घटनांचा ओघ* चालला आहे तें ठरविणें मोठें कठिण आहे. कधीं कधीं प्रगति आणि दिव्यत्व दर्शविणारा काळ तेथें दिसतो; तर कधीं निःशब्दपणें अधोगति आणि विस्कळितपणा चालू राहिलेले दीर्घ कालखंड आढळतात; तर कधीं कधीं बऱ्याच काळांत कांहींहीं घटना न घडतां शांततेनें कालक्रमण होऊन गोंधळ माजलेला दिसतो. तरीसुद्धां आशियाच्या इतिहासांत नोंदलीं गेलेलीं क्रांतीचीं कांहीं उदाहरणें येथें देणें अयोग्य ठरणार नाहीं. त्यांपैकीं बहुतेकांचा संबंध धार्मिक अथवा राजकीय महत्त्व असलेल्या व्यक्तीशीं निगडित होता. जीवनाच्या एकूण एक क्षेत्रांस व्यापणारा असा बुद्धधर्म, ख्रिश्चनधर्म किंवा इस्लामधर्म यांइतकी कुठलीच विलक्षण: प्रभावी क्रांति-कारक घटना असूं शकणार नाहीं. तरीपण हे धर्मसंस्थापक जन्मले नसते तर हिंदुस्थान, अरबस्तान आणि इतर देशांतील समाज वर्षानुवर्षें कांहींही बदल न होतां तसेच चालत राहिले असते. राजकीय क्षेत्रांत शिकंदर, जूलियस सीझर, कॉन्स्टँटिन, अकबर, शिवाजी इत्यादि व्यक्ति उदय पावल्या. त्यांनीं मोठाल्या राजक्रांत्या घडवून आणल्या. संस्कृति आणि समाजजीवन यांना त्यांनीं हलवून सोडलें. परंतु बुद्धिवंतांच्या व्यक्तित्वाच्या उत्कर्षास कारणीभूत होणारी परिस्थिति असूनहि जर कोणी महापुरुष निर्माण झाला नसेल तर वस्तुतः असें घडलें आहे कीं, समाजानें आपल्या चालत आलेल्या पद्धतींत बऱ्याच कालावधींत यत्किंचितही फरक केला नाहीं. या सर्व घडामोडी—त्या क्रांतिमय होत्या यांत शंकाच नाहीं — कोठल्याहि भौतिक वा आर्थिक परिस्थितीच्या असह्यतेमुळें घडून आलेल्या नाहींत. व्यक्तीमधील प्रकृतिभेदाइतकींच

आणि परिस्थितीच्या विविधतेइतकींच या घडामोडींचीं कारणें विविध होतीं.

हिंदुस्थानांतील हरिजनांचें उदाहरण घ्या. *मानवसमाजाचा एक मोठा भाग इतक्या दलित आणि पतित अवस्थेमध्यें, इतक्या शारीरिक व नैतिक ऱ्हासापर्यंत गेल्याची परिस्थिति प्राचीन किंवा आधुनिक गुलाम*-गिरीच्या काळांतहि आढळणार नाहीं. आणि तरीही कोठेंहि त्यामुळें क्रांति झालेली नाहीं. आजची चळवळ हीसुद्धां त्यांनीं सुरू केलेली नसून उच्च वर्गांतूनच आलेली आहे. अमेरिकेंतील नीग्रो लोकांच्या चळवळीचा वृत्तांतही हाच आहे. नीग्रो आणि अस्पृश्य समाजांत आज जी काय थोडीबहुत हालचाल दिसते ती त्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाच्या लोकांनीं त्यांच्यासाठीं केलेल्या कार्यांतून उद्‌भवली आहे.

पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील वरील उदाहरणांवरून ज्या परिस्थितींत क्रांतीचा हमखास जन्म होतो अशी कोणतीहि ठराविक परिस्थिति असूं शकत नाहीं हें सिद्ध होतें. अशी क्रांतीची अपरिहार्यता संभवतच नाहीं. क्रांतीचीं कारणें म्हणून इतिहासकारांनीं काहीं घटना दाखविल्या तरी त्या क्रांतीनंतर झालेल्या असतात. आणि तीं कारणेंसुद्धां इतकीं विपुल, विभिन्न, आणि देशांतील त्यावेळच्या प्रत्यक्ष परिस्थितीवर आणि त्या परिस्थितीच्या रंगभूमीवर वावरणाऱ्या व्यक्तींवर इतकीं आधारलेलीं असतात कीं, क्रांतिपूर्व घटनांचीं शास्त्रशुद्ध जंत्री करणें जवळ जवळ अशक्य आहे. प्रत्येक घटना आपापल्यापरीनें अद्वितीय असते. जर अशी कांहीं कारणपरंपरा तिच्यामागें असलीच तर ती भौतिक स्वरूपाची नसून मानसिक आणि विशिष्ट मतप्रणालीच्या स्वरूपाची असते.

जगांत वस्तुस्थिति काय आहे आणि काय असावी याबद्दलच्या लोकमतांत मोठी तफावत असणें ही अशीच एक परिस्थिति आहे. आर्थिक आणि भौतिक परिस्थिति अगदीं असह्य झालीच पाहिजे असें नाहीं. परिस्थिति आणि जीविताकांक्षा यांत अत्यंत तीव्र तफावत पड-

समळें ओंफस झालें असतें. कांहीं वेळां तर योजकांनीं ठरविल्याबरहुकूम योजना पार पडल्या नाहींत म्हणूनच यश मिळालें.

वरील उदाहरणें पाश्चिमात्य देशाच्या इतिहासांतून मी घेतलीं आहेत. कारण तिकडील इतिहासच ऐतिहासिक उत्क्रांति योग्य रीतीनें दाखवितो, अशी आधुनिकांची समजूत आहे. आशियाच्या इतिहासांत अव्याहत चढउतार दिसतात. त्यामुळें कोणत्या विशिष्ट दिशेनें घटनांचा ओघ चालला आहे तें ठरविणें मोठें कठिण आहे. कधीं कधीं प्रगति आणि दिव्यत्व दर्शविणारा काळ तेथें दिसतो; तर कधीं निःशब्दपणें अधोगति आणि विस्कळितपणा चालू राहिलेले दीर्घ कालखंड आढळतात; तर कधीं कधीं बऱ्याच काळांत कांहींहीं घटना न घडतां शांततेनें कालक्रमण होऊन गोंधळ माजलेला दिसतो. तरीसुद्धां आशियाच्या इतिहासांत नोंदलीं गेलेलीं क्रांतीचीं कांहीं उदाहरणें येथें देणें अयोग्य ठरणार नाहीं. त्यांपैकीं बहुतेकांचा संबंध धार्मिक अथवा राजकीय महत्त्व असलेल्या व्यक्तींशीं निगडित होता. जीवनाच्या एकूण एक क्षेत्रांस व्यापणारा असा बुद्धधर्म, ख्रिश्चनधर्म किंवा इस्लामधर्म यांइतकी कुठलीच विलक्षण प्रभावी क्रांति-कारक घटना असूं शकणार नाहीं. तरीपण हे धर्मसंस्थापक जन्मले नसते तर हिंदुस्थान, अरबस्तान आणि इतर देशांतील समाज वर्षानुवर्षें कांहींही बदल न होतां तसेच चालत राहिले असते. राजकीय क्षेत्रांत शिकंदर, जूलियस सीझर, कॉन्स्टँटिन, अकबर, शिवाजी इत्यादि व्यक्ति उदय पावल्या. त्यांनीं मोठाल्या राजक्रांत्या घडवून आणल्या. संस्कृति आणि समाजजीवन यांना त्यांनीं हलवून सोडलें. परंतु बुद्धिवंतांच्या व्यक्तित्वाच्या उत्कर्षास कारणीभूत होणारी परिस्थिति असूनहि जर कोणी महापुरुष निर्माण झाला नसेल तर वस्तुतः असें घडलें आहे कीं, समाजानें आपल्या चालत आलेल्या पद्धतींत बऱ्याच कालावधींत यत्किंचितही फरक केला नाहीं. या सर्व घडामोडी—त्या क्रांतिमय होत्या यांत शंकाच नाहीं — कोठल्याहि भौतिक वा आर्थिक परिस्थितीच्या असह्यतेमुळें घडून आलेल्या नाहींत. व्यक्तीमधील प्रकृतिभेद इतकींच

आणि परिस्थितीच्या विविधतेइतकींच या घडामोडींचीं कारणें विविध होतीं.

हिंदुस्थानांतील हरिजनांचें उदाहरण घ्या. मानवसमाजाचा एक मोठा भाग इतक्या दलित आणि पतित अवस्थेमध्यें, इतक्या शारीरिक व नैतिक ऱ्हासापर्यंत गेल्याची परिस्थिति प्राचीन किंवा आधुनिक गुलामगिरीच्या काळांतहि आढळणार नाहीं. आणि तरीही कोठेंहि त्यामुळें क्रांति झालेली नाहीं. आजची चळवळ हीसुद्धां त्यांनीं सुरू केलेली नसून उच्च वर्गांतूनच आलेली आहे. अमेरिकेंतील नीग्रो लोकांच्या चळवळीचा वृत्तांतही हाच आहे. नीग्रो आणि अस्पृश्य समाजांत आज जी काय थोडीबहुत हालचाल दिसते ती त्यांच्यापेक्षां वरच्या दर्जाच्या लोकांनीं त्यांच्यासाठीं केलेल्या कार्यांतून उद्‌भवली आहे.

पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील वरील उदाहरणांवरून ज्या परिस्थितींत क्रांतीचा हमखास जन्म होतो अशी कोणतीहि ठराविक परिस्थिति असूं शकत नाहीं हें सिद्ध होतें. अशी क्रांतीची अपरिहार्यता संभवतच नाहीं. क्रांतीचीं कारणें म्हणून इतिहासकारांनीं काहीं घटना दाखविल्या तरी त्या क्रांतीनंतर झालेल्या असतात. आणि तीं कारणेंसुद्धां इतकीं विपुल, विभिन्न, आणि देशांतील त्यावेळच्या प्रत्यक्ष परिस्थितीवर आणि त्या परिस्थितीच्या रंगभूमीवर वावरणाऱ्या व्यक्तीवर इतकीं आधारलेलीं असतात कीं, क्रांतिपूर्व घटनांचीं शास्त्रशुद्ध जंत्री करणें जवळ जवळ अशक्य आहे. प्रत्येक घटना आपापल्यापरीनें अद्वितीय असते. जर अशी कांहीं कारणपरंपरा तिच्यामागें असलीच तर ती भौतिक स्वरूपाची नसून मानसिक आणि विशिष्ट मतप्रणालीच्या स्वरूपाची असते.

जगांत वस्तुस्थिति काय आहे आणि काय असावी याबद्दलच्या लोकमतांत मोठी तफावत असणें ही अशीच एक परिस्थिति आहे. आर्थिक आणि भौतिक परिस्थिति अगदीं असह्य झालीच पाहिजे असें नाहीं. परिस्थिति आणि जीविताकांक्षा यांत अत्यंत तीव्र तफावत पड-

[illegible] असा कोणी द्रष्टा त्या काळीं जन्मास यावा लागतो. असा द्रष्टा कांहींसा अद्भुत असाच असतो.

जर ही तफावत मोठी असेल तर क्रांतीची अपेक्षा करणें योग्य ठरेल. पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रांतील अनेक क्रांतींनीं हें सिद्ध केलें आहे. जेव्हां भयंकर बदल घडून येतात तेव्हां त्याच्या अगोदर नेहमींच मानसिक अस्वस्थता तीव्र असल्याचें दिसून येतें. आर्थिक प्रश्नांना अवास्तव महत्त्व देण्याची पद्धत ही आधुनिक आहे. आजचा यूरोपीय बहुजनसमाज ज्या परिस्थितींत कालक्रमणा करीत आहे ती शतकापूर्वींच्या त्यांच्या बापजाद्यांच्या परिस्थितीपेक्षां कितीतरी सुखावह आहे. तरीपण जुनी परिस्थिति त्या लोकांनीं सहन केली. त्याचें कारण ती पूर्वनियोजित अटळ आणि म्हणूनच आवश्यक आणि न्याय्य आहे असें त्यावेळीं त्यांना वाटत होतें. न्याय, समता, मनुष्याचे हक्क आणि विज्ञान शास्त्रांतील शोध यांनीं असें दाखविलें आहे कीं, क्रांतीसाठीं अशी भौतिक परिस्थिति असणें अपरिहार्य आहे किंवा आवश्यक आहे असें नाहीं. जी वस्तुस्थिति अन्याय्य आहे. ज्या श्रद्धेमुळें पूर्वकाळीं लोकांना हें सर्व सुसह्य होत असे ती आतां नष्ट झाली आहे. नोकर आणि धनी यांचे संबंध केवळ व्यापारी आणि तात्कालिक असे ठरले आहेत. मोठमोठ्या कारखान्यांत तर ते तुटलेच आहेत. प्रेम आणि भावना यांचे बंधही अदृश्य झाले आहेत. जें सध्यां आहे तें पूर्वीपेक्षां भौतिक किंवा आर्थिकदृष्ट्या पूर्वींच्या मानानें वाईट नाहीं. परंतु पूर्वींच्या मानानें ही सुधारलेली अवस्थाही शांतपणानें सहन करण्यास लोक आतां तयार नाहींत. परिस्थिति वाईट झालेली नाहीं पण लोकांचीं मूल्यें आतां बदललीं आहेत. चूक आणि बरोबर, न्याय्य आणि अन्याय्य, इमान आणि कृतज्ञता यांविषयींच्या कल्पना, थोडक्यांत म्हणजे त्यांच्या नैतिक मूल्यांत क्रांतिकारक बदल झाला आहे. जेव्हां जेव्हां भावना आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिति यांच्यांतील अंतर जास्त जास्त वाढत जातें तेव्हां समाज एका आणीबाणीच्या आणि अस्थिर अवस्थेस पोहोचतो.

ज्या समतोलपणावर जीवित उभारलेलें असतें तो समतोलपणा डळमळीत होतो. अर्थातच पुनः पूर्वीसारखी समतोल अवस्था स्थापन होण्यास सहाय्यक अशी एखादी घटना त्या वेळीं दिसूं लागण्याचा संभव असतो.

दुसरी अशी मानसिक परिस्थिति म्हटली म्हणजे याहून चांगली परिस्थिति उत्पन्न करण्याची शक्यता आहे अशी आशा मनुष्याच्या मनांत निर्माण होणें ही होय. ही नवी आशा म्हणजे अखिल मानवतेला हांक मारणारी तुतारीच होय. ‘ स्वर्गाचें राज्य तुमच्या अगदीं जवळ आलें आहे, तयार व्हा. ’ अशा या ख्रिस्ताच्या आदेशाप्रमाणेंच ही आशा असते. या आशेची उभारणी श्रद्धेवर होत असते. ती क्वचितच विवेकावर उभारलेली असते. मानवतेच्या प्रगतिमार्गांत मधून मधून एखाद्या व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होणारा उत्साह, आणि आकांक्षा यांचा तो परिणाम असतो. मग त्याच्या मागें एखादी व्यक्ति असो, एखादा सिद्धांत असो, किंवा एखादी विशेष घटना असो. त्या व्यक्तीकडे विवेचक दृष्टीनें पाहिल्यास ती नाटकी, लहरी, बेछूट किंवा विकृत मनोवृत्तीचीहि ठरू शकेल. तीं ध्येयवाक्यें शब्दांत सांगितलेलीं अर्धसत्यें, लोकांना उच्चारावयास अगदीं सोपीं, आणि विरोधकांचे तोंडावर स्वसंरक्षण व प्रतिकार यांचें साधन म्हणून पुढें करण्याजोगीं असतात. “ मनुष्याचे जन्मसिद्ध हक्क, ” “ स्वातंत्र्य, समता आणि बंधुता, ” “ अतिरिक्त मूल्य ” अशासारखीं तीं असतात. ती घटना, तो देश आणि तो काळ यांच्याखेरीज इतर कशाशींही संबद्ध नसेल. मनुष्याच्या मनांत आशा कशी उत्पन्न होते हें सर्वज्ञ अशा अंतर्मानसशास्त्रज्ञालाही अज्ञात आहे. ती जेव्हां मनुष्यसमाज उन्नतीच्या मार्गावर असेल तेव्हां उत्पन्न होणें शक्य असते. प्रत्यक्ष परिस्थिति सुधारण्याच्या इच्छेमुळें बहुधा ती उत्पन्न होते. सध्यांच्या दलित बहुजनसमाजाची आशा अशाच प्रकारची आहे. न्याय आणि समता या कल्पनांतून जें निर्माण झालें आहे, जें १९ व्या शतकांतील महात्मे आणि अखिल मानवसमाजा-

त्याचें त्यांच्या दृष्टीस करून त्यानें जसा कोणी द्रष्टा त्या काळीं जन्मास यावा लागतो. असा द्रष्टा काहींसा अद्भुत असाच असतो.

जर ही तफावत मोठी असेल तर क्रांतीची अपेक्षा करणें योग्य ठरेल. पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रांतील अनेक क्रांतींनीं हें सिद्ध केलें आहे. जेव्हां भयंकर बदल घडून येतात तेव्हां त्याच्या अगोदर नेहमींच मानसिक अस्वस्थता तीव्र असल्याचें दिसून येतें. आर्थिक प्रश्नांना अवास्तव महत्त्व देण्याची पद्धत ही आधुनिक आहे. आजचा यूरोपीय बहुजनसमाज ज्या परिस्थितींत कालक्रमणा करीत आहे ती शतकापूर्वींच्या त्यांच्या बापजाद्यांच्या परिस्थितीपेक्षां कितीतरी सुखावह आहे. तरीपण जुनी परिस्थिति त्या लोकांनीं सहन केली. त्याचें कारण ती पूर्वनियोजित अटळ आणि म्हणूनच आवश्यक आणि न्याय्य आहे असें त्यावेळीं त्यांना वाटत होतें. न्याय, समता, मनुष्याचे हक्क आणि विज्ञान शास्त्रांतील शोध यांनीं असें दाखविलें आहे कीं, क्रांतीसाठीं अशी भौतिक परिस्थिति असणें अपरिहार्य आहे किंवा आवश्यक आहे असें नाहीं. जी वस्तुस्थिति अन्याय्य आहे. ज्या श्रद्धेमुळें पूर्वकाळीं लोकांना हें सर्व सुसह्य होत असे ती आतां नष्ट झाली आहे. नोकर आणि धनी यांचे संबंध केवळ व्यापारी आणि तात्कालिक असे ठरले आहेत. मोठमोठ्या कारखान्यांत तर ते तुटलेच आहेत. प्रेम आणि भावना यांचे बंधही अदृश्य झाले आहेत. जें सध्यां आहे तें पूर्वींपेक्षां भौतिक किंवा आर्थिकदृष्ट्या पूर्वींच्या मानानें वाईट नाहीं. परंतु पूर्वींच्या मानानें ही सुधारलेली अवस्थाही शांतपणानें सहन करण्यास लोक आतां तयार नाहींत. परिस्थिति वाईट झालेली नाहीं पण लोकांचीं मूल्यें आतां बदललीं आहेत. चूक आणि बरोबर, न्याय्य आणि अन्याय्य, इमान आणि कृतज्ञता यांविषयींच्या कल्पना, थोडक्यांत म्हणजे त्यांच्या नैतिक मूल्यांत क्रांतिकारक बदल झाला आहे. जेव्हां जेव्हां भावना आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिति यांच्यांतील अंतर जास्त जास्त वाढत जातें तेव्हां समाज एका आणीबाणीच्या आणि अस्थिर अवस्थेस पोहोचतो.

ज्या समतोलपणावर जीवित उभारलेलें असतें तो समतोलपणा डळमळीत होतो. अर्थातच पुनः पूर्वीसारखी समतोल अवस्था स्थापन होण्यास सहाय्यक अशी एखादी घटना त्या वेळीं दिसूं लागण्याचा संभव असतो.

दुसरी अशी मानसिक परिस्थिति म्हटली म्हणजे याहून चांगली परिस्थिति उत्पन्न करण्याची शक्यता आहे अशी आशा मनुष्याच्या मनांत निर्माण होणें ही होय. ही नवी आशा म्हणजे अखिल मानवतेला हांक मारणारी तुतारीच होय. ‘ स्वर्गाचें राज्य तुमच्या अगदीं जवळ आलें आहे, तयार व्हा. ’ अशा या ख्रिस्ताच्या आदेशाप्रमाणेंच ही आशा असते. या आशेची उभारणी श्रद्धेवर होत असते. ती क्वचितच विवेकावर उभारलेली असते. मानवतेच्या प्रगतिमार्गांत मधून मधून एखाद्या व्यक्तीच्या मनांत उत्पन्न होणारा उत्साह, आणि आकांक्षा यांचा तो परिणाम असतो. मग त्याच्या मागें एखादी व्यक्ति असो, एखादा सिद्धांत असो, किंवा एखादी विशेष घटना असो. त्या व्यक्तीकडे विवेचक दृष्टीनें पाहिल्यास ती नाटकी, लहरी, बेछूट किंवा विकृत मनोवृत्तीचीहि ठरूं शकेल. तीं ध्येयवाक्यें शब्दांत सांगितलेलीं अर्धसत्यें, लोकांना उच्चारावयास अगदीं सोपीं, आणि विरोधकांचे तोंडावर स्वसंरक्षण व प्रतिकार यांचें साधन म्हणून पुढें करण्याजोगीं असतात. “ मनुष्याचे जन्मसिद्ध हक्क, ” “ स्वातंत्र्य, समता आणि बंधुता, ” “ अतिरिक्त मूल्य ” अशासारखीं तीं असतात. ती घटना, तो देश आणि तो काळ यांच्याखेरीज इतर कशाशींही संबद्ध नसेल. मनुष्याच्या मनांत आशा कशी उत्पन्न होते हें सर्वज्ञ अशा अंतर्मानसशास्त्रज्ञालाही अज्ञात आहे. ती जेव्हां मनुष्यसमाज उन्नतीच्या मार्गावर असेल तेव्हां उत्पन्न होणें शक्य असते. प्रत्यक्ष परिस्थिति सुधारण्याच्या इच्छेमुळें बहुधा ती उत्पन्न होते. सध्यांच्या दलित बहुजनसमाजाची आशा अशाच प्रकारची आहे. न्याय आणि समता या कल्पनांतून जें निर्माण झालें आहे, जें १९ व्या शतकांतील महात्मे आणि अखिल मानवसमाजा-

विषयीं कळवळा वाटणाऱ्या लोकांनीं प्रसृत केलें आहे आणि जें कित्येक कामगार संघांनीं आपले प्रयत्न, कष्ट आणि त्याग यांच्या जोरावर मिळविलें आहे त्याच्या आधारावर ती आशा उत्पन्न झाली आहे. जरी परिस्थिति सुधारली तरी आशा वाढत जाते. कारण तिची उत्पत्ति दुर्बलता आणि निराशा यांतून झालेली नसून शक्ति, प्रगति आणि भावी कालाचीं स्वप्नें यांतून झालेली असते. प्रत्यक्ष परिस्थिति असह्य होते, म्हणून तिचा जन्म होतो असें नाहीं तर भावी कालाचे रंग, आकर्षक, मोहक, भडक असे इंद्रधनुष्यासारखे असतात म्हणून त्याविषयीं ओढ वाटूं लागते.

राजकीय, सामाजिक अगर धार्मिक क्रांतीशीं संलग्न अशी आणखी एक गोष्ट आहे. ती म्हणजे एका व्यक्तीच्या मनांत ही नवी आशा, ही नवी श्रद्धा, ही नवी कल्पना, हा नवीन आदेश, प्रथम ठाणें देतो. आपल्या स्वतःच्या वैयक्तिक जीवनांत एखाद्या व्यक्तीला या सर्वांचा जितका 'भरणा' करून घेतां येणें शक्य असतें तितका तो त्याजवळ असतो. एखादा कल्पनेचें वेड शिरलेला मनुष्य म्हणजे कार्य हातीं घेतलेली एक धुरंधर व्यक्ति असते. ती त्याच कार्यांत जगते आणि वावरते, तिचें सर्व जीवन त्याच कार्यासाठीं असतें. तिचें कार्य तिला सगळीकडून बांधून टाकतें. ती एखाद्या वेड्याप्रमाणें बनते. कितीही कष्ट, त्रास, त्याग तिला थोडाच वाटतो. जीवनमरणाची तिला कांहींच किंमत नसते. ती एक कल्पना म्हणजेच सगळें कांहीं असा भारलेला मनुष्य जिवावर उदार झालेला असतो. त्यामुळें त्याचा स्पर्शही परिणाम-कारक होतो. आपल्यासमोर असलेलें सर्व, तो आपल्या बरोबर नेतो. आपल्या सहकाऱ्यांना तो जवळ जवळ मंत्रमुग्ध करतो. त्याचा तर्कवाद आणि कार्यकारणभाव त्या वेळीं कोणालाच पटत नाहींत. तरी ते त्याच्या मागें जातात. तो स्वतःमध्यें आणि इतरांमध्यें अशी एक चेतना उत्पन्न करतो कीं, दुसऱ्याला कांहीं काळपर्यंत तो सर्वांत वरचढ असतो. त्यानंतर असेंही आढळून आलें आहे कीं, एकदां ती कल्पना पार पडली आणि यशस्वी झाली आणि ती व्यक्ति मात्र टिकून राहिली

विषयीं कळवळा वाटणाऱ्या लोकांनीं प्रसृत केलें आहे आणि जें कित्येक कामगार संघांनीं आपले प्रयत्न, कष्ट आणि त्याग यांच्या जोरावर मिळविलें आहे त्याच्या आधारावर ती आशा उत्पन्न झाली आहे. जरी परिस्थिति सुधारली तरी आशा वाढत जाते. कारण तिची उत्पत्ति दुर्बलता आणि निराशा यांतून झालेली नसून शक्ति, प्रगति आणि भावी कालाचीं स्वप्नें यांतून झालेली असते. प्रत्यक्ष परिस्थिति असह्य होते, म्हणून तिचा जन्म होतो असें नाहीं तर भावी कालाचे रंग, आकर्षक, मोहक, भडक असे इंद्रधनुष्यासारखे असतात म्हणून त्याविषयीं ओढ वाटूं लागते.

राजकीय, सामाजिक अगर धार्मिक क्रांतीशीं संलग्न अशी आणखी एक गोष्ट आहे. ती म्हणजे एका व्यक्तीच्या मनांत ही नवी आशा, ही नवी श्रद्धा, ही नवी कल्पना, हा नवीन आदेश, प्रथम ठाणें देतो. आपल्या स्वतःच्या वैयक्तिक जीवनांत एखाद्या व्यक्तीला या सर्वांचा जितका ‘ भरणा ’ करून घेतां येणें शक्य असतें तितका तो त्याजवळ असतो. एखाद्या कल्पनेचें वेड शिरलेला मनुष्य म्हणजे कार्य हातीं घेतलेली एक धुरंधर व्यक्ति असते. ती त्याच कार्यांत जगते आणि वावरते, तिचें सर्व जीवन त्याच कार्यासाठीं असतें. तिचें कार्य तिला सगळीकडून बांधून टाकतें. ती एखाद्या वेड्याप्रमाणें बनते. कितीही कष्ट, त्रास, त्याग तिला थोडाच वाटतो. जीवनमरणाची तिला कांहींच किंमत नसते. ती एक कल्पना म्हणजेच सगळें कांहीं असा भारलेला मनुष्य जिवावर उदार झालेला असतो. त्यामुळें त्याचा स्पर्शही परिणाम-कारक होतो. आपल्यासमोर असलेलें सर्व, तो आपल्या बरोबर नेतो. आपल्या सहकाऱ्यांना तो जवळ जवळ मंत्रमुग्ध करतो. त्याचा तर्कवाद आणि कार्यकारणभाव त्या वेळीं कोणालाच पटत नाहींत. तरी ते त्याच्या मागें जातात. तो स्वतःमध्यें आणि इतरांमध्यें अशी एक चेतना उत्पन्न करतो कीं, दुसऱ्याला कांहीं काळपर्यंत तो सर्वांत वरचढ असतो. त्यानंतर असेंही आढळून आलें आहे कीं, एकदां ती कल्पना पार पडली आणि यशस्वी झाली आणि ती व्यक्ति मात्र टिकून राहिली

तर तिची शक्ति नष्ट होते आणि त्याचें व्यक्तिमत्वही मागें पडतें. मनुष्यजातींतील तिच्या योग्य जागीं मग त्याची आपोआप रवानगी होते. त्याच्यांतील गुण निघून गेल्यासारखे वाटतात. स्वतः पूर्वी केलेल्या विलक्षण गोष्टी तो मग करूं शकत नाहीं. सामान्यतः त्याचें कार्य संपलें कीं, त्याचें अस्तित्वही दृष्टीआड होतें. परंतु तें कार्य संपेपर्यंत मात्र त्याचें आयुष्य अत्यंत रोमांचकारी वाटतें; कुणाचीही तलवार किंवा बंदूक त्याला स्पर्श करूं शकणार नाहीं असें दिसतें. त्याच्या शत्रूनें पेरलेल्या उत्कृष्ट योजनाही निष्फळ ठरतात. त्याला कांहीं खास दैवी संरक्षण असावें असा भास होतो. त्यानें जरी मागें जावयाचें ठरविलें तरी त्याला तें शक्य होत नाहीं. दैवाच्या अशा एका फेऱ्याच्या सपाट्यांत तो सांपडतो कीं, त्यामुळें त्याला, त्याच्या सहकाऱ्यांना किंवा त्याच्या विरोधकांना एक क्षणाचीही उसंत मिळत नाहीं. त्याचें कार्य झालेंच पाहिजे. क्रांति घडवून आणणाऱ्या व्यक्ति बहुतेक वेळां अशा असतात.

तेव्हां क्रांतीच्या पूर्वकालांत कारणात्मक असें जें कांहीं होणें आवश्यक असतें ते म्हणजे त्या जडवादी आर्थिक क्षेत्रांतील भूमिकेपेक्षां मानसिक आणि ध्येयवादी क्षेत्रांतीलच असणें अधिक शक्य आहे. बाह्य परिस्थिति केवळ जरूर ती पार्श्वभूमिका सजवितात. वस्तुतः क्रांतीसाठीं आवश्यक कारण या नात्यानें आर्थिक क्षेत्राच्या पार्श्वभूमिकेवर दिलेला हा जादा भर हा मार्क्सवादाचा एक सिद्धान्त आहे. जागतिक क्रांतीचा अर्थ केवळ आर्थिक क्षेत्रावर जादा भर देऊन लागत नाहीं. तो अधिक व्यापक आहे. ह्या मानसिक आणि ध्येयात्मक पार्श्वभूमीकडे लक्ष देऊनच सध्यांचे क्रांतिवादी कार्याच्या प्रसारावर जास्त भर देत आहेत. क्रांतिविरोधी म्हणून आपण ज्यांना म्हणतों ते त्या क्रांतिक्षम कल्पनांची शक्ति कमी कमी करीत असतात. त्यांचा विश्वास नेहमीं जुन्या आणि रूढिप्रिय कल्पनांवर असून जुन्या कल्पनांच्या नवीन अर्थाच्या प्रसारानें आणि प्रचारानें ते आपलें कार्य करण्याचा प्रयत्न करतात. जडवादी भूमिका आणि आर्थिक परिस्थिति सुसंगत असतांही हें विरोधी कार्य करण्याची

प्रेरणा प्रतिक्रांतिकारकांस होणें शक्य असतें. जें काय बदलतें तें म्हणजे त्याचें मूल्य, भावना आणि व्यक्ति. आणि म्हणून प्रत्येक क्रांति अधिक मतस्वातंत्र्याचा अतिशय अट्टाहास करीत असते. मतांमतांचा गलबला आणि विसंगति ही क्रांतीस विघातक अशीं भयंकर दुष्कृत्यें होत. धर्माच्या दृष्टीनें जे गुन्हे फांशीच्या अथवा जिवंत जाळण्याच्या शिक्षेस पात्र होतात त्यांत त्यांची गणना होते. ध्येयाखेरीज इतर कोणत्याही बाबतींतील विसंगति किंवा अश्रद्धा क्षणभर चालूं शकेल. त्या गुन्ह्यां-साठीं केली जाणारी शिक्षा कडक पाहिजे एवढेंच नव्हे तर तांतडीनें केली पाहिजे. कारण शारीरिक रोगांपेक्षांही विचार अधिक सांसर्गिक आहेत. विज्ञानाला माहीत असलेल्या कोठल्याही जंतूपेक्षां ते जास्त लौकर आणि अनंतपटीनें पसरतात. आणि ते अधिक विनाशकारक आहेत. ज्यांच्या हातीं प्रथम सत्ता असते त्यांच्यापेक्षां एखाद्या कल्पनेच्या जोरावर जे सत्ता हातीं घेतात त्यांना त्यांच्या शक्तीची किंमत चांगली कळते.

जुन्या कल्पनेला उचलून धरण्याची मोठीशी आवश्यकता नसते. मनुष्याची स्वाभाविक रूढिप्रियता, संवय, आणि फार काय आळस यांचाही तिला आधार म्हणून उपयोग होत असतो. खेरीज तिच्यावर लोकांचे पुष्कळसे मिरासदारीचे हितसंबंध आधारलेले असतात. नवीन कल्पनेस मात्र फक्त तिच्या स्वयंसिद्ध शक्तीचाच काय तो पाठिंबा असतो. जेव्हां तिच्यावर आघात होतो तेव्हां मागें आधार घेण्यास तिच्याजवळ लोकांची रूढिप्रियता, आळस किंवा मिरासदारांचे हितसंबंध यांचा आधार नसतो, कारण तिनें ते नष्ट केलेले असतात आणि नवीन प्रस्थापित करण्याला तिला सवड नसते. अर्थातच तिला दडपशाही करणें भाग पडतें आणि ती तावडतोब केली नाहीं तर नवीन क्रांतीचा गाडा तेव्हांच उलथून पडण्याचा संभव असतो. हेंच अफगाणिस्थानांत झालें असावें. अमा-नुल्लांनीं दिरंगाई केली. स्वतःच्या देशबांधवांचें रक्त सांडण्याचा हिय्या त्याला करवला नाहीं. लेनिन, केमालपाशा, मुसोलिनी, हिटलर आणि स्टॅलिन हे त्या मानानें पुरेसे कठोर होऊं शकले.

वास्तविक भौतिक आणि आर्थिक परिस्थिति हेच निर्णयात्मक घटक आहेत असें वादाकरितां क्षणभर गृहीत धरू या. ते तसे नाहींत असें आम्हाला वाटतें हें मात्र खरेंच आहे. तरीसुद्धां, इतिहास, राजकारण किंवा अर्थशास्त्र यांचा कोणताही विद्यार्थि क्रांति कधीं होईल हें खात्रीनें सांगूं शकणार नाहीं. ती वाटेल त्या दिवशीं घडून येईल. कदाचित् बराच कालपर्यंत ती येणारही नाहीं आणि दरम्यानच्या काळांत समाज स्वतःची पुनर्रचना करून घेईल. अशा परिस्थितींत आपल्या नजीकच्या कर्तव्या-पासून पराङ्मुख होणें अदूरदृष्टीचें ठरेल. एखाद्या डॉक्टरानें सबंध आळीची घाण दूर करण्याची व्यवस्था चालू असून ती ५० एक वर्षांत पूर्ण होईल आणि सगळ्या रोगांचें कारण समूळ नष्ट होईल या कारणास्तव प्रस्तुत रोग्यास औषध देण्याचें नाकारणें आणि मानवी जीवनांतील दुःखें कमी करण्यासाठीं कांहीं प्रयत्न न करणें या दोन्ही गोष्टी सारख्याच विघातक आहेत. योजना अमलांत आणण्याचा प्रयत्न करीत असतांना त्यानें तात्कडतोब अमलांत आणण्याचे उपायहि करीत राहिलेंच पाहिजे. जर त्यानें तसें केलें नाहीं तर डॉक्टर आणि रोगी यांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या अनुभवाविरूद्ध त्यानें वर्तन केलें असें होईल. जर डॉक्टरनें हे उपाय तावडतोब केले नाहींत तर त्याच्या दिरंगाईचा त्याच्या धंद्यावरच नव्हे तर एकंदर जनतेच्या मनावरही घातुक परिणाम होईल. वैयक्तिक गरीबी आणि दुःख यांकडे दुर्लक्ष केल्यास सुधारक आणि जनता यांच्यांतील संबंध दुरा-वत जाऊन वैयक्तिक दुःखाकडे दुर्लक्ष करण्याची लोकांना संवय होऊन त्यांचें दुःख दूर करण्याची इच्छा नष्ट होईल. एवढेंच नव्हे तर हेंच धोरण चालू राहिलें तर मनुष्यजात यंत्रासारखी आणि नुसत्या साधनासारखी होऊन बसेल. अमूक एखादें धोरण यशस्वी होत असेल तर मग कितीही हत्या त्यापायीं झाली तरी हरकत नाहीं. कित्येक स्त्री-पुरुष, कांहीं वेळां बरोबर तर कांहीं वेळां चुकीचें वर्तन करणाऱ्या हुषार लोकांच्या योजना अंमलांत आणणारीं बाहुलीं होतात. त्यांना स्वतःला अशा वेळीं कांहीं किंमत रहात नाहीं. अशा भयंकर कल्पनाच पूर्वकालांत कत्तली, राज्यक्रांति किंवा

रक्तपात यांना कारणीभूत झालेली आहेत. आजही त्यांच्यांतच झोटिंगशाही उलट जास्त यशस्वीपणें चालू आहे, कारण दडपशाहीचीं आणि सोटे-शाहीचीं आजचीं साधनें पूर्वीपेक्षां अधिक प्रभावशाली आहेत. मानवी जीवीतांचें पावित्र्य अशा रीतीनें नष्ट झालें आहे.

स्वार्थी सत्ताधारी, आक्रमक, विजेता आणि माथेफिरू मनुष्य, लोकांचा उपयोग स्वतःचा बडेजाव वाढविण्याच्या कामीं करून घेतो असें समर्थन सुधारणा करूं इच्छिणाऱ्यानें करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. तो तर उघड उघड माणसें यंत्रासारखीं उपयोगांत आणीत असतो! त्यांचें उदाहरण घेऊन सुधारक स्वतःचा बचाव करूं शकत नाहीं. कारण त्याचें उद्दिष्ट अधिक उच्च, आणि अधिक जनहितैषी असतें. स्वतः समोर आणि लोकांच्या समोर त्याला न्याय, दया, आणि मानवी जीवनाचा मितव्यय यांचा आदर्श ठेवावयाचा असतो. त्यानें उच्चतर मानदंड प्रस्थापित केला पाहिजे.

आमच्या विरोधकांचें म्हणणें भौतिक आणि आर्थिक परिस्थितीवर आधारलेलें असेल. परंतु तें कितीही साधार असलें तरी त्याचाच सारखा पाठलाग करीत राहण्यासारखें त्या म्हणण्यांत काय आहे? लोकांची वाईट परिस्थिति सुधारण्याच्या प्रयत्नांनीं यातनांची तीव्रता कमी होते आणि लोकमताच्या प्रक्षोभाची धार कमी होते. एवढ्याच सबबीवर आपण ती वाईट परिस्थिति तशीच पहात बसलों आणि ती सुधारण्याचे कांहींही प्रयत्न केले नाहींत तर त्याच न्यायानें कोणत्याहि नैसर्गिक आपत्तीचेंहि आपण स्वागत केलें पाहिजे. इतकेंच नव्हे तर थोडेंसें पुढें होऊन ती परिस्थिति आणखी बिघडविणें आणि असंतोष भडकविण्यास सहाय्य करणें हेंही मग समर्थनीय ठरण्यास काय हरकत आहे.? ज्यानें दुःस्थिति जास्तच दुःसह होईल असें कोणतेंही प्रक्षोभक कृत्य, त्यांतून क्रांति निर्माण होईल अशा अपेक्षेनें करावयासही काय हरकत आहे? अर्थात् प्रक्षोभाचा तडाखा नेमका प्रक्षोभास कारण होणाऱ्यावरच बसेल आणि क्रांतीनें ज्यांना पदच्युत करावयाचें आहे

त्यांच्यावरच आघात होतील अशी दक्षता घेतली पाहिजे. जर खोट्या प्रचारानें सत्ताधाऱ्यांच्या तोंडाला काळें फांसतां आलें तर तसेंही करण्यास हरकत नाहीं; मात्र त्यानें क्रांति जवळ आणली गेली पाहिजे. ह्याचाच अर्थ असा कीं, ज्याचा शेवट गोड तें सर्वच गोड !

सध्यांची नीति हें तत्त्व उघड उघड कबूल न करतां पण त्याच मार्गानें चालली आहे. विशेषतः राजकीय आणि सामाजिक जीवनांत तर हें विशेषच आढळून येतें. भूतकाळीं मात्र मानवी वर्तनाला रूढीची मर्यादा घालून दिलेली होती. सर्वांत मोठा क्रांतिकारक आणि अरेराव-सुद्धां त्यांचें उल्लंघन करूं शकत नव्हता. रूढीनें अशी एक सदसद्विवेक-बुद्धीची बोंचणी लागत असे कीं, तीमुळें वरील म्हणीचा अर्थ व्यावहारिक मर्यादेंत राहिला होता. कांहीं वेळां परिस्थितीचा दाब अतिशय वाढल्यामुळें ती मर्यादा उल्लंघिली गेली हें खरें, पण तो परिणाम तात्का-लिकच होता. सर्वांचा पाया, नीति व रूढि, यांवर भक्कम आधारलेला होता; फार काय लोकप्रिय अशा लौकिक भ्रमांनाही आधारासारखें महत्त्व होतें. आज नीति संशयास्पद झाली आहे; धर्म दुबळा झालेला आहे; लोक-भ्रमाची जागा शास्त्रानें घेतली आहे, अशा स्थितींत रूढि सारखी बदलत आहे.

अशा स्थितींत वरीलसारख्या भीतिप्रद आणि विनाशक तत्त्वानुसार वर्तन केल्यास मानवतेचा अंत शून्यवादांत ( Nihilism ) झाल्याखेरीज राहणार नाहीं. यशाशिवाय दुसरा कोठलाही मानदंड मनुष्य जातीच्या वर्तनास लावतां येणार नाहीं, यशाशिवाय कोठलाही आधार घेतां येणार नाहीं. या शून्यवादाचीं चिन्हें दिसूं लागलींच आहेत. यशाच्या नांवाखालीं समाजांतील दोन घटकांतील वैर मानवजातीला किती नीच कोटीला नेऊन बसवूं शकतें त्याचें उत्कृष्ट उदाहरण महायुद्धांत दिसलेंच; कारण प्रत्येक राष्ट्रानें आपापल्या ध्येयाचें समर्थन केलेंच होतें. निरनिराळ्या लष्करी छावण्यांत चाललेली शस्त्रास्त्रांची जमवाजमव, कारखाने, प्रयोगशाळा इत्यादि ठिकाणीं सध्यां चाललेली नव्या युद्धाची तयारी इतकी भयंकर

आहे कीं, अत्यंत निधड्या छातीच्या आणि बेडर माणसाला देखील थोडा वेळ थांबून सध्यांच्या नीतीचा पाया भक्कम आधारलेला आहे कीं नाहीं याचा विचार करण्याची वेळ आली आहे. कारण आतां सर्व साधनें संपूर्णपणें अंतिम परिणामापुढें दुय्यम ठरविण्यांत आलीं आहेत. साध्य आणि साधन या संज्ञा आपल्या बाबतींत परस्परवाचक आहेत असा गांधीजी आग्रह धरतात त्याचें कारण हेंच तर नसेल ना ?

एखाद्या गोष्टीची अगदीं काटेकोरपणें परीक्षा करणें कांहीं वेळां मनुष्याच्या विचारशक्तीला शक्य नसतें. याची मला जाणीव आहे. आपण मुख्यतः क्रियाप्रधान प्राणी आहोंत. आणि कार्यासाठींच आपण विचार करतों. म्हणून आपण आहोंत तशा स्थितींतही या भ्रमिष्ट लोकांच्या शर्यतींत पळतांना आपण विचार केला पाहिजे. प्रसंगविशेषीं स्थूल आणि तात्कालिक असे निर्णय घ्यावे लागतात. पुष्कळ लोकांचें आज किंवा भविष्यकाळीं संरक्षण व्हावें म्हणून आज कांहीं लोकांचा बळी घ्यावा लागेल. हजारों लोकांना घेऊन हजारों मैलांचें अंतर तोडण्यास निघालेले एखादे गांधी, रेंगाळणाऱ्या आणि लंगड्या लोकांसाठीं थांबूं शकत नाहींत. जर विनाश त्यांना टाळावयाचा असेल तर त्यांना त्यांच्या दैवाच्या स्वाधीन करून त्यांनीं पुढें गेलेंच पाहिजे. क्रांतीच्या मध्यकालांत असलेल्या लेनिननें दुष्काळासारखें संकट आलें तरी आपल्या ध्येयापासून च्युत होतां कामा नये. परंतु अशा गोष्टी प्रसंगाच्या बिकटपणावर आणि जीवनमरणाचा लढा असलेल्या कालांतच योग्य ठरूं शकतील. अशीं तत्त्वें सार्वकालीन म्हणून मान्य केलीं गेलीं आणि कांहींशा शांततेच्या कालांतही त्यांचा अवलंब केला तर त्याचे परिणाम फार भयंकर होतील. कालाच्या बिकटपणाचा दाब आणि जोर प्रचंड असणें शक्य आहे. सर्वत्र कोलाहल माजला असेल तशी प्रत्यक्ष क्रांतीचें कार्य सुरू झालें नसेल आणि एखादी चूक एकदम भयंकर ठरण्यासारखी गंभीर परिस्थिति नसेल तोंपर्यंत मानवी दुःख कष्ट, आणि मृत्यु यांच्याकडे तात्त्विक भूमिकेवरून तटस्थपणें पाहणें योग्य ठरणार नाहीं. औषध हेंच रोग्याचें अन्न होऊं शकत नाहीं. काळाच्या दृष्टीनें

क्रांतीची वेळ अतिशय अनिश्चित असते. ती आजही घडून येईल किंवा कदाचित् आणखी ५० वर्षेंहि घडून येणार नाहीं. लोकांच्या हितास प्रामाणिकपणें जागूं इच्छिणारा आपल्या देशबांधवांच्या चालू पिढीच्या नशिबाशीं जुगार खेळूं लागला तर तें अयोग्य होईल. त्याला दक्षतेनें वागलेंच पाहिजे. क्रांतीची तयारी हळूहळु झाली तरी चालेल पण लोकांचे तात्कालिक कष्ट तात्पुरते तरी दूर करण्याचा यत्न त्यानें केला पाहिजे. बिहारमध्यें जेव्हां भूकंप झाला तेव्हां तेथील सत्याग्रहाची चळवळ जवळ जवळ बंदच करण्यांत आली होती. सत्याग्रहाच्या विरोधकांनीं म्हणजेच सरकारनेंदेखील तुरुंगांतील सर्व कैद्यांना मोकळें सोडलें. देशभक्तांनीं तरी यापेक्षां जास्त कांहीं केलें नसतें.

म्हणून सुधारकांनाहि चांगल्या डॉक्टराप्रमाणें दुहेरी कार्य करावें लागतें. लोकांना उगवत्या क्रांतीसाठीं तयार करतांना त्यांचे तांतडीचे प्रश्नही सोडवावे लागतात. हे प्रश्न सोडवणें हेंच एक प्रकारचें क्रांतीचें शिक्षण होय. ज्या बहुजनसमाजाच्या दैनंदिन प्रश्नांतून त्यांना मार्ग दाखविण्याचें कार्य ते करीत असतात, त्याच्यावर कांहीं सत्ताहि प्राप्त होते. चळवळीच्या उत्तेजक शक्तीचे दोन विभाग जरूर तर करतां येतील. एक लोकांच्या दैनंदिन प्रश्नांचा विचार करते व दुसरी उगवत्या क्रांतीचें वातावरण निर्माण करते. शेवटीं जेव्हां इतिहासकार शौर्याचा गुणानुक्रम लावतील, तेव्हां कोणाला ठाऊक, पहिले शेवटीं जातील आणि शेवटले पहिले येतील! या काळच्या अत्यंत नम्र माणसाला मानाचेंहि स्थान मिळूं शकेल!

बार्डोलीसारखीं कार्यें शेतकऱ्यांची संघटना, ग्रामपंचायती, कामगार संघ, राष्ट्रीय शिक्षण, अस्पृश्यता, खादी, दारूबंदी इत्यादि सर्व विधायक कार्यें एका अर्थीं तावडतोबीचे प्रश्न सोडविण्यासाठींच चालू असतात. या दृष्टीनें अधिक कार्य परिणामकारक सत्ता हातीं आल्यानंतरच होऊं शकेल. सुधारकानें धीर धरला पाहिजे. ठराविक काळीं हमखास क्रांति घडवून आणतों असें त्याला म्हणतां येणार नाहीं. क्रांतीची गाडी आपापल्या ठराविक रस्त्यानें आणि ठराविक कालानेंच येईल. तोंपर्यंत हाताशीं असलेलें कार्य त्यानें

श्रद्धेनें ध्येयावरचें लक्ष उडूं न देतां केलें पाहिजे. रोजच्या कार्यांत मग्न असतांना त्याच्या व्यापकतेमुळें, एखाद्या वरवर पाहाणाऱ्याला तो आपलें ध्येय विसरून गेला आहे असें भासण्याचा संभव आहे. गांधीजींच्या बाबतींत १९२३ ते १९२९ च्या दरम्यान असेंच वाटलें होतें. ते आपलें ध्येय विसारल्यासारखें वाटत होतें. त्यावेळीं पुष्कळांना असें वाटत होतें आणि ते बोलूनही दाखवीत. परंतु वस्तुस्थिति अशी होती कीं, त्या मधल्या काळांत तयारीचें काम चालू होतें. ही गोष्ट १९३० मध्यें उघडकीस आली. अशी शांततामय आवश्यक तयारी जर चालू राहिली नाहीं तर लोकमत जेव्हां तयार असेल तेव्हांची कांहीं क्रांतिवाद्यांची संधि वाया जाईल. म्हणूनच अदम्य उत्साही आणि उद्योगी कार्यकर्त्यांच्या आशामय आणि विश्वासपूर्ण शब्दांत गांधीजी म्हणतात, "एकच पाऊल प्रगति मला पुरे आहे."

कोणाही शास्त्रीय समाजवाद्यानें कामगारसंघांच्या कार्याचा निषेध केलेला नाहीं. सध्यांच्या तांतडीच्या प्रश्नाचा विचार केला तर ती सुधारणाच आहे. कधींकधीं ते प्रश्न रुपये—आणे—पै चें स्वरूप धारण करतात, पण तरीही ते आवश्यक आहेत. त्यांच्यामुळें ऐक्य, संघटना, संघभक्ति सहकारी वृत्ति, आज्ञापालन आणि नम्रता इत्यादि नैतिक गुण निर्माण होतात आणि असाधारण महत्त्वाकांक्षा, मत्सर यांचें नियमन होतें आणि असें झाल्याशिवाय कोठल्याही यशस्वी चळवळीचा प्रस्ताव करतां येत नाहीं. असें विधायक कार्य केल्याशिवाय सामान्य सैनिकानें काय करावयाचें ? नुसतें ध्येयवाक्य उच्चारणें आणि ध्येयवादाच्या मागें जात राहाणें एवढ्यानें सैनिकाचें कार्य होत नाहीं. कार्य करण्याचें आणि एकंदर गोष्टींची व्यवस्था लावण्याचें शिक्षण नेटानें घेतलेंच पाहिजे.

कोणी तरी क्रांतिवादी असें म्हणूं शकेल काय कीं घाण, अस्वच्छता, रोगराई, गरीबी, अधोगती, आणि अज्ञान या गोष्टी या समाजांत क्रांतीस पुरेशा ठरण्याइतक्या थरास गेल्या नाहींत ? या गोष्टींतून एकच काय पण दहा वेळां क्रांति होऊं शकण्याइतकी परिस्थिति आली आहे

हें कोणत्या क्रांतिकारकाला नाकबूल करतां येईल ? तीमध्यें थोडीशी दुरुस्ती झाली तरी सध्यांच्या असंतोषाची आणि विषमतेची धार कमी होणार नाहीं, कारण ती इतकी तीक्ष्ण आहे. आणि सुधारणा करूं इच्छिणाऱ्याच्या लहान सहान प्रयत्नांनीं कमी होण्याचा यत्किंचितही संभव नाहीं. या क्रांतिपूर्व अनुकूल परिस्थितीचा विनाश होण्याची किंवा ती परिस्थिति एकदम चांगली होण्याची कांहींहि भीति नाहीं ! ! विधायक कार्यक्रमाबद्दल म्हटलें तर आपलेच विरोधी लोक म्हणतात त्याप्रमाणें, त्याचा विषमता आणि गरीबी दूर करण्याला कांहींही होत उपयोग नाहीं ! म्हणून जी कांहीं थोडीबहुत मदत आमच्या नम्र प्रयत्नांनीं त्या लोकांना आम्हीं करीत आहोंत त्यामुळें क्रांतीचा दिवस आम्ही पुढें ढकलीत आहोंत असें त्यांनीं मानण्याचें कांहीं कारण नाहीं. आम्हीं गरीब शेतकऱ्यांच्या हातीं चार तांब्याचे पैसे देण्यांत आनंद मानतों असें जर आहे तर क्रांतिरूपी यक्षिणीची कांडी फिरून जर तीं तांब्याचीं नाणीं निकेलचीं किंवा चांदीचीं झालीं तर आम्हांला किती बरें आनंद वाटेल ? त्यांची स्थिति सुधारली आणि अधिक वेतन मिळालें तर त्यास आमचा विरोध आहे असें मुळींच नाहीं. शेतकऱ्याच्या फावल्या वेळांतील कामाबद्दल त्याला चार पैसे मिळतात एवढेंच पुष्कळ झालें असें मानणारा माणूस देशभक्त किंवा भूतदयावादी म्हणतां येणार नाहीं. त्याची ती महत्त्वाकांक्षा फार कमी दर्जाची ठरेल आमच्या देशांतील बहुजनसमाज नैतिक, शारीरिक आणि आध्यात्मिक उन्नतीच्या अत्युच्च शिखरावर जावा अशी आमची इच्छा आहे. त्यापेक्षां खालच्या दर्जाची इच्छा, गांधींच्यासारखी व्यक्ति करील हें शक्यच नाहीं; परंतु ते आणि त्यांचे सहकारी व्यवहारवादी आहेत. सध्यांच्या परिस्थितीचा बिकटपणा इतका तीव्र आहे कीं, गरीबांना हे चार तांब्याचे पैसेही बहुमोलाचे आहेत हें ते जाणतात. गरीबांच्या बाबतींत हा प्रश्न जीवनमरणाचा आहे.

म्हणून राष्ट्रीय चळवळीचा क्रांतिवाद न विसरतां विधायक कार्यक्रमाचा पुरस्कार करणारे कार्यकर्ते चालू परिस्थितींत सामाजिक आणि आर्थिक

पुनर्रचना करण्याचें दैनंदिन कार्य अंगावर घेऊन पार पाडीत आहेत. १९२० पासून आपल्या चळवळीचा इतिहास याचा प्रत्यक्ष पुरावा देतो. कारण जेव्हां जेव्हां सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली, जेव्हां जेव्हां प्रत्यक्ष कार्य करण्याचा निर्णय घेतला गेला, तेव्हां तेव्हां खादीधारी आणि विधायक कार्यक्रमाचे पुरस्कर्ते पुढें आले. इतर लोक थकून गेले. आतां थांबू या, असें म्हणूं लागले तेव्हांसुद्धां खादीधारी लोकांनीं आपल्या कार्यक्रमांत खंड पडूं दिला नाहीं. जेव्हां अधिकारस्वीकाराचा प्रश्न येतो तेव्हां कोण मागें राहतें ? अनुभवानें असें दिसून आलें आहे कीं, खादीधारी आणि ग्रामीण चळवळीचा पुरस्कार करणारेच मागें राहून पार्श्वभूमिका सजवितात. जेव्हां अतिशय तीव्र कष्ट सहन करण्याचा प्रश्न असतो तेव्हां पुढें कोण जातो ? खादीधाऱ्यांनीं कोठल्याही कसोटीचे वेळीं पाय मागें घेतला नाहीं, शौर्य किंवा धैर्य यांचा अभाव त्यांच्या ठिकाणीं कधीं दिसूं दिलेला नाहीं. शिस्तीच्या दृष्टीनें पाहिलें तरी या कार्यक्रमानें शैथिल्य येण्याचा मुळींच संभव नसतो. जर सहनशीलता, त्यागाची तयारी, आज्ञापालन, संघटना, प्रामाणिकपणा आणि हिणकस महत्त्वाकांक्षा आणि मत्सर यांच्यापासून अलिप्तता या गोष्टी चांगल्या आणि परिणामकारी क्रांतिकारकाचीं लक्षणें असतील तर विधायक कार्यक्रमाचा पुरस्कार करणारे त्या बाबतींत दुसऱ्या कोणालाही संघटनेच्या बाबतींत हार जाणार नाहींत.

अहिंसेंत व्यक्त होणाऱ्या नवनीतीचा सामाजिक जीवनाशीं जो संबंध आहे, त्याचा मी या चर्चेंत उल्लेख केलेला नाहीं. आजसुद्धां व्यावहारिक राजकारण आणि अर्थशास्त्र म्हणून ज्या गोष्टी ओळखल्या जातात त्यांच्याच आधारावर माझी सगळी चर्चा आहे. मी माझें विवेचन, काय असावें यावर आधारलेलें नसून काय आहे यावरच आधारलेलें आहे. प्रचलित नीतीच्या आधाराबद्दल मी कधींही शंका व्यक्त केली नाहीं. गांधीजींच्या अहिंसा आणि सत्य या, नव्या पण एका दृष्टीनें जुन्याच तत्त्वाबद्दल मीं येथें मुळींच उल्लेख केलेला नाहीं. सप्टेंबर १९३४

# भाग दूसरा

# क्रांतीचे दोन प्रवाह

१

प्रत्येक युगांत त्या त्या युगाचे असे खास प्रश्न असतात. आपल्या युगाचे असे जे प्रश्न आहेत ते फारच बिकट आहेत. ते केवळ राजकीय नाहींत. जीवनाच्या सर्व अंगोपांगांचा त्यांत संपूर्ण समावेश होतो. इतर लोकांना त्यांच्या त्यांच्या काळांत फक्त एकाच क्रांतीशीं झुंजावें लागलें. आपल्या काळांत आपल्याला दुहेरी क्रांतीशीं तोंड द्यावयाचें आहे. एकींतून पार पडण्याच्या अगोदरच आपल्यापुढें दुसरी, पहिलीपेक्षां मोठी आणि जास्त व्यापक, क्रांति उभी आहे.

ब्रिटिश राज्याचें आगमन आणि स्थापना झाली तेव्हांपासून पहिलीची सुरुवात झाली. त्या राज्याच्या सुसंघटित आणि तडफदार शक्तीनें एकाद्या सोसाट्याच्या वावटळीसारखें येऊन आपल्या दृष्टीसमोर असलेलें सर्व कांहीं व्यापून टाकलें. त्यामुळें डोळे दिपून जाऊन, अवघ्या शंभर वर्षांच्या काळांत, पाश्चिमात्त्यांनीं संपादन केलेल्या गोष्टींकडे पाहून, आपण 'आ' करून पाहत राहिलों. त्यांचीं मूल्यें आणि जीवनविषयक दृष्टिकोन

यांचें नुसतें अनुकरण केलें कीं, आपण त्यांच्याइतकी शक्ति, कार्यक्षमता आणि जीवितांतील आनंद हस्तगत करूं शकूं, असें आपल्याला वाटत होतें. परंतु उत्साहाच्या भरांत आपण घेडगुजरी संस्कृति मात्र निर्माण केली. ती संस्कृति आज स्वतःच्या हीनत्वामुळेंच पाश्चिमात्य संस्कृतीपासून निराळी दिसत आहे. तिचें स्वरूप खेंचरासारखें झालें आहे. ती वरवर पाहतां बलिष्ठ दिसते परंतु वस्तुतः ती अगदीं वांझ ठरली आहे! यांत अस्वाभाविक असें कांहींच घडलें नाहीं! ज्या मानव-वंशानें पुष्कळ काळपर्यंत झगडा केलेला आहे आणि पुष्कळ यश संपादन केलें आहे, त्याच्या बाबतींत दुसरें काय घडणें शक्य होतें? म्हणून आतां सिंहावलोकनाची वेळ आली आहे. आपला भूतकाळ नीट तपासून आपल्या वृत्तीस आणि आपला 'स्वधर्म' आणि 'स्वभाव' यांस सुसंगत असा मार्ग शोधण्याची वेळ आली आहे. युगानुयुगाचे अनुभव आणि संस्कार यांतून स्वधर्म आणि स्वभाव सिद्ध झाले आहेत.

हें सिंहावलोकन आणि राष्ट्रीय स्वभावास सुसंगत असा दुसरा मार्ग चोखाळणें ही दुसरी क्रांति होय. दोन्ही बरोबरच चालू आहेत. दोन्ही बाजूस भरपूर अनुयायी लाभले आहेत. परंतु पहिली सध्यां विशेष जोरांत दिसते. भारतीय परिस्थितीला सोईस्कर असा मार्ग ज्या ज्या ठिकाणीं सांपडतो तेथें तेथें दुसऱ्या क्रांतीचें कार्य चालू आहे. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं बंगाल्यांतील कांहीं उदाहरणें मी घेतों.

धार्मिक लोकांशीं पाश्चिमात्यांचा जो प्रथम संबंध आला, त्यांतून धार्मिक सुधारणांचा उत्साह निर्माण झाला आणि ब्राह्मो समाज या नवीन धर्मपंथाचा उद्गम झाला. त्या पंथानें पुष्कळ कार्य केलें आहे. कांहीं असा-मान्य व्यक्ती त्या पंथांतून उदयास आल्या. परंतु अखिल हिंदुस्थानांत त्यामुळें खळबळ माजूं शकली नाहीं किंवा तो बहुजनसमाजापर्यंत जाऊन पोंचूं शकला नाहीं. किंवा जगाचें लक्ष तो आपल्याकडे खेंचूं शकला नाहीं. हें कार्य दुसऱ्या भारतीय स्वरूपाच्या चळवळीनें जास्त केलें. ती चळवळ म्हणजे श्रीरामकृष्णांच्या प्रेरणेनें उत्पन्न झालेली

आणि स्वामी विवेकानंदांच्या बुद्धिवैभवानें आविष्कृत झालेली चळवळ होय. ही चळवळ सबंध देशांतील बहुजनसमाजापर्यंत जाऊन पोंचली. एवढेंच नव्हे तर साऱ्या जगाचें लक्ष ती आपल्याकडे वेधूं शकली. जगांतील धर्मपंथांच्या इतिहासांत नमूद झालेलीं अशीं श्रीरामकृष्ण आणि स्वामी विवेकानंद हीं दोन नांवें आहेत.

वाङ्मयांत जोंपर्यंत बंगाल, परभाषांतील ग्रंथाचीं भाषांतरें करण्यांतच गुंतला होता, तोंपर्यंत म्हणण्यासारखें कांहींच कार्य निर्माण झालें नाहीं; परंतु लौकरच बंकिम, शरत् चतर्जी आणि महाकवी रवींद्रनाथ उदयास आले. ते पाश्चात्त्य आवरणांनीं विभूषित आहेत असें कोण म्हणूं शकेल काय ? अर्थात्च त्याचाहि परिणाम भव्य स्वरूपांत दिसला. त्या महाकवींचें नांव साऱ्या जगास ठाऊक झालें आहे.

चित्रकलेंत रविवर्म्यानें भारतीय स्त्रीत्वाच्या अपूर्व मोहकतेकडे दुर्लक्ष करून आपल्या देव आणि देवता यांचीं चित्रें पाश्चात्त्यांच्या वास्तववादी पद्धतीनें रंगविलीं. आतां आपणांस नवीन बंगाली सांप्रदाय कळला आहे. खरें पाहतां हा नवीन भारतीय संप्रदाय बंगालमधून मिळालेल्या प्रेरणेनें उत्पन्न झालेला आहे. त्यांत अजंठ्याच्या चित्रकलेची झांक आहे. त्या सांप्रदायांतल्या मानवी आकृती स्वर्गांतून नुकत्याच अवतरलेल्या व्यक्तींसारख्या वाटतात. जगाच्या चित्रमंदिरांत त्या सांप्रदायानें स्थान मिळविलेंच आहे.

जगदीशचंद्र बोसांनीं आपल्या राष्ट्रीय वृत्तीनें शास्त्रीय संशोधन करून जीवनाची एकरूपता विशद करून दाखविली आहे. इतर देशांतील शास्त्रज्ञ संहारक-शक्तीचें संशोधन करीत आहेत पण भारतीय शास्त्रज्ञांनीं सर्व वस्तु-जातांतील मूलगामी ऐक्य सिद्ध केलें आहे.

एवढीं उदाहरणें पुरेत. भारतीय चैतन्यानें प्रेरित झालेलें जें जें म्हणून आहे तें तें अतिशय थोड्या काळांत फलदायी झालें आहे. तें निर्माण-क्षम ठरलें आहे. राष्ट्रीय जीवनाच्या ज्या ज्या अंगांना परकीयत्वाच्या मगरमिठींतून सुटतां आलेलें नाहीं, त्यांची वाढ खुरटलेली आहे.

इतकेंच नव्हे तर तीं कार्यक्षेत्रें उजाड झालीं आहेत. शिल्पकलेचें उदाहरण घ्या. हिंदुस्थानांत दक्षिणेकडील मंदिरें आणि ताजमहाल यांसारख्या अप्रतिम, अद्वितीय इमारती निर्माण झाल्या आहेत. ब्रिटिशांचा पाय लागल्या नंतर त्यासारखें एकहि शिल्प निर्माण झालें नाहीं. आपले हिंदी राजेरजवाडे आणि मोठमोठे जमीनदार यांनीं अव्याहत खटपट करूनहि शिल्प-विभागांत कांहींहि भर पडली नाहीं. जवळच असलेल्या व्हिक्टोरिया मेमोरियलकडे पहा. 'नवी दिल्ली' हा हिंदी शिल्पावरील एक मूर्तिमंत कलंक आहे. सरकारची बाहुलीं बनलेल्या आमच्या राजांनीं आणि महाराजांनीं अर्धपोटीं आणि उपाशी शेतकऱ्यांकडून पिळून काढलेल्या पैशांवर बांधलेले पाश्चात्य पद्धतीचे 'महाल' पहा. त्यांना राजवाडा हें नांव चुकून मिळालें आहे. त्या महालाच्या बांधणींत आधुनिक कालांतील अभिरुचीची अधोगति स्पष्ट दिसते. सर्वत्र हाच ओंगळपणा आढळतो आणि त्यासाठीं प्रचंड पैसा खर्च होत असतो.

मग आपल्याला जर खरोखर कांहीं उच्च गोष्ट संपादन करावयाची असेल, तर ह्या पहिल्या क्रांतीस आपण रामराम ठोकला पाहिजे आणि दुसरीच्या हातांत हात दिला पाहिजे. राजकारण नुकतेंच आघाडीवर दिसूं लागलें आहे आणि आपणां सर्वांचें लक्ष त्यानें वेधून टाकलें आहे. शासनसंस्था जीवनाच्या सुखदुःखांत फारच थोडी ढवळाढवळ करूं शकते, अशी आपली खुळी समजूत होती. पण शासनसंस्थेच्या विशिष्ट स्वरूपावरच समाजाची उभारणी होते हें आपणास लवकरच उमगलें. आपली संस्कृति टिकावी आणि तिला चांगलीं फळें यावींत असें वाटत असेल तर ती गोष्ट सर्वत्र शासनसत्तेनेंच होऊं शकेल हेंहि आपण आतां ओळखलें आहे. हें लक्ष्यांत आल्यावर राजकीय प्रश्नाला महत्त्व यावें हें स्वाभाविकच होतें.

ही राजकीय जागृति सुमोर अर्धशतकापूर्वीं झाली. स्फूर्तिस्थानीं या जागृतीचें स्वरूप पाश्चात्त्यच होतें आणि आपणांस जो कळला नाहीं वा आत्मसात् करतां आला नाहीं असा नमुना आपण आपल्यापुढें ठेविला

होता. त्याचा परिणाम असा झाला कीं, न्यायकचेरीला सुटी असेल त्या दिवसांत नाताळाच्या सुमारास कांहीं विद्वान् आणि महत्त्वाकांक्षी वकील वर्षांतून तीन दिवस एकत्र येत. बर्क, शेरिडन, ग्लॅडस्टन यांच्या थाटाचीं, आवेशपूर्ण भाषणें करीत, आणि ज्या परकीय सत्तेच्या कारखान्यांत त्यांची घडण झाली त्या सत्ताधीशांची ते कधीं स्तुति, व कधीं निंदाहि करीत. मग कांहीं ठराव पास करून ते पुन्हां आपल्याला गांवीं जात ते दुसऱ्या वर्षीच्या नाताळापर्यंत. त्यांच्यापैकीं विशेष उत्साही आणि सुखवस्तु असलेले लोक छोटयाशा कौन्सिलांतून भाषणें करीत; आणि इंग्लिश जनतेच्या न्यायासनासमोर आपल्या धन्यांवरील दोषारोप सिद्ध करतां यावेत यासाठीं कांहीं आंकडे गोळा करीत, कांहीं माहिती मिळवीत. आपलीं वक्तृत्वपूर्ण भाषणें, कॉंग्रेसच्या मंडपांत जशीं गाजतात तशीं, तीं आणखी पलीकडे जाऊन सातां समुद्राच्या पार असलेल्या लोकशाहीच्या कानांवर गेलीं म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल अशी त्यांना वेडी आशा वाटे. उदारमतवादी म्हणविणाऱ्या पण वास्तविक साम्राज्यवादी असलेल्या मुत्सद्यांच्या घोषणांनीं या पुढाऱ्यांची सहज फसवणूक होई. त्या उदारमतवादी लोकांना, आपल्या पक्षासाठीं आपण ज्या घोषणा करतों त्या घोषणांचा काय अर्थ आहे याचें कधींहि आकलन झालें नव्हतें. परंतु आपल्या पुढाऱ्यांना मात्र असें वाटलें कीं, आपण फक्त आपलें मागणें मागण्याचा काय तो अवकाश आहे! ब्रिटिश लोकशाही आणि उदारमतवादित्व यांवरील आमच्या पुढाऱ्यांचा विश्वास एखाद्या लहान मुलाला शोभेसा होता; यामुळें कधीं कधीं त्यांची स्थिति अगदीं केविलवाणी होई.

यामुळें अर्थातच प्रतिक्रिया घडून येणें स्वाभाविक होतें; लवकरच राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांचा पक्ष कॉंग्रेसमध्यें निर्माण झाला. त्या पक्षानें 'भीक मागण्याच्या' धोरणाचा तीव्र निषेध केला. आणि असंदिग्धपणें सरकारची निर्भत्सना केली. यामुळें या पक्षाचें स्वरूप स्पष्टपणें व्यक्त झालें. बहुजनसमाजांत मिसळावें आणि कांहीं कार्यक्रम हातीं द्यावा असे

विचार या पक्षांत सुरू झाले. मात्र त्यांनीं प्रत्यक्ष कार्य असें फारसें केलें नाहीं. अर्ज-विनंत्या करणारा आणि राष्ट्रीय वृत्तीचा हे दोन्ही पक्ष सारखेच निष्क्रिय होते. हिंदी तरुणांच्या वाढत्या मागण्या ते पूर्ण करूं शकले नाहींत; किंवा अनावर होत चाललेल्या वाढत्या असंतोषालाहि ते आळा घालूं शकले नाहींत.

सनदशीर राजकीय चळवळीला दाबून टाकण्याचे सराकारी निष्ठुर प्रयत्न आणि दहशतवादावरील विश्वास यांमुळें पूर्वीच्या असंतोषास सुडाच्या भावनेची जोड मिळून, दहशतवादी राष्ट्रसेवकांची गुप्त संघटना जन्मास आली. या संघटनेंतील लोकांना अराजक हें नांव पडलें आहे. तें बरोबर नाहीं. ‘ अराजकवाद ’ हें जीवनाचें एक तत्त्वज्ञान असून त्याचा संबंध क्रोपट्किन, टॉलस्टॉय, थोरो यांच्यासारख्याशीं येतो. बॉम्ब आणि पिस्तुल यांसारख्या साधनांशीं वरील थोर कार्यकर्त्यांचा कांहींहि संबंध नव्हता. परंतु नोकरशाहींतील सामान्य लोकांना काय, किंवा खुनासाठीं अथवा खुनाच्या प्रयत्नासाठीं शिक्षा झाल्यामुळें तुरुंगांत पडलेल्या अराजकाला काय, याची जाणीव नाहीं. हे तीनही पक्ष राजकीय प्रक्षोभाच्या पाश्चात्त्य पद्धतींनाच उचलून धरणारे आहेत. पहिला स्पष्टपणें त्यांना उचलून धरतो. तर उरलेले दोघे त्यांच्याविरुद्ध आरडाओरड करीत राहूनहि तेंच करतात. पहिल्या पक्षानें अगदीं नम्रपणें गुरूला नमस्कार केला आहे, तर राहिलेल्या दोघांनीं कट्टर शत्रुत्व धारण करण्यांत, पाश्चात्त्य विचारसरणीविषयींचें आपलें प्रेम व्यक्त केलें आहे. माणसाच्या मानसशास्त्रास अनुसरून हिंदुधर्मामध्यें शत्रुत्व आणि द्वेष हे देखील भक्तीचे प्रकार मानले आहेत.

हीं परदेशांतून आलेलीं रोपटीं जास्त काळ टिकूं शकलीं नाहींत. पहिल्याचें कर्तृत्वशून्यत्त्व तर राष्ट्राच्या प्रक्षोभासच कारणीभूत झालें. आणि उरलेलीं दोन आपल्या विध्वंसक कार्यक्रमानें राष्ट्रीय प्रश्न सोडविण्याची आपली नालायकी झपाट्यानें सिद्ध करीत आहेत. त्या पक्षांनीं थोडेंसें कार्य केलें आणि आतां ते तिरस्कलित होत चालले आहेत. राजकारणांतील

अधिक राष्ट्रीय स्वरूपाची चळवळ सुदैवानें त्याआधींच आखाड्यांत उतरली आहे. तिच्या आकांक्षांची आपण छाननी करणें जरूर आहे. सर्व गैरसमज अथवा पूर्वग्रह यांपासून अलिप्त अशा वृत्तीनें केवळ विद्यार्थि या नात्यानें आपण त्या चळवळीचें अध्ययन करूं या.

गांधीजींचें राजकीय क्षेत्रांत आगमन झाल्यपासून हिंदी राजकीय चळवळीचें ध्येय आणि मार्ग यांमध्यें जणूं काय एक मोठीच क्रांति झाली आहे. त्यांचें कार्य जरी त्याच जुन्या संस्थांच्या माध्यमानेंच चाललें असलें तरी सगळ्या गोष्टी बदललया आहेत, राजकारण हें जीवनाच्या इतर सर्व अंगांपासून अलिप्त समजलें जात होतें; धर्म, नीति आणि सामाजिक जीवन यांच्याशीं त्याचा असलेला सर्व संबंध तोडून टाकण्यांत आला होता. अर्थशास्त्राशीं त्याचा अगदीं वरवर संबंध होता. जीवनाच्या इतर अंगांना वगळून राजकारणाचा अभ्यास आणि अंमलबजावणी होत होती. परंतु गांधीजींना सारें जीवन एकरूप वाटतें. त्यांच्या मतें राजकीय चळवळीचा, नीति, सामाजिक सुधारणा, अर्थशास्त्र आणि जनहिताचें सर्वसामान्य कार्य या सर्वांशीं फार जिव्हाळ्याचा संबंध आहे. या सर्वांचा एकमेकांवर परिणाम होतो. कित्येक वेळां राजकीय कार्यासाठीं सामाजिक अथवा आर्थिक सुधारणेवर भरपूर जोर द्यावा लागला आहे. पूर्वीं बंगाल, मद्रास किंवा महाराष्ट्र यांमधील एखाद्या राष्ट्रवाद्याला सामाजिक बाबतींत प्रतिगामी राहून राजकारणांत मात्र पुरोगामी असणें शक्य होतें. परंतु अशा विसंगतीचा काळ आतां संपला. स्वतः नखशिखान्त विदेशी पेहेराव करून कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून स्वदेशीचा प्रचार करणें एखाद्या उदार-मतवाद्यास पूर्वीं शक्य होतें. केवळ दोन-चार मुद्यांवरच भर देऊन त्याला पहिल्या प्रतीचें नेतृत्व मिळवितां येणें शक्य होतें. त्याचा व्यवसाय किंवा त्याची राहणी यामुळें, राष्ट्रीय सभेंत सर्वांत वरिष्ठ अधिकाराची जागा पटकावण्यास कांहीं प्रत्यवाय होत नव्हता. परंतु आतां हें सर्व बदललें आहे. सध्यांच्या राजवटीजवळ स्वतःची अशी शक्ति मुळींच नाहीं; आपल्या वैयक्तिक आणि राष्ट्रीय कमकुवतपणावरच ती राजवट उभारली

आहे, ही गोष्ट गांधीजींच्या शिकवणुकीनें आपण ओळखली आहे. आपल्या दुर्गुणांवर आणि दुर्बलतेवरच या राजवटीची भरभराट होत आहे. अर्थातच तिच्याशीं लढण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आपल्या संस्थांची सुधारणा आणि आत्मशुद्धि हा होय. आपल्या स्वत.च्या सुधारणेबरोबरच स्वातंत्र्याचा लढाही चालू राहिला पाहिजे. स्वराज्याची स्थापना होऊन व्यापारसंरक्षक कायदे पास होईपर्यंत आपण स्वदेशीसाठीं थांबण्याची जरूर नाहीं. स्वतःच स्वतःवर बंधन घालून उद्योगधंदे आणि व्यापार यांना मदत करूं शकणारा वटहुकूम आपण आजही काढूं शकूं. दारूबंदीसाठीं राज्याधिकाऱ्यांत बदल होण्याची वाट पाहण्याची आवश्यकता नाहीं; उलट आपण स्वतःच्या उदाहरणानें आणि शांततामय निरोधनानें दारूबंदी अमलांत आणूं शकूं. तसेंच अस्पृश्यतेचें, हिंदुमुसलमान ऐक्याचें, राष्ट्रीय शिक्षणाचें, किंवा ग्रामपंचायतीचेंही होऊं शकेल. या शुद्धिकरणासाठीं स्वराज्याच्या आगमनाची प्रतीक्षा करीत बसण्याची जरूर नाहीं. आपण कार्यास तावडतोब आरंभ केला पाहिजे आणि आपल्या या कार्यानें राष्ट्रीय जीवनाचें संपूर्ण क्षेत्र व्यापून टाकलें पाहिजे.

पुष्कळ लोक अर्थात् असें म्हणतील कीं, या कल्पना गांधीजींच्याहि पूर्वीं होत्या. यांतील कांहीं बाबी तर बंगाल आणि पुणें येथील राष्ट्रवादीयांच्या कार्यक्रमांत अंतर्भूत होत्याच. पण गांधीजींचें संशोधन क्षेत्रांत अग्रस्थान सिद्ध करणें हा माझा हेतु नाहीं. त्यांनीं समाजांत जास्त जोरानें या कल्पनांचा पुरस्कार केला आणि प्रत्येक बाबींत कांहीं तरी विधायक कार्य घडून येईल अशी खबरदारी घेतली असें मी दाखवूं शकलों, म्हणजे झालें. जर राष्ट्रानें त्यांच्या मार्गावर अधिक श्रद्धा दाखवली असती आणि त्यांना अधिक निष्ठेनें मदत केली असती, तर गेल्या दहा वर्षांत झालें त्यापेक्षां किती तरी अधिक कार्य झालें असतें. परंतु या परिस्थितींत देखील घडून आलेलें कार्य प्रचंड आहे. ही गोष्ट, असहकारितेच्या चळवळीपूर्वीं राजकीय क्षेत्रांत कार्य करण्याची ज्यांना सुदैवानें (वा दुर्दैवानें)

संधि लाभली होती त्यांना जितकी पटेल तितकी नवीन पिढींतील लोकांना पटणार नाहीं.

दुसरा महत्त्वाचा बदल राजकीय चळवळीच्या उद्दिष्टाविषयींचा आहे. सत्ताधारी व्यक्ति बदलणें, किंवा परदेशीयांना हांकून लावणें किंवा सत्तेची कवळ खांदेपालट हें आजचें उद्दिष्ट नसून 'लोकांनीं चालवलेलें आणि लोकांसाठींच असलेलें सरकार स्थापन करणें' हें आजचें उद्दिष्ट आहे. अर्धपोटी, अर्धनग्न, दलित, 'दरिद्रनारायण', दीन, आणि ज्यांच्यापुढें आपण शरमेनें मान खालीं घातली पाहिजे असा अस्पृश्य लोक या शब्दाचा गांधीजी अर्थ करतात. गांधीजीच्या उदाहरणानें आणि आदेशानें त्यांचा किंवा त्यांच्या चळवळीचा अनुयायी होणाऱ्यानें स्वतःला त्या गरीबांशीं आपापल्या श्रद्धेप्रमाणें आणि शक्तीप्रमाणें एकरूप करून घेतलें पाहिजे. या अनुयायी वर्गांत राजेशाही मोतीलाल, क्रोडोपती जमनालाल यांच्यापासून तों थेट साध्या स्वयंसेवकापर्यंत कोणीही असो. जे नेतृत्व स्वीकारूं इच्छितात त्यांनीं गरीबांच्या सेवेचें व्रत धारण केलें पाहिजे, हें गांधीजींनीं आपल्याला शिकविलें. प्रत्येकानें खादी हा गरीबाचा पोशाख निरपवादपणें वापरलाच पाहिजे.

गांधीजींनीं उपदेशापूर्वी आचरणाचा आदर्श आपल्यापुढें ठेविला आहे आणि करड्या नीतिमत्तेवर आधारलेल्या जीवनानें सर्व लोकांना आत्मशुद्धीचा मार्ग सुलभ करून दाखविला आहे. कॉंग्रेसला वास्तविक पहातां निश्चित तत्वप्रणाली अशी मुळींच नव्हती; ती त्यांनीं दिली. तिच्यापुढें त्यांनीं एक कार्यक्रम ठेवला आणि देशबांधवांनीं त्या दोन्हीही बाबतींत प्रामाणिक सैनिकासारखें वागावें असें आग्रहानें सांगितलें.

गांधीजींनीं राजकीय जीवनाचा देशांतील नैतिक दर्जा उंच केला. वैयक्तिक आणि राजकीय हालचालींना आचाराचे सारखेच नियम त्यांनीं लागू केले. राजकारणी पुरुषाचे शब्द, सभ्य माणसाच्या शब्दांइतकेच विश्वसनीय असले पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे. जीं वचनें पाळण्याचा स्वतःचा बेत नाहीं अशीं वचनें सार्वजनिक कार्यकार्यानें देतां

कामा नयेत. राजकारणांत 'मुत्सद्देगिरी' या नांवाखालीं चालणाऱ्या दुटप्पी वर्तनापासून त्यानें दूर राहिलें पाहिजे. 'ज्याचा शेवट गोड तें सर्वच गोड' ह्या भयंकर तत्त्वावर त्यांचा विश्वास नाहीं. त्यांचें राजकारण सत्य आणि अहिंसा यांसारख्या जागतिक सत्यावर आधारलेलें आहे. ह्या दोन्हींमध्यें सामर्थ्य निर्माण करून त्यांनीं तीं तत्वें प्रभावी केलीं आहेत.

त्यांची अहिंसा केवळ परप्रत्ययी आणि भावनाविवश स्वरूपाची नाहीं. स्वतःच्या संघटनेवर पूर्ण श्रद्धा ठेवणारें असें तें तत्त्व आहे. पापाला विरोध न करण्याचें तें जुनें तत्त्व नाहीं. तर तें तीव्र आणि दुर्दम्य विरोधाचें तत्त्व आहे. मात्र या विरोधांत कोणाच्याहि शरीरास वा जीवनास अपाय होणार नाहीं अशी दक्षता घ्यावी लागते. मात्र या मार्गानें जाणाऱ्या सुधारकास शरीर आणि प्राण यांचाहि त्याग करण्यास सिद्ध असावें लागतें.

संपूर्ण जीवन आणि सामाजिक हितसंबंध यांच्यावर सत्ता गाजविणाऱ्या तत्त्वांवर आधारलेली ही एक मतप्रणालि आहे. हीं तत्त्वें पर्वताइतकीं प्राचीन असलीं तरी तीं आजहि चैतन्यसंपन्न आहेत. फक्त सत्याच्याच ठिकाणीं जितकें अविकार्य नावीन्य आणि चैतन्य असूं शकतें तितकें त्या तत्वप्रणालींत आहे. कृतिरूपानें त्या तत्त्वांचा आपल्या डोळ्यांसमोर आविष्कार होत आहे. आपल्यासमोर तीं केवळ तत्वरूप राहिलीं नाहींत तर तीं कृतिरूपानें आपल्यापुढें आहेत. एखाद्या तत्त्वांतून त्या तत्त्वाच्या प्रवर्तकाचें व्यक्तित्व बाजूस केलें तर तें तत्त्व ध्येयशून्य माणसासारखें निष्फळ ठरेल.

कल्पना जेव्हां 'अवतार' घेतात आणि योग्य व्यक्तीच्या रूपानें जन्माला येतात तेव्हांच मानवी जीवनावर त्या परिणाम करूं शकतात; तसा त्यांचा जन्म झाला नाहीं तर त्या केवळ मतप्रणालीच्या स्वरूपांत तशाच राहतात; तार्किकांना त्या पटतात, पण माणसाच्या ठिकाणीं श्रद्धा आणि इच्छा उद्दीपित करूं शकत नाहींत. बोल्शेविझमला जर लेनिन-सारख्या तेजस्वी आणि व्यवहारकुशल व्यक्तींचें माध्यम मिळालें नसतें तर, तो केवळ मार्क्सची एक तत्त्वप्रणालि म्हणून शिल्लक राहिला असता;

रशियासारख्या मोठ्या खंडाला तो चेतनाही देऊं शकला नसता आणि जगाच्या मार्गांत एक धोंड मात्र होऊन बसला असता ! व्यवहारकुशल आणि नैतिक आणि आत्मिक धैर्यानें संपन्न अशा गांधीजींच्या व्यक्तित्वावांचून सत्य आणि अहिंसा हीं तत्त्वें पूर्वींइतकींच निरर्थक राहिलीं असतीं; अरण्यांतच त्यांचें आचरण होत राहिलें असतें किंवा आपला भेकडपणा गोंडस शब्दांनीं झांकण्याच्या कामीं दुर्बलांनीं त्यांचा उपयोग करण्याचा उपक्रम चालू राहिला असता.

[ ऑक्टोबर १९३१, विद्यार्थि परिषद् कलकत्ता. ]

## अहिंसात्मक क्रांति

# मुख्य प्रमेय

—१—

## व्यक्ति आणि समाज

आजच्या मानवी सुधारणेचें स्वरूप कांहींसें विचित्र आणि गोंधळाचें आहे. एकीकडे स्पष्टवक्तेपणा, न्याय, सहानुभूति, प्रेम, आणि परोपकारी वृत्ति पूर्वींपेक्षां बरीच अधिक असलेली आढळते तर दुसरीकडे वाढती संशयी वृत्ति, अविश्वास, बेपर्वाई, तिरस्कार, अन्याय, क्रौर्य आणि मत्सर हीं दिसून येतात. मागल्या पिढींतल्या लोकांवर ज्या घटनांचा कांहींही परिणाम होत नसे त्याच घटनांचा आतांच्या पिढीवर अतिशय परिणाम होतो. दुर्दैवी मनुष्याला पूर्वीं मिळत नसे ती मदत आणि सहानुभूति आतां मिळत आहे. आजाऱ्यांसाठीं आतां इस्पितळें आहेत. महारोग्यांसाठीं

आश्रम आहेत. आणि आंधळे, बहिरे आणि मुके यांच्यासाठीं शाळा आहेत. मनुष्याच्या आणि निसर्गाच्या क्रौर्याचा परिणाम शक्य तितका कमी करण्यासाठीं आपण झटत आहोंत. युद्धकालांत शत्रुपक्षाबद्दलच्या तीव्र द्वेषानें आपण सैनिक जखमी करीत असलों तरी रेड क्रॉसची मदतहि पुरवतों. मृतांच्या मुलांबायकांची सोय पूर्वीपेक्षां अधिक चांगल्या रीतीनें होत आहे. वृद्ध, अपंग, रोगी, बेकार आणि दुर्दैवी लोकांना मदतहि आणि आश्रय मिळतो. त्यांचा आपल्यावर हक्कच आहे. पुढारलेला मानवी समाज, जगांत कोठेंही दुरावस्था निर्माण झाली तर हळहळतो. जात, धर्म वंश किंवा स्थल यांमध्यें कितीही फरक असला तरी जगांतला प्रत्येक भाग आपल्याला आतां शेजारीच वाटूं लागला आहे. दुष्काळ, पूर आणि भूकंपानें उध्वस्त झालेल्या लोकांचें दु:ख आणि कष्ट कमी करण्यासाठीं जगाच्या या कोपऱ्यापासून त्या कोंपऱ्यापर्यंत सगळीकडून मदत येऊं लागते. आपल्या एकमेकांशीं होणाऱ्या वर्तनांत अधिक मनमोकळेपणा, अधिक आदरातिथ्य आणि अधिक आनंद असतो. रस्त्यावरील क्षुल्लक भांडणें आणि दारू पिऊन झिंगत पडणें किंवा खासगी हेवेदावे हे प्रकार कमी कमी होत आहेत. चोरी, लुटालूट, जाळपोळ आणि खून हे आतां सुधारलेल्या समाजांत अपवाद आहेत. गुलामी आणि दास्यत्व या गोष्टी आतां इतिहासजमा झाल्या आहेत. सार्वजनिक हिताची आणि संघटित परोपकाराचीं कार्यें सर्वत्र उत्साहानें वाढीस लागलीं आहेत. ज्ञान वाढत असून त्याचें क्षेत्र अधिक विस्तृत आणि सखोल होत आहे. वाचनालयें अजबखाने, सिनेमा आणि रेडिओ यांकरवीं ज्ञानाच्या मर्यादा वाढत चालल्या आहेत. कलावंत, कवि, आणि लेखक यांना पूर्वीपेक्षां अधिक आश्रय मिळूं लागला आहे. स्त्री अथवा पुरुष यांचे खेळ आणि मनोरंजन हीं देखील अधिक संघटित आणि नियमित झालीं आहेत. मनुष्यजात शरीरानें अधिक स्वच्छ आणि रोगराईपासून अधिक सुरक्षित झाली आहे. सरासरी आयुर्मर्यादा अधिक वाढावी असे प्रयत्न करण्यांत येत आहेत. बालमृत्यूंची संख्या आश्चर्यजनकरीत्या कमी करण्यांत आली आहे.

रोग्याचें दुःख आणि कष्ट कमी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ह्या सर्वतः चाललेल्या सुधारणेंत आणि आनंदांत इतर प्राण्यांना देखील स्थान मिळालें आहे. पशुपक्ष्यांविषयीं मनुष्याला अधिक जिव्हाळा वाटूं लागला आहे. पशूंविषयीं क्रौर्य दाखवणाऱ्यांना आळा घालण्यासाठीं संस्था निर्माण झाल्या आहेत. अनंतविध मार्गांनीं पुढारलेल्या समाजांतील जीवन अधिक सुगम आणि सुधारलेलें असून कठोरपणा आणि क्रौर्य पुष्कळच कमी झालें आहे. एखादा पूर्वग्रह दूषित निराशावादी किंवा हटवादी सनातनीच फक्त हें सर्व अमान्य करील.

परंतु वैयक्तिक आणि सामाजिक क्षेत्राबाहेर जाऊन आपण आंतरराष्ट्रीय संबंधाकडे पाहिलें तर समाजानें कोठल्याही प्रकारची सुधारणा केलेली दिसत नाहीं; उलट त्याची कांहींशी अधोगतीच झालेली आपल्याला दिसेल. तेथें जंगली कायद्याव्यतिरिक्त दुसरा कोणताही कायदा ओळखला जात नाहीं, अंतरामुळें एकमेकांमध्यें येणारें दूरत्व नाहींसें करण्यांत आलें असूनही पूर्वींपेक्षां अधिक कटुत्व मनांत बाळगून आणि अधिक तीव्रपणें एकमेकांचा द्वेष होत आहे. त्यांचे एकमेकांशीं चालणारे व्यवहार, स्वार्थ, पूर्वग्रह, संशय आणि अविश्वास यांनीं लडबडलेले आहेत. एकीकडे वैयक्तिक जीवनांतील सुख आणि जीवन यांविषयीं अतिशय कळकळ व्यक्त होत आहे तर दुसरी-कडे जातीय, आर्थिक, वांशिक किंवा राष्ट्रीय बाबतींत जे सामाजिक संबंध असतात त्या बाबतींत मानवी जीवनाला कवडीचीही किंमत उरलेली नाहीं. दोन समाजांमध्यें, विशेषतः राष्ट्रें समजल्या जाणाऱ्या समाजामध्यें एकमेकांशीं व्यवहार करतांना सभ्यपणाचें नांवसुद्धां ऐकूं येत नाहीं. आंतरराष्ट्रीय व्यवहारांत फसवेगिरी इतकी सर्रास आणि स्पष्टपणें चालू आहे कीं, त्याविषयीं आतां कोणी गाफील राहिलेला नाहीं. असत्यच नव्हे, तर कमालीचा अप्रामाणिकपणा आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्यें सर्वत्र माजला आहे. या व्यवहारांत गुप्त हेरगिरी, फसवेगिरी, खोटा आणि दुर्बुद्धिपूर्वक केलेला प्रचार हीं साधनें कायदेशीर समजलीं जातात आणि त्यांचा निर्लज्जपणें उपयोग करणें चालू आहे.

लांचलुचपत, हातचलाखी, फसवेगिरी, हिंसा, चोरी, जाळपोळ, आणि खून या सर्वांना या व्यवहारांत स्थान-अगदीं मानाचें स्थान-मिळालें आहे. मानवी जीवनाची कांहींही किंमत राहिलेली नाहीं. जे राजकारणी लोक राजकारणाची दिशा ठरवितात त्यांनासुद्धां ज्यांची स्पष्ट कल्पना नसते, अशा ध्येयासाठीं मानवी जीवनाचा, यंत्रांत घातलेल्या कडब्या-प्रमाणें फडशा पाडण्यांत येतो. आर्थिक व्यवहारांत पिळणूक सर्रास चालली आहे. प्रत्येक समाजाला कांहीं ना कांहीं गोष्टींचा हव्यास आहे; परंतु त्यासाठीं योग्य किंमत देण्याची मात्र कोणाचीही तयारी नसते. आंतर्राष्ट्रीय व्यवहारांत गर्व, उर्मटपणा आणि जात, रंग आणि वंश, यांविषयींचे विकृत ग्रह भरपूर प्रमाणांत आढळतात. युद्धांमधील कालांतर जरी रुंदावलें असलें तरी तीं अधिक भयंकर आणि क्रूर झालीं आहेत. कोठलीही गोष्ट पवित्र राहिलेली नाहीं आणि सुरक्षितही नाहीं. धर्मोपदेशक आणि ईश्वरभक्त, कलावंत आणि लेखक, शास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता, कारा-गीर आणि शेतकरी या सर्वांची निर्दयपणें, आघाडीवर अथवा खंदकांमध्यें रवानगी होत आहे. प्रगतिमान् विज्ञानशास्त्र आणि मनुष्याची विकृत मनो-वृत्ति यांनीं शोधून काढलेलीं प्राणहरणाचीं सर्व शस्त्रास्त्रें काल्पनिक झगडे मिटविण्यासाठीं वापरलीं जात आहेत. हॉवित्झर तोफ, रणगाडा, विमान आणि पाणबुडी हीं सर्व कायदेशीर हत्यारें गणलीं जातात. बालक, स्त्री, तटस्थ, नागरिक जनता आणि लढाईत सामील न झालेले, या सर्वांचा बळी घेण्यांत येतो आणि मरणाहूनहि भयंकर अशा बॉंबवर्षावाखालीं त्यांना जायबंदी करण्यांत येतें, विषारी धुरानें गुदमरून टाकण्यांत येतें अथवा जळत्या आगींत भाजण्यांत येतें. परोपकार अथवा दया तर बाजूलाच राहिली पण न्यायसुद्धां या घटकांत राहिला नाहीं. कोठलेही नीतिनियम पाळण्यांत येत नाहींत. आंतरराष्ट्रीय नियम जर कांहीं असलेच तर लढाईच्या धामधुमींत त्यांचाहि चक्काचूर होत असतो. मनुष्यजातीच्या प्रगतीची अतिशय आशादायी वृत्तीनें तरफदारी करणारादेखील ही वस्तु-स्थिति नाकबूल करूं शकणार नाहीं.

हें सर्व कशामुळें निर्माण झालें आहे ? मानवीजीवन इतकें दयामय आणि तितकेंच पाशवी कां झालें आहे ? तें जितकें आकर्षक वाटतें तितकेंच तिरस्कारणीय कां वाटतें ? ह्या प्रश्नांचीं खरीं उत्तरेंच सुधारणेचा मार्ग दाखवितील.

## दुटप्पी नीति

शतकानुशतकें ज्या दोन प्रकारच्या नैतिक मूल्यांना आपण चालवून घेतलें, नव्हे मान्यता दिली, त्यामुळें वैयक्तिक व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार यांमधील हा प्रचंड फरक निर्माण झालेला आहे असें आम्हांला दिसतें.

वैयक्तिक जीवनांतील सामाजिक संबंधांत ज्या गोष्टी आपण हितावह मानतों त्याच गोष्टी राष्ट्ररूपी गटांच्या बाबतींत अनर्थावह गणल्या जातात.

वैयक्तिक जीवनांत मात्र आपण नीतीनियम आणि रूढि यांचीं बंधनें मानतो. परंतु गट या भूमिकेवर असें कांहींही नियंत्रण राहत नाहीं. एखादा राजकारणधुरंधर वकील म्हणून परदेशांत गेला तर त्याच्या वर्तणुकींत खोटेपणा आणि अप्रामाणिकपणा भरलेला दिसतो. आपल्या देशाच्या अगर सरकारच्या खऱ्याखुऱ्या अगर काल्पनिक हितासाठीं त्यानें वाटेल ते उपाय योजावेत अगर वाटेल त्या माणसांची मदत घ्यावी ! त्याच्या वागणुकीचा मुख्य भर गोप्य, फसवणूक आणि खोटेपणा यांवर असतो. ज्याचा खोटेपणा आणि फसवेगिरी सुप्रसिद्ध आहे त्याला सभ्य समाजांत मान्यता मिळत नाहीं; परंतु राजकारणाच्या क्षेत्रांत विशेषतः आंतरराष्ट्रीय राजकारणांत असल्या लोकांची चहा होते. राष्ट्राच्या प्रमुख मंडळांत त्यांना वरचें स्थान मिळतें. एखाद्या व्यक्तीनें आपल्या शेजाऱ्याच्या मालकीच्या वस्तूचा अपहार केला तर तिला चोर मानण्यांत येतें; परंतु शेजारच्या राष्ट्रावर सुसंघटित हल्ला करून विजय मिळवणाऱ्या सेनापतीला शूरवीर समजतात. चोरी, मग ती दारिद्र्य आणि क्षुधा यांमुळें

बेजार होऊन जरी एखाद्यानें केली तरी त्याची तुरुंगांत रवानगी होते; परंतु राष्ट्रीय प्रमाणावर 'अपहार' करणारा इतिहासांत मानाचें स्थान पटकावून बसतो. जीव घेण्याचा गुन्हा केल्याबद्दल खुनी फांसावर लटकतो हें योग्यच आहे. पण लाखों लोकांचें 'शिरकाण' करणारास कांहींही शासन होत नाहीं. किंबहुना अशा, प्रचंड प्रमाणावर हत्या करणाऱ्यांसाठीं राजमुकुट आणि विजयोत्साहानें काढलेल्या मिरवणुकी राखून ठेवण्यांत येतात. खासगी आयुष्यांत नम्र, प्रेमळ, आणि क्षमाशील मनुष्य आपल्याला आवडतो; परंतु राजकीय व्यवहारांत याच्या अगदीं विरुद्ध स्थिती असते. यशस्वी राजकारणी पुरुष अभिमानी, सूडाची भावना जागृत असलेला आणि चढाईच्या बाबतींत पुढाकार घेणारा असला पाहिजे! प्रत्येक व्यक्तीला आपल्या शेजाऱ्याच्या सुखासाठीं स्वार्थ-त्याग करण्याचा हक्क असतो; नव्हे तें तिचें कर्तव्य समजलें जातें; परंतु एखादा समाज अथवा राष्ट्र जर अशा एकाद्या परोपकाराच्या मोहानें प्रवृत्त झालें तर त्याचा संपूर्ण नाश तर होईलच पण त्याची मूर्ख राष्ट्रांत गणना होईल. जर एखादा मनुष्य चोराला सोडून संन्याशाला सुळावर देण्याला उत्सुक होण्याइतका बिथरला तर त्याला समाजहितशत्रु, छल-वादी, ( sadist ) आणि अमानुष समजलें जाईल; परंतु एखाद्या पोलि-सानें अथवा सैन्याधिकाऱ्यानें एखाद्या जमावाला, जातीला अथवा राष्ट्राला, कांहीं थोड्या व्यक्तींच्या खऱ्या वा काल्पनिक चुकांबद्दल धारेवर धरलें तर त्याला कार्यतत्पर अधिकारी आणि सामर्थ्यसंपन्न पुढारी मानलें जाईल! एखादा समाज, मग तो कितीही सुधारलेला असो, दहशतवादी माणसापासून बाँबवृष्टि करणाऱ्या अथवा हल्ला करणाऱ्या हिंसकापासून आलिप्त राहूं शकत नाहीं. असे समाजहितशत्रू जर वैयक्तिक जीवनांत आपापल्या धर्मांतील रूढि–नियमांचें योग्य पालन करीत असले तर त्यांना धर्मशील गृहस्थ असा भलेपणाहि मिळतो.

वैयक्तिक आणि सामाजिक जीवनांत जें जें सत्य, न्याय्य आणि नैतिक समजलें जातें तें सर्व राष्ट्रीय व्यवहारांत अशक्य, अयोग्य आणि

अनैतिक मानलें जातें. ज्या गुणांची एका क्षेत्रांत वाहवा होते त्यांचीच दुसरीकडे निंदा चालते. आपणांस असें आढळून येतें कीं, राजकारणी पुरुष आणि मंत्री दररोज इतकीं खोटीं विधानें न डगमगतां करीत असतात कीं, त्यांच्या खरेपणावर कोणाचाही विश्वास बसूं शकत नाहीं. तरीपण त्यांविरुद्ध कोणी ब्रही काढीत नाहीं, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. तरीसुद्धां हे सर्व खोटें बोलणारे लोक माननीय पुरुष समजले जातात. त्यांपैकीं कांहींची तर धर्मशील आणि पापभीरु अशी स्तुति केली जाते. खासगी आयुष्यांत बुद्ध अगर ख्रिस्ताचे नियम पाळणारे हे लोक, समाजजीवनांत मोझेसचे अनुयायी किंवा त्याहूनही अधिक हीन असतात. त्या क्षेत्रांत यश मिळविण्याला किंमत असते. कोणत्या मार्गानें तें मिळालें याला तेथें कांहीं महत्त्वच नाहीं. वैयक्तिक नीति आणि राजनीति यांच्यामध्यें एक प्रचंड दुर्लंघ्य दरी निर्माण झाली आहे.

मानवी समाज ही दुहेरी नीति आणि दुहेरी नैतिक मूल्यें उत्पन्न करीत आहे; पण तसें करतांना व्यक्ति आणि समाज किंवा सामाजिक आणि राजकीय व्यवहार यांमधील मूलभूत अंतर्गत संबंधाकडे त्याचें दुर्लक्ष होत आहे. समाजावांचून व्यक्तीला कांहीं किंमत नाहीं. व्यक्तीवांचून कोणत्याही समाजाचें कार्य चालूं राहणार नाहीं. जर एका राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्राशीं चाललेलें व्यवहार जंगली आणि हिंसक असले तर त्यांचा परिणाम वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर आणि सामान्य नीति नियमांवर झाल्यावांचून राहणार नाहीं.

## समाजिक आणि राजकीय जीवन

व्यक्ति आणि संघ हे मानवी समाजाचे दोन पैलू आहेत. ते दोन्ही पैलू सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या प्रगत झालें तरच मानव-जातीची खरी सुधारणा होईल. नीतिमान् व्यक्ति आणि अनीतिमय समाज यांचें साहचर्य अधिक कालपर्यंत हितावह होणार नाहीं. वैयक्तिक आणि सामाजिक प्रगति होत असतां जर राजकीय आणि संघ-

जीवनांत अधोगति चालू असेल तर प्रगतीला आवश्यक असा समतोलपणा लवकरच नाहींसा होईल.

## ऐतिहासिक उदाहरणें

हे अंतर्गत संबंध जेव्हां योग्य प्रकारें पाळण्यांत आले नव्हते किंवा त्यांकडे दुर्लक्ष झालें होतें तेव्हां समाजाच्या प्रगतीला धक्के बसल्याचीं उदाहरणें इतिहासांत सांपडतात. हिंदुस्थानच्या इतिहासांतील कांहीं सुसंगत उदाहरणें घेऊन हा मुद्दा स्पष्ट होईल. हिंदी लोक, विशेषतः उच्चवर्णीय, व्यक्तिशः साधारणतः स्वच्छ आहेत. ते दररोज स्नान करतात. त्यांपैकीं बहुतेक लोक आपले कपडे दररोज बदलतात. त्यांचीं घरें, स्वयंपाकघरें, कोठीच्या खोल्या, भांडींकुंडीं नेहेमीं अगदीं स्वच्छ असतात. असें असतांनाही हिंदुस्थानांतील स्वच्छतेचा दर्जा फार कमी आहे असें कां ? कारण स्वच्छतेची व्यक्तिशः काळजी घेतांना त्यास पूरक अशा समाजांतील जीवनाकडे आपलें दुर्लक्ष होत असतें हें होय. सार्वजनिक रस्ता, खेडेगांव, शहर यांच्याशीं आपल्याला कांहींच कर्तव्य नसतें. या गोष्टींशीं जणूं काय कोणाचाच संबंध नसतो. आपण आपल्या स्वतःच्या राहणींत घाण दूर केली म्हणजे संपलें अशी आपली सोईस्कर समजूत आहे. परंतु समाजाचा आणि व्यक्तीचा इतका दृढ संबंध आहे कीं, जी घाण आपण दाराबाहेर निष्काळजीपणानें टाकतों तीच मच्छर आणि माशा आपल्याकडे हिंवताप आणि इतर रोगांच्या द्वारें परत आणतात. स्वतःच्या शारीरिक स्वच्छतेसाठीं दिवसाकांठीं दोनदां स्नानें करणारे सभ्य स्त्रीपुरुष वरच्या मजल्यावरून जें घाण पाणी किंवा आणखी तसेंच कांहीं खालीं ओततात त्यानें रस्त्यावरून चालणारा मनुष्य नखशिखान्त भिजावा हा प्रकार सर्रास चालू आहे. समाजाला जणूं काय कांहींच हक्क नाहींत ! जें काय आहे तें सर्व व्यक्तीसाठीं ! आपलें सामाजिक कर्तव्य व्यक्ति ओळखीत नाहीं. त्यामुळें व्यक्ति आणि समाज दोघांवरहि घातुक परिणाम होतात.

आपल्या पूर्वजांना ज्ञान पवित्र ठेवावयाचें होतें. ‘अनधिकारी’ लोकांना तें ज्ञान द्यावयास ते तयार नव्हते. फक्त वरच्या दोन वर्गांचाच त्यावर अधिकार होता. पण अनेक शतकांनंतर याचा परिणाम काय झाला ? वेद, शास्त्रें आणि अनेक ‘दर्शनें’ हीं एके काळीं आपणच रचलीं परंतु तें सर्व ज्ञानभांडार असूनहि आज शिक्षणांत आपण अतिशय, किंबहुना सर्वांत मागासलेले आहोंत. हिंदु लोक चतुर्वेदांची शपथ घेतात परंतु त्यांच्यापैकीं किती लोकांनीं हीं त्रिकालाबाधित पुस्तकें पाहिलीं आहेत ? ज्या अंधकारांत आपल्यापैकीं कांहींना डांबण्याचा आपण प्रयत्न करीत होतों, त्याच अंधारानें आपणांस ग्रासिलें आहे आणि संकुचित दृष्टीचे ते शास्त्रकारहि त्यांत सांपडले आहेत.

अस्पृश्यांची वेगळी जात निर्माण करून आपण स्वतःला उच्च आणि पवित्र ठेवूं पहात होतों. आज सर्व हिंदी लोक—‘उच्च’ तसेच ‘नीच’हि—परदेशांतच नव्हे तर, आपल्या मायभूमींतच ‘अस्पृश्य’ होऊन बसले आहेत ! खरा ब्राह्मण, खरा क्षत्रिय आणि खरा वैश्य कोणी असेल, तर तो फक्त इंग्रज माणूस आहे आणि हिमालय आणि गंगा यांनीं पवित्र झालेल्या या देशांत हिंदी माणूसच वाळींत पडलेला आहे ! नियतीनें आपल्यावर मात केली आहे. ह्या नैतिक जगांत, वैयक्तिक किंवा सामाजिक कोणत्याहि स्वरूपाच्या प्रमादानें जर निसर्गनिर्मित समतोलपणाला धक्का देण्याचा प्रयत्न करण्यांत आला तर निसर्गाकडूनच त्याचें प्रायश्चित्त मिळाल्याखेरीज राहणार नाहीं.

व्यक्ति आणि समाज हे एकत्र बांधले गेलेले आहेत. एकाच मानवी जीवनाचे ते दोन पैलू आहेत. जर एकाची प्रगति झाली आणि दुसरा मागेंच रेंगाळत राहिला तर आवश्यक तो समतोलपणा रहात नाहीं आणि कालांतरानें दोघांवरहि त्याचा वाईट परिणाम होतो. मनुष्यजातीनें जर आंतर्राष्ट्रीय संबंधाचा प्रश्न नीट सोडवला नाहीं आणि संघजीवनाचें योग्य रीतीनें नियंत्रण करून त्यांतील नीतिमत्ता टिकविली नाहीं तर आजपर्यंत केलेली सर्व प्रगति फुकट जाऊन पूर्ववत् निसर्गास

शरण जावें लागेल, आणि ज्या पश्वावस्थेंतून मनुष्य वर आला त्या पशुत्वाच्या दर्जास मानवसमाज पोहोचेल, अशी भीति जगांतील सर्व विचारवंतांना प्रामाणिकपणें वाटत आहे. आणखी एक दोन जागतिक महायुद्धांनंतर सबंध मनुष्यजात जंगली झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

आपण गेल्या कित्येक शतकांच्या श्रमांनीं मिळविलेल्या बौद्धिक आणि नैतिक विजयास आपल्या सांघिक जीवन-कलहामुळें आपणास मुकावयाची वेळ आली आहे. तें संघजीवन नियंत्रित आणि नीतिबद्ध कसें करावयाचें हा प्रश्न खरा आहे. तसा एखादा मार्ग आहे काय ? जर असेल तर तो कोणता ? समाजांतर्गत व्यक्तीच्या प्रगतीचा वृत्तांत आपणास कांहीं मार्ग-दर्शन करूं शकेल काय, तें आपण पाहूं या.

## अहिंसा–पथाकडे

## — २ —

## कायदा

सुधारणेच्या मार्गांत मानवी व्यक्तीनें प्रगति कशी केली ? कोणचे मार्ग अवलंबिले ? मनुष्यप्राणी प्राथमिक स्वरूपांत अगदीं पशूंच्याप्रमाणें रहात असल्याचा एक काळ प्रत्येक वंशाच्या इतिहासांत आढळतो. सर्व वंश एकाच वेळीं अशा अवस्थेंत नव्हते हें खरें असलें तरी केव्हां ना केव्हां प्रत्येक वंश या अवस्थेंत होताच. त्या काळांत प्रत्येकाचा सर्वांशीं अव्याहत निकराचा झगडा चालू होता. मनुष्य पशुइतकाच हिंस्र होता. शारीरिक-दृष्ट्या जो अधिक समर्थ असेल तोच अधिक काल तग धरून राहील हा नियम पूर्णपणें आणि अनिर्बंधपणें चालू होता. परंतु ही परिस्थिति कायम टिकणारी नव्हती. जर ती तशीच राहिली असती तर आतांपर्यंत मनुष्य-

प्राण्याचा मागमूसदेखील राहिला नसता. मनुष्यजात टिकून राहिली याचें कारण तिनें युद्ध आणि हिंसा या मार्गांपेक्षां निराळे पंथ शोधून काढले. पुरुष आणि स्त्रिया, कुटुंबें, टोळ्या, संघ आणि राष्ट्रें यांना संकलित करणारी ती शक्ति कोणती? अप्रत्यक्षपणें सांगावयाचें म्हणजे ती शक्ति अहिंसा ही होय. प्रत्यक्ष सांगावयाचें म्हणजे त्या शक्तीचें नांव 'प्रेम' हें आहे. त्या शक्तीनें शांतता आणि सहकार्य निर्माण झालें. मनुष्यानें निर्माण केलेले आणि विकसित केलेले समाज आणि संघटना, हिंसेचा मार्ग सोडून अहिंसेच्या आणि सहकार्याच्या दिशेनें प्रगत होत आले आहेत. एवढेंच नव्हे तर मनुष्यनिर्मित सर्व संघटना याच मार्गानें उन्नत होत आल्या आहेत. कांहीं उदाहरणें घेऊन हा मुद्दा स्पष्ट करूं या.

## कुटुंब-संस्था

मनुष्यप्राण्याच्या जीवनाचा ओघ अखंडपणें टिकूं शकला तो केवळ कुटुंबसंस्थेमुळेंच. कुटुंबसंस्था ही आद्य आणि अतिप्राचीन मानवसंस्था आहे. कुटुंबांतील सर्वच व्यवहार कालांतरानें हिंसावृत्तीचा अधिकाधिक लोप करीत अहिंसात्मक होत गेलेले आहेत. कुटुंबप्रमुखाला कुटुंबांतील कनिष्ठांवर संपूर्ण सत्ता गाजविण्याचा अधिकार एके काळीं होता. बायको आणि मूल ही अनुक्रमें नवरा आणि बाप यांची मालमत्ता समजली जाई. त्यांचें जीवित आणि देह यांवर त्यांचा अधिकार असे. अगदीं प्राथमिक अवस्थेंत कुटुंबनायक कनिष्ठांचें जीवित किंवा शरीर यांना धक्का न लावतां, आपल्या ताब्यांतली ही मालमत्ता, गरज पडतांच इतर मालमत्तेप्रमाणें दुसऱ्याला तो देऊनही टाकूं शके. नंतर असा काळ आला कीं, कुटुंबनायक कनिष्ठांना आज्ञाभंग किंवा असमाधानकारक वर्तनाबद्दल शिक्षा म्हणून शारीरिक शिक्षा करून स्वतःचें समाधान मानी. कुटुंबांतर्गत हिंसेबद्दल सरकारदेखील त्याला जाब विचारूं शकत नसे. त्याचा आज्ञाभंग केल्यास तो सांगेल ती शिक्षा कुटुंबियांस सहन करावी लागे. ज्या मानानें आज्ञाभंग किंवा अमर्यादा, आज्ञोलंघन कमीअधिक गंभीर असेल त्या मानानें शिक्षेचें

प्रमाणही कमीजास्त असावयाचें. आजदेखील कुटुंबांतर्गत शारीरिक शिक्षेचा प्रघात चालू आहे. तरी भयंकर शिक्षेच्या प्रसंगीं मध्यें पडण्याचा अधिकार सरकार गाजवूं शकतें. वयांत आलेले स्त्री-पुरुष आज थोडेफार स्वतंत्र आहेत. मुलांच्या हक्कांनादेखील मान्यता मिळण्यास आतां सुरुवात झाली आहे. आईबापांनीं क्रूरपणानें हक्क गाजविल्यास आधुनिक सरकार मध्यें पडून मुलांची सुटका करतें.

## विवाह-संस्था

विवाहसंस्थेची आजपर्यंत विलक्षण स्थित्यंतरें झालीं आहेत. हरण, अपहरण आणि अनेक मुली पळवून नेणें या विवाहपद्धतीस रूढीनें मान्यता दिलेली असे. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, या पद्धतींनीं मिळविलेल्या वधूंची स्थिति अरेरावीस बळी पडल्यासारखी केविलवाणी नव्हती. त्या पद्धतींतहि आजच्या समवयस्क आणि स्वतंत्र तरुणतरुणींच्या संबंधाइतकीच कल्पनारम्यता असे. परंतु अजूनही विवाहाची सर्वोत्कृष्ट अशी पद्धति प्राप्त व्हावयाची आहे. स्त्री पुरुषविषयक संबंधांपैकीं विवाहासारख्या अति नाजुक प्रकरणीं मातापित्यांची बळजबरी, जात, गोत, धर्म आणि रंगवंश यांविषयींचे पूर्वग्रह अद्यापही अप्रत्यक्षपणें अरेरावी गाजवितातच. आजकाल सुधारलेल्या देशांत विवाह पूर्वीपेक्षां बऱ्याच अंशांनीं स्वतंत्रपणें होत आहेत; इतकेंच नव्हे तर प्रणयाराधनेंतील चांचल्य आतां नाहींसें होऊन त्याऐवजीं प्रेमाचा स्पष्ट आणि मनमोकळेपणानें स्वीकार होत आहे. लटके आविर्भाव आणि वैषयिक मोहिनी यांचा प्रभाव दिवसेंदिवस कमी होत चालला आहे.

लग्नानंतरही प्रगतिशील समानत्वाकडे पतिपत्नींचा कल दिसतो. आर्थिक परावलंबित्वही नाहींसें होत आहे. असा एक काळ होता कीं, ज्यावेळीं बऱ्याच दिवसांनीं घरीं आलेला पति, घरीं आल्याबरोबर ताडनानेंच पत्नीचें प्रेमाराधन करी; किंबहुना तसा प्रसाद मिळाला नाहीं तर नवऱ्याचें प्रेम कमी तर झालें नाहीं ना अशी बायकोला रुखरुख वाटे. त्या काळाच्या आपण किती पुढें गेलों आहोंत! अशा मारहाणीनें

वैवाहिक जीवन अत्यंत सुखाचें व्हावें अशी परिस्थिति थोड्या शतकांपूर्वीच आपल्या जातीच्या इतिहासांत होती, असें एखाद्या आधुनिक प्रेयसीला सांगितलें तर तिचा त्यावर विश्वास तरी बसेल काय ?

## अपत्यसंगोपन

छडीचा प्रसाद आणि 'खुर्ची' आंगठे धरणें अशा शिक्षा दिल्यावांचूनहि मुलें शहाणीं होतात यावर आपल्या पूर्वजांचा विश्वास बसलाच नसता ! शिक्षण-शास्त्राचें मुख्य तत्त्व ' छडी लागे छम् छम् । विद्या येई घम् घम् ' हेंच होतें. आजच्या कालांत देखील या तत्त्वाचा मनुष्यप्राण्याला पूर्णपणें विसर पडलेला नाहीं. परंतु जनावरांनासुद्धां शिक्षण देण्याचे कामींहि छडी नि चाबूक हीं उत्तम माध्यमें नाहींत, तीं परिणामकारक नाहींत हें हळू हळू मान्य होत चाललें आहे. आज कटु शब्द आणि धाक दाखविणें देखील शक्यतोंवर टाळण्यांत येतें. मुलांच्या आयुष्यांत हास्य अवतीर्ण होऊन प्रकाश प्रगट होऊं लागला आहे. त्यांच्याविषयी यथार्थ कळकळ दाखवून त्यांचें संगोपन होत आहे.

मुलाची कसलीही जिज्ञासा असो, ती एक थप्पड देऊन पूर्ण करावयाची असा एक काल होता. सभ्य वृत्तीचे आईबाप अशा वेळीं असत्याचा आश्रय करून आणि उडवाउडवीचीं उत्तरें देऊन, आपल्याला पेचांत टाकणाऱ्या मुलांच्या जिज्ञासेला बगल देतात. आज सुसंस्कृत आणि सुधारलेल्या शाळांतून आणि घरांतून छडीची तर हकालपट्टी झालीच आहे पण मुलांशीं वागतांना आणि त्यांचें संगोपन करतांना खोटेपणा आणि बनवाबनवी हीं नाहींशीं होण्याच्या मार्गांत आहेत व कोठें कोठेंतर तीं नष्ट झालींच आहेत.

सुधारलेल्या समाजांत मुलाचें मानसशास्त्रच बदललें आहे. त्याच्या पूर्वींच्या पिढींतील मुलांचें संगोपन आणि ज्ञान आणि धार्मिकता या गोष्टी छडीच्या माध्यमानेंच प्राप्त होत असत. अशा पद्धतीनें शिकण्यास आजचा विद्यार्थी तयार नाहीं. त्याला नीटपणें वागवलें, त्याच्याविषयीं पुरेशी आस्था दाखविली तरच तो आपल्या ठिकाणच्या सुप्त शक्तींचा आविष्कार

करील आणि त्याच्या विकासाची दिशा ठरवितां येईल. त्याच्यावर बळजबरी करण्यांत आली तर त्याच्यांत विचित्र गंड निर्माण होतील आणि तो विकृत होईल.

## धर्म-संस्था

धर्माची सुरुवात आग आणि तलवार यांच्या जोरावर प्रथम झाली. नरमेध आणि पशुयज्ञ यांच्यापासून धर्मास आरंभ झाला.

बळजबरीनें धर्मांतर आणि त्यासाठीं वारंवार कत्तली धर्माच्या आरंभ-काळीं झाल्या. पृथ्वीच्या बऱ्याच मोठ्या भागांवर धर्मासाठीं मोठमोठीं युद्धें झालीं आहेत. आज अतिशय मागासलेले असे लोक वगळल्यास हिंसेच्या जोरावर श्रद्धा आणि मन बदलतां येत नाहीं, ही गोष्ट बहुतेकांना पटली आहे. गुप्तपणें दिलेली लांच, खुबीदार प्रचार, शैक्षणिक आणि सामाजिक सेवा या मार्गांचा उपयोग आतां धर्मप्रचारासाठीं करण्यांत येतो. अप्रत्यक्षपणें हिंसा करणाऱ्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या प्रचारकांच्या हेतूंविषयीं लोक साशंक असतात. त्यांना कोणी मान देत नाहीं. कारण आध्यात्मिक गोष्टींच्या स्वीकारासाठीं भौतिक आमिषें प्रचारक पुढें करतात. आध्यात्मिक मूल्यापेक्षां बाटलेल्यांच्या संख्याबलावरच प्रचारकांची महति ठरविण्यांत येते. पण धर्म ही प्रत्येकाची खासगी बाब आहे असें पुरोगामी मत आतां प्रस्थापित होत आहे. खरें धर्मांतर म्हणजे मनुष्याच्या मनांत सत्याविषयीं ओढ लागण्यांत आहे. या तत्त्वापासून च्युत होणें ही हिंसाच आहे असें आध्यात्मिक भावनेविषयीं तळमळ बाळगणाऱ्या लोकांचें मत आहे.

## व्यापार-संस्था

व्यापाराची सुरुवात लूट, अपहार आणि चांचेगिरीनें झाली. पाश्चिमात्य राष्ट्रांत व्यापारी संस्था स्थापन होऊन त्यांना त्यांच्या त्यांच्या सरकारांकडून जमिनीवर आणि समुद्रावर लूटमार करण्यास परवाना मिळत असे. या गोष्टीस फारसा काल लोटलेला नाहीं. व्यापाराची एवढीच

कल्पना पूर्वी माहीत होती. अमेरिकेंतून माल आणणाऱ्या स्पेनमधील जहाजांवर हल्ले करणें म्हणजेच चांगला व्यापार होय, अशी एलिझाबेथच्या काळीं इंग्लंडमध्यें व्यापाराची कल्पना होती. परंतु हा लुटलेला मालदेखील मुळांत स्पॅनिश लोकांनीं असाच कुटून तरी लुटून आणलेला असे. नीग्रो लोकांना त्यांच्या देशांतून धरून आणून अमेरिकेंतील मळ्यांमध्यें गुलाम म्हणून विकणें हा इंग्रज लोकांचा किफायतशीर धंदा होता. मानवी शरीराचा हा जो व्यापार, स्वतःच्या कर्तबगारीवर त्यांनीं मिळविला होता, त्यांतील आपलें वर्चस्व टिकवण्यासाठी इंग्रज व्यापारी नेहमीं तलवार उपसून सिद्ध असत. हें वर्चस्व आपण न्याय्य मार्गानेंच मिळविलें आहे असें त्यांना वाटे. या सर्व गोष्टी आतां लुप्त झाल्या आहेत. अर्थात् व्यापार आणि उद्योगधंदे यांमध्यें हिंसा आणि फसवाफसवी यांचा कौशल्यानें उपयोग होतच आहे. परंतु तरी पुष्कळच सुधारणा झाली आहे यांत शंका नाहीं. व्यापाऱ्याचा शब्द हा त्याच्या करारनाम्याइतका मूल्यवान् समजला जातो. फसवणुकीची शक्यता नेहमींचीच असली तरी व्यापारांतील नेहमींचे व्यवहार दोघांच्याही फायद्याचे व्हावेत या दृष्टीनें केले जातात. आधीं दाखविलेल्या नमुन्याचाच माल पुरवला जातो. तसेंच ‘ एकच भाव ’ अधिकाधिक प्रचारांत येत आहे. मनुष्याच्या ह्या अतिशय स्वार्थी व्यवहारांतील अप्रामाणिकपणाचा आणि फसवणुकीचा नायनाट करण्याचे प्रयत्न चालू आहेत. तरी देखील सांठेबाजी, मजुरांची पिळवणूक आणि उपासमार यांसारखे हिंसामय प्रकार चालूच आहेत. पण मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि अधिकाधिक जागृत होत असून ती या प्रकारांचा निषेध स्पष्टपणें नमूद करूं लागली आहे.

## शासन-संस्था

शासन-संस्थेचा आरंभ हिंसेपासूनच झाला. एकदां तिची स्थापना झाली म्हणजे तिचें काम हिंसेच्याच द्वारें चालतें. बलिष्ठ माणसाची इच्छा हाच पूर्वी कायदा होता. त्या अरेरावाच्या इच्छेला कोणतेंहि विशिष्ट वा सर्वसामान्य तत्त्व

नव्हतें. तिचें स्वरूप, लहरी, बेबंद, विकारवश आणि सुडाच्या प्रवृत्तींचें होतें. तिच्यापुढें संमति वा परिवर्तन हा प्रश्नच नव्हता. तिचा अंमल दडपशाही, बळजबरी आणि दहशतवाद यांच्या आधारें चालत असे. कालांतरानें एकट्याच्या इच्छेची जागा, एखादा संघ किंवा सत्ताधारी वर्ग यांच्या इच्छेनें घेतली असावी. असा वर्ग कितीही लहान असला तरी त्याला सर्वसामान्य नियमांवांचून वागणें अशक्य होतें. त्यामुळें कांहीं कायदे करण्यांत आले आणि पुढें त्यांची नोंद करण्यांत आली. त्यानंतर कांहीं दिवसांनीं कायदेग्रंथ निविष्ट झाले. तरीसुद्धां हे नियम सत्ताधारी वर्गापैकीं कांहीं लोक वारंवार धुडकावून लावीत. कायद्याला समानता माहीतच नव्हती. परंतु कालांतरानें लहरी आणि मूठभर सत्ताधाऱ्यांच्याबरोबर चालणाऱ्या शासन-संस्था नाहींशा होऊन लोकशाहीनें कायद्याच्या बाबतींत समानत्वाचें तत्त्व प्रस्थापित केलें.

शासनाचे खरे गुणधर्म त्यास लोकमताचा पाठिंबा असल्याखेरीज व्यक्त होत नाहींत. त्याची घटना आणि दुरुस्ती जनतेनें निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं केली पाहिजे. न्यायदान आणि त्याची अंमल-बजावणी ह्या गोष्टी या अवस्थेंत विभक्त करण्यांत आल्या. तरीही लोकशाही पूर्णपणें सुरू झाली नाहीं. वस्तुतः असें आढळून आलें कीं, प्रातिनिधिक सरकारें केवळ नांवालाच आणि बाह्यतः लोकसत्तात्मक होतीं. परंतु प्रच्छन्नपणें मूठभर सत्ताधाऱ्यांच्याच करवीं तीं चालवलीं जात होतीं. गरीब लोक स्वतःचें मत योग्य रीतीनें व्यक्त करण्यास असमर्थ होते. त्यांचें मत सरकारी निर्णयावर परिणाम करूं शकत नसे. म्हणून आतां राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक आणि सामाजिक समानता सर्वांना मिळावी या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत. तरीपण सध्यांचीं सर्व सरकारें तात्त्विक दृष्ट्या दडपशाही आणि अरेरावीनेंच चालू आहेत. सुधारलेल्या आधुनिक राष्ट्रांत ही शक्ति प्रत्यक्ष समाजविरोधी गटाला मात्र दिसत नाहीं. ती गुप्त असते. अगदीं शेवटलें, दरारा म्हणून किंवा हत्यार

म्हणून ती वापरण्यांत येते. सर्वसामान्य परिस्थितींत दडपशाहीचा किंवा अरेरावीचा प्रत्यक्ष अंमल होत नाहीं.

## फौजदारी कायदा

सुरुवातीला गुन्हा हा फक्त वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न होता. भयंकर राजद्रोहाचा गुन्हा सोडून इतर गुन्ह्यांशीं सरकारचा कांहीं संबंध नसे. गुन्हेगार किंवा त्याचे आप्तेष्ट आणि मित्र यांचेकडून गुन्हेगारानें केलेल्या गुन्ह्याची भरपाई करणें हें अगदीं कायदेशीर कृत्य मानण्यांत येई. पिढीजात मालमत्तेप्रमाणें कुटुंबांतील कलहसुद्धां वंशपरंपरेनें चालू रहात. दोन घराण्यांतलें वैर पिढ्यान् पिढ्या चालत असे. कालांतरानें सरकारला या बाबतींत अधिकार आला. प्रथमतः ह्या पिढीजात वैरांकडे सरकार लक्ष घालूं लागलें. सुडाचें नियंत्रण करण्यांत आलें. आणखी कांहीं काल गेल्यावर, खुनासुद्धां सर्व गुन्ह्यांची पैशांत किंमत ठरवण्यांत येऊं लागली. आणि पैशाच्या मोबदल्यानें भांडण तोडण्याचें स्वातंत्र्य कज्जेदारांस देण्यांत आलें. हा मोबदला दिला जातो कीं नाहीं तें पहाणें एवढेंच सरकारचें काम झालें; परंतु गुन्हेगारी हा वैयक्तिक प्रश्न नसून तो सामाजिक प्रश्न आहे ही दृष्टि येण्याइतकी प्रगति होण्यास बराच काळ लागला. सरकारनें आपला अधिकार हळूहळू गाजविण्यास सुरुवात केली.आज गुन्ह्याच्या बहुतेक स्वरूपांचा विचार सरकारच्या कक्षेंत आला आहे. गुन्हा हा केवळ व्यक्तीविरुद्ध नसून समाज आणि सरकार यांनाहि अहितकारक आहे असें आज मानण्यांत येतें. गुन्हेगार व फिर्यादी दोघांनाही न्यायखात्याकडे तक्रार न्यावी लागते आणि शिक्षा देणें व ती भोगावयास लावणें या गोष्टी समाजहिताच्या दृष्टीनें, सार्वजनिक संस्थेकडून होऊं लागल्या आहेत. गुन्ह्यामुळें दुखावलेली जी व्यक्ति असेल तीसुद्धां केवळ साक्षीदार या नात्यानेंच न्यायासनासमोर उभी राहते. गुन्ह्याचें निराकरण करण्याची तिच्या हातीं पूर्वीप्रमाणें कांहीं सत्ता नाहीं.

## शिक्षा

आरंभीं शिक्षा रक्तपातकारक आणि क्रूर होत्या. गुलामगिरी हातपाय

तोडणें, फांसावर चढवणें, जाहीरपणें ठार मारणें अशा या शिक्षा आरंभीं सर्रास चालू होत्या. इंग्लंडमध्यें अगदीं अलीकडे १९ व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत, आजच्या कालांत जे अगदीं क्षुद्र गुन्हे मानले जातील, अशा गुन्ह्याबद्दल प्राणदंडाची शिक्षा दिली जाई. अवयव तोडणें, डाग देणें आणि विद्रूप करणें सर्रास चालू होतें. आजच्या सुधारलेल्या देशांत या सर्व गोष्टी बदलल्या आहेत. प्राणदंडाची शिक्षा कांहीं पुढारलेल्या कांहीं देशांनीं अजीबात बंद केली आहे. जेथें ती चालू आहे तेथेंही समाज-विघातक कृत्याबद्दल गुन्हेगारीची कायमची हकालपट्टी करतांना तें कृत्य शक्य तितक्या खासगी रीत्या आणि शक्य तितक्या कमी यातनादायक पद्धतीनें करण्यांत येतें. शिक्षेचें शास्त्रच मुळीं बदललें आहे. सूड घेणें, बदला घेणें किंबहुना मन दाबून ठेवणें यांवर सुरक्षिततेच्या दृष्टीनें सुद्धां कोणी फारसा विश्वास ठेवीत नाहीं. गुन्हेगारी प्रवृत्ति जर पिढीजात प्रति-कूल परिस्थितीमुळें निर्माण झालेली असेल, वाईट वातावरण किंवा अयोग्य शिक्षण यामुळें उत्पन्न झालेली नसेल, तर मग तो एक रोग असला पाहिजे आणि त्यावर शरीरदंडापेक्षां मानासिक उपचार करूनच तो दूर केला पाहिजे ही गोष्ट हळू हळू कळूं लागली आहे. तुरुंगच 'बंदि-शाळा' होत आहेत, आणि तेथें गुन्हेगारांना उपयुक्त धंदे-शिक्षण अथवा हातकाम शिकवण्यांत येऊन, त्यांची गुन्हेगारीची प्रवृत्ति समूळ नष्ट करून, त्यांना पुन्हां बाहेरच्या जगांत सोडतांना आरोग्यसंपन्न आणि संपूर्ण करून, सामान्य नागरिकाचें आयुष्य पुन्हां जगण्यास आरंभ करतां यावा अशी त्यांची सुधारणा करण्यांत येते.

## दिवाणी—कायदा

सावकारानें आपले पैसे कसे वसूल करून घ्यावेत याचा निर्णय त्यानें [illegible] त्र करावयाचा अशी या कायद्याची सुरवात झाली. सरकार त्यात ढवळाढवळ करीत नसे. सावकार कर्जदाराला कांहीं काळ किंवा कायमचा सुद्धां गुलाम बनवूं शके. त्याचे अवयव तो तोडूं शके अथवा

तो त्याला जिवें मारी ! सावकारानें कर्जवसुलीसाठीं कोणत्या थराला जाव-याचें याची मर्यादा ठरवून देण्यासाठीं सरकारनें प्रथम या बाबतींत लक्ष घातलें. प्रथमतः कर्जदाराचा जीव आणि हातपाय सावकाराच्या तडाख्यां-तून सोडविण्यांत आले आणि मग त्याची गुलामगिरींतून सुटका झाली !

वारसाकडे कांहीं संपत्ती आली असेल तर गोष्ट निराळी; पण तसें नसल्यास, कर्जाचा बोजा कर्जदाराच्या वारसाच्या डोक्यावर बसूं नये अशी व्यवस्था पुढें पुढें करण्यांत आली.

आतां कर्जदाराच्या मालमत्तेवर सावकाराचा फक्त मर्यादित आणि तोहि नियंत्रित अधिकार असतो. त्यासही सरकारची मान्यता मिळवावी लागते आणि जप्तीचा हुकूम मिळाल्यानंतरहि तो बजावण्याचें कार्य सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीनेंच आणि ठरलेल्या नियमानुसार करावें लागतें. कराराची अंमलबजावणी, नोकर व मालक यांचे संबंध आणि इतर अनंत सामाजिक संबंध आणि संस्था यांमध्येंही हीच पद्धती आप-णांस दिसते. मानवी जीवन आणि कार्यक्षेत्र यांमध्यें पुरोगामी अशी जी सुधारणा घडून आली ती अहिंसा, सहकार्य, प्रेम व सत्य या मार्गानेंच झाली. हीं आधारभूत तत्त्वें जर नसतीं तर मानवी समाज रसातळाला गेला असता आणि ह्या पृथ्वीवर मानवी जीवन अशक्य झालें असतें. स्वतःला सुसंस्कृत करण्यासाठीं व्यक्तीला या मार्गानें जावें लागलें आहे. समाजालाही सुसंस्कृत व्हावयाचें असेल तर ह्याच मार्गानें गेलें पाहिजे. सामाजिक संबंधांतहि संशय, अविश्वास, द्वेष आणि हिंसा यांची जागा विश्वास, सत्य, प्रेम आणि अहिंसा यांना मिळाली पाहिजे. असें न केलें तर व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन यांना धोका निर्माण होईल.

मानवी व्यक्तीला माणसाळवण्यासाठीं आणि समाजाभिमुख आणि सुसंस्कृत बनविण्यासाठीं मनुष्यजातीनें दुहेरी मार्गाचा अवलंब केला. प्रथम त्याचें मन ज्ञान देऊन सुधारण्यांत आलें आणि नंतर त्याच्या भोंवतींच्या वातावरणांत इतके प्रतिबंध आणि नियंत्रणें ठेविलीं कीं, त्यांमुळें समाज-विरोधी वर्तणूक करणें कठिण आणि दुःखकारक होऊन बसलें. एका बाजूस

मानासिक आणि ध्येयवादी दृष्टिकोण तर दुसरीकडून संस्थां-मूलक आणि बाह्य परिस्थितीची अनुकूलता असें वातावरण निर्माण झालें; व्यक्तीचें मन आणि इच्छा, सुधारक आणि धर्मसंस्थापकांच्या उपदेशानें, प्रचारानें आणि प्रत्यक्ष उदाहरणानें हळूहळू बदलत होती. त्यायोगें ज्या ज्या गोष्टी साध्य झाल्या त्यांतून कायदे करणारे, राजकारणी पुरुष आणि मोठमोठे राजे आणि सत्ताधारी यांनीं संस्था निर्माण करून त्या गोष्टी चिरस्थायी केल्या. अंतर्गत आणि बहिर्गत अशा स्वरूपाच्या या दोन्ही पद्धतीं एकमेकीं-बरोबर सहकार्यानें चालू राहिल्या. ज्यावेळीं ध्येयमार्गी आणि सुधारणावादी प्रगतीस आवश्यक अशा स्थिर संस्थाचें सहकार्य वा पाठिंबा मिळाला नाहीं, त्यावेळीं त्या कालांतरानें नाहींशा झाल्या. जेथें बाह्यतः कार्य करणाऱ्या संस्थांनीं मानसशास्त्रीय सिद्धांतावर अतिक्रमण केलें तेथें आंतरिक तळ-मळ आणि आवश्यकता यांच्या अभावीं त्या संस्थाची वाताहात झाली. आंतरिक आणि बाह्यतः परिणामकारी म्हणजेच ध्येयात्मक आणि संस्थामूलक असाच दुहेरी मार्ग संघात्मक सुधारणांसाठीं अवलंबिला पाहिजे. ध्येयात्मक प्रगतीच्या अगोदर, नियमबद्धता आचरणांत आणूं पहाण्याचा एक प्रयत्न अकालीं परंतु अपरिहार्यपणें होत असल्याचें अगदीं ताजें उदाहरण आपल्या-पुढें आहे. राष्ट्रसंबंधांत संयुक्तिकता, न्याय, तत्परता, किंबहुना सत्य आणि अहिंसा यांची आवश्यकताहि माणसास पटलेली नाहीं हेंच राष्ट्रसंघाच्या अपयशाचें कारण आहे. राष्ट्रसंघाच्या सर्व सभासदांचा युद्ध आणि राजनीतीचे डावपेच यांवर सारा भर आहे. मग ते बाह्यतः कांहींहि दाखवोत. इतकेंच नव्हे संघच काय पण व्यक्तीसुद्धां या बाबतींत बदल करायला तयार नाहींत. कांहीं थोडा प्रचार या दृष्टीनें झाला आहे खरा, पण व्यक्ती अथवा राष्ट्रांना ही नवी सामाजिक नीति पत्करावयास लावण्या-इतका तो प्रभावी नाहीं. एकमेकांविषयीं अविश्वास असतांना आणि प्रत्येक राष्ट्र शस्त्रास्त्रें वाढवून गुप्त करार करीत असतां राष्ट्रसंघ टिकाव कसा धरणार ? असें असतांहि कितीतरी वर्षें त्यानें आपलें मरतुकडें आयुष्य कंठलें, याचें श्रेय त्याच्या स्वयंसिद्ध सामर्थ्याकडे नसून महा-

युद्धामुळें हतबल आणि भीरु बनलेल्या पराभूत राष्ट्रांच्या दुर्बलतेकडे आहे. जों जों ही भीति आणि थकवा कमी होत आहे तों तों राष्ट्रांची क्षुधा वाढत असून तीं आणखी एक अधिक मोठें आणि भयंकर युद्ध जवळ आणीत आहेत.

## मार्ग

— ३ —

अशा या संपूर्णतः विकीर्ण झालेल्या जगांत गांधीजींनीं आपल्या सत्य आणि अहिंसेच्या संदेशासमवेत पाऊल ठेवलें आहे. इतिहासानें सिद्ध केलेली एक आवश्यकता आणि मोठें ऐतिहासिक कार्य तडीस नेण्यासाठीं ते पुढें झाले आहेत. आपल्या सुदैवानें ह्या नवीन सुधारणेची ध्येयवादी दृष्टि तर त्यांच्यापाशीं आहेच परंतु शिवाय त्याबरोबरच त्या दृष्टीचा व्यवहारांत उपयोग करवून घेण्याची पात्रताही त्यांचे अंगांत आहे. कुटिल राजनीति, हिंसा आणि युद्ध यांनीं पछाडलेल्या जगांत जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आणि अवस्थांत सत्य आणि अहिंसा यांवरील त्यांची पूर्ण निष्ठा अचल राहिली राहिली आहे. तें पाहून त्यांच्या हेतूविषयीं कांहीं लोकांना—विशेषतः त्यांच्या विरोधकांना—संशय वाटणें साहजिक आहे. विरोधकांचें हें मत पूर्वग्रहदूषित नसेलहि; तरी त्या मतांत उथळपणा आहे यांत शंका नाहीं. गांधीजींच्या कल्पना अपूर्व आणि अव्यवहार्य वाटणें शक्य आहे. परंतु आपण हें विसरतां कामा नये कीं त्यांचाच उपयोग करून त्यांनीं संघटनेच्या जोरावर कांहीं घटना घडवून आणल्या आहेत; त्यांच्या अनुयायांचा या तत्त्वाबद्दल विश्वास शेवटपर्यंत टिकेल कीं नाहीं आणि विरोधकांच्या आदरास ते पात्र होतील किंवा नाहीं हें भविष्यकाळ ठरवील. परंतु त्यांचें आतांपर्यंतचें यश स्तिमित करून सोडणारें आहे. दक्षिण

आफ्रिका, चंपारण्य, खेडा आणि बार्डोली येथील अहिंसात्मक सत्याग्रह याखेरीज अखिल भारतव्यापी स्वरूपाच्या अशा तीन चळवळींचें नेतृत्व त्यांचेकडे होतें. दोन चळवळी त्यांनींच सुरू केल्या आणि एक सरकारनें त्यांच्यावर लादली. ह्या तीन चळवळींच्या वेळीं एक सबंध राष्ट्र, जगांतील सर्वांत अधिक सुसंघटित आणि सामर्थ्यशाली साम्राज्याच्या अन्यायी आणि जुलुमी सत्तेविरुद्ध बंड करून उठलें होतें. तरीही अशीं प्रचंड आंदोलनें इतरत्र झालीं त्यावेळीं येथील आंदोलनापेक्षां कमी हिंसा अगर द्वेष असल्याचें आढळून येणार नाहीं. या संग्रामांत जे मरण पावले त्यांची संख्या अगदीं उपेक्षणीय आहे. या संग्रामांत अनाथ आणि विधवा यांचे आर्तस्वर अगदीं सौम्य आणि तुरळक ऐकूं आले. आहिंसक सत्याग्रहींच्या वित्तास अथवा जीवितास फारसा अपाय झालेला नाहीं. या संग्रामांतील मानवी कष्ट आणि दुर्दैवाची कहाणी फार छोटी आहे. सर्वसाधारण युद्धें यापेक्षां नैतिक दृष्ट्या हिणकस असतात. त्यांत यापेक्षां कमी यश लाभतें. आणि तरी हिंसा, द्वेष व कष्ट यांचें प्रमाण मात्र जास्त असतें. तेथें अधिक रक्ताचा व्यय झालेला दिसतो. जेता आणि जित या दोघांनाही भयंकर तोटा सोसावा लागला असें त्या युद्धाचा इतिहास सांगतो. गांधीजींच्या अहिंसात्मक चळवळीमध्यें प्रत्यक्ष नुकसान असें दोन्ही बाजूंचें फार थोडें झालें. परंतु आक्रमकांची नैतिक हानि मात्र कमालीची झाली.

गांधींच्या या तीन चळवळीनंतर आतां हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य अगदीं नजीक येऊन ठेपलें आहे असें दिसतें. परकीयांची भीति आणि मोह हीं हिंदी मनानें टाकून दिलीं आहेत. परकीयांचा मानमरातब नाहींसा झाला असून त्याचा नैतिक अधिकारही संपला आहे आणि परसत्तेचें कंबरडेंच मोडलें आहे. अद्याप स्वराज्य मिळालें नाहीं हें खरें परंतु राष्ट्रीय दृष्टीनें कार्य करण्याची संवय नसलेला, जातिभेदामुळें छिन्नविच्छिन्न झालेला आणि शतकापेक्षां अधिक काल दास्यांत घालवलेला असा हा देश आहे. या लोकसमूहानें तीन लहानसे

प्रयत्न करून पंधरा वर्षांच्या कालावधींत हिंसात्मक मार्गानें तरी स्वातंत्र्य मिळविलें असतें का ? राष्ट्रीय स्वातंत्र्याकरितां इटली, आयर्लंड आणि इतर देश यांना किती भयंकर आणि मोठमोठ्या चळवळी कराव्या लागल्या ? किती कालपर्यंत, किती मानवी संहार आणि कष्ट सहन करावे लागले ? एकमेकांविरुद्ध द्वेष आणि मत्सर माजविण्यांत त्यांच्या किती पिढ्या गेल्या ? हिंदुस्थान मात्र या सर्वांपासून अलिप्त आहे.

गांधींनीं युद्धाच्या बरोबरीचें एक नैतिक शस्त्र शोधलें आहे. त्याची संघटना करून त्यांनीं त्याला फलदायी केलें आहे आणि कांहीं प्रत्यक्ष फळहि प्राप्त करून दिलें आहे. राष्ट्रीय कूटप्रश्न अजून त्यामुळें संपूर्णपणें सुटला नाहीं खरा; परंतु गांधीजींच्या प्रयोगांनीं ते प्रश्न सोडविण्याची दिशा दाखविली आहे आणि या दृष्टीनें पाहिल्यास प्राथमिक प्रयत्न म्हणून ते दुर्लक्ष करण्यासारखे निःसंशय नाहींत. सर्व जगांतील विचारवंतांचें लक्ष त्यांनीं वेधून घेतलें आहे. सद्यःपरिस्थितींत राष्ट्रीय स्वातंत्र्य हें मर्यादित कार्यक्षेत्रच गांधीजींच्यापुढें आहे. हिंदुस्थान स्वतंत्र असता तर त्यांनीं मोठाल्या चळवळी केल्या असत्या. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठीं त्यांनीं कोणत्या नव्या अहिंसक मार्गाचा अवलंब केला असता, सत्यावर आधारलेली कोठली राजनीति अवलंबिली असती याचें आज उत्तर देणें कठीण आहे. कदाचित् या प्रश्नांना समाधानकारक उत्तरें देणें गांधीजींसारख्या व्यवहारी सुधारकाला शक्य होणार नाहीं. परंतु इतिहासानें त्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित केलें आहे. त्यांना आपलें राष्ट्र परकीय उन्मत्त सत्तेच्या तावडींतून सोडवावयाचें आहे. या झगड्यासाठीं त्यांनीं आपल्या राष्ट्राला एक नवीन ध्येय-मार्ग, नवीन शस्त्र आणि नवीन कार्यक्रम दिला आहे. त्यांनीं आपल्या ध्येयवादाला नियमबद्ध केलें आहे. बाह्य प्रतिकारासाठीं त्यांनीं सत्य आणि अहिंसा यांना संघटित केलें आहे.

सत्याग्रह्याच्या मनांत कोणाविषयीं अशुभेच्छा नसते. तरीही तो पूर्णपणें आपल्या अंतर्गत आत्मिक शक्तीवरच विसंबून राहत नाहीं. तो ती

बहिर्मुख करतो, तिला योग्य वळण लावतो आणि संघटित करून नियमबद्ध संस्थांच्या मार्फत तिचा उपयोग करतो. केवळ मानसिकच नव्हे तर शारीरिक आणि बाह्यतः दिसून येणाऱ्या परिणामासाठींहि तो प्रयत्न करतो. अंतस्थ अशी प्रत्येक आध्यात्मिक शक्ति बाहेरील विविध क्षेत्रांत काम करतांना तिचें पावित्र्य कांहींसें दूषित होतें. तद्वतच ज्या संस्थांमार्फत सत्याग्रहाचें कार्य चालवावयाचें असतें त्याच संस्थांमुळेंहि त्याचें तेज कांहींसें कमी होतें. आध्यात्मिक शक्तीचा भौतिक जगांत आविष्कार होतांना ही हानि टाळणें अशक्य आहे. निसर्गाला तेवढी किंमत देणें भाग आहे. शुद्ध स्वरूपांतील आत्मशक्तीला शरीर नसतें. तिला भौतिक माध्यमाचीही आवश्यकता नसते. परंतु अशा स्वरूपांत ती शक्ति या ऐहिकांत जमा होत नाहीं ! म्हणूनच गांधीजींच्या सर्व साधनांमध्यें त्यांना हवी तेवढी अंतर्बाह्य निर्मलता नसेल, कांहीं थोडासा प्रक्षोभ निर्माण झाला असेल, किंवा मानसिक वा शारीरिक हिंसा कोठें कोठें दृग्गोचर होत असेल तर त्याबद्दल कोणी त्यांच्या सत्य-अहिंसेच्या तत्त्वांकडे बोटें दाखवूं नयेत. ह्या जगांत पूर्वींच्या कार्यकर्त्यां-पेक्षां जो अधिक चांगलें करून दाखवतो त्यानेंच सर्वांत अधिक चांगलें कृत्य केलें असें ठरतें. संपूर्णपणें सर्वश्रेष्ठ असें जें कांहीं असेल त्याचें मनुष्यजातीस नेहमीं ओझरतेंच दर्शन होतें.

## जुना आणि नवा कायदा

प्रेम आणि अहिंसा यांचा जो सिद्धांत गांधीजींनीं राष्ट्रीय संबंधांत प्रस्थापिला तो अनंत कालपर्यंत चालत आलेल्या व्यक्तिगत नियमापेक्षां निराळा आहे. धर्मोपदेशकांनीं त्याचा जेव्हां प्रचार केला तेव्हां तो प्रामु-ख्यानें आंतरिक आणि मानसिक दृष्ट्या व्यक्तिगत स्वरूपाचा होता. तो आपल्या स्वयंभू शक्तीवर आधारलेला होता. त्याचा प्रत्यक्ष फायदा तावड-तोब दिसून आला नाहीं तरी केव्हांतरी कसातरी कोठेंतरी तो फलदायी झाल्यावांचून रहाणार नाहीं अशी श्रद्धा त्याचें आचरण करणाऱ्यांच्या मनांत असे.

त्याची सत्ता बाह्य जगांत चालत नसे. स्वतःच्या श्रद्धेपुरतीच त्याची शक्ति होती. इहलोकांतील तात्काल लाभणाऱ्या फलाविषयीं त्याला फिकीर नसे. म्हणूनच अहिंसेच्या जुन्या तत्त्वाला संघटित करण्याचा प्रयत्न झाला नाहीं. सज्जन आणि धार्मिक लोक, आपल्या न्याय्यतेवर, हेतूंच्या उच्चतेवर विसंबून असत. ते संघटनेच्या अगर सहकार्याच्या विरुद्ध होते ही गोष्ट जगजाहीर आहे. धर्मप्रवण असे किती तरी लोक पूर्वीं होऊन गेले. त्यांनीं कधींकाळीं जर संघटना केलीच तर ती बुद्ध धर्म किंवा ख्रिस्ती धर्म यांप्रमाणें ऐहिक कारणांसाठीं नसून आध्यात्मिक विचार करणारांना त्यांच्या ईप्सित ध्येयाकडे, अंतिम निर्वाण—मोक्ष—साधनाकडे नेण्यासाठीं असे. ऐहिक जीवनांत वावरतांना, परमेश्वराच्या न्यायाप्रमाणें सर्व कांहीं होतें; परमेश्वरच आपल्या कल्याणाची काळजी वाहतो अशी श्रद्धा मुमुक्षूंच्या ठिकाणीं असे. त्यांच्या दृष्टीला जरी कांहीं विपरीत, न्यायविरुद्ध वाटलें तरी ईश्वराच्या दृष्टीनें तो न्यायच असला पाहिजे असेंही मानण्यास ते कमी करीत नसत. दुष्कृत्य करणाऱ्यांचा मात्र दैवी सहाय्यावर विश्वास नसल्यामुळें त्यांनीं आत्मविश्वासानें आपली संघटना मजबूत केली. याचा परिणाम असा झाला कीं, श्रद्धावंतांना दुष्कृत्याबद्दल अंतस्थ आनंद आणि समाधान यांचा भरपूर लाभ होत असला तरी दुष्ट लोकांनीं संपूर्ण-पणें स्वतःवर विसंबून, एकमेकांशीं सहकार्य करून संघटना केली आणि जगांतील सर्व चांगल्या गोष्टींवर स्वतःचा एकमेव हक्क प्रस्थापित केला.

पुरातन कालचा प्रेमाचा सिद्धांत अप्रतिकारावरही भर देत असे. 'दुष्कृत्याचा प्रतिकार करूं नका; एक मैल जाणें भाग पडलें तर दोन मैल चाला; कोणी अंगावरील वस्त्र मागितलें तर त्याबरोबर डोक्याचें मुंडासें व नेसूंचें धोतरही द्या; एका गालावर थप्पड बसली तर दुसरा गाल पुढें करा; कारण तुम्हाला जगांतील चांगल्या वस्तूंची गरज कां लागावी ? शेतांतील लिलीच्या फुलांकडे पहा. स्वतः कष्ट न करतां त्यांची आपोआप वाढ होते. ते सूत कांतीत नाहींत किंवा विणीतहि नाहींत. तरी देखील त्यांचें जें वैभव आहे तितकें सालोमनला

सर्वोच्चस्थानीं असतांनाही लाभलें नव्हतें, असें त्या सिद्धांताचें स्वरूप होतें. एका हिंदु साधूला आपल्या झोंपडींत रात्रीं एक चोर शिरल्याची चाहूल लागली. आपल्या झोंपडींत या आपल्या भल्या बांधवास न्यावेंसें वाटेल असें कांहींही नाहीं हें जाणून त्यानें पांघरावयाचें एकच एक कांबळें होतें तें त्याच्याकडे फेंकून दिलें. तें अशा करितां कीं, चोराला तें नेणें सोपें पडावें. इतर सर्व गोष्टींप्रमाणें याही गोष्टींत कांहीं तात्पर्य आहे. चोर जेव्हां तें घेऊन गेला तेव्हां त्याच्या मनोवृत्तींत बदल झाला आणि तो स्वतः धार्मिक बनला.

साधूंविषयीं असल्या दंतकथा सर्व धर्मांत आहेत. या गोष्टी नेहेमींच आनंदपर्यवसायी असतात. एक प्रमाद करणारा पश्चात्ताप तरी पावतो किंवा त्याच्या वृत्तींत बदल होतो अथवा त्याचें लौकरच कांहीं तरी बरें वाईट होऊन तो दुःख पावतो. इतकेंच नव्हे तर ईश्वर यथावकाश परंतु योग्य तें शासन करतोच अशा समजुतीवर स्वतः कोणी अतिअहिंसामय राहून व प्रतिकाराची सर्व जबाबदारी ईश्वरावर टाकूं नये असेंही मानण्यांत येत असे. ईश्वर करील तें न्याय्य असणारच असा सर्वांचा समज होता.म्हणून साधु-पुरुषाला कांहीं अपशब्द वापरण्याची अगर क्रोध दर्शवण्याची आज्ञा केलेली आहे. कारण त्यामुळें दुष्कृत्य करणाऱ्यास न्यायनिष्ठुर परमेश्वराकडून होणारें शासन होण्याची पाळी येत नसे. ईश्वरी कोपापासून त्याचा अशा रीतीनें बचाव होतो अशी समजूत होती. अशी तत्त्वनिष्ठा ज्यानें सर्वसंगपरित्याग केलेला आहे अशा विरागी संन्याशाला ठीक होती. परंतु व्यवहारामध्यें अशा मार्गानें कल्याण होणें शक्य नव्हतें.

आत्मा, अध्यात्म आणि परलोक यांच्या दृष्टीनें ती श्रद्धा कितीहि उपयुक्त वाटली तरी तीमुळें जीवनाची ऐहिक धारणा होऊं शकत नव्हती. तसेंच राजकीय व्यवहारांत किंवा देशांतर्गत राज्य-व्यवस्थेसाठींही ती योग्य नव्हती. कारण अंतर्गत राज्यव्यवस्था प्रथमतः लौकिक वर्तन आणि व्यवहारी परिणामांकडे लक्ष देत. कालांतरानें पूर्णपणें

प्रकट होणारा पण आज मात्र अंधुकपणें दिसणारा प्रकाश लौकिक व्यवहारांत पुरा पडत नाहीं. तावडतोब होणाऱ्या परिणामाकडेच लौकिकांत लक्ष ठेवावें लागतें. लोकसमुदाय फार विरागी किंवा हुतात्मा होऊन राहूं शकत नाहीं. ह्या केवळ आध्यात्मिक मार्गांनीं ते कपडे, अन्न आणि घर यांची गरज भागवूं शकत नाहींत. ऐहिक वस्तूंसाठीं भौतिक संघटनाच आवश्यक असते. आपल्या मूक रुदनानें दुष्ट लोकांना रोधणारी शक्ति केव्हां तरी निर्माण होणार आहे, या आशेवर समाधान मानून सामान्य लोकांनीं कसें रहावें? तसेंच आपल्या त्यागानें क्रूर लोकांच्या हृदयाला पाझर फुटेल अगर दुष्टांच्या वर्तनांत फरक घडून येईल या विचारानेंहि त्यांचें समाधान होणें शक्य नाहीं. सत्य आणि अहिंसेचीं तत्त्वें जर सामान्य स्त्रीपुरुषांच्या उपयोगी पडावयास हवीं असतील, जर सामाजिक जीवनामध्यें त्यांना अनुस्यूत करावयाचें असेल तर त्या तत्त्वांची अशी संघटना केली पाहिजे कीं, तिचे परिणाम सुगम आणि सद्यःफलदायी व्हावेत. तसें कार्य घडवून आणावयाचें असेल तर त्या संघटनांची लौकिक स्वरूपांत योजना केली पाहिजे. त्यांचा उपयोग करतांना व्यवहारी बुद्धि आणि ज्ञान यांचा आविष्कार झाला पाहिजे आणि त्यासाठीं त्यांना अनुकूल आणि आवश्यक असें नवीन तंत्र आणि साधन निर्माण केलें पाहिजे. अशा संघटनेतील कार्यकारणभाव आणि ज्ञान व बुद्धि यांचा व्यावहारिक दृष्टीनें उपयोग करण्याचें तंत्र आणि साधन सत्याग्रहाच्या निर्मात्यानें आणि आद्य प्रवर्तकानें 'सत्याग्रह' च्या द्वारें लोकांपुढें ठेविलीं आहेत. या लौकिक उपयुक्ततेच्या दृष्टीमुळें सत्य आणि अहिंसा यांची उदात्तता कांहींशी कमी होणें शक्य आहे. परंतु त्याची भरपाई अहिंसा आणि सत्य यांच्या कार्यक्षेत्राच्या व्यापकतेनें झाली आहे.

## नवीन तंत्र

पूर्वीं जें शक्य नव्हतें तें आतां शक्य झालें आहे. आजचें जग इतकें तकलुबी आधारावर संघटित झालें आहे कीं, त्याची गति सत्याग्रहानें,

असहकारानें कुंठित करितां येते. राजकीय लोकशाहीची झालेली प्रगति, आणि वृत्तपत्रें आणि प्रचार यांमुळें लोकमताचाही मोठा परिणाम होतो. औद्योगिक कारखान्यांतील मजूर-मालक यांच्या संघर्षामध्यें ही गोष्ट स्पष्टपणें निदर्शनास येते. व्यवस्थाखात्याशीं मजूरवर्गानें असहकार करण्याचें ठरविलें तर एक सबंध कारखाना आणि धंदा तात्काल बंद पडतो आणि एक कारखाना बंद पडला कीं, त्याचा इतर कारखान्यांवर आणि उद्योगधंद्यांवर ताबडतोब परिणाम होतो. सर्व मजुरांचा सार्वत्रिक हरताळ अतिशय सुसंघटित अशा आधुनिक सरकारला देखील वठणीवर आणील. मजुरांच्या सहकार्यावांचून सरकारी युद्ध-यंत्र आणि विध्वंसाचें तंत्र निरुपयोगी ठरतें.

पिळवणूक आणि छळ करणारी ही वस्तुस्थिति चालू राहण्यासाठीं दलितांच्या अप्रत्यक्ष संमतीचीच नव्हे तर वाटेल त्या उपायांनीं मिळविलेल्या प्रत्यक्ष सहकाराची आवश्यकता आहे, यांत कांहींहि शंका नाहीं. ही गोष्ट यापूर्वीं इतक्या स्पष्टपणें लक्षांत आली नव्हती. दलितवर्ग आणि गरीब लोक ज्या शृंखलांनीं बांधलेले असतात त्या बहुतांशीं त्यांनींच स्वतः निर्माण केलेल्या असतात. ते स्वतःच खोड्यांत मान अडकवितात. एकदां का त्यांनीं असहकार पुकारला कीं व्यापारी, उद्योगधंदेवाले आणि सरकार यांच्या अन्याय आणि पिळणुकीच्या धोरणाचें धाबें दणाणलेंच म्हणून समजावें. आणि याच कारणास्तव मजूरसंघाची चळवळ आतां शक्यच नव्हे तर बलसंपन्नहि झाली आहे. दलितवर्गाच्या मनांत याच भावनेमुळें भविष्यकालाविषयीं आशा निर्माण झाली आहे. उद्योगधंदे, व्यापार आणि सरकार यांच्या सत्तेचा मुख्य केंद्रबिंदु आपण स्वतःच आहोंत ही गोष्ट सामान्य जनांच्या लक्षांत येऊन चुकली आहे; आतां संघटन आणि सहकार्य वाढवून सत्ता—मग ती आर्थिक असो वा राजकीय असो—धारण करणाऱ्यांशीं असहकार करणें एवढेंच कार्य राहिलें आहे. संप, सार्वत्रिक संपदेखील व्यवहारी राजकारणाच्या क्षेत्राबाहेर आहे असें, आज संपामुळें ज्याचें नुकसान होतें अशा माणसाखेरीज दुसरा कोणीही म्हणणार नाहीं. उद्योगधंद्यांत जर संप झाले नसते तर मजुरांच्या पुष्कळशा

मागण्या आजही 'मागण्या' याच स्वरूपांत पडून राहिल्या असत्या, ही गोष्ट सर्वमान्य झाली आहे. ज्या तत्त्वांवर संप शक्य आणि परिणामकारी होतो त्याच तत्त्वांवर व्यापक सत्याग्रहही शक्य आहे. त्याच प्रकारची संघटना आणि त्याच प्रकारची कार्यपद्धति सत्याग्रहास पुरेशी आहे. या दोहोंत फरक आहे तो बाह्यात्कारी नसून ज्या तत्त्वांसाठीं सत्याग्रह किंवा संप करावयाचा त्या तत्त्वांबाबतच काय तो असूं शकेल !

औद्योगिक क्षेत्रांतील संप नफेबाजीमुळें वर्गविरोध माजला कीं, निर्माण होतो. वर्गकलह आणि वर्गयुद्ध हा त्यांतील मुख्य भाग असतो. त्यांतील मुख्य तत्त्व वर्गविरोध हें असतें. एका वर्गाचा तोटा तो दुसऱ्याचा फायदा असें त्या व्यवहारांत होतें. म्हणून संपाच्या बुडाशीं वर्गकलह, द्वेष आणि मत्सर असतो. असें असतांही संपामुळें हिंसेला आळा बसतो. ज्यांनीं यशस्वीपणें संप घडविले आहेत त्यांना अहिंसेची योग्य किंमत कळून चुकली आहे. संपूर्ण यशासाठीं अहिंसेला प्रामाणिकपणें चिकटून राहणें आवश्यक आहे. आपल्या विरोधकांची भौतिकशक्ति इतकी जबरदस्त आणि सुसज्ज आहे कीं, दहशतवाद्यांनीं उपदेशिलेला प्रतिकारमार्ग आणि परिणामीं होणारा नैतिक ऱ्हास यांपासून अलिप्त राहूनच त्यांना आपली नैतिक बैठक टिकवितां येईल. संपवाल्यांना हिंसेला प्रवृत्त करून संप फोडणें नेहमीं अधिक सोपें, स्वस्त आणि शक्य असतें हें अधिकाऱ्यांच्या लक्षांत आलें आहे. त्या कामीं जर यश मिळालें नाहीं तर हिंसा करणारे हस्तक ते कामास लावतात. कारखान्यांतील संपांत यशस्वी डावपेंच लढविणारे नेहमीं शांततामय आणि अहिंसक मार्गाचा अवलंब करतात. परंतु संपांचे वेळीं जें धोरण म्हणून स्वीकारण्यांत येतें तें सत्याग्रहाचें प्रमुख तत्त्व असतें. संघटित जीवनाच्या सर्व क्षेत्रांत तें मूलगामी तत्त्व असतें. विविध हेतूंचा एकमेकांशीं संघर्ष होत असला तरी जीवन सर्वत्र एकच आहे असें सत्याग्रही मानतो. संपावर जाणारा स्वतःच्या दुबळेपणामुळें आणि आणि शस्त्रास्त्रांचा अभाव असल्यामुळें निःशस्त्र राहून जें करतो तें सत्याग्रही आपल्या नैतिक बलाच्या आधारावर करतो. युद्धांत देखील अंतिम

यशासाठीं शारीरिक बलापेक्षां, टिकाव धरण्याची शक्ति आणि नैतिक धैर्यच कारणीभूत होतें. म्हणून भौतिक वस्तूंपेक्षां नैतिक बलावरच सत्याग्रही आपली सर्व भिस्त ठेवतो आणि तरीहि बाह्य साधनांचा तो तिरस्कार करीत नाहीं. सहकार्याचीं आणि संघटनेचीं तीं साधनें बनतात. आक्रमक क्रूर शक्तीपेक्षां संघटनेनें अधिक यशस्वी होतो, हें त्याला माहीत असतें. आक्रमकाच्या हिंसात्मक संघटनेस तो आपल्या अहिंसक संघटनेनें विरोध करतो. परंतु सत्याग्रहींच्या संघटनेंत सामील होणाऱ्या व्यक्तीमध्यें विरोधकांपेक्षां मनोधैर्य अधिक असतें, आणि तें आपल्या साध्याच्या न्याय्यतेविषयींच्या आणि अहिंसेच्या श्रद्धेतून निर्माण झालेलें असतें. नैतिक तत्त्वें आणि ध्येयाच्या न्याय्य तत्त्वाविषयींची श्रद्धा यांमुळें सत्याग्रही आपल्या ध्येयाविषयीं तर जागरुक असतोच पण आपलीं जीं साधनें असतील त्यांबद्दल देखील दक्षता बाळगतो. दुर्बलता आणि दुःखदायक परिस्थिति यांमुळें तो अहिंसक होत नाहीं तर स्वतःच्या स्वतंत्र विचारानें नैतिक धैर्याच्या बलावर तो अहिंसावादी होतो.

सत्याग्रही नेत्याला मात्र कांहीं झालें तरी शिक्षण आणि नीति याबाबतींत ज्यांच्यांत बरीच भिन्नता आहे, अशा लोकांमध्यें आपलें कार्य करावें लागतें. कांहीं लोकांत अंतःस्फूर्ति नसली तरी, जर आचारांच्या बाबतींत ज्यांच्यांत समानता असली तर त्यांच्या कार्यशक्तीचा तो त्याग करीत नाहीं. आचरणापुरती अहिंसा त्याला चालू शकते. वर्तन शुद्ध ठेवण्याची एकदां संवय लागली म्हणजे शेवटीं बहुतेक वेळां तिचा मनावर परिणाम होऊन हृदयाचें परिवर्तन होतेंच अशा विश्वासानें धार्मिक सुधारणा घडवून आणणारा देखील बाह्यात्कारी शुद्धीला मान्यता देतो. परंतु यांत्रिक स्वरूपाच्या या आचार-शुद्धीच्या दुष्परिणामांचीही सत्याग्रही पुढाऱ्याला कल्पना असते. ते दुष्परिणाम कमी व्हावेत म्हणून तो मनाच्या शुद्धतेवर नेहेमींच भर देत राहतो. पण त्यालाही इतर व्यवहारी कार्यकर्त्यांप्रमाणेंच उघड-उघड कांहीं धोका पत्करणें भाग असतें. दुसरें असें कीं,

सामान्य सैनिकानें आचारशुद्धि राखणें पुरेसें असलें तरी त्यांतलेच जे उपनेते असतील त्यांच्या बाबतींत मात्र केवळ आचारशुद्धि पुरत नाहीं.

सत्याग्रहाला इंग्रजींत Passive resistance, Non-co-operation हे प्रतिशब्द आहेत. त्यांचा अर्थ असहकार अथवा निःशस्त्र प्रतिकार असा होतो. परंतु हें भाषांतर संपूर्ण अर्थ प्रगट करूं शकत नाहीं. सत्याग्रहाच्या बाबतींत 'अप्रत्यक्ष' असें कांहींही नाहीं आणि सत्याग्रह हा एकाद्या गोष्टीच्या अभावानें सिद्ध होत नाहीं. कार्य, संघटना, चळवळ आणि विरोध यांचें प्रत्यक्ष तत्त्वज्ञान म्हणजे सत्याग्रह होय. शस्त्रास्त्रांना विरोध करण्याच्या बाबतींत जरी तो निःशस्त्ररीत्या व्यक्त होत असला तरी त्याचा विरोध प्रत्यक्ष आणि निश्चयी असतो. दुष्टपणा आणि छळ यांच्याशीं सहकार्य केल्यानें जे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदे मिळतात ते ह्या नैतिक विरोधानें धिक्कारले जातात. सत्याग्रही बनलेल्या व्यक्तींच्या आपोआप होणाऱ्या शुद्धींतील हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. थोडीशी सुधारणा आणि थोडासा हृदयपालट त्यानें साधला जातो. त्याचे-मुळें आपोआपच कांहीं बंधनें पडतील, कांहीं नियंत्रण होईल, थोडा त्यागहि करावा लागेल. कधीं कधीं हीं बंधनें, सरकारी अधिकाऱ्यांशीं जवळचे घनिष्ठ संबंध, विदेशी वस्तूंचा आणि पदवीचा स्वीकार, सरकारी शाळा, कोर्ट-कचेऱ्या, यांसारख्या सामान्यतः अगदीं साध्या आणि नीतिनिरपेक्ष अशा गोष्टी-विषयीं असतात तर कधीं अस्पृश्यता, मद्यपान यांसारख्या निश्चितपणें वाईट आणि अनैतिक गोष्टींसंबंधींहि हीं बंधनें असूं शकतील. कांहीं लोकांना हीं बंधनें सत्याग्रहाचीं विचित्र वैशिष्ट्यें वाटतात. परंतु थोड्याशा विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, कोणत्याही दिशेनें संघटित आणि परिणामकारी चळवळ करावयाची असेल तर कांहीं बंधनें अत्यावश्यक आहेत. पूर्वीं झालेल्या सर्व धार्मिक, राष्ट्रीय आणि ध्येयवादी चळवळींनीं त्यांचा अंगीकार केला होता. ख्रिस्ती, मुस्लीम, प्यूरिटन आणि शीख या सर्वांनीं, किंब-हुना ज्याला ज्याला संघटन यशस्वी करावयाचें असेल त्यानें त्यानें कांहीं नियंत्रणें आणि बंधनें स्वीकारलींच पाहिजेत. बोल्शेविक लोक आध्यात्मिक

गोष्टींना मुळींच मानीत नाहींत. तरीही पुढारी आणि सैनिक यांच्यावरच नव्हे तर तेथील सामान्य नागरिकावर देखील इतकीं बंधनें आहेत कीं, त्यांची गणना करणें शक्य नाहीं.

## व्यवहारिक नियोजन

सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचा राजकीय जीवनाच्या कामीं उपयोग केला कीं, " वाईटाला विरोध करूं नये " हें जुन्या आध्यात्मिक आणि नैतिक सुधारकांचें तत्त्व बदलून जातें. सत्याग्रह हें वाईटाविषयीं अविरोध धारण करणारें तत्त्व नाहीं. अविरोध फक्त शारीरिक आणि हिंसक मार्गापुरता आहे. परंतु इतर बाबतींत मात्र अत्यंत निश्चयी आणि तीव्र विरोध करणें सत्याग्रहांत अंतर्भूत आहे. उदाहरणार्थ, दीड शतकपर्यंत राजकीय आणि आर्थिक पिळणूक करून ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांतून कोट्यावधी रुपये नेले आहेत म्हणून आतां त्यांच्या हृदयांत पालट होण्यासाठीं अथवा निसर्गानेंच त्यांना योग्य तें शासन करावें म्हणून हिंदुस्थाननें आपल्या श्रमाचा आणखी पैसा इंग्लंडमध्यें पाठवावा असें गांधीजी म्हणणार नाहींत. ते म्हणतील, 'आजपर्यंत गेलेला पैसा वाईटाशीं आपण सहकार्य केलें म्हणून गेला. तेव्हां आपण आपला चुकीचा मार्ग सुधारूं, स्वदेशीच्या तत्त्वावर आपल्या देशांतील उत्पादन, वांटणी आणि आपल्या संपत्तीचा व्यय यांची पुनर्घटना करूं आणि त्यायोगें इंग्लंडाकडे जाणाऱ्या पैशाचा ओघ थांबवूं या.' हिंदी व्यापाऱ्याला आणि दलालाला ते म्हणतील, 'परदेशी कापड आणि इतर वस्तूंचा व्यापार करणें पापकृत्य आहे.' परदेशी मालाची आयात करणाऱ्याला ते म्हणतील, 'ह्या धंद्यांत मिळणारा फायदा पापमय आहे.' स्वतःची अधोगति आणि शेजाऱ्याची उपासमार टाळण्या-साठीं, ते विदेशी वस्तू वापरणाऱ्याला स्वदेशीचा उपदेश करतील. त्याचें आद्य कर्तव्य आपल्या हिंदी बांधवांना मदत करण्याचें आहे, हें त्याला गांधीजी बजावतील. ताडीचा एक पेला मागणाऱ्याला सत्याग्रही आणखी दोन पेले देणार नाहीं. ताडी पिण्याचा मोह उत्पन्न करणारी मानसिक

आणि शारीरिक परिस्थिति त्याच्याभोंवतीं राहणार नाहीं अंशी तो व्यवस्था करील. जर आणि जेव्हां या व्यसनाविरुद्ध कायदा करण्याची शक्ति त्याच्या हातीं असेल तेव्हां तो कायदा केल्याशिवाय रहाणार नाहीं. राजाचें नाणें येशूला दाखवण्यांत आलें तेव्हां तो म्हणाला " ज्या वस्तू सीझरच्या आहेत, त्या सीझरला मिळूं देत " पण गांधीजी तसें म्हणणार नाहींत. ते म्हणतील, " स्वजनांच्या सेवेची माननीय संधि सीझरला मिळूं दे. " सोनें आणि चांदी गांधीजी घेतील पण स्वतःवरील उच्च जबाबदारी पार पाडण्यास आवश्यक असेलें तेवढ्याचाच ते स्वीकार करतील. स्वतः विश्वस्त आणि गरीबांचे सेवक या दृष्टीनें आवश्यक तेवढेंच धन घेतील. सीझरच्या नेतृत्वाला लोकांची मान्यता आहे कीं नाहीं हें देखील ते पाहतील. मात्र सीझरच्या कातडीचा रंग, त्याचें राष्ट्र आणि प्रतिष्ठा इत्यादींच्या बाबतींत मात्र ते यत्किंचितही पर्वा करणार नाहींत. विचारलेल्या योग्य प्रश्नांना समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं तर सीझरच नव्हे तर सीझरवादहि दोषास्पद आहे असें गांधीजी मानतात. सत्याग्रह्याचें भांडण व्यक्तीशीं नसतें. त्याचा विरोध संस्था आणि मार्ग यांच्याशीं असतो. जोंपर्यंत चुकीच्या मार्गानें कार्य करणाऱ्या संस्थांमध्यें एकादी व्यक्ति तादात्म्य होऊन काम करते तोंपर्यंत त्या संस्थायंत्राचा एक भाग म्हणून तिलाहि जो विरोध करावा लागतो तो कांहीं वैयक्तिक नसतो. अनुभवानें असें दिसून आलें आहे कीं, आपल्यांतील श्रेष्ठ मनुष्याचे वर्तनावर देखील तो स्थानावर अधिष्ठित असेल तेथील वातावरणाप्रमाणें परिणाम होत असतो. त्याची कामाची पद्धत वाईट असली तर तो मनुष्यही वाईट बनण्याचा संभव असतो. शिवाय ज्या पद्धतीनें कार्य चालतें त्या पद्धतींतील अधिकारीवर्ग आणि त्या पद्धतीनें पिळून निघणारा खालचा वर्ग हे दोन्हीही सारख्याच प्रमाणांत त्या पद्धतीचे बळीच आहेत, हें सत्याग्रह्याला माहित आहे. म्हणून तो कोणत्याही व्यक्तीविरुद्ध द्वेष, मत्सर बाळगीत नाहीं.

वाईटाशीं अविरोध हें जुनें तत्त्व संपूर्णपणें आध्यात्मिक होतें. त्यामध्यें

प्रत्येकाचें स्वतः विषयीं आणि परमात्म्याविषयीं काय कर्तव्य आहे तें सांगण्यांत आलें होतें. थोड्याशा प्रमाणांत सामाजिक कर्तव्यही त्यांत नमूद होतें. परंतु दोन समाजांनीं एकमेकांशीं कसें वागावें याविषयीं त्यांत कांहींही उल्लेख नव्हता. सत्याग्रह हा व्यक्तिगत तर आहेच पण त्यांत उल्लेखलेलें कर्तव्य सामाजिक आणि राजकीयही आहे. गर्विष्ठ व्यक्तीला अथवा गैर अधिकार गाजविणाऱ्या माणसाला विरोध करण्याचा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे हें जुन्या पद्धतीच्या अविरोध तत्त्वानेंही सांगितलें. मग तो अधिकार कौटुंबिक असो, सामाजिक असो, आर्थिक असो वा राजकीय असो.

परंतु या सर्व गोष्टी अंतर्भूत असून शिवाय सत्याग्रहानें संघटित आणि सामुदायिक चळवळींचा मार्गही दाखवून दिलेला आहे. एखाद्याचा न्याय्य हक्क बजावून सांगणें अथवा एकाद्या चुकीच्या गोष्टीविरुद्ध आपली नापसंति दर्शविणें या पलीकडे जाऊन जरूर पडल्यास अकल्याणकारक अशा सामाजिक, आर्थिक अथवा राजकीय पद्धतींचें अस्तित्वच अशक्य करून टाकणारा असा हा संघटित चळवळीचा मार्ग आहे. या चळवळींचा हेतु हिंसक अथवा धाकदपटशाचा, किंवा सुडाचा नसून, स्वतःच्या अधोगतीला आणि दास्याला कारणभूत होणाऱ्या पद्धतींशीं सहकार्य न करण्याचा आपला हक्क बजावण्याचें कर्तव्य पालन करणें, एवढाच असतो. अर्थातच वाईट पद्धतींचा जे अवलंब करतात त्यांच्या कार्याला अशा सामुदायिक सत्याग्रहानें विघ्न आणि अडथळा येतो खरा पण तें अपरिहार्य आहे. जेथें सर्वांचे हेतु नेहेमींच सारखे नसतात अशा या वैचित्र्यपूर्ण जगांत विरोधावांचून कर्तव्य पार पाडणें अशक्य आहे. सामुदायिक आयुष्यांत तर असें नेहेमींच होतें. परंतु सामुदायिक सत्याग्रहांत निर्माण होणारा विरोध, जे लोक आणि संस्था आपलें वैयक्तिक कर्तव्य पार पाडीत असतात त्यांनीं घडवून आणलेला नसतो. आपलें कर्तव्य मनांत दुष्ट बुद्धि न ठेवतां, सत्याला धरून अहिंसक रीत्या केलें म्हणजे विरोध केल्याची तक्रार विरोधकाला करतां येणार नाहीं. परिस्थिति बदलून टाकणें आणि विरोधाचा प्रसंग येऊंच द्यावयाचा नाहीं, असें

करणें त्याच्या हातांत असतें. परंतु दोन व्यक्तींना आपापलें कार्य हें आपलें 'कर्तव्यच' आहे असें प्रामाणिकपणें वाटत असलें तर त्या व्यक्ती अगर गट यांच्यामध्येंही विरोध येणें अशक्य नाहीं. अशा वेळीं कोठल्याही प्रकारचा खोटेपणा, फसवेगिरी, हिंसा, द्वेष अगर मत्सर यांचा प्रादुर्भाव न होऊं देतां सत्याग्रही हा विरोध उच्च नैतिक पातळीवरून करीत असतो.

वाईटाला विरोध न करण्याच्या जुन्या धर्मोपदेशकांच्या पद्धतींत विरोधकाचा हृदयपालट घडवून त्याची सुधारणा करणें हें प्रमुख अंग असतें. सत्याग्रहांतही हेंच तत्त्व आहे. परंतु तें कांहींसें सौम्य झालेलें असतें. समाज आणि अधिकारीवर्ग हे व्यक्तीपेक्षां कमी सुसंस्कृत आणि अधिक यांत्रिकपणें हालचाली करणारे असतात. युक्तिवाद आणि नैतिक वजन त्यांच्यावर पुरेसा दाब आणूं शकत नाहींत. नैतिक अथवा बौद्धिक आत्मनिरीक्षण त्यांना करतां येत नाहीं. सामान्यतः लोकसमूहाचें मन व्यक्तीच्या मनापेक्षां कमी सुसंस्कृत असतें. समुदायाचें मन सामुदायिक विचारसरणीला अधिक पोषक असल्यामुळें गर्व, उत्कट इच्छा, राग, मत्सर, द्वेष आणि सूड यांना तें लौकर अनुकूल होतें. व्यक्तीच्या मनाप्रमाणेंच समुदायाचेंदेखील खरोखर एखादें मन असतें कीं काय याचा कधीं कधीं विचार पडतो. पण एकंदरींत असें एक मन असतें असें मात्र वाटतें. पण एखाद्या व्यक्तीच्या मनाला जितक्या लौकर तयार करतां येतें तितक्या लौकर या सामुदायिक मनाला तयार करणें सत्याग्रह्याला शक्य नाहीं. कारण हें मन अधिक भौतिक आणि यांत्रिक असल्यामुळें नैतिक किंवा आध्यात्मिक विचार त्याला चटकन् पटत नाहींत. पुन्हां त्याची हालचाल अंतःस्फूर्त नसून तिला बाहेरून प्रेरणा होत असते. सत्याग्रहाच्या शास्त्राचा अभ्यास करणाऱ्याला असें दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं कीं, कांहीं व्यक्तींचा ——कधीं कधीं महत्त्वपूर्ण व्यक्तींचाहि——हृदयपालट झालेला आहे; विरोधी पक्षाला येणारी हिंसेची सुरसुरी फार कमी झाली आहे; त्याचा राग आणि मत्सर यांना वाव मिळण्यास जागा राहिली नाहीं, त्याचे हात हवेंतच, मारामारी करीत राहिलेले आहेत. त्यांना पुरेसा विरोध न मिळाल्या-

६८२५

मुळें स्वतःच हातपाय झाडत राहून शेंवटीं ते दमून जातात. दीर्घकालपर्यंत चाललेल्या लढ्यांत तटस्थांच्या नैतिक सहानुभूतीवर आणि मनावर विशेष भर असतो. पण तींही ते विरोधक गमावून बसतात. सत्याग्रह्याला मात्र त्यांचा पाठिंबा मिळतो. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या हृदयपालटाची क्रिया अशी घडून येते; मात्र सत्याग्रहींचा जथा एकट्या सत्याग्रही इतका अहिंसक, निरिच्छ, सत्यवादी आणि पवित्र राहात नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. त्यामुळें हृदयपालटाच्या क्रियेचा वेग किंचित् मंद होतो.

सत्याग्रही चळवळ अव्यवहारी समजणाऱ्यांनीं ह्या विषयाचा पूर्ण विचारच केलेला नसतो. इतिहासांत अहिंसक चळवळींचा उल्लेख क्वचित् असला तरी सत्याग्रहाची गांधीजींची कल्पना अगदीं नवीन आहे. अतिशय निराळ्या प्रकारानें तिचा मजूर-कामगारांनीं उपयोग केला आहे. तेथें तिचा उपयोगही होत आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारांतून युद्धाचें अस्तित्व नाहींसें करावयाचें असेल तर विध्वंसक साधनें वाढविण्यानें तें उद्दिष्ट साध्य होणार नाहीं, ही गोष्ट आतां स्पष्ट झाली आहे. विध्वंसक मार्गानें शस्त्रास्त्रें वाढत जातात, नवीन भयस्थानें निर्माण होतात, नवीन द्वेषस्थानें उत्पन्न होतात आणि विरोधाची नवी भूमिका तयार होते. खरोखर युद्ध टाळण्यास उत्सुक असलेलीं अशीं लहान राष्ट्रें पुष्कळ आहेत. तरी त्यांनासुद्धां शस्त्रास्त्रें वाढवावीं लागतात. कारण विरोध नाहींसा करण्याचा दुसरा कोठलाच मार्ग त्यांना शक्य दिसत नाहीं. आपल्याहून मोठ्या आणि ज्यांच्याजवळ उत्पादनाचीं साधनें अधिक आहेत अशा देशाशीं तुलना करतां, आपल्याला यशस्वी होण्याची संधि मिळणें अशक्य आहे हें दिसत असतांनाही, शस्त्रास्त्रें वाढवण्याच्या या चढाओढीला तीं लहान राष्ट्रें बळी पडतात. हिंसा आणि द्वेष यांचें एक दुष्ट वर्तुळ निर्माण होऊन त्याचा व्याप अधिकाधिक वाढत मात्र जातो. हें वर्तुळ नाहींसें करण्याचा मार्ग सामुदायिक हिंसा आणि द्वेष नाहींसे केल्याशिवाय सांपडणार नाहीं. सामाजिक व्यवहारांत बुद्ध आणि येशू ख्रिस्त यांचे शब्द त्रिकालज्ञाच्या उद्गारा-

सारखे अचूक ठरले आहेत. द्वेष, द्वेषानें जिंकला जाणार नाहीं तर प्रेमानें; हिंसा, हिंसेनें नव्हे तर अहिंसेनें पराभूत होऊं शकते.

## नवीन योजना

पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या आपल्या श्रद्धेच्या गौरवपूर्ण मार्गानें आणि आपल्या देशांतील बौद्धिक परंपरेनें गांधीजी आज जागतिक शांततेसाठीं एक नवीन योजना, नवीन पद्धति आणि नवीन तत्त्वज्ञान आंखीत आहेत. सत्य आणि अहिंसेच्या ज्या वार्धिष्णु तत्त्वांनीं व्यक्तीचे सामाजिक व्यवहार अधिक सुसंस्कृत केले आहेत तींच तत्त्वें आंतरसामाजिक आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारांतही मार्गदर्शक ठरलीं पाहिजेत असा त्यांचा विश्वास आहे. व्यक्तिगत हिंसेनें वैयक्तिक प्रश्न सुटत असत असा एक काळ होता. न्याय मिळण्यासाठीं स्वतःच सूड घेणें अगर परतफेड करणें एवढा एकच मार्ग एके काळीं व्यक्तीला माहीत होता, परंतु ह्या हिंसेला निर्बंध घालण्याची कल्पना सुधारक आणि धर्मोपदेशक यांनीं अंमलांत आणली. त्यांनीं जशास तसें आणि ठोशास ठोसा हा नियम दाखवून दिला. असें न केलें तर हिंसेचा अधिक भयंकर प्रसार होतील अशी त्यांची खात्री होती. मनुष्याची जसजशी प्रगति झाली तसतसा हाही नियम अयोग्य वाटूं लागला. एकेकाळीं तो नियम मनुष्य जातीला उपयोगी पडला पण नंतर तो नियमच प्रगतीच्या पायांतली शृंखला होऊन बसला. प्रगतिपथावरील मानवाला मग तोही नियम बाजूस करून नवीन नियम करावा लागला. आज त्या जुन्या नियमाचा अवलंब करणारा मनुष्य स्वतःवर मोठेंच संकट ओढवून घेईल. त्याची मूळ तक्रार तर दूर होणार नाहींच पण त्याचे कांहीं हक्क मात्र हिरावून घेतले जातील. व्यक्तिगत तक्रारी दूर करण्याची आज एक पद्धति आणि मार्ग ठरवून देण्यांत आलेला आहे. जुन्या नियमांचा उपयोग आतां कांहींही नाहीं. एकाद्या इसमाला द्वंद्वयुद्धाला केलेलें पाचारण त्यानें नाकारल्यास त्याचें हंसें होई असा काळ नुकताच येऊन गेला. मग

तें आमंत्रणाचें निमित्त खरें असो वा खोटें असो. निमंत्रक त्याची भित्रेपणा-बद्दल छीः थू करून हंसत हंसत निघून जाई. आज सुसंस्कृत समाजांत असें पाचारण केलें जात नाहीं. त्याची गणना जंगली कायद्याच्या काळांत होते. त्याचा उद्रेक जर कोठें झालाच तर त्याबद्दल वाहवा तर होत नाहींच पण अधिक थराला गोष्टी गेल्यास सरकार मध्यें पडतें आणि द्वंद्व करणारांनाच शिक्षा ठोठावतें.

समाजानें केलेल्या एखाद्या अघोर कृत्याचें प्रायश्चित म्हणून हिंसा आणि युद्ध हा कायदा सामुदायिक जीवनांतही कितीही उपयुक्त ठरला असला तरी इष्ट साधण्यास त्याचा कांहींही उपयोग नाहीं. उदात्तीकरणा-च्या दृष्टीनें अथवा सुधारणेच्या दृष्टीनें युद्धाचा परिणाम पूर्वी कितीही चांगला झाला असला तरी आज युद्ध लोकांना क्रूर बनवितें आणि द्वेष, मत्सर आणि हिंसा वाढवण्यास कारणीभूत होतें असें अनुभवास आलें आहे. आतां समाजसुधारणेच्या दृष्टीनें तें निरुपयोगी आहे. समाजाचें त्यामुळें अधःपतन होतें आणि समाजाच्या अधःपातामुळें व्यक्तींचेंही मन दूषित होतें. समाजांचे संबंध योग्य रीतीनें राहण्यासाठीं, सामाजिक वितुष्टें दूर करण्यासाठीं, समाजाचा नैतिक दर्जा वाढविण्यासाठीं अगर जगाच्या पुनर्रचनेसाठीं युद्धाचा कांहींही उपयोग राहिलेला नाहीं.

## बोल्शेविझमचा मार्ग

युद्ध आणि हिंसा यांमुळें उत्पन्न होणारे प्रश्न सोडविण्याची हमी बोल्शेविझम आणि कम्यूनिझम हे पंथ घेत असतात परंतु ज्या साधनांचा ते उपयोग करतात तीं पूर्वींप्रमाणेंच राजकारण, द्वेष, मत्सर, हिंसा आणि युद्ध हींच असतात. कम्युनिस्टांचा विश्वास एका समूहाचा दुसऱ्या समू-हाशीं विरोध आणि वर्गकलह या गोष्टींवर आहे. द्वेष, दुही आणि विरोध कमी करण्याऐवजीं ते त्यांना वाढविण्याला मदत करतात. त्यांचें म्हणणें असें कीं, सध्यांच्या समाजव्यवस्थेंत वर्गकलह आणि वर्गविरोध अगोदर पासून आहेत आणि कोणताही वास्तववादी त्यांच्याकडे काणाडोळा करूं

शकणार नाहीं. पण सत्याग्रह देखील वास्तववादी आहे. समूहाविरोध आणि एका समाजाचें दुसऱ्याशीं असलेलें वैर सत्याग्रह पंथासहि माहीत आहे. परंतु हें वैर कमी व्हावें आणि शेवटीं नाहींसें व्हावें, वाढूं तर नयेच या दृष्टीनें त्याचे प्रयत्न चालतात. एकमेकांशीं जुळतें घेतां येण्यासारखे आणि सहकार्य करतां येण्यासारखे मुद्दे कोणते ते शोधून काढण्याचा त्याचा प्रयत्न असतो. व्यक्तिगत संबंधांतहि भांडण-तंटे असतातच परंतु प्रज्ञाचक्षु, सुधारक आणि राजकारणी पुरुष, व्यक्तिगत संबंधांत एकमेकांशीं सहकार्याचे, साम्य दाखविणारे आणि सामान्य हेतु पूर्ण करणारे मुद्दे शोधून काढतात. वरवर दिसणाऱ्या मतभेदांच्याहि आंत असलेली सर्वव्यापी मानवता प्रमुखपणें त्यांच्या नजरेस आणतात. साम्य दाखवणाऱ्या गोष्टींवर भर देऊन ते त्यांना योग्य मार्ग दाखवितात आणि त्यांची संघटना करतात. मतभेद शोधून काढणें, वाढविणें अगर त्यांवर भर देणें हें अशा लोकांचें काम नसतें. उलट असे मतभेद असले तरी एकमेकांविषयीं वैरभाव जागृत असतांनाही, ते विसरून जाऊन सामुदायिक जीवन प्रगतिपूर्ण आणि सुखानें चालविण्याचें सर्वसामान्य कार्य यशस्वी व्हावें म्हणून त्यांना ते सहकार्य करावयास लावतात. सामुदायिक जीवनांत सत्याग्रही हेंच कार्य करतो. महत्त्वाचे सामान्य मुद्दे आणि सहकार्याच्या बाबी कोणत्या आहेत तें तो पहातो. सर्वसामान्य मानवतेवर त्याचा भर असतो; जेथें त्याचा उपयोग होत नाहीं तेथें सामुदायिक दुःखें दूर करण्याच्या चळवळी नियंत्रित करून त्या शक्य तितक्या अहिंसक आणि शांततामय करण्याचा त्याचा प्रयत्न असतो. मोहवशता, द्वेष आणि मत्सर शक्य तितका कमी करण्याचा त्याचा प्रयत्न असतो. खोटा आणि दुष्ट हेतूपूर्ण प्रचार करण्याला तो नकार देतो. शत्रूचें चित्र तो काळ्या रंगानें रंगवीत नाहीं. तेथें विरोधकालाही मानवतेचा सर्वसामान्य फायदा मिळूं शकतो. जे एखाद्या पद्धतीमुळें हवालदील होऊन ती पद्धति बदलून टाकण्याच्या प्रयत्नांत असतात, त्यांच्याच इतके त्यांचे विरोधकही त्याच पद्धतीचे गुलाम बनलेले असतात हेंही त्याला माहीत असतें. व्यक्तींशीं त्याचें

भांडण नसतें. वर्षानुवर्षे ज्या पद्धतींनीं अधोगति केली आहे आणि पिढ्यान्‌पिढ्या लोकांनीं जे अमानुष आणि असामान्य वर्तन केलेलें आहे त्यांशीं त्याचा विरोध असतो. ज्या लोकांच्या हातीं सध्यां सत्ता आहे त्यांनीं सत्ता हातीं द्यावयाची नाहीं असें म्हणून चाललें नसतें. आपण जर त्यांच्या जागीं असतों तर आपणही त्या दूषित पद्धतींच्या आहारीं जाऊन त्यांनीं केलें तेंच केलें असतें हें सत्याग्रही समजूं शकतो.

कम्यूनिझम या उलट विचार करतो. तो मतभेद प्रथम शोधून काढतो. नंतर ते किती मोठे आहेत तें वारंवार दाखवून त्यांना महत्त्व देऊन वाढवितो. पूर्वापार चालत आलेल्या वर्गांमध्यें कोणत्या भावना सामान्य आहेत त्यांकडे तो दुर्लक्ष करतो. द्वेष आणि हिंसा यांच्या परिणामक्षमतेवर विश्वास ठेवून नवीन आणि अधिक साम्यवादी रचना करण्यासाठीं प्रत्येक देशांत कम्यूनिझमनें युयुत्सु वर्ग तयार केले आहेत. सामान्य बाबी आणि मुद्दे कमी करीत करीत नाहींसे करण्यांत येतात. शेजारधर्माप्रमाणें, दुष्ट वस्तूंच्या संसर्गामुळें या विरोधानंतर लैंगिक, आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक इत्यादि मतभेदांवर प्रथम भर देऊन नंतर घरगुती भांडण लावून हे मतभेद मी पसरविलेले नाहींत तर ते अगोदरपासूनच होते अशी हांकाटी करीत सुटेल. उलट चांगला शेजारी निराळ्या प्रकारें वागेल. नवराबायकोमधील कलहप्रसंगीं सहजीवनाचे मुद्दे, कौटुंबिक दृष्ट्या कल्याणकारक कृत्यें, हीं त्यांच्या मनावर ठसवून सहनशीलता, सहकार्य, आणि समजुतदारपणा हीं त्यांना तो पटवीत राहील. बोल्शेविझम् चांगल्या शेजाऱ्याप्रमाणें न वागतां कलहप्रिय शेजाऱ्याप्रमाणें आज वागत आहे.

उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील दोन मोठ्या जमाती—हिंदु आणि मुसलमान—यांच्यांतील मतभेदाचा जे लोक अथवा समाज भलत्याच कामाकडे उपयोग करून घेतात त्यांच्याबद्दल आपल्याला काय वाटेल ? गेलीं कित्येक शतकें या ना त्या स्वरूपांत तो विरोध आहे यांत शंका नाहीं. मूलभूत आणि न मिटण्यासारखे मतभेद फक्त आर्थिक आहेत असें मानणें

वस्तुस्थितीला धरून होणार नाहीं. जोंपर्यंत लोकांच्या भावना या मतभेदांमुळें उच्छृंखल होऊं शकतात तोंपर्यंत ते मतभेद महत्त्वाचे आहेत असें म्हटलें पाहिजे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. त्यांच्याशीं योग्य त्या रीतीनें वागून त्यांना एकमेकांशीं सहकार्यानें वागायला लावलें पाहिजे. हिंदु–मुस्लिममतभेदावर भर देऊन ते वाढविण्याचा जो प्रयत्न करील त्याला देशभक्त देखील म्हणावयास कोणी तयार होणार नाहीं. मग विशाल मानवतेचा सेवक मानणें तर दूरच. हे मतभेद हिंसा, युद्ध आणि सुरामारी याशिवाय मिटणारच नाहींत असें मानणाऱ्याला आपण एकतर भयंकर वेडा म्हणूं अथवा लोक-शत्रू म्हणूं. दुर्दैवानें हिंदुस्थानांत असे वेडे आणि लोकशत्रू आपल्यामध्यें आहेत आणि ते स्वतःला वास्तववादी समजतात. सध्यां असलेल्या मतभेदांना महत्त्व देऊन ते वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असतो आणि या मार्गानें अंतिम शांततेचा लाभ होईल असा त्यांचा दावा असतो. जेथें लोक कांहींसे शांततेनें रहात आहेत तेथें जाऊन कम्यूनिझम, त्यांना त्यांच्यांतील मूलगामी आणि दुर्लंघ्य विरोध, तेढ, तीव्र वैर आणि मतभेद शोधून काढून दाखवून देतो. अन्याय आणि प्रमाद यांकडे लोकांचें लक्ष वेधून भयंकर विरोध घडवून आणला म्हणजे समतोलपणा प्रस्थापित होतो असें त्यांच्याकडून सांगण्यांत येतें. दलितवर्गाची सदसद्विवेक बुद्धि जागृत करून न्याय आणि समतोल परीस्थिति निर्माण करण्याच्या यत्नांत खरा सुधारकहि दंग असतो. परंतु त्याचा मार्ग सहकार्य, शांतता आणि प्रेम यांचा असतो. मानवतेची सुधारणा करण्याचा दावा मांडणाऱ्या बोल्शोव्हिझमनें सामाजिक मतभेद मिटविण्याचा जो नवीन मार्ग शोधला आहे तो म्हणजे हिंसा आणि वर्ग–कलह !

## त्याचे परिणाम

आर्थिक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें बोल्शेविझमनें केवढेंही कार्य केलें असलें तरी शांततेचा प्रश्न आजही पूर्वींइतकाच बिकट राहिलेला आहे.

आंतरराष्ट्रीय युद्धाला त्यानें अंतर्गत कलहाची जोड मिळवून दिली आहे. मत्सर आणि द्वेष यांचा प्रचार सारखा चालू ठेवून हा विरोध जिवंत राखला जात आहे. बोल्शेविझम जों जों यशस्वी होत जाईल तों तों अंतर्गत कलह आंतर्राष्ट्रीय लढ्यापेक्षांही अधिक तीव्र आणि निर्दय होत जातील. रशियांत काय झालें? त्यांचा प्रत्यक्ष वा मानलेला शत्रू जो मध्यमवर्ग, त्याचा विनाश केल्यानंतर आतां, क्रान्तीनें स्वतःच उत्पन्न केलेल्या लोकांविरुद्धच नव्हे तर ज्यांनीं क्रान्तीचा उठाव केला आणि क्रांति घडवून आणली त्यांच्याहि विरुद्ध शस्त्र उगारलें आहे. आजचें तेथील युद्ध विरोधकांशीं नसून एकच तत्त्वप्रणालि मान्य करणाऱ्या त्यांच्याच देशांतील दोन घटकांमध्यें आहे. एखादा मध्यमवर्गीय, मार्क्सवाद्याच्या तडाक्यांतून सुटेल पण मतभेद असलेला कोणीहि मार्क्सवादी मात्र सुटूं शकणार नाहीं. आज बोल्शेविक रशियाचें साम्राज्यवादी राष्ट्रांशीं किंवा अपहारक राष्ट्रांशीं भांडण राहिलें नाहीं. परंतु देशांतील लोकांत मतमतांतरें असलेलीं तेथें खपत नाहींत. मध्ययुगीन ख्रिस्ती धर्मामध्यें जी स्थिति होती तीच सध्यां तेथें आहे. सध्यां जे सत्ताधारी आहेत त्यांनीं स्वतः मार्क्स-वादाचा एक अर्थ ‘खरा’ म्हणून दिला आहे. त्यापेक्षां वेगळा अर्थ लावणारा अधर्मी आणि वाममार्गी ठरून छळ आणि सूळ यांना पात्र होतो. मध्ययुगांत कित्येक खऱ्या ख्रिश्चन साधूंना त्यांच्या मतांबद्दल, तीं मतें प्रेषिताच्या मतांशीं, त्यांना शिक्षा देणाऱ्या लोकांच्या मतांपेक्षां अधिक जवळ असतांही, प्राणदंडाची शिक्षा भोगावी लागली; कारण त्या वेळीं हे साधू चर्चमध्यें सत्ताधारी नव्हते. आज बोल्शेविझमही असेंच वर्तन करीत आहे. खरेखुरे मार्क्सवादी, कम्यूनिस्ट आणि बोल्शेव्हिक यांना आपल्या मतांसाठीं जीविताची राखरांगोळी करावी लागते आहे.

गेल्या कांहीं वर्षांत झालेल्या दिखाऊ खटल्यांवरून त्यांची चौकशीची पद्धति शेवटल्या क्षणीं अपराध्यांनीं दिला जाणारा कबुलीजबाब आणि मतभेद मागें घेतल्याचा खुलासा वाचला कीं, आजही चौकशी कोर्टांचें काम कसें चाललें आहे तें आपल्या डोळ्यांसमोर स्पष्ट दिसूं लागतें.

चेटकिणी आणि भिन्न मतानुयायी यांना जिवंत जाळण्याचा प्रकार न्यायदानाच्या नांवाखालीं मध्ययुगांत होत असे त्याची आज आठवण होते. ख्रिश्चन लोकांना यहुदी आणि मुसलमान लोक खपत होते पण जे ख्रिश्चन लोक रूढ धर्ममतें मान्य करण्यास तयार नव्हते ते त्यांना चालूं शकले नाहींत. कोणाच्याही मदतीवांचून, स्वतः बायबल वाचून त्याचा अर्थ काय होतो यासंबंधीं स्वतःचें मत प्रकट करणें हा मोठा गुन्हा होता. जो काय 'प्रकाश' मनांत पडावयाचा तो रूढ धर्ममतवाद्यांच्या प्रार्थना-मंदिरांतूनच आला पाहिजे. आज कम्युनिझमचा धर्मग्रंथही रशियांतील सत्ताधारी वर्गानेंच समजावून सांगावयाचा असतो. ज्यांच्या हातीं सत्ता आहे त्यांच्याशिवाय दुसरें कोण तो अधिक स्पष्ट करूं शकणार ? त्यांना यश मिळालें नाहीं का ? जर त्यांना मूलतत्त्वें नीट समजलीं नसतीं तर त्यांना यश कसें आलें असतें ?

आंतर्राष्ट्रीय राजकारणांतील रशियाचे डावपेंच इतर भांडवलशाही राष्ट्रांपेक्षां अधिक गुंतागुंतीचे आणि अगम्य आहेत. ते गुप्त आणि संधि-साधूपणाचे आहेत. चोरांच्या संघाशीं युद्ध जाहीर करून त्यांनीं सुरुवात केली. पण आज त्याच संघाला ते साम्राज्यवादी राष्ट्रांपेक्षांही अधिक प्रेमानें कवटाळीत आहेत. जगांतील दलित वर्गाचें भवितव्य उज्वल व्हावयाचें असेल तर ते फक्त युद्धानेंच होणार अशा जाहीर घोषणेनें रशियानें सुरुवात केली. आज त्यांचा विश्वास शांततेवर आहे आणि शांतताानिदर्शनांत त्यांचा पुढाकार आहे. त्यांना एक गोष्ट कळावयास लागली कीं, आज शांतता नांदावयाची असेल तर ती आहे ती परि-स्थिति कायम ठेवूनच म्हणजे साम्राज्यशाही राष्ट्रांना त्यांनीं भल्याबुऱ्या मार्गानें मिळवलेलें साम्राज्य त्यांच्याच ताब्यांत राहूं दिलें तरच शक्य आहे. परंतु अशा शांततेनें सध्यांची आहे हीच विषम स्थिति कायम राहील. परंतु आपली आर्थिक रचना, आणि युद्ध आणि विध्वंसन यांची साधनें संपूर्णतेस पोहोंचेपर्यंत रशियाला आज अशा शांततेची आवश्यकता आहे. म्हणून शांतता सर्वांनाच आवश्यक असली पाहिजे ! प्रत्येक

कम्यूनिस्ट जसा पूर्वी युद्धाला चिकटून होता तसें आतां त्यानें शांततेच्या तत्त्वाला चिकटलें पाहिजे. जो ह्या नवीन मताला मान्यता देणार नाहीं तो वाममार्गी ठरणार. सध्यांचें आपलें राष्ट्रीय सरकार आणि धोरण युद्ध सुरू झाल्यास संपुष्टांत येईल हें रशियनांना कळलें आहे म्हणून ते जें युद्ध इतके दिवस बहुजनसमाजाच्या कार्याला अतिशय उत्तम संधि प्राप्त करून देईल असें म्हणत होते तेंच युद्ध आतां विनाशक होईल असें म्हणत आहेत. पिळवणूक करणाऱ्या इतर भांडवलशाही राष्ट्रांना हेवा वाटावा इतक्या उत्साहानें आणि जलद गतीनें रशिया शस्त्रास्त्रसाधन करीत आहे. इतर भांडवलशाही राष्ट्रांप्रमाणेंच युद्धानें युद्धें बंद होतील या तत्त्वावर त्याचा विश्वास आहे. इतर राष्ट्रें दुसऱ्याची पिळणूक करतां यावी म्हणून शस्त्रें सांठवीत आहेत तर रशिया मात्र जागतिक शांततेसाठीं शस्त्रास्त्रें जमवीत आहे! १ ल्या महायुद्धांत दोस्त राष्ट्रांचें तर्कशास्त्र ह्याच प्रकारचें होतें. त्यांनीं जर्मनीशीं युद्ध केलें तें शांतता आणि लोकशाही प्रस्थापित करण्यासाठीं आणि जगांतील युद्धें थांबवण्यासाठीं केलें. आज भांडवलशाही राष्ट्रें गुप्त शस्त्रें जमवीत आहेत तीं शस्त्रसंन्यासासाठीं! रशियाही तसेंच करीत आहे. पण कांहीं श्रद्धाळु लोक म्हणतात कीं, दोन्ही एकच नाहींत. त्यांत फरक आहे. आत्मरक्षण आणि शांततेसाठीं रशिया शस्त्रें जमवीत आहे तर इतर राष्ट्रें आक्रमण आणि पिळवणुकीसाठीं शस्त्रसंभार वाढवीत आहे. पण हा फरक श्रद्धावंतांशिवाय इतरांना दिसणार नाहीं अशी आम्हाला भीति वाटते. वरवर पाहणारांस त्यांना या दोघांत कांहींच फरक वाटत नाहीं. कदाचित् ह्या नवीन भौतिक वादांत ते तितके तयार नसल्यामुळें असें होत असेल. ज्या अंतर्गत अथवा आंतर्राष्ट्रीय जागतिक शांततेवांचून मानवतेची प्रगति होणें शक्य नाहीं ती शांतता प्रस्थापित करण्याचे हे मार्ग नव्हते असें आम्हाला वाटतें. इतकेंच नव्हे तर शेवटीं आतांपर्यंत मिळवलेलें सर्व व्यक्तिगत आणि सामाजिक फायदे युद्धांतील हिंसेंत बळी देऊन मनुष्याला प्रगतिपथावरून परत फिरावें लागेल!

आंतरराष्ट्रीय युद्धें सामूहिक हिंसेनें बंद होतील यावरच बोल्शेविझमचा

विश्वास आहे असें नव्हे तर क्रांतीसाठीं वाटेल ते मार्ग उपयोजावे असेंहि त्यांचें म्हणणें आहे. पवित्र अथवा अभेद्य असें जगांत कांहींही नाहीं. यश मिळविण्यासाठीं वाटेल त्या गोष्टी करण्यास हरकत नाहीं. कोणताही मार्ग अवलंबिण्यास प्रत्यवाय नाहीं. जर सामाजिक आणि राजकीय नीति-तत्त्वामध्यें कांहीं भेद असेल तर (सध्यां तो अतिशय आहेच) या नवीन तत्त्वज्ञानानें तो अधिक वाढण्याचा मार्ग खुला होत आहे. यशाशिवाय दुसऱ्या कशालाही महत्त्व नाहीं आणि प्रत्येक गोष्ट याच दृष्टिकोनांतून पाहिली पाहिजे. स्टॅलिन यशस्वी झाला; त्याचें करणें बरोबर! ट्रॉट्स्की आणि त्याचे अनुयायी अयशस्वी ठरले; ते धिक्कारास पात्र! योग्यायोग्यतेचा निर्णय यशापयशानेंच काय तो ठरावयाचा. ज्या मार्गांचा अवलंब भांडवलशाही करते, त्याच मार्गांचा अवलंब बोल्शेविझमलाही करावयाचा आहे!

जर दोन विरोधकांनीं एकाच प्रकारच्या शस्त्राचा उपयोग केला तर ज्याचें शस्त्र अधिक तीक्ष्ण असेल आणि जो त्याचा उपयोग अधिक ठिकाणीं आणि अधिक निर्दयपणें करतो तो अर्थातच यशस्वी होतो. असें असतांना भांडवलशाही सरकारांनीं जीं शस्त्रें वापरलीं तींच बोल्शेविझमनें अधिक व्यापक प्रमाणांत आणि अधिक कसोशीनें वापरलीं यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं! त्या शस्त्रांची नवी धार पाहून त्यांच्या अधिक विध्वंसन-शक्तीचें विस्मरण होण्याचें कारण नाहीं. प्रत्येक विभागांत कम्यूनिझम्ला जुन्या पद्धतीच संपूर्णतेस न्यावयाच्या आहेत. आपलीं युद्धसाधनें अधिक शास्त्रशुद्ध आणि अधिक कार्यक्षम करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. 'आज आमच्याविरुद्ध कितीही राष्ट्रांनीं एकत्रित होऊन चढाई केली तरी त्या सर्वांना एकट्यानें टक्कर देण्याची कम्यूनिझमच्या सैन्याची शक्ति आणि संघटना आहे' अशा ते वल्गना करीत आहेत. त्यांची विवाहपद्धति त्यांच्या त्यांच्या मर्यादेंत कोठल्याही दुसऱ्या देशाच्या पद्धतीपेक्षां अधिक कार्यक्षम आहे. त्यांच्या बदलणाऱ्या धोरणास आणि कल्पनांस सोईस्कर असें वातावरण निर्माण

करण्यासाठीं पाण्यासारखा पैशाचा व्यय केला जातो. त्यांचें प्रचारयंत्र भांडवलशाही देशांतल्या प्रचारयंत्रापेक्षां अधिक कार्यक्षम आहे. कांहीं सोटे-शाही देशांतल्या प्रचारयंत्रापेक्षांही तें वरच्या दर्जाचें आहे. भांडवलशाही आणि सोटेशाही राष्ट्रें व्यक्तींचा उपयोग बंदुकींतील गोळ्यांसारखा कर-तात ! बोल्शेव्हिस्ट देखील आपल्या नागरिकांचा तितकाच स्वैरपणें आणि निर्दयपणानें उपयोग करतात. मात्र आपण सामाजिक न्यायासाठीं त्या व्यक्तीचा बळी देत आहोंत असा त्यांचा विश्वास असतो. परंतु प्रत्येक धर्मपंथाचीहि अशीच समजूत होती. ख्रिस्ती धर्मीयांनीं मानवी आत्मे सुर-क्षित राहावे आणि पृथ्वीवर स्वर्गाचें राज्य असावें म्हणूनच मनुष्यवध केला ! नागरिक हक्कांचें संरक्षण भक्कम रीत्या व्हावें म्हणून बोल्शेव्हिक प्रथम नागरिकांचा अपहार करतो ! सशस्त्र हुकूमशाही प्रस्थापित करून तिलाच ते बहुजनसमाजाची हुकूमशाही असें म्हणतात. ह्या सगळ्याच्या मुळाशीं असलेली वंचना आणि असत्य तिच्या प्रचारकांना उमगत नाहीं. खरी सत्ता बहुजनसमाजाच्या हातीं नसून जो बोल्शेव्हिक पक्ष एखाद्या फासिस्ट पक्षाइतका संघटित आहे, त्या पक्षाच्या नेत्या-उपनेत्यांच्या हातीं आहे. पूर्वग्रहदोष नसलेल्या मनुष्याला नवीन स्वरूपांत पुढें मांडलेलीं जुनींच तत्त्वें पोकळ वाटतात परंतु श्रद्धावंताला तीं इतकीं तंतोतंत पटणारीं वाटतात कीं, त्यासाठीं आपला आणि इतरांचा प्राणहि पणाला लावून लढण्याची त्याची तयारी असते !

## सरळ आणि अरुंद मार्ग

ह्या सगळ्याला गांधीजींचा विरोध आहे. त्यांना युद्ध नाहींसें करावयाचें आहे परंतु तें युद्धाची शस्त्रास्त्रादि सामुग्री जमवून नव्हे; तर शांततेच्या मार्गानें. आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं वाटेल त्या मार्गाचा अवलंब ते करीत नाहींत व इतरांनीं केलेला त्यांना चालत नाहीं. साध्य कितीही उत्तम असो, साधनें शुद्ध असलींच पाहिजेत. त्यांच्या दृष्टीनें साधनें हीं साध्याइतकींच महत्त्वाचीं आहेत. कारण साधनांचा साध्यावर परिणाम

होतो. संशयास्पद मार्गांनीं साध्य केलेलें उद्दिष्ट बाह्यतः जरी मूळ साध्या-सारखेंच दिसलें तरी तें वस्तुतः तसें नसतें. पवित्र साध्याचें मर्म अपवित्र साधनांमुळें बदलून जातें. इटली-अबिसीनियायुद्धांत जे निर्बंध रशियानें इटालीविरुद्ध पाळले ते इतर भांडवलशाही राष्ट्रांपेक्षां निराळे नव्हते. आणि तीं राष्ट्रें इटालीचा विजय व्हावा असेंच थोड्याफार प्रमाणांत मनांत म्हणत होतीं. ते निर्बंध दूर करतेवेळींही रशियाचा उत्साह इतर राष्ट्रांपेक्षां कमी नव्हता. युद्ध चालू असतांना रशियानें इटालीला भरपूर तेल पुरवलें. तें कां? आपली निर्यात आणि व्यापार वाढवण्याकरतां. गांधीजींच्या नेतृत्वाखालीं हिंदुस्थान एखाद्या निर्दय आक्रमक राष्ट्राला युद्धसाहित्याचा पुरवठा करील अशी कल्पनाही करवत नाहीं! असल्या अपवित्र कायद्याचा गांधीजी धिक्कारच करावयास सांगतील. आज कॉंग्रेसच्या हातीं थोडीशीच सत्ता असतांना, अफू, गांजा, दारू यांपासून मिळणारें कराचें उत्पन्न शेतकऱ्याचें दुःखनिवारण, साक्षरताप्रसार अशा आवश्यक कार्यासाठीं खर्च न करतां, उत्पन्नाचें हें साधनच बंद करावयाचा कॉंग्रेस प्रयत्न करीत आहे हें पाहून आमच्या पुष्कळ आधुनिक मित्रांना आश्चर्य वाटतें. तांतडीच्या अशा सुधारणादेखील आपल्या लोकांच्या अधःपातावर मिळव-लेल्या अपवित्र पैशानें घडवून आणण्यापेक्षां त्या सुधारणाच कांहीं काळ-पर्यंत लांबणीवर टाकायलाही ते तयार आहेत. इतर दिशेनें करावयाची सुधारणा कांहीं काळ थांबली तरी चालेल पण दारूबंदी मात्र थांबूं शकत नाहीं. त्यांच्या मतें एखादें साध्य कितीही उच्च असलें तरी तें साध्य अनैतिक आणि अयोग्य साधनांचें समर्थन करूं शकणार नाहीं. निदान दारूबंदीच्या बाबतींत त्यांनीं योग्य तो व्यवहारी हिशेब केलेला आहे. दारूबंदी केल्यास एकंदर दारूच्या किंमतीच्या १० ते १५ टक्के तोटा सरकारला सोसावा लागतो. पण दारूबंदीनें जो शेतकरी दारू पितो त्याचा १०० टक्के फायदा होतो. आतां असें जरी नसतें आणि गिऱ्हाइकाचाहि कांहीं तोटा होतच राहता तरी देखील गांधींनीं दारूबंदीचा हेका सोडला नसता. ते नीतिवादी आणि तज्ज्ञ राजकारणी असल्यामुळें आद्य महत्त्वा-

च्या गोष्टींना ते प्रथमस्थान देतात. तात्कालिक फायद्याच्या मोहानें ते आपला सरळ आणि जवळचा मार्ग सोडायला तयार होणें शक्य नाहीं. हिंदी स्वातंत्र्यापेक्षां सत्य आणि अहिंसा यांचीच काळजी गांधीजींना जास्त आहे असें जें नेहमीं म्हटलें जातें, तें म्हणणें चुकीचें आहे. सत्य अहिंसा आणि हिंदी स्वातंत्र्य यांमध्यें गांधीजींना विरोधी भूमिका कोठेंच दिसत नाहीं. हिंसा आणि फसवणूक या मार्गांनीं मिळवलेलें स्वातंत्र्य त्यांना केवळ दिखाऊ वाटतें. अशा स्वातंत्र्यांत, स्वातंत्र्याचें मर्म आणि तत्त्व, अनैतिक आणि वंचनात्मक मार्गांनीं नष्ट होईल! खरें स्वातंत्र्य-ध्येय जितकें उज्ज्वल आणि उच्च आहे तितक्याच उज्ज्वल आणि उच्च साधनांचा अवलंब केला तरच खरें स्वातंत्र्य मिळूं शकेल.

अर्थातच आंतर्सामूहिक नीतीच्या बाबतींत तरी गांधींचीं तत्त्वें आणि व्यवहार बोल्शेव्हिझमपेक्षां अधिक भक्कम पायावर उभीं आहेत. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर जागतिक शांततेसाठीं त्यांनीं सुचवलेला उपाय हा अधिक विचारपूर्वक शोधलेला आहे. समाज सुधारावयाचा आणि त्याला अधिक नीतिवादी बनवावयाचें आणि युद्ध व हिंसा आंतर्सामूहिक व्यवहारांतून नाहींशी करावयाची हे दोन प्रश्न त्यांच्या मार्गानें सुटतील किंवा नाहीं हें कोणीही निश्चितपणें आजच सांगूं शकत नाहीं. आपण एवढेंच म्हणूं शकतों कीं, त्यांची विचारांची दिशा बरोबर दिसते. ती मानवी उत्क्रांति आणि इतिहास यांना धरून आहे. ह्या जगांत योग्य मार्ग आणि योग्य यत्न देखील, मनुष्य सुधारणेला तयारच नसला तर हवे ते परिणाम घडवून आणण्याला असमर्थ ठरतात. यश हें सोईस्कर परिस्थिति निर्माण होण्यावर अवलंबून असतें. नियति आपली लीला दाखविल्यावांचून रहात नाहीं. गांधीजींच्यापेक्षांही थोर लोक आपापल्या काळांत अयशस्वी ठरलेले आहेत. तद्वतच तेही कदाचित् अपयशी होतील. परंतु वस्तुतः तें अपयश नसतें. ते अपयशाचा भास असतो. त्यांच्या प्रयत्नांनीं मानवतेची सुधारणा झाली आहे. एखादें तत्त्व जर सत्याधिष्ठित असेल आणि जागतिक प्रगतीसाठीं आवश्यक असेल तर वारंवार अपयश आल्यानंतरही

शेवटीं मनुष्याला तें मान्य करावेंच लागतें. मनुष्यानें आतांपर्यंत केलेली प्रगति जर टिकवावयाची आणि वाढवावयाची असेल तर सामाजिक आणि आंतर्सामूहिक नीतीचे प्रश्न सोडवण्यासाठीं गांधीजींचा सत्य आणि अहिंसेचा मार्ग त्याला मान्य करावा लागेल. द्वेष, मत्सर, फसवणूक, हेवा-दावा, युद्ध, हिंसा आणि साधनांविषयींची बेफिकिरी या गोष्टी आपले प्रश्न सोडवूं शकतील असें मानणें फोल आहे. नीतिमय मार्ग जागतिक रचना चांगली करूं शकतील किंवा नाहीं याविषयीं शंका असली तरी फसवणूक, हिंसा आणि युद्ध तीं करूं शकणार नाहींत हें मात्र निश्चित आहे. वैयक्तिक आणि सामाजिक व्यवहारांत त्या जुन्या मार्गांना जसें अपयश आलें तसेंच तें राजनैतिक आणि आंतर्सामूहिक व्यवहारांतही आलें आहे हें उघड आहे.

## काँग्रेस आणि वर्गयुद्ध 3

वर्गयुद्धासंबंधीं काँग्रेसनें केलेल्या ठरावांत वर्गयुद्ध आणि खाजगी मालमत्ता जप्त करणें याबाबतच्या वल्गनांचा तीव्र निषेध केला आहे. तो ठराव काँग्रेस समाजवादी पक्ष किंवा इतर कोणत्याही पक्षनिष्ठ संघटनेला उद्देशून नाहीं. जरूर ती शक्ति आणि राज्ययंत्रावर आवश्यक तें नियंत्रण प्राप्त झालें म्हणजेच सुसंघटित आणि तत्त्वनिष्ठ गट आपला स्वतःचा कार्यक्रम आणि स्वतःचें धोरण यांचा संपूर्ण पाठपुरावा करूं शकतात. शासन-संस्थेंतील एकाद्या नवीन सुसंघटित पक्षाच्या घटनात्मक आणि कायदे-शीर कार्यक्रमाबद्दल कांहीं सांगणें काँग्रेसला शक्य नाहीं. फक्त त्या पक्षाकडून कांहीं अन्याय्य वर्तन झालें म्हणजे सत्याग्रह करावयाचा एवढेंच काँग्रेस जाणते. जेव्हां राज्यशकट तिच्या हातीं येईल आणि ती सत्ता काबीज करील, तेव्हां महत्त्वाचे बदल करण्याचा संकल्प तिनें केलेलाच आहे. परंतु कांहीं तुरळक विस्कळित व्यक्तींनीं चालविलेल्या बेजबाबदार बडबडीचा काँग्रेस निषेध करते.

पूर्वी जेव्हां जेव्हां क्रांतिकारक घटना झाल्या आहेत तेव्हां तेव्हां व्यक्ति आणि गट यांनीं स्वत:च्याच अधिकारांत इतर व्यक्ति आणि गट यांवर आपला अधिकार गाजवून त्यांना शासन करण्यांत मुळींच कसूर केलेली नाहीं. वैयक्तिक द्वेष आणि वर्गयुद्ध यांना उत्तेजन देण्यांत येऊन, कत्तली आणि दहशत यांत त्यांचें पर्यवसान होत आलें आहे. अशा वर्गयुद्धाला उत्तेजन देणाऱ्या वर्गविग्रहाचा कॉंग्रेस निषेध करते आणि तो यथार्थ आहे. गेलीं कित्येक शतकें अस्तित्वांत असलेला वर्गविग्रह कॉंग्रेसला माहीत नाहीं असा याचा अर्थ नाहीं. कोठल्याही प्रकारचा द्वेष मग तो वर्गावर्गांतला असो, जातीजातींतला असो वा जमातीजमातींतील असो, ज्यामुळें त्यांच्यापैकीं कोणावरही वा संपूर्ण राष्ट्रावर अन्याय होणें शक्य आहे असा द्वेष नष्ट करणें यासाठीं कॉंग्रेस आजपर्यंत झगडत आली आहे आणि यापुढेंहि झगडणार आहे. हिंदी राष्ट्रांतील निरनिराळ्या गटांतील हीं भांडणें लक्षांत घेऊनच हरिजन, खादी आणि ग्रामोद्योग हे कार्यक्रम आंखण्यांत आले आहेत. परंतु या कलहाची दखलगिरी कॉंग्रेसनें घेतली असली तरी तशींच तीं रहावींत असें कॉंग्रेसला मुळींच वाटत नाहीं. एखाद्या व्यक्तीनें वा गटानें आपल्याच हातीं सत्ता घेऊन सगळें कांहीं समतोल करण्याचा उद्योग आरंभिला तर त्यालाहि ती कधींही मान्यता देणार नाहीं.

एखादी पद्धति आणि त्या पद्धतीचें स्वेच्छया किंवा अनिच्छया, जाणून बुजून वा अजाणतां, तिच्या पुरस्काराचें साधन बनलेले लोक यांच्यांतील फरकाकडे कॉंग्रेसचें अवधान आहे. अन्याय्य आणि अपायकारक अशी पद्धति नष्ट करण्याकरितां कॉंग्रेस आपले सर्व यत्न खर्चीं घालील; पण व्यक्तीकडून अमानुष आणि बेकायदेशीर कृत्यें झालीं नसल्यास त्या पद्धतीचें साधन झालेल्या व्यक्तीवर कॉंग्रेस कधीं सूड उगवणार नाहीं. वैयक्तिक आणि असंघटित असे सुडाचे प्रयत्न कोणा व्यक्तीवर वा गटावर झाले तर त्यालाही कॉंग्रेस विरोधच करील. असल्या सूडबुद्धीच्या कृत्यांनीं गतकालांतील कित्येक महनीय क्रांतीच्या कार्यास कलंक

लाविला आहे. परंतु कॉंग्रेसचें ब्रीद अहिंसेचें असल्यामुळें तिला व्यक्ति आणि पद्धति यांच्यामध्यें फरक करावा लागणारच. कायदेशीर मार्गाखेरीज इतर कोणत्याही तऱ्हेनें कोणाही व्यक्तीवर हिंसक आघात करावयाचा नाहीं अशी कॉंग्रेसनें प्रतिज्ञाच केली आहे. वर्गद्वेष आणि वर्गयुद्ध ही भाषा अगदीं प्रारंभापासूनच कॉंग्रेसला वर्ज्यच आहे.

मालमत्तेच्या जप्तीचा प्रश्न असाच आहे. सुधारलेल्या समाजांत सर्व जीवित आणि मालमत्ता अखेरपक्षीं सरकारच्या मालकीची असलीं पाहिजेत एवढी गोष्ट समजण्याइतकें राजकारण कॉंग्रेसला ज्ञात आहे. सामाजिक कर्तव्यांच्या नांवाखालीं सरकार जीवित आणि वित्त यांवर सत्ता मिळवूं पाहतें. राष्ट्रांतील कित्येक गुन्ह्याबाबत मालमत्तेची जप्ती किंवा प्राणदंडाची शिक्षाही दिली जाते. सरकारला जर आपल्या प्रजेच्या जीवितावर आणि मालमत्तेवर सत्ता गाजविण्याचा हक्क नसेल तर, व्यक्ति आणि गट यांच्या झगड्यांत सरकार गुरफटून बसेल. युद्धकालांत प्रत्येक राष्ट्र आपल्या प्रजेपैकीं कांहींना सामाजिक कल्याणासाठीं प्राण अर्पण करण्याचा आदेश देतें व सक्तीची सैन्यभरती आणि सक्तीची नोकरी अंमलांत आणते. तसेंच मालमत्तेचेंही आहे. युद्धाव्यतिरिक्त इतर वेळींहि प्रत्येक सरकार खासगी मालमत्तेचा कांहीं भाग करांच्या रूपानें जप्त करतें. विशेष आणीबाणीच्या प्रसंगीं नुकसानभरपाई देऊन अगर न देतांही सरकार सर्व कांहीं हरण करीत असतें. परंतु या सर्व कृत्यांना जप्ती म्हणत नाहींत. सुसंघटित सत्तेनें आंखलेल्या राष्ट्रांतील कायद्यांनुसार केलेली अशी ही योजना असते. खासगी मालमत्तेच्या अशा जप्तीच्या आवश्यकतेविषयीं कोणाला कधींही क्षणभरहि संशय वाटत नाहीं. फार काय अशी तत्त्वप्रणालीच होऊन बसली आहे कीं, सर्व मालमत्ता ही सरकारचीच निर्मिती असते. निसर्गतः खाजगी अशी मालमत्ताच नसते आणि असणें शक्यहि नाहीं! ज्याअर्थीं सरकार, मग तें कशाही प्रकारचें असो, सर्व खासगी मालमत्ता उत्पादन करतें, त्याअर्थीं तिची मालकींही सरकारकडेच असावयाची. सामान्यतः या मालकीची प्रत्यक्ष किंवा संपूर्ण

अंमलबजावणी सरकार करीत नाहीं. परंतु व्यक्तीला कांहीं हक्क आहेत म्हणून सरकार असें वागतें असें नव्हे. तर व्यक्तींनीं कांहीं संपादन करणें आणि ती संपादित मालमत्ता आणि हक्क सर्वांना हितावह होईल अशा रीतीनें स्वतःकडे ठेवणें यांत सरकारची सोय आणि समाजाचें हित आहे म्हणून सरकारनें तशी सवलत ठेवलेली असते एवढेंच.

सुसंघटित शासनसंस्था (सरकार) देखील स्वतःवर इतरांनीं खटले भरण्याची सवलत ठेवतात. अमूकच एक पद्धत अवलंबण्यांत किंवा शोधून काढण्यांत प्रजेचें हित हा हेतू साध्य करण्याचें कार्य पूर्णपणें साधतें असें नाहीं. त्याहून अधिक चांगले मार्ग असणें शक्य असतें. पण स्वतःच्या हातांत सत्ता असेपर्यंत तें सरकार स्वतःची पद्धत हीच जास्तींत जास्त चांगली असें समजते. किंवा सर्वांत ती उत्तम नसली तरी तिच्यांच कांहीं बदल केला तर त्याचे परिणाम भयंकर होतील अशी तरी त्या सरकारची कल्पना असतेच.

राजनीतीमध्यें सरकारची व्याख्या संपूर्णतया अंतर्गत सत्ता असणें अशी केली जाते. प्रत्येक क्षणीं, या सर्व सामर्थ्याचा उपयोग केला नाहीं तरी सरकारचें कार्य अडत नाहीं. आपल्या सर्वश्रेष्ठ सामर्थ्याची वांटणी करून किंवा त्याचा कांहीं भाग, कांहीं व्यक्ती, गट, समित्या किंवा स्थानिक संस्था यांच्या स्वाधीन करणें सरकारलाहि हितावह वाटणें शक्य आहे. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, आपल्या अधिकारांतला कोठलाही भाग कायमचा देऊन टाकला तर अंतर्गत भागांतील सर्वांत वरिष्ठ गट हा सरकारचा दर्जा नाहींसा होईल. राष्ट्रसंघाच्या प्रमुख तत्त्वांपैकीं, सरकारच्या या अंतिम सत्तेस मान्यता असणें हें एक तत्त्व आहे. त्याला जर मान्यता नसेल तर तें राष्ट्र, राष्ट्रसंघाचा सभासदच होणार नाहीं.

भावी हिंदुस्थानची आर्थिक पुनर्रचना करतांना नवीन उत्पन्न होणाऱ्या परिस्थितींच्या अनुरोधानें राष्ट्राची सेवा करण्यासाठीं पुष्कळसे अधिकार काढून घ्यावे लागतील. हें इतर कोणत्याही राजकीय संघटनेप्रमाणें कॉंग्रेसलाही समजतें. कॉंग्रेसनें स्वतःपुरता आंखलेला कार्यक्रम " मूलभूत-

हक्क आणि आर्थिक कार्यक्रम ” या कराचीच्या ठरावांत नमूद आहे. तो अधिकारसंन्यासाचा एक प्रचंड कार्यक्रम आहे. त्यासाठीं कांहीं नुकसानभरपाई दिली जाईल किंवा नाहींही. एखाद्या हक्काचा उपभोग अथवा उपयोग पूर्वकालांत अन्याय्य असला किंवा तो काढून घेतला तरी कांहीं नुकसान होणार नसेल तर तो हक्क कालदृष्ट्या पोहोचलेला असला तरी तो काढून घ्यावा असें एखाद्या सरकारला वाटल्यास तें सरकार भरपाई देण्यास बांधलेलें नाहीं. हें सर्व आणि समाजहितासाठीं सरकारनें जें जें करणें आवश्यक आहे तें तें इतरहि सगळें करावें लागेल याची काँग्रेसला जाणीव आहे. कोणाच्याहि हितसंबंधाच्या मिरासदारीची काँग्रेस पर्वा करणार नाहीं. हिंदुस्थानचें राष्ट्रीय ऋण म्हणून जें मानलें जातें त्या सर्वांची तपासणी काँग्रेस करणार आहे. मग तें कायदेशीर मार्गानें झालेलें असलें तरी त्याची वसुली काँग्रेस केल्याखेरीज राहणार नाहीं. तसेच सर्व प्रकारचे विविध कालमर्यादेचे आणि पवित्र मानले गेलेले सर्व हितसंबंध कांटेकोर रीतीनें काँग्रेस तपाशील आणि तिच्या न्यायाचा मानदंड सामाजिक हित हाच राहील. स्वतःची सहानुभूति तिनें केव्हांही दडवून ठेवलेली नाहीं. हिंदी बहुजन-समाजाच्या हितसंबंधांना बाध आणणारे कसलेही हितसंबंध असले तरी ते नाहींसे झालेच पाहिजेत. गांधीजींच्या मार्गदर्शनानुसार आंखलेल्या स्वराज्याच्या योजनेंत काँग्रेसनें दुसरा कोठलाही मानदंड मानलेला नाहीं. उपासमार आणि आबाळ होत असलेल्या लाखों लोकांच्या भल्यासाठींच प्रत्येक हितसंबंध कार्यक्षम आहे हें सिद्ध झालें पाहिजे. आणि केवळ ह्याच कसोटीमुळें इतर कित्येक पूर्वापार गुंतलेले हितसंबंध काँग्रेसपुढें टिकाव धरूं शकत नाहींत.

या सर्वांवर काँग्रेसचा विश्वास असला तरी मालमत्ता खालसा करण्याबाबत चालणाऱ्या बेजाबदार, निरर्गल प्रलापांना काँग्रेसची मान्यता नाहीं. उदाहरणार्थ, खंडकरी व्यक्तिशः किंवा सांघिकरीत्या जमीनीवर ताबा गाजवूं लागले तर तें काँग्रेसला रुचणार नाहीं. एखाद्या गिरणीतील कामगारांनीं गिरणीच ताब्यांत घेणें काँग्रेस मानणार नाहीं. तसें काँग्रेसनें

मान्य करणें म्हणजे तिला आजपर्यंत कमावलेलें नांव आणि समाजहितदक्षता यांना बट्टा लावणें होय. ह्या सर्व गोष्टी पूर्वी घडलेल्या क्रांतीचे वेळीं झाल्या आहेत आणि त्यांचे परिणाम राष्ट्राच्या दृष्टीनें कांहींवेळां तात्पुरते तर कांहींवेळां कायमचे हानिकारक झाले आहेत. ही हानि भरून काढण्यासाठीं नंतर त्या राष्ट्रांना वर्षानुवर्षे विस्कळित स्थितींत दुःख, कष्ट आणि हानि सहन करावी लागलीं आहेत. हिंदी राष्ट्र आणि हिंदी कॉंग्रेस यांना अशा गोष्टींच्या बाबतच्या निरर्गल प्रलापांना मान्यता न देण्याचा योग्य सल्ला मिळाला आहे. खोट्या राजकीय आणि आर्थिक कल्पना अशिक्षित शेतकरी आणि कामकरी यांच्या मनांत अशा वल्गनांनीं निर्माण होतात. सुसंघटित समाजांत अन्याय-निराकरणाचे कांहीं मार्ग राजकीय आणि कायदेशीर हक्क म्हणून मानण्यांत येतातच. तें काम कांहीं व्यक्तींच्या, असंघटित, गोंधळ माजलेल्या आणि अज्ञाण्यांच्या स्वाधीन करतां येणार नाहींत. कांहीं विशिष्ट पद्धत त्यांत पाहिजे, आणि एवढ्याच कारणास्तव कॉंग्रेसनें घटनासमितीच्या कल्पनेला ताबडतोब मान्यता दिली.

## डावा गट आणि उजवा गट

## ४

ज्याला थोडा तरी अनुभव आहे किंवा ज्यानें थोडा अभ्यास केला आहे असा कोणीही जी गोष्ट सहज कबूल करतो ती मोठ्या पाल्हाळानें सिद्ध करण्याची उठाठेव आपले कांहीं चांगले शिक्षित लोक करीत बसतात. एका दृष्टीनें पाहिलें तर धार्मिक माणसालाच ते धर्मतत्त्वें समजावावयाचा प्रयत्न करतात असें म्हटल्यास चालेल. देशांत सर्वत्र गरिबी, बेकारी, आणि निकृष्ट क्रयशक्ति आहे हें सर्वांना मान्य आहे. शेतकरी आणि उद्योग-धंदे यांचें यांत्रिकीकरण केल्यास उत्पादन वाढेल ही उघड गोष्टही कोणी नाकबूल करूं शकत नाहीं. आणि ही शेवटली गोष्ट उत्तम प्रकारें साधण्यास समाजसत्तावाद प्रस्थापित झाला पाहिजे असेंही वादाकरितां आपण गृहीत धरूं या. परंतु खरोखर जें कांहीं कळावयास पाहिजे आहे तें हें कीं, हवे तसे बदल कसे घडवून आणावयाचे, पाहिजे ती सत्ता कशी काबीज करावयाची आणि आपलें ध्येय साध्य करण्यासाठीं कोणत्या मार्गाचा

अवलंब करावयाचा. आपल्याजवळ जरूर ती सत्ता आणि साधनें नाहींत ही गोष्ट कबूल. म्हणूनच असा प्रश्न उद्भवतो कीं, आपण तीं मिळवाव-याचीं कशीं ? यांत्रिकीकरण, साम्यवादाची प्रस्थापना, गुंतागुंतीच्या स्वार्थी हितसंबंधाचें निराकरण, उत्पादनांत व क्रयशक्तीमध्यें वाढ आणि गरिबी व बेकारी यांचें निवारण हे प्रश्न तात्त्विक किंवा बौद्धिक चिकित्सेनें सुटणार नाहींत. ते प्रत्यक्ष व्यवहारी राजकारणांतले प्रश्न असून आपल्या हातांत सत्ता आणि राज्ययंत्र असल्याशिवाय ते सोडवितां येणार नाहींत. रशियामध्यें जागृति करणें, राजकीय सत्ता हातीं आल्यावरच लेनिनला शक्य झालें आणि त्याच्यानंतरच्या लोकांना सर्वाधिकार प्राप्त झाल्यावरच औद्योगिकरण आणि शेतीचें यांत्रिकीकरण करतां आलें.

आपल्या हिंदुस्थानांत तसें पाहिलें तर उद्योगधंद्यांची स्वाभाविकपणें वाढ कां होत नाहीं ? आपण कोठेंही गेलों तरी आपल्या मार्गांत अडचणी उभ्या असलेल्या आपल्याला दिसतात. ह्या तात्त्विक नसून प्रत्यक्ष आहेत. आपण त्या प्रथम दूर केल्या पाहिजेत तरच आपल्याला कांहीं मिळवितां येईल. या अडचणींचे ठोकळ मानानें तीन प्रकार करतां येतील. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक. आपल्या आर्थिक अडचणी आपल्या शासनपद्धतींतूनच निर्माण झाल्या आहेत असें आपणास शेवटीं वाटूं लागतें. ह्या राजकीय अडचणींचें निवारण झाल्यावांचून आपणांला फारशी आर्थिक प्रगति करतां येणार नाहीं. आपल्यालाही ही गोष्ट नुकतीच कळून चुकली आहे कीं, सामाजिक दोष देखील राजकीय सत्तेवांचून दूर करतां येणार नाहींत. राष्ट्र जरी अस्पृश्यता-निवारणास तयार झालें तरी कोणत्या ना कोणत्या कारणानें कायदा त्याच्या मार्गांत आडवा येतो. आपल्याला दारूबंदी करावयाची असली तर कायदा मदत करीत नाहीं. देश साक्षर करावयाचा म्हटला तर सरकार पैसे देण्यास नकार देऊन आपल्या राष्ट्र-उभारणीच्या मार्गांत धोंड निर्माण करूं शकतें. सरकार स्वतः आपल्या हातांत येईल किंवा सुधारकांच्या तर्फेनें राहील, तरच त्या

सुधारणा होणें शक्य आहे, नाहीं तर नाहीं. म्हणून आपण राजसत्ता उत्पन्न केली पाहिजे, किंवा काबीज केली पाहिजे.

जपानजवळ राजकीय सत्ता होती आणि म्हणूनच जवळ जवळ ३० वर्षांच्या अवधींत तें स्वतः यांत्रिकीकरण करूं शकलें, इतकेंच नव्हे तर पाश्चिमात्य राष्ट्रांना आव्हान देण्याइतकें तयार झालें. हिंदुस्थाननें औद्योगीकरण थोडेंसें उशीरां सुरू केलें, पण त्याचा फायदा किती तरी झाला आहे. पूर्वींपेक्षांही अधिक लोकसंख्या सध्यां शेतांवर जगते असें शिरगणतीच्या वृत्तांतावरून दिसतें. रशियाला १५ वर्षांत औद्योगीकरण करतां आलें. रशियन ध्येयवाद्यांचीं स्वप्नें राजकीय सत्ता हातीं येण्यापूर्वीं किती निष्फळ वाटत होतीं !

औद्योगीकरणाच्या हिंदी प्रयत्नांचा आपण थोड्या बारकाइनें विचार करूं या. सर्व उद्योगधंदे मोठ्या पेंचप्रसंगांत सांपडले आहेत. जगांतील राष्ट्रें आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या एकमेकांशीं युद्धांत गुंतलेलीं असतांना कोणत्याही देशाला उत्पन्न, चलन, कर आणि परराष्ट्रीय धोरण आपल्या ताब्यांत असल्यावांचून आपले उद्योगधंदे चालू ठेवणें अशक्य आहे. ती सत्ता ज्यांच्याजवळ नसेल त्यांचे उद्योगधंदे पेंचप्रसंगांत सांपडणारच. जागतिक मंदीमुळें आर्थिक व्यवस्था, चलन, कर आणि परराष्ट्रीय धोरण ही ज्यांच्या स्वाधीन आहेत अशा देशांतील सरकारलाही आपापल्या धंद्यांना संरक्षण देणें कठीण झालें आहे, मग आपल्यासारख्या राजसत्ता नसलेल्या परतंत्र देशास हें किती कठिण झालें असेल ? हिंदी उद्योगधंद्यांची सर्व साधारण वाढहि होत नाहीं. तरी बंगालच्या फाळणीनें झालेल्या प्रक्षोभापासून जी स्वदेशीची चळवळ निघाली, त्या चळवळीमुळें कांहीं धंद्यांत २०० टक्केपर्यंत संरक्षण मिळालें आहे ! देशांतील गिऱ्हाइकांची क्रयशक्ती फारच कमी आहे. तरीसुद्धां त्यांनीं आपखुशीनें आणि स्वयंस्फूर्तीनें अधिक भार उचलण्याचें मान्य केलें आहे. स्वदेशी उद्योगधंद्यासाठीं निर्वेतन प्रचारक आणि जाहिरातदार होऊन सार्वजनिक कार्यकर्ते पुढें आले. प्रदर्शनें आणि

बाजार भरविण्यासाठीं काँग्रेसनें आणि इतर संस्थांनीं कितीतरी पैसा खर्च केला आहे. कौन्सिलांत आणि असेंब्लींत मोठाल्या उद्योगधंद्यांचा नेहमीं पाठपुरावा करण्यांत आला असून या बाबतींत नाखूष असलेल्या सरकारकडूनही थोडें फार संरक्षण मिळालें आहे. परंतु गरीबांना किंवा जनतेला या सर्व प्रयत्नाचा आणि त्यागाचा काय मोबदला मिळाला ? या उद्योगधंद्यांनीं आपलें स्वतःचें कार्यहि धडपणें चालूं ठेवलें नाहीं-त्यांची कार्यतत्परता सर्वांत खालच्या दर्जाची आहे. त्यांच्यांत स्वयंस्फूर्ति नाहीं आणि त्यांना कोठून चेतनाहि मिळत नाहीं. त्यांना ठाऊक आहे कीं, अर्थमंत्र्याच्या लेखणीच्या फटकाऱ्यानें आपण वाटेल त्या क्षणीं कोसळणार ! म्हणून ते वाहत्या गंगेंत हात धुऊन घेत आहेत एवढेंच. शक्य त्या कमींत कमी वेळांत वाटेल त्या मार्गानें जास्तींत जास्त फायदा काढावा एवढेंच ते जाणतात. सरकार त्यांना तसें करूं देतें कारण त्यामुळें परदेशी भांडवलाला देशांतील भांडवला-इतकाच किंबहुना त्यापेक्षांहि जास्त वाव देतां येतो. या दिखाऊ भांड-वलवाल्यांच्या तोंडावर चार तुकडे फेकण्यांत सरकारचें फारसें बिघडत नाहीं, हे तुकडे इंग्लंडच्या किंवा इतर देशांच्या व्यापारी आणि राजकीय हितसंबंधांना बाध आणण्याइतके ‘ मोठे ’ नसले म्हणजे झालें !

हिंदी भांडवलदारांची आणि सरकारची जी उदासीनता आहे तिचा परिणाम देश आणि सामान्य जनता यांच्या हितावर इतका वाईट झाला आहे कीं, कामगार वर्गाच्या अगदीं प्राथमिक हक्काचेंसुद्धां संरक्षण होत नाहीं. कामाचे तास, कामाची जागा, कामगारांचीं घरें, अपघाता-बद्दल नुकसान–भरपाई, वेतन, पेन्शन, शिक्षण, प्राथमिक उपचार, आणि करमणूक या सर्व बाबतींत इतर कोणत्याही कामगारांपेक्षां आमच्या कामगारांची स्थिति वाईट आहे. इतर देशांत ५० वर्षांपूर्वी असलेली पिळवणूक आजहि येथें चालू आहे. तिच्यापासूनही राष्ट्रास कामगारांचें संरक्षण करतां येत नाहीं.

शेतीचेंच उदाहरण घ्या. जमिनीची विभागणी तुकडेवारीनें केली

आहे. कित्येक प्रांतांत मालकीची जमीन सरासरी २ एकर असते. याचा अर्थ एवढाच कीं, हजारों लोकांजवळ अवघी अर्धा किंवा पावच एकर मालकीची जमीन आहे. ही पोटविभागणी आणखी वाढतेच आहे. राष्ट्रांत त्याला आळा घालणारा कायदाच नाहीं. जें सरकार आज शेतीस मुकलेल्या पिढीजाद शेतकऱ्याच्या कुटुंबांचें संरक्षण करूं शकेल, तेंच असा कायदा करूं शकेल. व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रांतच अशा शेतकऱ्यांची सोय करतां येईल हें सरकारला माहीत आहे म्हणूनच सरकार ही पोटविभागणी थांबविण्याचा प्रयत्न करीत नाहीं.

मालकी जमीन फार थोडी असल्यामुळें तीहि इकडेतिकडे विखुरलेली असते. गरीब शेतकरी अशा जमिनीचें काय करणार ? शेतकऱ्यांची मालकी असणें चांगलें कीं सर्व जमिनीचें राष्ट्रीयकरण चांगलें; लहान तुकडे बरे कीं मोठमोठाल्या जमिनींतून एकदम उत्पन्न काढणें बरें; असे तात्त्विक प्रश्न येथें उत्पन्नच होत नाहींत. शेतकीच्या वातावरणांत या ना त्या प्रकारची क्रांति घडवून आणण्यास समर्थ अशा सत्तेचा मुख्य प्रश्न आहे. कारण माझ्या समजुतीप्रमाणें सध्यांच्या परिस्थितींत वरील दोन्ही बदल क्रांतिकारक असून त्यासाठीं सुधारणेची इच्छा असणारांच्या हातांत संपूर्ण हिंदुस्थानावर चालणारी आर्थिक आणि राजकीय सत्ता पूर्णपणें पाहिजे. कोणत्या तरी प्रकारची आर्थिक पुनर्रचना केल्याखेरीज यापैकीं कांहींच साधावयाचें नाहीं. परंतु सत्तेशिवाय नुसत्या आर्थिक घटनेच्या गप्पा मारणें पढिक अर्थशास्त्रज्ञांच्या बेजबाबदार परिषदेंत फक्त शक्य आहे. त्यांना खरी गोष्ट माहीत असूनही ते ती बोलण्यास धजत नाहींत आणि तरीही ते स्वतः अद्ययावत् आणि विद्वान् ठरण्याची इच्छा आणि प्रौढी बाळगतात.

अर्थातच औद्योगिक आणि समाजवादी तत्त्वांनीं पुनर्घटनेचा क्रांतिकारक कार्यक्रम आंखणें हा हिंदुस्थानांतला खरा प्रश्न नसून सत्ता काबीज करण्याचा मौलिक कार्यक्रम आंखणें हा मुख्य प्रश्न आहे. अशी

सत्ता मिळेपर्यंत बाकी सर्व आर्थिक आणि सामाजिक कार्यक्रम केवळ तकलुपी स्वरूपाचेच ठरणार.

गांधीजींच्या ठिकाणीं कांहीं छांदिष्टपणा असला तरी राष्ट्राला ज्या गोष्टी सरकारी सहाय्याखेरीज आणि राज्ययंत्राखेरीज करतां येतील त्याच राष्ट्रापुढें ते ठेवीत असतात. त्यांचा खादी आणि ग्रामोद्योग याविषयींचा सर्व कार्यक्रम याच राजकीय आणि आर्थिक पार्श्वभूमीवर आधारलेला आहे. समाजवादी सरदार लॉर्ड फॅरिंग्टन यांनीं, नुकतीच गांधीजींची भेट घेतली. त्यांना गांधीजींच्या ग्रामोद्योग संघाचें खरें कार्य काय तें त्यांच्याचकडून समजून घ्यावयाचें होतें. गांधीजींना त्यावेळीं मौन होतें म्हणून त्यांनीं लेखी उत्तर दिलें.

"कचऱ्याचें सोनें कसें करावें हें लोकांना दाखविणें." पृच्छकानें पुनः विचारलें, "ग्रामीण लोकांच्या कर्जाचा प्रश्न तुम्ही कसा सोडवणार आहांत ?" गांधीजींनीं उत्तर दिलें, "आम्हीं त्याचा विचार करीत नाहीं. त्याला सरकारी प्रयत्नांची आवश्यकता असते. सध्यां मी सरकारच्या प्रयत्नाशिवाय लोकांना काय करतां येईल तें शोधून काढीत आहें. मला सरकारची मदत नको आहे असें नाहीं. परंतु माझ्या अटी मान्य करून मला ती मिळणार नाहीं, हें मला ठाऊक आहे." या अर्थपूर्ण शब्दांत अगदीं स्पष्टपणें महात्माजींच्या संबंध कार्यक्रमाचा आर्थिक पाया स्पष्ट झाला आहे. ते समाजवादी माणसाशीं बोलत होते. त्याला कदाचित् त्यांची नेहमींची आध्यात्मिक भाषा किंवा साधेपणा आणि आपखुषीनें स्वीकारलेलें दारिद्र्य यांविषयींच्या कल्पना समजल्या नसत्या म्हणून त्यांनीं परकीय गृहस्थास समजेल अशी सहज आणि सरळ राजकीय आणि आर्थिक भाषा त्याच्यापुढें वापरली. राष्ट्राच्या कचऱ्यांतून संपत्ति निर्माण करण्याची कल्पना कोणीही खरा अर्थशास्त्रज्ञ अमान्य करूं शकणार नाहीं. याच भेटीच्या वेळीं त्यांनीं असेंही सांगितलें कीं, राष्ट्रासमोर दुसरा कोठलाही विधायक कार्यक्रम नाहीं.

सध्यांच्या राजकीय परिस्थितींत क्रांतिकारक असा विधायक कार्यक्रम

अंमलांत येणें शक्य नाहीं असें मला वाटतें. तो सगळा केवळ सुधारणे-च्याच स्वरूपाचा राहणार आणि त्याचा उपयोग देशांतील फुकट जाणारा भाग कामीं लावणें एवढाच होणार. त्या कार्यक्रमानें फारच सौम्य स्वरू-पाच्या गोष्टी अगदींच सामान्य प्रमाणावर होत राहणार. म्हणूनच समाज-वाद्यांना विधायक कार्यक्रमच नको असें वाटतें. आम्हाला आपलें उद्दिष्ट आणि ध्येय ते असें सांगतात कीं, "उत्पादनाच्या सर्व साधनांचें राष्ट्रीयकरण झालें पाहिजे. याचाच अर्थ सर्व आर्थिक कार्य मग तें उत्पादन असो, देवघेव असो किंवा खप असो, या सर्व गोष्टी सरकारी नियंत्रणानेंच चालल्या पाहिजेत आणि हें सरकार उत्पादकांचें अर्थात कामगारांचें आणि कामगारांच्या हिताचा विचार करणारें असलें पाहिजे. परंतु हें होण्यापूर्वी बहुजनसमाज किंवा त्यांच्या वतीनें कोणीतरी प्रथम सत्ता काबीज केली पाहिजे." हें शास्त्रीय समाजवादाचें उद्दिष्ट आणि ध्येय आहे. कम्यूनिस्ट अर्थातच ट्रेड युनियनच्या कार्यास महत्त्व देत नाहींत. त्यांच्या दृष्टीनें ते संघ केवळ सुधारणावादी असून कामगारांच्या क्षुल्लक गरजांचाच विचार करतात. कांहीं वेळां असलें सुधारणावादी कार्य संपाची पूर्वपीठिका म्हणून ते पत्करतात. कारण वर्गयुद्धाच्या तयारीचें शिक्षण त्यानें मिळतें असें त्यांना वाटतें. कामगारास थोडासा सुखी करणाऱ्या ट्रेड-युनियनसारख्या संघटना असंतोषाची धार बोथट करतात आणि क्रांतीचा क्षण दूर ढकलतात म्हणून त्या संघटनांचा 'भाई' लोक धिक्कार करतात.

शास्त्रीय समाजवाद्यांना हें समजतें कीं, उद्योगधंदे जेव्हां मंदावतात तेव्हां कुठलाच संप यशस्वी होणें शक्य नाहीं. कांहीं वेळां तर मालकच मंदीचें स्वागत करतात. कधीं कधीं तर ते स्वतःच मंदी घडवून आण-ण्याची खटपट करतात. तरी पण समाजवादी अशा परिस्थितींतसुद्धां, उद्योगधंदे मंद असतांना संप अयशस्वी होणार आणि कल्पनातीत यातना फक्त पदरांत पडणार हें माहीत असूनही संपास उत्तेजन देतातच. त्यांच्या समजुतीप्रमाणें ते कष्ट आणि यातना अटळ आहेत. तेवढी किंमत दिलीच पाहिजे. सामुदायिक प्रगतीला व्यक्ती या केवळ साधनासारख्या

आहेत. भांडवलदार आणि साम्राज्यवादी यांच्या गोलंदाजीचा, बहुजनसमाज हा केवळ कच्चा माल आहे! तो बहुजनसमाजाच्या क्रांतीच्या कार्मी बळी पडला तर भावी पिढीचें तरी कल्याण होईल!

उलटपक्षीं एखादा खरा कामगार-संघवादी यशाच्या संभाव्यतेचा विचार करतो. गरीबगुरीब नुसते साधनीभूत व्हावेत हें त्याला पटत नाहीं. संघटनेव्यतिरिक्त त्यांना स्वतःचें कांहीं जीवित आहे याची त्याला जाणीव असते. त्यांचीं व्यक्तिगत दुःखें आणि यातना हीं सत्यच असतात, काल्पनिक नसतात. त्यांचें जीवन कितीही खालच्या दर्जाचें असलें तरी तें स्वयंपूर्ण असतें. या गोष्टी लक्षांत घेऊन खरा कामगार-संघवादी यशाचा संभव दिसला नाहीं तर स्वस्थ बसतो. त्याच्या दृष्टीनें संप हें कामगारांच्या परिस्थितींत सुधारणात्मक बदल घडवून आणण्यासाठीं उपयोगांत आणलेलें साधन असतें. वर्गशून्य, भेदविरहित समाजव्यवस्था स्थापण्यासाठीं करावयाच्या तीव्र आणि अंतिम वर्गयुद्धाची संप ही एक तालीम आहे असें तो मानीत नाहीं.

आपल्या तात्त्विक अट्टाहासास थोडीशी मुरड घातल्याखेरीज किंवा तो कांहीं काळ बाजूस ठेविल्याखेरीज शास्त्रीय समाजवादी नागरी बहुजनसमाजासाठीं कांहींहि विधायक कार्यक्रम करूं शकणार नाहीं. शहरांत जर तो कांहींच विधायक कार्यक्रम करूं शकला नाहीं तर खेडेगांवांत तर तो निरुपयोगीच ठरेल. ग्रामीण प्रश्नांत तर तो गोंधळूनच जाईल. ते प्रश्न इतके लहान आणि इतके स्थानविशिष्ट असतात कीं, त्याच्या विशाल जागतिक दृष्टीनें पहातां त्याला ते प्रश्न त्यास निरुपयोगी वाटतील, निदान कर्शाण तरी वाटतीलच. कदाचित् कित्येक युगांनंतरच असले सुधारणावादी प्रयत्न क्रांतीला पोषक अशी परिस्थिति उत्पन्न करूं शकतील असें त्याला आढळून येईल आणि तो कंटाळून आपलें कार्य सोडून देईल. येथें त्यांचें कार्य निदर्शनें घडविणें एवढेंच! हीं निदर्शनें ठराविक कालांतरानें होत राहणार. शेतीचा हंगाम येतांच त्याला असें आढळून येईल कीं, त्याचें क्रांतिविषयक प्रेम किंवा

वर्गभेदातीत अशा रामराज्याचें स्वप्न शेतकऱ्याला कळत नाहीं आणि शेतकऱ्यास त्याच्या नांगरापासून किंवा खुरप्यापासून ओढून आणतां येत नाहीं ! निदर्शनें हंगामी स्वरूपाचींच करावीं लागतील ! नाहीं तर त्यांचें महत्त्व नाहींसें होतें. ग्रामीण कामकरी एखाद्या निदर्शनासाठीं गोळा होतील, ५० हजारापर्यंत त्याचा जमाव होईल. तरी त्यांना दुपारीं ३ वाजण्याच्या आंत त्या सभेंतून परतलेंच पाहिजे. त्यांतले बहुतेक पायीं येतात. रात्र पडायच्या आंत त्यांना घरीं पोहोंचतां आलें पाहिजे. कोठल्याही खेड्यांत १०,००० लोकांची जेवणाखाणाची सोय एक दिवसही होऊं शकत नाहीं मग ५०,०००ची कोठून होणार ? हा जमाव अर्थातच अतिशय गोंधळाचा असणार ! कोठलेही विधायक कार्यक्रम करण्यास तो निरुपयोगी ठरणार. प्रचार आणि निदर्शन या दृष्टीनें त्याचें महत्त्व फारच किरकोळ असणार. त्यांना प्रज्वलित केलें तर क्रांतीचा देखावा उत्पन्न होऊं शकेल खरा परंतु शेतकऱ्यांचे असे प्रक्षोभ नेहमीं रक्तपातांत शांत झाले आहेत !

अर्थातच शास्त्रीय समाजवाद्याची शहरांत काय किंवा खेड्यांत काय भूमिका फक्त प्रचारकाची, निदर्शकाची आणि साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या प्रचारकाची रहाणार. यांपैकीं तत्त्वप्रसारक हें शेवटलें कार्य कांहीं थोड्या निवडक आणि हुशार लोकांनाच यशस्वी रीतीनें करतां येईल. तें सर्व कार्य सर्वसामान्य लोकांच्या हातीं दिलें, शहरांतील किंवा खेड्यांतील स्वयंसेवकांवर तें सोपविलें तर एका लोकभ्रमाच्या जागीं दुसरा लोकभ्रम आणि एका माथेफिरूपणाच्या ऐवजीं दुसरा माथेफिरूपणा निर्माण होण्यापलीकडे कांहीं घडणार नाहीं. शास्त्रीय समाजवाद्यांचें सर्व बोलणें अशा रीतीनें फोल ठरणार !

साम्यवाद्यांपैकीं सामान्य लोकांनीं मग काय करावें ? गांधीजींनीं आपल्या अशा सैनिकांचा हा प्रश्न सोडविला आहे. राजकीय कार्यक्षेत्रांत बेकार ठरलेल्यांना गांधीजींनीं काम पुरविलें आहे. त्यांच्या विधायक कार्यक्रमाचें क्षेत्र पुढाऱ्यांनाच नव्हे तर सामान्य अनुयायालाही वाव देणारें आहे. गरीब लोकांकडून स्वेच्छेनें मिळणाऱ्या पैशाच्या प्रमाणांत प्रत्येकास वेतनहि

मिळण्याची व्यवस्था त्या कार्यक्रमांत आहे. ते स्वच्छ, साधें आणि टापटिपीचें जीवन जगतात. त्यांना बेकार होण्याची वेळ कधींच येणार नाहीं.

सत्ता काबीज करण्यासाठींसुद्धां गांधीजींचा कडक कार्यक्रम इतर कोठल्याही 'लाल' क्रांतीइतकाच तत्त्वशुद्ध आहे, मात्र तो अहिंसात्मक आहे. आपण ज्या परिस्थितींत आहोंत त्या स्थितीच्या दृष्टीनें अहिंसेचें तत्त्वज्ञान किंवा त्याची व्यावहारिक उपयुक्तता काय आहे एवढाच विचार मला करावयाचा आहे. तिची व्यावहारिक किंमत तर समाजवादीयांच्या एका गटानें मान्यही केलीच आहे. हें किंवा तें तत्त्वज्ञान बरोबर आहे कीं चूक आहे हा येथें प्रश्न नाहीं. तो प्रश्न भावी इतिहासकार किंवा विद्वान् असा अवतारी पुरुषच सोडवूं शकेल. मी तसा कोणीहि नाहीं. असहकाराची नवी पद्धत प्रत्यक्ष लढ्याच्या स्वरूपाची आहे कीं नाहीं, पूर्वींच्या सुधारणावादी धोरणापेक्षां ती क्रांतिकारक आहे किंवा नाहीं हा खरा प्रश्न आहे. मला वाटतें तो प्रत्यक्ष लढा आहे आणि क्रांतिकारकही आहे. असहकार हा कांहीं लोक म्हणतात त्याप्रमाणें 'उघडा कट' आहे. मी म्हणेन कीं, तो अहिंसक असा उघडा कट आहे. अर्थातच शेवटीं असें म्हणावयास हरकत नाहीं कीं गांधीजींच्याजवळ जो कार्यक्रम आहे, तो सत्ता काबीज करण्याच्या बाबतींत क्रांतिकारक आहे आणि विधायक कार्यक्रमाच्या बाबतींत सुधारणावादी आहे.

पाश्चिमात्य राजकारणांत ज्यांना उजवा आणि डावा गट म्हणतात, ते पक्ष काँग्रेसच्या राजकारणांत गांधीजींच्या चळवळीच्या वरील दुहेरी स्वरूपामुळें निरर्थक ठरतात. ज्या राजनीतिज्ञांचा पक्ष उजवा आहे असें मानलें जातें, त्यांचें कार्य प्रत्यक्ष लढ्याच्या वेळीं चाललेल्या विधायक कार्यक्रमाच्या रूढिप्रिय दृष्टीकोनांतून पाहिलें कीं, ते डाव्या गटाचे ठरतात. जे तत्त्वतः डाव्या गटाचे आहेत ते प्रत्यक्ष लढा चालू असतांना, डाव्या गटाच्या प्रवृत्तीप्रमाणें वागत नाहींत असें कधीं आढळलें. ही गोष्ट १९३३ च्या पुणें परिषदेंत स्पष्ट दिसून आली. गांधीजींच्या अनुयायांचें मत १९३२ ची चळवळ पुढें चालवावी असें होतें; तर कित्येक समाजसत्तावाद्यांनीं चळवळ

तहकुब करावी असें सांगितलें आणि या त्यांच्या वृत्तीमुळेंच व गांधीजींच्या अनुयायांचें कॉंग्रेसमधील वजन किंवा त्यांच्याविषयींची लोकप्रीति हीं हिरावून घेण्याच्या प्रयत्नांत समाजवाद्यांस यश आलें नाहीं. त्यांत कसोटीस पूर्णपणें उतरलेले असे सिद्ध सैनिक आहेत. त्यांनीं विधायक कार्यक्रमांत आपलें कर्तृत्व सिद्ध केलें आहे. महापूर, दुष्काळ, भूकंप, किंवा लोकांवर कोसळलेल्या अनेक संकटांचे वेळीं आपली कर्तृत्वशक्ति त्यांनीं प्रगट केली असून वेळ आली तेव्हां सरकारशीं युद्ध करण्यांतही त्यांनीं माघार घेतली नाहीं. जेव्हां प्रत्यक्ष लढा चालू असतो तेव्हां त्या अनुयायांचे पुढारी, गांधीजी, अतिशय कडवे क्रांतिकारक ठरतात. स्वतःच्या जिवाची यत्किंचितही फिकिर नसल्याचें त्यांच्या वागण्यांत दिसून येतें. मला आणखी नांवें सांगतां येतील पण मी तीं सांगितलीं नाहींत तरी चालेल. चाणाक्ष वाचकानें स्वतःशीं विचार करावा म्हणजे झालें.

गांधीजी आणि त्यांचे अनुयायी यांना इतर गटांशीं असलेले संबंध तोडावयाचे नसतात हें सर्व विश्रुत आहे. मग ते गट राजकीय दृष्ट्या प्रत्यक्ष लढ्यापासून अगदीं दूर का असेनात! कोणत्याही पक्षाचे वा जातीचे, मवाळ, भांडवलदार, सुधारक या सर्वांना अस्पृश्यता, हिंदीप्रचार, खादी, ग्रामोद्योग, ग्रामपुनर्घटना या चळवळींशीं सहकार करण्यासाठीं आमंत्रण आहेच. इतर राजकीय आणि अर्ध राजकीय पक्षांशीं सहकार्य करण्यांत कॉंग्रेसच्या आणि गांधीजींच्या मनांत दुसराही एक उद्देश असतो. हिंदुस्थानांतील विरोधी पक्षांमध्येंही एक गोष्ट सर्वसाधारण अशी आहे: परकीय सरकारमुळें येणारा पंगूपणा आणि खुजेपणा सर्वांनाच भोगावा लागत आहे. तो कांहीं फक्त बहुजनसमाजालाच भोगावा लागतो असें नाहीं. तसें असतें तर सगळे पुढारी त्या वर्गांतूनच निर्माण झाले असते. शारीरिक दृष्ट्या बहुजनसमाजाला जास्त त्रास होतो हें खरें आहे परंतु जे जास्त हळवे असतात त्यांना जास्त त्रास होतो आणि असे लोक प्रत्येक वर्गांत, प्रत्येक जातींत असतात. त्यांचा देशाभिमान, संस्कृतीविषयींचाच नव्हे तर आपापल्या धर्माविषयींचा अभिमान दुखावला

जातो. राष्ट्रीय चळवळीनें या सर्व लोकांना एकत्रित करून त्यांची सर्व शक्ति एकाच पक्षावर आणि उद्दिष्टावर केंद्रित केली पाहिजे. तें उद्दिष्ट म्हणजे राष्ट्रीय, राजकीय स्वातंत्र्यसंपादन ! सध्यां राष्ट्रीयतेची भावना लोकांच्या मनांत रुजलेली आहे. तिचा जोम अद्याप कांहीं निघून गेलेला नाहीं. त्यामुळें निरनिराळ्या पक्षांतील लोक त्या भावनेभोवतीं गोळा करण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं आहे. रशियन समाजवादी देखील राष्ट्रीयतेच्या भावनेला मुकलेले नाहींत पण आपल्या ‘ होऊं घातलेल्या ’ समाजवादी मित्रांना मात्र आपल्या राष्ट्रीयतेच्या भावनेबद्दल लाज वाटते.

जगांत सर्वत्र चाललेल्या राष्ट्रीय आणि लोकशाही चळवळीवरून या निरनिराळ्या गटांना एकाच उद्दिष्टासाठीं एकत्र कसें आणण्यांत येतें हें दिसून येतें. आपल्यांतल्या अेरावांचें किंवा परकीय सत्तेचें जू मानेवरून फेकून देण्याकरितां हॉलंड, इंग्लंड, अमेरिका, इटली, फ्रान्स, इतकेच काय रशिया देखील संघटित होऊन उभा राहिला. परंतु बहुजनसमाजानें कष्ट, यातना आणि त्याग या बाबतींत पराकाष्ठा करूनही सत्ता मात्र त्याच्याच हातीं पूर्णपणें आली नाहीं हें मात्र खरें. पूर्वीच्या क्रांतींत ही सत्ता श्रीमंत सत्ताधारी मध्यम वर्गाच्या हातांत पडली. कारण ते त्यावेळीं बहुजनसमाजाचे पुढारी मानले जात. फ्रान्समध्यें ही राजाकडून आणि सरदाराकडून घेतलेली सत्ता बहुजनसमाजाच्या हातीं देण्याचे प्रयत्न झाले; परंतु लायकी, नेतृत्व आणि संघटना पुरेशी नसल्यामुळें तें साधलें नाहीं. रशियांतसुद्धां झारशाही उलथून पाडल्यावर सत्ता मध्यम वर्गाच्या हातीं आली. पण तो गट पुरेसा कार्यक्षम आणि संघटित नसल्यामुळें जास्त कार्यक्षम आणि धाडसी अशी अधिक चांगली संघटित बोल्शेव्हिक संघटना पुढें आली. आपल्याला काय पाहिजे याची त्यांना कल्पना असल्यामुळें ते दुसरी क्रांति घडवून आणूं शकले आणि स्वतः बहुजनसमाजाचे पालक बनले. परंतु ज्या पहिल्या क्रांतीनें झारशाही उलथून पाडली त्यावेळीं ते कांहीं स्वस्थ बसले नव्हते. इंग्लंडांत राष्ट्रीय संकटाच्या वेळीं काय होतें ? जेव्हां राष्ट्रावर कठीण प्रसंग येतो तेव्हां ब्रिटिश राष्ट्रांतील सर्व

राजकारणी मुत्सद्दी एकत्र येऊन राष्ट्रीय सरकार स्थापन करतात. तेवढ्या वेळापुरते तरी मतभेद विसरले जातात. प्रत्येक क्रांतीचे वेळीं पुरोगामी आणि वजनदार पक्ष एकत्र येऊन काम करतात. जो सर्वांत अधिक तयार, अधिक संघटित आणि ज्यांतून अधिक कार्यक्षम पुढारी निर्माण झाले असतील तो पक्ष विजयी होतो. कारण आणीबाणीच्या वेळीं पुष्कळसें कार्य पुढाऱ्यावरच अवलंबून असतें.

उलट असा विचार करूं या कीं, प्रत्येक गट दुसऱ्या गटाविषयीं साशंक असून त्याच्याशीं संबंध ठेवण्यास तयार नाहीं. समाजवादी पक्षाचें घ्या. तो म्हणतो कीं, जमीनदार आणि भांडवलवाले स्वातंत्र्याच्या लढ्यांत कधींच भाग घेत नाहींत. ते अगदीं शेवटच्या क्षणीं पटकन पळ काढतील. कारण त्यांना असें वाटतें कीं, त्यांचे हक्क फक्त परकीय सरकारच रक्षण करील. हें जर खरें असेल तर मध्यम वर्गांतील वरचे लोकही याच मार्गाचा अवलंब करतील. विद्वान्, वकील, अध्यापक, डॉक्टर इत्यादि व्यवसायिकांचेंहि तेंच होईल. खालचा मध्यम वर्ग हा नेहेमींच संशयित अवस्थेंत असतो, हें इटली व जर्मनी यांच्या उदाहरणावरून दिसून आलेंच आहे. शेतकरी आणि जमिनीचे मालक यांना जर समाजवादी कार्यक्रमाचा आणि जमिनीचें व इतर उत्पादन-सामुग्रीचें राष्ट्रीयकरण यांचा खरा अर्थ कळला तर ते सगळ्यांत मोठा अडथळा आणण्याचा प्रयत्न करतील. जातीयवादी लोक मग ते हिंदु असोत, मुसलमान असोत किंवा शीख असोत, सहकार करणार नाहींत. अशा रीतीनें पाहिलें तर जर प्रत्येक गट सुसंघटित, शिस्त पाळणारा आणि एक-ध्येयी असा असला आणि आपल्या स्वतःच्या गटाची प्रगति करणें एवढाच त्यांचा कूपमंडूकवृत्तीसारखा उद्देश असला तर हिंदुस्थानांतील बहुतेक लोकसंख्याच वगळावी लागेल ! जे काय उरतील ते अगदींच थोडे खंबीर लोक ! परंतु ते विजयी झालेच पाहिजेत. कारण लवकरच सर्व जग जिंकूं पाहणाऱ्या अशा खऱ्या कल्पनेचा आविष्कार तेच करीत असतात. आणि जवळजवळ धर्मवेड्या धर्मप्रसारकांच्या वृत्तीसारखी अशी

दुर्दम्य इच्छा आणि उत्साह ख्रिस्ताच्या, महंमदाच्या आणि गांधींच्या अनुयायांमध्यें आढळेल. परंतु केवळ भौतिक दृष्टीनें बघणाऱ्या शास्त्रीय समाजवाद्यांमध्येंहि जर त्याचा आविष्कार दिसून आला तर समाजवाद हा एक ईश्वरप्रणित धर्म आहे, असाच त्याचा अर्थ होईल. समाजवाद्यास त्याची स्वतःची लहर, उत्साह आणि सगळ्यांत विशेष म्हणजे स्वतःचा असा माथेफिरूपणाहि असूं शकेल. ग्रंथनिविष्ट तत्त्वांचा आधार घेऊन या सर्व म्हणण्याचा उपहास करतां येईल हें मला ठाऊक आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत असें दिसतें कीं, इतर कोठल्याही पंथापेक्षां तो अणुभरहि श्रेष्ठ नाहीं. त्याच्यांतही आकुंचितपणा, रूढिप्रियता, अंधश्रद्धा, आणि कांहीं निवडक लोकांचा उद्दामपणा गुप्त रूपानें वास करीत आहेच. स्वर्गाचें राज्य ते माणसास मिळवून देणार नाहींत. उलट श्रद्धाविहीनांना ते कायमचे नरकांत लोटणारे आहेत. असा पंथ, अधिक शास्त्रशुद्ध शस्त्रांनीं आणि चांगल्या संघटित बळाच्या जोरावर, जुन्या पंथाप्रमाणेंच किंबहुना मानवी जीवनाविषयीं कमी आस्था असल्यामुळें, जुन्या पंथापेक्षांहि क्रूरपणें मानवी जीवन गाडून टाकील. गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा या साधनांतील संरक्षक औदार्य या पंथांत नाहीं. जर नवीन पंथ उत्पन्न व्हावयाचेच असतील तर ते निदान अहिंसक तरी असणें मानवतेच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

गांधींच्या राजकीय आणि सामाजिक पुनर्घटनेच्या योजनेचे गुण मी समाजवादी योजनेशीं तुलना करून दाखविले आहेत. मीं कांहीं अहिंसेची तत्त्वप्रणाली किंवा गांधीजींच्या कार्यक्रमाचे दूरगामी परिणाम यांची चर्चा केलेली नाहीं. कारण ती ह्या सध्यांच्या चर्चेच्या दृष्टीनें अप्रस्तुत ठरेल.

## ३ कॉंग्रेस आणि समाजसत्तावाद

आमचे प्रतिस्पर्धी आम्हांला असें सांगतात कीं, जगास सतावून सोडविणारे प्रश्न समजावून घेऊन ते सोडविणारी जी अर्थशास्त्रीय मत-

प्रणाली तिलाच समाजसत्तावाद म्हणतात. ही गोष्ट एखाद्या शाळेंतल्या मुलासहि माहीत असली पाहिजे. शाळेंत जागारीं मुलें सरळ वाटणाऱ्या ह्या शब्दांचे खोल अर्थ न समजतां व्याख्या पाठ करतात. त्या व्याख्येचे दोन अर्थ संभवनीय आहेतः—( १ ) आपल्या ह्या चिमुकल्या जगांत जे जे प्रश्न उद्भवतात ते सर्व आर्थिक आहेत आणि आर्थिक संबंधांतून ते उद्भवतात. ( २ ) कांहीं असेही प्रश्न आहेत कीं, जे आर्थिक परिस्थितीमुळें उत्पन्न होतात परंतु पुढें पुढें ते आर्थिक संबंधांपासून दूरावत जातात; मग त्या प्रश्नांचीं उत्तरें केवळ आर्थिक स्वरूपांचीं राहात नाहींत. तीं इतरत्र शोधावीं लागतात. वरील व्याख्येच्या या दोन अर्थांपैकीं कोणता तरी एक खरा असला पाहिजे.

पहिल्या अर्थाप्रमाणें मनुष्याचे एकमेकांशीं असणारे सर्व संबंध प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें समाजाच्या आर्थिक घटनेवर आधारलेले असतात. भौतिक, बौद्धिक, नैतिक आणि कलात्मक अशीं सर्व मूल्यें देखील आर्थिक तत्त्वावर ठरविलीं जातात. असें जर असेल तर समाजसत्तावाद हा केवळ आर्थिक तत्त्वप्रणालीच्या स्वरूपाचा न राहतां संबंध जीवनाशीं संबद्ध असे मानासिक विचार आणि कार्य यांचा विचार करणारें तें एक स्वतंत्र तत्त्वज्ञान ठरेल. आणि मग आजपर्यंत मनुष्यानें मानलेलीं सर्व मूलभूत मूल्यें बदलून नवें मूल्यमापन करण्याची तयारी करावी लागेल.

दुसऱ्या अर्थानें पाहिलें तर जर सर्व प्रश्न सर्वथा आर्थिक नसतील तर समाजसत्तावाद हा केवळ अर्थशास्त्रीय सिद्धांत ठरतो. मानवी जीवनाच्या एका भागाशींच त्याचा संबंध येतो—तो भाग महत्त्वाचा आणि इतर कार्यक्षेत्रांवर परिणाम करणाराहि असेल कदाचित् ! मानवी जीवनाचें तत्त्वज्ञान म्हणून तो संबोधला जाऊं शकणार नाहीं किंवा सर्व जागतिक प्रश्नांचीं उत्तरें त्यामुळें कळणार नाहींत. तशा परिस्थितींत मूलभूत मूल्यें बदलण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. आपोआप क्रांति-तत्त्वाप्रमाणें तीं बदलतील. त्या मूल्यांत विशेष फरक होण्याचें कारण नाहीं.

खरी विचक्षणा करूं पाहणारा साहाजिकच असें विचारील कीं, वरील

दोन अर्थांपैकीं एखाद्या विशिष्ट समाजसत्तावाद्याला कोणता मान्य आहे? विचारांचा खुलासा होऊन कृतीस शास्त्रशुद्धता येण्यासाठीं हें कळणें आवश्यक आहे. हें जर स्पष्ट झालें नाहीं तर गोंधळ होण्याचा संभव आहे. त्यामुळें एकाच्या समाजसत्तावादाचा दुसऱ्या एखाद्या प्रकाराशीं गोंधळ झाला तर समाजसत्तावाद्यांस त्याबद्दल तक्रार करतां येणार नाहीं.

जर एखादी तत्त्वप्रणाली "कांहीं" हें विशेषण न लावतां जगांतील सर्व प्रश्न सोडविण्याची मनीषा बाळगीत असेल किंवा तिचें उद्दिष्ट "समाजाची पुनर्रचना" करण्याचें असेल; जर तिचा दृष्टिकोण मार्क्सवादी असेल, ती स्वतःला "शास्त्रशुद्ध" समजत असेल, तर ज्याला पूर्णपणें आर्थिक मूल्यें म्हणतात तींच नव्हेत तर सर्व मूल्यें आणि जीवनच पुनर्घटनेसाठीं रूढ अर्थानें मुशींत वितळविलें जात आहे असें म्हणावें लागेल. संपूर्ण मानवी जीवनाची फेरतपासणी होत असून एक नवीन पृथ्वी आणि तीवर (ऐतिहासिक भविष्यकालांत) नवीन स्वर्ग उत्पन्न होण्याची तयारी चालू आहे असा याचा अर्थ होईल. बोल्शेव्हिक आणि त्यांचे पुरस्कर्ते अगदीं हेंच म्हणतात. त्यांनीं मानवी विचारांचें आणि कार्याचें प्रत्येक क्षेत्र संपूर्णपणें बदलून टाकलें आहे. वैयक्तिक आणि कौटुंबिक संबंध, मुलांचें पालन, पोषण, वर्धन, शिक्षण, कला, विज्ञान, वाङ्मय, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक कल्पना आणि संबंध, सगळें कांहीं त्यांनीं बदलून टाकलें आहे. जुन्या पद्धतीचीच नव्हे तर जुन्या मूल्यांचीही उलथापालथ होत आहे. नवीन छापाचें मानसशास्त्र असलेलें मानवी मन अजून तयार झालें नसलें तरी होण्याच्या मार्गावर आहे.

हें शास्त्रशुद्ध समाजसत्तावादाचें म्हणणें सर्व जर खरें असेल तर ज्या थोड्या लोकांचा जुन्या मूल्यांवरील विश्वास अजून संपूर्णपणें नष्ट झालेला नाहीं ते भीतिग्रस्त व्हावेत यांत कांहींच आश्चर्य नाहीं. नुसता समाजसत्तावाद हा शब्द ऐकल्याबरोबर ते घाबरून जातात असें नाहीं. तर समाजसत्तावाद आणि त्याचा एक विवक्षित प्रकार राष्ट्रासमोर नेहमीं ठेवला

जाऊन, मानवी जीवनाशीं संबद्ध असणारे सर्व प्रश्न सोडविण्यास तोच समर्थ आहे असा जो तीव्र प्रचार केला जातो त्याच्या सामर्थ्याची त्यांना भीति वाटते. यापुढेंही जाऊन असें सांगितलें जातें कीं, ऐतिहासिक दृष्ट्या समाजसत्तावाद अवलंबणें आतां आवश्यक झालें असून ज्यांना त्याची आवश्यकता आणि तांतडी भासत नाहीं ते पुराणमतवादी आणि प्रगतिपराङ्मुख आहेत.

जे लोक हिंदुस्थानांत किंवा इतरत्र समाजसत्तावादाला विरोध करतात त्यांपैकीं बहुतेक सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या प्रतिगामी आहेत यांत संशय नाहीं. परंतु ते जाणून बुजून किंवा न जाणतां, असे राखीव हित-संबंधांचे पगारी किंवा फुकटे हस्तक आहेत. ते समाजसत्तावादाच्याच नव्हे तर सगळ्याच सुधारणांच्या विरुद्ध आहेत. ज्यांची नागवण झाली आहे त्यांना थोडासाहि न्याय मिळविण्याच्या कार्यास ते विरोध करीत असतात.

परंतु या हितकाराच्या दोन गटांचा गोंधळ करणें म्हणजे प्रतिगामी आणि प्रागतिक यांचा गोंधळ करण्यासारखें आहे. ह्या गोंधळामुळें जे न्याय आणि स्वातंत्र्य यांसाठीं लढत आहेत त्यांचीही किंमत विनाकारण कमी होईल. राष्ट्रीय लढ्यांत अशा वृत्तीनें परकीय सरकार मात्र अधिक प्रबळ होईल आणि देशांतील साम्राज्यविरोधी सामर्थ्याचें संकलन होऊं शकणार नाहीं. परिणामकारी राष्ट्रीय संघटना आणि कार्य चालू रहाण्यासाठीं साम्राज्यवाद आणि भांडवलशाही यांच्यांत फरक केला आहे हें गृहीतच धरलें आहे. कारण जर तसा फरक केला नाहीं तर "सामान्य आघाडी" "सर्व साम्राज्यविरोधी शक्तींची एकजूट" "आमचें सर्वांत महत्त्वाचें आणि प्राथमिक उद्दिष्ट राजकीय स्वातंत्र्य हेंच आहे" या शब्दांना कांहीं अर्थच राहणार नाहीं. राष्ट्रीय लढा हा वर्गयुद्धांत गडप होईल. एका बाजूस हिंदुस्थानांतील दलित वर्ग आणि दुसऱ्या बाजूस ब्रिटिश राष्ट्र आणि हिंदुस्थानांतील उरलेले सर्व वर्ग कीं जे दलित वर्गीयही नाहीत आणि वर्गातीतही

नाहींत आणि असें असतांही परकीय जूं झुगारून देण्याच्या प्रयत्नांत जे त्याग करूं इच्छितात आणि दलित वर्गाला न्याय मिळावा अशी इच्छा ठेव-तात असे वर्ग पडतील. समाजसत्तावादी मित्र हा महत्त्वाचा आणि आव-श्यक फरक फार वेळां विसरतात. शब्दांत जरी त्यांनीं तो मान्य केला तरी व्यवहारांत आणि प्रत्यक्ष कार्याचे वेळीं विसरतात. त्यांच्यापैकीं कांहींनीं कॉंग्रेसच्या घटनेला दुरुस्त्या सुचविल्या आहेत. कॉंग्रेसचें समाजसत्ता हेंच उद्दिष्ट आहे अशा घोषणा ते करीत आहेत.

हा मुद्दा एवढ्याचसाठीं स्पष्ट करावयास हवा. स्वतःला समाजवादी म्हणविणारे आणि समाजवादी नसलेले अशा दोन्ही प्रकारच्या कॉंग्रेस-भक्तांसाठीं तो स्पष्ट केला पाहिजे. विशेषतः समाजवाद्यांच्या हितासाठीं तो विशद करून सांगितलाच पाहिजे कारण ते साम्राज्यशाही आणि भांड-वलशाही यांना समानार्थीं संबोधतात आणि वर्गयुद्ध, वर्गकलह आणि राष्ट्रीय लढा यांची एकत्र गल्लत करून टाकतात. हिंदुस्थानांतील प्रत्येक हिंदी माणूस रंगामुळें आणि राष्ट्रीयत्वामुळें गुलाम बनला आहे, मग तो राजपुत्र असो अथवा भिकारी, जमीनदार वा खंडकरी, भांडवल-दार वा कामगार, यापैकीं कोणीहि असो. देश स्वतंत्र करण्यासाठीं जे लढत आहेत तेच फक्त स्वतंत्र आहेत.

“ हीं तत्त्वें कांहीं प्रमाणांत अत्यंत कळकळीचे समाजवादी मान्य करतात कारण आज आपल्याला राजकीय स्वातंत्र्य ही सर्वांत पहिली आवश्यक गोष्ट आहे. आणि बाकी सर्व तद्नंतर हेंही त्यांना कबूल आहे.” पण खेदाची गोष्ट एवढीच कीं, फक्त तात्त्विक दृष्ट्या तो हें मानतो. प्रत्यक्ष व्यवहारांत “ह्या सर्वसामान्य उद्दिष्टा-कडेहि पहाण्याचा दृष्टिकोन मात्र असा नसतो.” अर्थातच व्यावहारिक अडचणी उभ्या राहणारच आणि त्या राहतातही. ह्या अडचणींचें निराकरण करण्याचा अथवा त्यांचा परिणाम कमी तीव्र करण्याचा कांहीं उपाय शोधल्याखेरीज आपलें कार्य परिणामकारी होणार नाहीं आणि आपला सारा वेळ लोकांचे विचार आणि कार्य यांचेवर टीका करण्यांत जाईल.

प्रत्यक्ष उद्भवणाऱ्या अडचणी दूर करण्याचे फक्त दोन उपाय दिसतात. एक उपाय असा कीं, जें मूलतः महत्त्वाचें आहे त्याला मुख्य स्थान दिलें पाहिजे आणि जें गौण आहे त्याच्यावर जास्त भर देतां कामा नये. सारा भर सर्वसाधारणतः मान्य अशाच गोष्टीवर दिला पाहिजे. दुसरा उपाय म्हणजे एकमेकांशीं सहकार करून, करतां येण्यासारख्या विधायक गोष्टी शोधून काढल्या पाहिजेत किंवा उत्पन्न केल्या पाहिजेत. जर आपल्याला राजकीय स्वातंत्र्य कांहीं निश्चित काळांत मिळवावयाचें असेल तर यापेक्षां तिसरा उपाय दिसत नाहीं. आणि या दोनपैकीं एकाचा तरी अवलंब न केल्यास आपलें कार्य अर्धवट राहील. एवढेंच नव्हे तर ज्यासाठीं आपण विभक्तही व्हावयास तयार असतों तें सामाजिक आणि राजकीय उद्दिष्टही दूरावेल! दोन पक्षांचे कार्यक्रम जर निरानिराळी तत्त्वप्रणाली निर्माण करण्यासाठींच असतील तर त्यांच्यांत वितुष्ट येणारच. ह्या विभक्तीकरणाचा उपयोग देशाला फायदा करून देण्यांत होतो कीं नाहीं हें गतकालांतील उदाहरणांवरून ठरवितां येणार नाहीं. गतकालीन उदाहरणें त्या त्या वेळच्या परिस्थितीशीं इतकीं निगडित आहेत कीं, त्यांच्यावरून बसविलेला सामान्य नियम आपणास भलतीकडे नेईल. राजकारणांत घाईनें करविलेला वा चुकीचा सर्वसामान्य नियम फारच मोठा धक्का देऊं शकेल, तो कष्टांस कारण होईल आणि हजारोंचा त्यामुळें नाश होईल. आपल्या अंतिम ध्येयाच्या मार्गांत तो कदाचित् आडवा येणार नाहीं, पण आपल्या प्रगतीला मात्र त्यामुळें भयंकर आघात बसेल.

१९०८ सालीं राष्ट्रवाद्यांनीं आपले, मवाळ आणि जहाल असे जे दोन पक्ष केले, ते त्यांना स्वतःला किंवा देशाला अतिशय हितकारक ठरले असें म्हणणें धाडसाचें होईल. मवाळांची कर्तृत्वशक्ति त्यावेळीं निरुपयोगी ठरली. राजकीय क्षेत्रांत विरोध करणाऱ्यांचा सरकारनें पाठपुरावा केल्यामुळें जहालांचीहि गळचेपी झाली व संबंध राष्ट्र विस्कळित झालें. त्या अवेळीं झालेल्या फुटीमुळें एकाच पक्षाचा फायदा झाला. तो पक्ष म्हणजे नोकरशाही. होमरूल चळवळीच्या वेळीं किंवा सत्याग्रहाच्या

चळवळीच्या सुरुवातीला जे पक्षभेद झाले त्यापेक्षां आज असे भेद माजले तर नोकरशाहीचा फायदा होण्याचा जास्त संभव आहे. राष्ट्रीय गटांना विभक्त करणारे असे मुद्दे उपस्थित करण्यापूर्वी वेळ, स्थळ, परिस्थिति, आपली शक्ति आणि शत्रूचें सामर्थ्य यांचा विचार अगोदर केला पाहिजे. कॉंग्रेसमधील उजवा आणि डावा म्हणविल्या जाणाऱ्या गटांना विभक्त होण्याची वेळ येणार नाहीं अशी आम्हांला आशा आहे. पण जर ती आलीच तर आणि ती जेव्हां येईल तेव्हां विभक्तीकरण घडवून आणण्यापूर्वी सामर्थ्य आणि परिस्थिति आणि एकंदर देशाची स्थिति इत्यादि सर्व मुद्यांचा पूर्ण विचार होईल. जर विरोधी पक्षांना असें आढळून आलें कीं, एकमेकांशिवाय आपलें चालणें शक्य नाहीं आणि त्यांची आणि देशाची शक्ति त्यांच्या एकींतच आहे तर त्यांनीं तावडतोब निर्णय घेऊन असा कार्यक्रम आंखला पाहिजे कीं, ज्यामुळें भांडणतंटा, बखेडा यांचे प्रसंग कमींत कमी उद्भवतील. वृत्ति आणि तत्त्व-प्रणाली यामुळें उत्पन्न होणारे स्वाभाविक आणि अपरिहार्य भेद दूर करण्याचे सर्व प्रयत्न केले पाहिजेत. याहून दुसरा कोणताहि मार्ग राजकीय आत्मघातास आणि प्रलयास कारणीभूत होईल.

" आपण हिंदुस्थानचें स्वातंत्र्य या राजकीय उद्दिष्टावर केंद्रित झालें पाहिजे. तें आपल्या दृष्टीनें आद्य आणि प्रधान महत्त्वाचें कार्य आहे. तें उद्दिष्ट दृष्टिआड करूं पाहणारी कोठलीहि तत्त्वप्रणालि अहितकारक आहे आणि तिला उत्तेजन दिलें जातां कामा नये. ... मग ही समाजसत्तावादाची भाषा कशाला ? ... समाजसत्तावादी दृष्टि राजकीय लढ्याला मदत करते. त्या स्वातंत्र्याच्या खऱ्या सामाजिक स्वरूपाखेरीज राजकीय स्वरूपाचीहि स्पष्ट कल्पना समाजवादामुळें येते.—"

स्वातंत्र्याचें राजकीय स्वरूप समाजवादानें आपणांस कळतें हें खरें; परंतु ही दृष्टि म्हणजेच समाजसत्तावाद नव्हे, हें येथें सांगावेंसें वाटतें. सर्व प्रश्न सोडविण्याची हमी ती घेत नाहीं. तिच्यावर समाजसत्तावादाचा बराच परिणाम झाला आहे, परंतु शास्त्रशुद्ध समाजवाद किंवा

मार्क्सवाद असें त्या दृष्टीस म्हणतां येणार नाहीं. तिची चालना मार्क्स आणि त्याचे अनुयायी यांचेकडून झाली असणें शक्य आहे, ती शास्त्रशुद्ध समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र यांवर आधारलेलीहि असेल. परंतु ती म्हणजे कोठल्याहि प्रकारचा समाजवाद नव्हे. ती सुधारणावादी आहे. एखाद्या व्यक्तीचें अथवा गटाचें संपूर्ण आयुष्य नियंत्रित करण्याचा तिचा हेका नाहीं. वैयक्तिक आर्थिक संबंधांना ती एक निराळाच मार्ग दाखविते आणि म्हणून कित्येक पुराणमतवादी गटांनीं आणि शासनसत्तांनीं तिचा अवलंब केला आहे. जर ही दृष्टि येणें एवढीच खरी आवश्यकता असेल तर कॉंग्रेसचें धोरण आणि कार्यक्रम या दोन्हींच्या बुडाशीं ती आहे असें मी सुचवूं इच्छितों. त्याला पुरावा म्हणजे गोलमेज परिषदेपुढें गांधीजींनीं केलेल्या भाषणाचा समारोप पहा† किंवा १९२९ च्या उन्हाळ्यांत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें मुंबईस केलेला ठराव वाचा.*

† " कॉंग्रेस ही ७ लक्ष खेड्यांतून रहाणाऱ्या कोट्यवधि अर्धपोटीं मूक जनतेची खरी प्रातिनिधिक आहे. मग ती जनता ब्रिटिश हिंदुस्थानांतील असो अगर हिंदी हिंदुस्थानांतील असो. ज्या ज्या गोष्टींना संरक्षण द्यावें असें कॉंग्रेसला वाटतें त्यांनीं या लाखों लोकांचेच हितसंबंध साधावयाचे आहेत. आणि म्हणूनच तुम्हांला ह्या हितसंबंधांत वारंवार खटका उडालेला दिसतो. जर असा खरा खुरा विरोध निर्माण झाला तर कॉंग्रेस ह्या लाखों मूक जनतेचेच हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठीं इतर वाटेल त्या हितसंबंधांवर पाणी सोडील असें कॉंग्रेसच्या वतीनें सांगण्यांत मला मुळींच दिक्कत वाटत नाहीं. "

* " या कमिटीच्या मतें हिंदवासीयांतील अत्यंत यातना आणि गरीबी या गोष्टीस फक्त परकीय सत्तेची पिळवणूकच नव्हे तर समाजाची आर्थिक रचनाहि जबाबदार आहे. ही पिळणूक चालू राहण्यासाठीं परकीय सरकार अशा समाजरचनेचाच पुरस्कार करीत आहे. म्हणून ही गरीबी आणि यातना दूर करण्यासाठीं आणि हिंदी बहुजनसमाजाची

" जर सर्वसामान्य धोरण आणि दृष्टि यांत योग्य सुधारणा थोडेसे समाजसत्तावादी करूं शकतात, तर मग कॉंग्रेसच्या मनांत असलेल्या अर्थापेक्षां अधिक अर्थ असलेले शब्द मध्यें आणून आणखी घोटाळा उडविण्यांत काय अर्थ आहे ? जे अजून समाजसत्तावादाकडे धडाडीनें वळले नाहींत किंवा त्याचे कट्टर अनुयायी बनलेले नाहींत अशा मित्रांना आणि सहकाऱ्यांना उगीच दुःखित करण्यांत काय हंशील आहे ? आपल्याला दडपण्यासाठीं आपआपल्याच भाषेचा उपयोग करूं पहाणाऱ्या शत्रूच्या हातांत कोलीत देण्याचा हा उपद्व्याप कशाला ?

१९२९ चा ठराव फक्त " असाधारण विषमता नाहींशी करूं शकणारे असे सामाजिक आणि आर्थिक परिस्थितींतील क्रांतिकारक बदल " या विषयीं आहे. हा ठराव मंजूर केल्यानें कॉंग्रेस समाजसत्तावादी झाली असें म्हणणें चुकीचें आहे. परंतु तसें जर असेल तर समाजसत्तावाद हा कांहीं निराळ्याच तत्त्वांचा बनलेला असला पाहिजे. हाच समाजसत्तावाद आपल्या पुढाऱ्यांमध्यें फूट पाडील आणि ज्या राजकीय मुद्यांवरील सर्व लक्ष केंद्रीभूत करण्यासाठीं गांधीजी आणि कॉंग्रेस यांचे प्रयत्न चालूं आहेत, त्याला बाध आणण्यास कारणीभूत होईल. समाजसत्तावादाची किंमत ठरविण्याचा येथें हेतु नाहीं. याचा अर्थ एवढाच कीं, कॉंग्रेसनें समाजसत्तावादाच्या कांहीं चांगल्या सूचनांचाच तात्पुरता अंतर्भाव आपल्या कार्यक्रमांत केला असेल, पण तिला समाजसत्तावादाशीं कांहींच कर्तव्य नाहीं. तिचा मुख्य प्रयत्न आणि म्हणून सारी भिस्त राजकीय प्रश्नावर आहे. आर्थिक सुधारणेकडे तिनें दुर्लक्ष केलेलें नाहीं. परंतु आर्थिक जीवन नियंत्रित करणारीं समाजसत्तावादी तत्त्वें तिनें स्वीकारलेलीं नाहींत. राजकीय लढा संपल्यानंतर आणि तो जिंकल्यानंतर

---

स्थिति सुधारण्यासाठीं समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक रचनेमध्यें क्रांतिकारक फेरबदल करून समाजांतील भीषण विषमता नष्ट करणें आवश्यक आहे."

पुढें काय करावयाचें त्याचीही योजना कॉंग्रेसनें सुचविली आहे. ती योजना म्हणजेच—घटना परिषद्.

"आपण बहुजन-समाजाचें प्रातिनिधित्व स्वीकारलें पाहिजे आणि आपला लढाही बहुजन-समाजाच्या वतीनें झाला पाहिजे या गोष्टीवर समाजसत्तावादी दृष्टि भर देते. (आणि यावरच कॉंग्रेसनें गेलीं १५ वर्षे निरनिराळ्या प्रमाणांत भर दिला आहे.)" जर हें उद्दिष्ट असेल तर कॉंग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांनीं तरी कॉंग्रेसच्या ठरावांतील शब्द सुस्पष्ट असतांना गेल्या १५ वर्षांत मंजूर केलेल्या ठरावांतील शब्दांचाच उपयोग करून कॉंग्रेसचें ध्येय काय यावर भर दिलेला चांगला नाहीं काय? जे शब्द आणि शब्दसमुच्चय शाळकरी मुलांनाच काय पण कांहीं मुरलेल्या कॉंग्रेस पुढाऱ्यांनाही समजत नाहींत त्यांचा उगाच कां उपयोग करावयाचा? राष्ट्रांतील साम्राज्यविरोधी अशी सर्व शक्ति एकत्रित करण्याचा हा मार्ग नाहीं.

"स्वराज्य शब्दाची व्याख्या केली जावी असें गेलीं कांहीं वर्षे डॉ. भगवानदास विशेष आग्रहानें म्हणत आहेत. माझा कांहीं बाबतींत त्यांच्याशीं मतभेद आहे. परंतु कोणत्या प्रकारचें स्वराज्य आपल्याला पाहिजे हें स्थूल स्वरूपांत कां होईना सूचित न करतां स्वराज्याबाबत आपण मोघमपणें कांहीं तरी बोलत राहणें योग्य नाहीं. या बाबतींत त्यांच्याशीं माझें मतैक्य आहे." अर्थात् दोन मोठ्या माणसांच्या स्वराज्याच्या व्याख्येंत मतभेद आहे हें उघड आहे. आपल्या लढ्याच्या क्षणीं एखादी व्याख्या कांटेकोरपणें तयार करण्यामुळें अत्यंत अस्पष्ट भविष्यकालांविषयींच्या आपल्याला अनावश्यक, अहितकारी आणि फसव्या अशा तात्त्विक चर्चेमध्यें आपण गुंगून जाण्याचा संभव नाहीं का? १९२० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळीं डॉ. भगवानदासांनीं हा प्रश्न उपस्थित केला. जर त्या वेळीं तेथें एक सर्वसामान्य चर्चा झाली असती तर पंडित जवाहरलाल नेहरू आणि भगवानदास यांच्यासारखे या लढ्यांत प्रत्यक्ष भाग घेणारे जे आहेत त्यांच्यांतच मतभेद झाले असते

असें नव्हे, तर जे या लढ्यांत त्या दोघांच्या मानानें बेताबातानेंच वावरतात असे लोकही मुख्य प्रश्न न कळतांच या मतभेदाच्या आखाड्यांत उतरले असते आणि मग सविनय कायदेभंगाची चळवळ थांबून राहिली असती. माझ्या समजुतीप्रमाणें अशाच कांहींशा विचारानें गांधीजी आणि जवाहरलाल वगैरे इतर प्रमुख पुढाऱ्यांनीं डॉ. भगवानदासांच्या प्रशंसनीय आग्रहास दुजोरा दिला नाहीं. माझ्या समजुतीप्रमाणें स्वराज्याची एक ठोकळ कल्पनाच काय ती आपण चालू परिस्थितींत मांडूं शकतों आणि कॉंग्रेसनें तशी ती वारंवार मांडली आहे असें मी खात्रीपूर्वक म्हणतों आणि हें म्हणणें सर्वमान्यही आहे. गेल्या लढ्यानंतर कॉंग्रेसला कायदेशीरपणा प्राप्त झाल्यावर १९३४ मध्यें "पूर्ण स्वराज्य" मिळविण्याच्या ठरावाची पुनर्घोषणा झाली. त्यावेळीं वर्किंग कमिटीनें असें नमूद केलें कीं, कॉंग्रेसनें बहुजनसमाजाचें प्रतिनिधित्व आणि सेवा करण्यांत पुरोगामित्व दाखविलें नाहीं तर ती असून नसल्यासारखीच आहे. ठोकळ मानानें म्हणावयाचें तर संपूर्ण स्वराज्याची व्याख्या सुस्पष्ट आणि अचूक शब्दांत वरप्रमाणें मांडली गेली आहे.

"मूलभूत हक्क आणि आर्थिक योजना" या विषयींचा कॉंग्रेसच्या सुविख्यात कराचीठरावापेक्षां समाजसत्तावाद हा शब्द तरी कमी संदिग्ध आहे का ? या ठरावाच्याबद्दल आपल्या कांहीं मित्रांच्या हौशीप्रमाणें समाजसत्तावाद हा अधिक व्यापक शब्द घातला तरी वाद चालूच राहील. कोणत्या प्रकारचा समाजसत्तावाद ? समाजवादाच्या मार्क्सवादी प्रकारांतही बारीकसारीक भेद आहेत. प्रत्येक स्वयंभू सनातनी मार्क्सवादी विरोधी मार्क्सवादास मध्यमवर्गीय, प्रतिगामी आणि क्रांतिविरोधी म्हणतो. त्यांतील शब्द, वाक्यप्रयोग बदलतील पण वाद मात्र चालूच राहील, असें मला वाटतें. कॉंग्रेसच्या स्वराज्याची अधिक स्पष्ट आणि अधिक नक्की व्याख्या व्हावी अशी मागणी नेहमींच राहील. तुम्ही "पूर्ण स्वराज्य" म्हणा म्हणजे लोक म्हणतील ब्रिटिश संबंधांचें उच्चाटन असें कां म्हणत नाहीं ? तुम्ही ब्रिटिश संबंधांचें उच्चाटन म्हणा म्हणजे लोक म्हणतील

इंग्लंडशीं शत्रुत्व असें कां म्हणत नाहीं ? तुम्हीं तसें म्हणा कीं, लोक म्हणतील आपण इंग्लंडवर, त्यांनीं जितका काळ आपणांवर राज्य केलें आणि आपला छळ केला तितका काळपर्यंत राज्य करूं या आणि त्यांची पिळणूक करूं या. विशेषतः हें असें कधींच संपावयाचेंच नाहीं. आपण हिंदु लोक सत्य आाणि ज्ञान यांच्याविषयीं केवळ अनुमानें करण्यांत विशेष प्रख्यात आहोंत. तेव्हां आपल्या बाबतींत हे वादंग विशेषच माजावयाचे.

मार्क्सचा मोठेपणा किंवा सामाजिक घटनांच्या संशोधनांत इतिहासाकडे पहाण्याची त्याची दृष्टि यांबद्दल कोणी शंका घेऊं शकणार नाहीं त्यानें काढलेले निष्कर्ष मानले नाहींत तरी त्याचें वैयक्तिक जीवन आणि जीवनकार्य याबद्दल आपण त्यास धन्यवाद द्यावयास पाहिजेत. शास्त्र ही सत्याचें अन्वेषण करण्यासाठीं उपयोगांत आणलेली रीति आहे, तशीच ती निष्कर्ष आणि अनुमान काढण्याचीहि रीति आहे. संशोधनाची एखादी रीत किंवा मार्ग बरोबर आहे असें कबूल केलें तरी एखाद्या संशोधकानें काढलेलीं अनुमानें मान्य होतीलच असें नाहीं. भौतिक शास्त्रांच्या बाबतींत हें खरें आहे. पण सामाजिक शास्त्रांविषयीं तर हें त्याहून खरें आहेच. कारण तेथें संशोधनाचें क्षेत्र अतिशय प्रचंड असून प्रयोग करण्यासाठीं, आपले प्रयोग वारंवार आणि वाटेल त्या प्रमाणावर करण्याची शक्यता नसते. शिवाय प्रयोगास अडथळा आणणारीं आणि खास अशीं कारणें तेथें असंख्य असतात. न्यूटन आणि एडिसन या दोघांनींही एकच शास्त्रीय पद्धत अवलंबिली. पण त्यांचे दोघांचेही निष्कर्ष किती निराळे आहेत ! पण यामुळें ती पद्धत चुकीची ठरत नाहीं. काल, परिस्थिति आणि मानवी ज्ञान यांचीं प्रयोग करणारावर किती बंधनें असतात तेंच यामुळें स्पष्ट होतें. प्रत्यक्ष शास्त्रांची जर ही गत तर सामाजिक शास्त्रांतल्या स्वतंत्रपणें वावरणाऱ्या मानवांवरील प्रयोगांच्या बाबतींत तर हें किती तरी जास्त प्रमाणांत संभवनीय असणार !

गतकालांतील कित्येक भविष्यवादी आणि सुधारक यांनीं आपा-

पल्या पिढीच्या विचारांत विलक्षण क्रांतिकारक भर घातली. ज्या कांहीं महत्त्वाच्या तत्त्वांबद्दल त्यांना अथवा त्यांच्या अनुयायांना यत्किंचितही शंका नव्हती आणि ज्यांच्या संरक्षणासाठीं ते दुसऱ्यांच्या माना कापण्यास तयार झाले होते; इतकेंच नव्हे तर सत्याच्या सेवेंत स्वतःचा बळी द्यावयास उभे ठाकले होते, तीं त्यांचीं तत्त्वें आतां सर्व मनुष्यजातीनेंच नव्हे तर पुढें येणाऱ्या लोकांकडूनही अत्यंत बदललेल्या स्वरूपांत मान्य केलीं जातात, यांत त्या मूळ प्रवर्तकांना कमीपणा आला असें होत नाहीं. मार्क्स आणि लेनिन यांच्या मोठेपणाची योग्य ती कदर करण्यासाठीं त्यांच्या सर्व अपूर्ण निष्कर्षांनाही विचारवंतांनीं मान्यता दिली पाहिजे असें नाहीं. आपण त्यांचें मत न स्वीकारतांहि त्यांच्याविषयीं आदर बाळगूं शकूं. ज्ञान आणि संशोधन यांचें क्षेत्र आजच एकदम संपुष्टांत आलें आहे असें नाहीं. प्रत्येक नवीन संशोधनामुळें हें क्षेत्र अधिकाधिक व्यापक होत जात आहे. हेकेखोरपणा जितका धर्मांत वाईट, तितकाच तो राजकारणांतही वाईट. विशेषतः राजकारणांत फारच त्याज्य. कारण धर्म कांहीं वेळां तरी मानवता आणि आत्मविसर्जन यांच्यामुळें आपल्या अनुयायांवर कांहीं नियंत्रण गाजवूं शकतो. परंतु राजकारणांत तसें सामर्थ्यच नसल्यानें माथेफिरूपणा राजकारणांत धर्मापेक्षांहि त्याज्य ठरतो.

**टीप**—या लेखांतील अवतरणांतील उध्दृतें पंडित जवाहरलाल नेहरूंच्या या विषयावरील १९३६ मध्यें लिहिलेल्या लेखांतील आहेत.

संकलन

भाग तिसरा

# आध्यात्मिकता आणि काँग्रेस

१

रोगाचें नांव सांगितलें कीं, आपण रोगपरीक्षा बरोबर केली, असें वैदूंच्या दर्जाच्या वैद्यराजांना वाटूं लागतें. नामधारी शास्त्रवेत्त्यांना कांहीं वेळां असें वाटतें कीं, एखाद्या गोष्टीला नांव दिलें कीं, ती स्पष्ट करून दाखविण्याचें कार्य संपलें. कांहीं राजकारणी व्यक्ती आणि गट यांतही राजकीय आणि आर्थिक धोरण व कार्यक्रम यांवर टीका करतांना हीच वृत्ति दिसून येते. एखाद्या धोरणांतील किंवा कार्यक्रमांतील शहाणपणा, उपयुक्तता, आणि व्यावहारिकपणा यांची चर्चा करावयाचें सोडून ते कांहीं विशेषणें ठोकून देऊन त्या प्रश्नांची विल्हेवाट लागली असें मानतात. एखाद्या धोरणाला क्रांतिकारक म्हटलें कीं, तें धोरण लगेच शास्त्रशुद्ध, सर्वमान्य वस्तुस्थितिनिष्ठ, ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां आवश्यक आणि म्हणून ताबडतोब नाहीं तरी जरूर ती श्रद्धा असल्यास तें लौकरच तीं यशस्वी होण्याची खात्री देणारें या सर्व गोष्टी त्या एका विशेषणानें जणूं काय निर्माण होतात! आपल्या विरोधकांच्या धोरणाला सुधारणावादी,

अद्भुतपणें पुनरुत्थापन करणारे आणि प्रतिगामी अशी विशेषणें लावलीं कीं, मग त्याला पुरावा देण्याची किंवा त्याची फोड करून पाहण्याची आवश्यकताच नाहीं ! तें शास्त्रशुद्ध नाहीं, त्याची ऐतिहासिक दृष्ट्या जरूर नाहीं, तें वस्तुस्थितीवर आधारलेलें नाहीं, हें सर्व जणूं काय या विशेषणांनीं सिद्ध झालेंच ! आणि अर्थातच तें अयशस्वी होणार हें नक्कीच. जर तें यशस्वी होतांना आढळलें तर तो केवळ आभास आणि कोलाहल होय !

कॉंग्रेसचें अधिकृत धोरण आणि कार्यक्रम यांची तिच्याशीं सहमत नसलेल्यांकडून मध्ययुगीन आणि सुधारणावादी अशी लाखोली मिळून त्यांची वारंवार अवहेलना झाली आहे. टीकाकारांनीं आपलें स्वतःचें धोरण किंवा अजीबात धोरण नसणें हें देखील क्रांतिकारक मानलें आहे. भाई रॉय यांनीं युवक परिषदेच्या सितापूर येथील अधिवेशनाचे वेळीं अध्यक्षीय भाषणांत अशीच वर्तणूक केली. सुधारणावादी या शब्दाचा ताजेपणा आणि नावीन्य कदाचित् आतां नाहींसें झाल्यामुळें त्यांनीं ‘आध्यात्मिक’ हा नवा शब्द उचलला आहे: कॉंग्रेसची तत्वप्रणाली आध्यात्मिक आहेच. तिचें अधिक स्पष्टीकरण करून पहाण्याची जरूर नाहीं ! वक्त्याला वाटतें कीं, आपण ‘आध्यात्मिक’ हा शब्द योजण्यांतच कॉंग्रेसची तत्त्वप्रणाली आणि धोरण यांची निरर्थकता सिद्ध केली. जर वस्तुस्थिति तशी असेल तर कॉंग्रेस राजनीतिदृष्ट्या प्रतिगामी आहे. आध्यात्मिक या शब्दाचा खरा अर्थ समजणें कठिण आहे. धर्मवेड्या हिंदु व मुसलमानांच्या दृष्टीनें मशिदी पुढील वाद्यवादन, गोपूजा किंवा गोहत्या असा त्याचा अर्थ होईल. एकाद्या अडाणी माणसाचा दृष्टीनें तर त्याचा वाटेल तितका ठोकळ, निरर्थक आणि भौतिक अर्थ होऊं शकेल. एकाद्या शास्त्रज्ञाच्या किंवा गूढवाद्याच्या दृष्टीनें याचा अर्थ, बाह्य आणि सूक्ष्म अनुभवानें प्रतीत झालेलीं तात्त्विक आणि मानासिक सत्यें असाही होऊं शकेल.

टीकाकाराचा खरा अर्थ समजणें केवळ त्या तत्वप्रणालीला वा कार्यक्रमाला त्यानें आध्यात्मिक म्हटलें यावरून कोणालाच स्पष्ट होणार नाहीं.

आधिभौतिक याचा अर्थ टीकाकाराच्या मतें अशास्त्रीय, अव्यवहारी असा आहे काय? पण आध्यात्मिकता नेहमींच अव्यवहारी नसते. कधीं कधीं ती फारच व्यवहारी असते. धर्म नेहमींच अशास्त्रीय असतो असेंही नाहीं. एक काळ असा होता कीं, ज्या काळीं धर्मगुरु हा सर्व जगांतील शास्त्रांचें भांडार मानला जाई. म्हणूनच नेहमीं जबाबदार आणि लक्षावधी अनुयायी लाभलेल्या एखाद्या जबाबदार संस्थेच्या योजना आणि कार्यक्रम यांचेवर टीका करतांना अधिक स्पष्ट अर्थ असलेले शब्द वापरणेंच अधिक चांगलें. "आध्यात्मिक" हा शब्द रूढ नसता तरी एखादें धोरण आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या प्रतिगामी नसतांही आध्यात्मिक असूं शकेल. पूर्वकालांत, आध्यात्मिक धोरणें राजकीय दृष्ट्या नेहमींच वाईटच होतीं असें नाहीं. म्हणून आध्यात्मिक धोरण राजकीय दृष्ट्या वाईट असतें हें क्षणभरहि मान्य न करतां आपण कॉंग्रेसच्या उद्दिष्टांत, पद्धतींत, कार्यक्रमांत आणि व्यक्तींत आध्यात्मिक भाग किती आहे त्याची तपासणी करूं या.

कॉंग्रेसचें उद्दिष्ट राजकीय आणि आर्थिक असून कालामानानुरूप तें अधिकाधिक व्यापक होत चाललें आहे. आरंभीं कॉंग्रेसनें धार्मिक आणि सामाजिक सुधारणा आपल्या क्षेत्रांतून मुद्दामच वगळल्या होत्या. आज कॉंग्रेसला जें पूर्ण स्वराज्य पाहिजे आहे त्याचा, आध्यात्मिक अथवा वैयक्तिक आत्मसंयमन, स्वाधीनता किंवा आत्मज्ञान यांशीं कांहीं संबंध नाहीं. पूर्ण स्वातंत्र्याचें संपादन एवढेंच ध्येय कॉंग्रेसच्या घटनेंत नमूद आहे.

कॉंग्रेसच्या साधनांतही बदल होत आहे आणि तीं अधिकाधिक व्यापक होत आहेत. तिची सुरुवात, अर्ज, विनंती निषेध, आणि सनदशीर चळवळीनें झाली. आज तिनें आपल्या शस्त्रागारांत आणखी एका शस्त्राची भर घातली आहे. तें म्हणजे असहकार किंवा सत्याग्रह. तिनें अवलंबिलेला सत्याग्रह वैयक्तिक नाहीं; आध्यात्मिक नाहीं; तो सर्वथा राजकीय, आर्थिक आणि सामुदायिक आहे. सत्याग्रह या शब्दाची

व्युत्पत्ति मात्र स्वराज्य, या शब्दाप्रमाणेंच सारखीच आध्यात्मिक आहे. परंतु कॉंग्रेसनें हिंदी राष्ट्रासाठीं जी व्युत्पत्ति स्वीकारली त्या दृष्टीनें वैयक्तिक मुक्ति किंवा आत्मज्ञान लाभण्याचें तें साधन नसून राजकीय आणि आर्थिक हानि आणि अन्याय दूर करण्याचा अनत्याचारी पद्धतीचा तो प्रत्यक्ष लढा आहे. व्यवहारी आणि नैतिक दृष्टीनें तेथें राजकारणांत अत्याचाराला स्थान नाहीं. वैयक्तिक अहिंसा ही भौतिक आणि बाह्यात्कारी कल्पना नसून ती मानासिक अवस्था आहे. गटाच्या अनत्याचारांत वैयक्तिक अनत्याचाराचा समावेश होतो. परंतु दोन्हीहि नेहमींच एकरूप होतात असेंहि नाहीं. वैयक्तिक वर्तणुकींत मानवी कार्यशक्तींचें सर्वस्व, मानसिक हेतु आणि कार्याची तडफ यांत सामावलेलें असतें. केवळ कालांतर्गत आणि स्थलविशिष्ट भौतिक परिणामांमध्येंच तें सर्वस्व नाहीं. सामुदायिक वर्तनांत हेतूला प्राधान्य असूनहि सगळा भर बाह्य कृतीवर आणि परिणामक्षमतेवर असतो. वैयक्तिक अहिंसा निरनिराळ्या स्वरूपांत, व्यक्तीव्यक्तीमध्यें, धर्माधर्मांत आणि जातीजातींत दिसून येऊं शकते. सर्वसाधारण मुसलमान किंवा खिस्ती मांसाहार हा अहिंसेशीं विसंगत मानीत नाहीं पण सर्वसाधारण हिंदु तसें मानतो. जैन तर त्याच्याहि पलीकडे जातो. अहिंसचे हे सर्व प्रकार आणि स्वरूपें कॉंग्रेसनें मान्य केलेल्या सत्याग्रहांत येत नाहींत. तिची अपेक्षा एवढीच आहे कीं, तिचें राजकीय आणि आर्थिक उद्दिष्ट साधतांना कॉंग्रेसवाल्यांनीं हिंसेचा प्रगट उपयोग करतां कामा नये. जर मानसिक दृष्ट्या अहिंसेवर जास्त भर कधीं दिला गेला असेल तर तो केवळ व्यावहारिक दृष्ट्या आवश्यक म्हणून. जे लोक विचार आणि शब्द यांत अहिंसेचें पालन करतात ते आणीबाणीच्या वेळीं आपलीं बाह्य आणि सामाजिक कर्तव्यें पार पाडण्याच्या आणिबाणीच्या वेळी सहसा कचरत नाहींत. अहिंसेची ऐतिहासिक उपपत्ति काय असेल ती असो. कॉंग्रेसनें फक्त तिचें बाह्य भौतिक आणि सामूहिक स्वरूप मान्य केलें आहे. कॉंग्रेसला इतर अर्थ मान्य करण्यास लावण्याचे प्रयत्न फसले आहेत.

" शांततामय " या शब्दाबद्दल " अनत्याचारी ", न्याय्य साधनाबद्दल ' सत्याधिष्ठित ' मार्ग अशी शब्दांची अदलाबदल करण्यास काँग्रेसनें संमति दिली नाहीं मग तें तिचें करणें बरोबर असो वा नसो. अनत्याचार आणि सत्य या शब्दांना शांतता आणि न्याय्य साधनें या शब्दांपेक्षां अधिक व्यापक अर्थ आहे. म्हणूनच काँग्रेसनें वरील अदलाबदल स्वीकारली नाहीं. अनत्याचारी या शब्दाला अधिक वैयक्तिक आणि आध्यात्मिक अर्थ आहे.

गांधीजींच्या सत्याग्रहाचें दुसरें मूलतत्त्व सत्य हें आहे. परंतु काँग्रेसनें हा शब्द उपयोगांत आणण्याचें किंवा मान्य करण्याचें कबूल केलेलें नाहीं. तिनें अधिक सौजन्यपूर्ण आणि स्पष्ट अशा " न्याय " या शब्दावरच समाधान मानलें आहे. अर्थातच काँग्रेसनें आपलें उद्दिष्ट साधण्यासाठीं पूर्वीचे सनदशीर किंवा आजचे न्याय्य आणि शांततामय मार्ग अवलंबण्याचें ठरविलें आहे ते सर्व मार्ग राजकीय आहेत. त्यांचा आध्यात्मिक, धार्मिक किंवा वैयक्तिक प्रयत्नांशीं अथवा कल्पनांशीं कांहींचाहि संबंध नाहीं. उपयोगांत आणावयाचीं शस्त्रेंच अशीं आहेत कीं, नैतिक आणि आध्यात्मिक प्रवृत्ति असलेल्या व्यक्तींना तीं वापरतां येतील. त्यामुळें त्यांची कार्यक्षमता कमी होण्याऐवजीं वाढते. आजच्या जगानें आध्यात्मिकतेचा वास येत असलेली प्रत्येक गोष्ट टाकून दिली आहे असें नाहीं. हिंदुस्थानांत तर तसें फारच कमी प्रमाणांत झालें आहे. एखादें राजकीय शस्त्र वैयक्तिक उद्दिष्ट साधण्यासाठीं उपयुक्त आणि आध्यात्मिक आहे, एवढ्याच कारणासाठीं सर्व साधारण मनुष्य कांहीं तें फेंकून देणार नाहीं. अर्थात् यास कांहीं अपवाद असतील. हिंदी समाजसत्तावाद्यांनींहि काँग्रेसच्या ' शांततामय ' या शब्दाला मान्यता दिली हाच, काँग्रेसचा अनत्याचार राजकीय स्वरूपाचा आहे याचा पुरावा होय. तिच्या न्याय्य साधनांत समाविष्ट न होणारीं साधनें म्हणजे कूपमंडूकवृत्तीची राजनीति, संधिसाधूपणा आणि कुटिलता हीं होत. दूरदृष्टीच्या सुबुद्ध आणि मौलिक

राजकारणांतून यांची हकालपट्टीच करण्यांत आली आहे. एखाद्या राष्ट्राचे मुख्य प्रश्न कुटिलता आणि संधिसाधूपणा यांच्या जोरावर सुटल्याचें इतिहासांत एकही उदाहरण नमूद नाहीं. अशा मार्गांचा एखाद्या परतंत्र राष्ट्रानें उपयोग केला तर तेथील लोकांचें नैतिक बळ कमी होईल. म्हणून आध्यात्मिक सोडून द्या, पण फक्त राजकीय आणि व्यावहारिक मुद्यांवर भर देऊन काँग्रेसनें त्या पद्धतींचा इन्कार केला आहे. शतकानुशतकें गुलाम म्हणून राहिलेल्या राष्ट्रांतील लोकांचा प्रत्येक आर्थिक आणि राजकीय कार्यक्रम व्यक्तीचें आणि राष्ट्राचें नैतिक बळ वाढवतोच. परंतु केवळ त्यामुळें तो कार्यक्रम कोणत्याहि पक्षविशिष्ट आणि स्थूल अर्थानें आध्यात्मिक ठरतो असें कांहीं होत नाहीं.

"शेवट गोड तें सर्वच गोड" या सोइस्कर तत्त्वावर काँग्रेसचाही विश्वास नाहीं. पण म्हणून ती आध्यात्मिक ठरत नाहीं. कित्येक आध्यात्मिक पंथांचे लोक अशीं तत्त्वें मानीत आले आहेत आणि आजही मानतात. परंतु काँग्रेसनें आध्यात्मिक नव्हे तर नैतिक, व्यावहारिक आणि योग्यायोग्यतेच्या दृष्टीनें, धर्मवेड, क्रौर्य, रक्तपात आणि विनाश यांना कारण होणाऱ्या सिद्धांतांचा इन्कार केला आहे. काँग्रेसची कार्यपद्धति नीतिविरोधी नाहीं. ती नीतिनिरपेक्ष असते त्या वेळीं ती नीतियुक्त असते. नीति मुख्यत्वेंकरून शेजाऱ्यामधील न्याय्यसंबंधांशीं निगडित आहे. शेजाऱ्यामध्यें विरोधक आणि गुन्हेगार यांचाही अंतर्भाव होतो. कायद्याप्रमाणें शिक्षा देण्याची मुभा असली तरी त्याचा अंमल बजावतांना त्यांत नीतिचा हात असतो. आणि अनावश्यक यातना आणि टाळतां येण्यासारखें क्रौर्य टाळण्याची खबरदारी घेण्यांत येते. परंतु हीं दोन्ही आध्यात्मिकतेपेक्षां निराळीं आहेत हें शास्त्रीय चर्चेंत लक्षांत ठेवलें पाहिजे.

काँग्रेसच्या विधायक कार्यक्रमांत ग्रामोद्योग, ग्रामसुधारणा, कामगार आणि किसान संघटना, खादी, हिंदु-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता-निवारण, हिंदीचा प्रचार आणि कायदेमंडळांतील चळवळ यांचा अंतर्भाव करण्यांत आला आहे.

अस्पृश्यता-निवारणाखेरीज यांपैकीं कोणताच भाग अ—राजकीय आणि आध्यात्मिक नाहीं. वैयक्तिक दृष्ट्या आध्यात्मिक आणि मानसिक सुधारणेचीं तीं साधनें असतील. परंतु कॉंग्रेसनें त्यांचा राजकीय, आर्थिक आणि व्यावहारिक मूल्य आणि उपयुक्तता यांच्यासाठींच स्वीकार केला आहे. अस्पृश्यता ज्या प्रकारें आज हिंदुस्थानांत अस्तित्वांत आहे तो प्रकार केवळ धार्मिक नाहीं. तो प्रश्न राजकीय, आर्थिक आणि मानवतेचा आहे. ती नष्ट केल्याशिवाय राष्ट्र अंतर्गत स्वरूपांत विस्कळितच राहील आणि मग स्वातंत्र्याची मागणी पोकळ आणि असत्य ठरेल.

कॉंग्रेसचें पूर्वींचें किंवा आतांचें नेतृत्व कोणत्याही प्रकारें आध्यात्मिकतेशीं संबद्ध नाहीं. परंतु जर सामाजिक कार्याची तळमळ, त्याग, आणि कष्ट भोगण्याची तयारी यांनींच आध्यात्मिकता सिद्ध होत असेल तर ती मात्र या नेत्यांमध्यें भरपूर आहे. खेरीज गांधीजींच्याशिवाय बाकी सगळे बुद्धिनिष्ठ व्यवहारी देशभक्त आणि राजनीतिज्ञ होते आणि आहेत. गांधीजी आध्यात्मिकता आणि व्यवहारी राजकारण यांचें संमीलन करतात हें निःसंशय. परंतु त्यांच्यांत व्यावहारिक आणि राजकीय लायकी नाहीं असा कोणी संशयही व्यक्त केलेला नाहीं. लॉइड जॉर्ज यांनीं एकदां त्यांचेबद्दल 'विलक्षण धोरणी राजकारणी' असें विधान केलें होतें. कांहीं वेळां त्यांच्या विरोधकांना त्यांचें धोरण इतकें चाणाक्ष आणि गुंतागुंतीचें वाटलें आहे कीं, त्यांनीं त्यांच्यावर कौटिल्याचाही आरोप केला आहे. परंतु मित्र आणि निःपक्षपाती निरीक्षकांस ते पूर्णपणें प्रामाणिक आणि जें मनांत असतें तेंच बोलून दाखविणारे आणि आपला डाव प्रतिपक्ष्याला उघड करून दाखविणारे आहेत असेंच आढळेल.

अर्थातच कॉंग्रेसचें उद्दिष्ट, पद्धति, कार्यक्रम किंवा नेते कोणीही आध्यात्मिकतेवर अवास्तव विश्वास टाकीत नाहींत. मग चांगल्या माहितगार आणि जबाबदार लोकांकडून असें विधान कां केलें जातें ? त्याला दोन मोठीं कारणें आहेत. समाजसत्तावादी दृष्टीनें जें जें भौतिक आणि जडवादाच्या चौकटींत बसणार नाहीं तें सर्व मध्ययुगीन आणि म्हणून

आध्यात्मिक वाटतें. कारण मध्ययुगांत मुख्य कार्यशक्ति राजकीय नसून धार्मिक आणि आध्यात्मिक होती. ही मध्ययुगाविषयींची समजूत कितपत बरोबर आहे व सत्यावर कितपत आधारलेली आहे, त्याची चर्चा येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. दुसरें कारण म्हणजे आध्यात्मिक कल्पनांशीं निगडित असलेल्या शब्दांचा आणि जुन्या शब्दसमुदायांचा उपयोग केल्यामुळें उडणारा गोंधळ. त्यांत शाब्दिक हेत्वाभास निर्माण होतो. विचार आणि चिकित्सा या शक्ति या भाषेच्या घोंटाळ्यामुळें पंगू होऊन त्या बहकण्याचे प्रसंग वारंवार येतात. अतिशय काळजी घेतली तरच त्यांतून बचाव होऊं शकतो. पूर्ण स्वराज्य, सत्याग्रह, रामराज्य, हरताळ, ग्रामोद्योग, खादी या शब्दांमुळें आधुनिक मनासमोर मध्ययुगीन आणि म्हणून आध्यात्मिक कल्पना उभ्या राहतात. यांचे जागीं पूर्ण स्वातंत्र्य, असहकार, लोकशाही सत्ता, सामुदायिक संप, उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरण हे शब्द वापरले तर लगेच त्या कल्पना आधुनिक, आजतागायतच्या, आणि पूर्णपणें राजकीय आणि आर्थिक बनतात. परकीय भाषेंतून आलेले हे नवे शब्द बहुजनसमाजाला समजतील कीं नाहीं हा विचार काँग्रेसचे टीकाकार करतात असें वाटत नाहीं. हिंदुस्थानानें पाश्चिमात्य भाषा आणि विचार उचललेच पाहिजेत नाहींतर राजकीय दृष्ट्या आपला कोंडमारा होणें आणि निष्क्रियता येणें अपरिहार्य आहे.

## आध्यात्मिकता आणि राजकारण



जनसेवा किंवा देशभक्ति ही हिंदुस्थानांत अपवादात्मक गोष्ट आहे. लोकांना, कुटुंब, जात आणि कीर्ति यांसाठीं त्याग करण्याची संवय आहे. परंतु त्याग जेव्हां रूढ होऊन बसतो तेव्हां त्याचें महत्त्व नाहींसें होतें. प्रत्येकाकडूनच त्याची अपेक्षा केली जाते. जे तो करीत नाहींत ते माणूसघाणे आणि अर्धवट समजले जातात. मनुष्याला समाजांत रहावयाचें म्हणजे कितीतरी वैयक्तिक गैरसोयी सोसाव्या लागतात. परंतु त्या रूढ असल्यामुळें त्यांना कोणीं त्याग म्हणत नाहीं; हिंदुस्थानांत कुटुंबसेवा, जातिसेवा आणि धर्मसेवा रूढ आहेत पण तसें राष्ट्रसेवेचें नाहीं.

राष्ट्रसेवेसाठीं इतर सेवाकार्यापेक्षां अधिक गैरसोय सोसावी लागते असें नाहीं. परंतु राष्ट्रसेवा कोणी करीत नाहीं म्हणून करणारे अतिमानव मानले जातात. ते असामान्य अशा गैरसोई सोसतात. हिंदुस्थानला फक्त एकाच प्रकारची श्रेष्ठता ठाऊक आहे. ती म्हणजे आध्यात्मिक ! पूर्वीं आध्यात्मिकतेचा काय अर्थ असेल तो असो,

आज हिंदुस्थानांत तिचा अर्थ योगसाधन आणि देहदंड, आत्मक्लेश असा होतो. म्हणून प्रत्येक राष्ट्रसेवकानें या कसोटीस उतरलें पाहिजे.

पाश्चिमात्य देशांत राष्ट्रसेवक सर्व सामान्य प्रकारचेंच जीवन जगतो. तो प्रचंड त्याग करतो, कधीं कधीं आपला प्राणही देतो, तरी तेवढ्याकरितां कोणीही त्याला आध्यात्मिक प्रवृत्तीचा म्हणत नाहीं. त्यानें योग्याप्रमाणें राहिलें पाहिजे अशी कोणाची अपेक्षा नसते. एकाद्या सामान्य नागरिकाप्रमाणें तो कपडे घालतो, जेवतो, राहतो आणि इतरही आवश्यक व्यवहार करतो. हिंदुस्थानांत समाजसेवकानें नुसता आर्थिक लाभाचा किंवा सुखसोयींचा त्याग करून भागत नाहीं. त्यानें आपल्या सर्व शारीरिक गरजाही सोडल्या पाहिजेत. राष्ट्रसेवकानें सुखसोई आणि पैसा यांचा त्याग केला तरी तेवढेंहि पुरेसें ठरत नाहीं. त्यानें सर्वसामान्य अशाहि भौतिक गरजांचा त्याग केला पाहिजे. आणि शारीरिक सुखांत हिंदी दृष्टीनें कशाचा समावेश होत नाहीं? राष्ट्रसेवक समाजाची टीका झाल्यावांचून चित्रपट पाहूं शकत नाहीं. त्याला भूक लागली तरी त्यानें उपाहारगृहांत जाऊं नये, त्यानें धूम्रपान करूं नये. त्यानें चहा कॉफी पिऊं नये. तो मुसलमान असला तर त्यानें दाढी करतां उपयोगी नाहीं. हिंदु राष्ट्रसेवकानें अंडीं खाऊं नयेत, कांहीं हळव्या माणसांच्या भावना दुखविल्यावांचून मांसमच्छी त्याला खातांच येत नाहीं. त्यानें आपल्या संपत्तीचा उपभोग घेऊं नये. जर कांहीं मालमत्ता त्यानें स्वतः पूर्वी अगर त्याच्या वाडवडिलांनीं मिळविली असेल तर ती त्यानें दान करावी असा मुळीं दंडकच आहे! देशसेवक स्त्रियांच्या बाबतींत अलंकारांना रजा देण्यांत आली आहे. त्यांनीं केसांचा भांग जुन्या पद्धतीनें पाडला पाहिजे. थोडक्यांत म्हणजे देशभक्त हा योगी असला पाहिजे, कारण राष्ट्रसेवामंदिरांत फक्त अशांनाच प्रवेश मिळूं शकतो. कॉंग्रेसनें राष्ट्रीय धोरण म्हणून मादक पदार्थ आणि परदेशी कापड आणि एकंदरींत परदेशी माल यांना बंदी केलीच आहे. परंतु लोकमतानें यापेक्षां आणखी किती तरी गोष्टी निषिद्ध मानल्या आहेत.

जेव्हां खिलाफत चळवळ जोरांत होती तेव्हां मुसलमान राष्ट्रभक्ताला

दाढी वाढवणें अनिवार्य होतें. आणि मिशी कशी ठेवावयाची या बद्दलही रूढीचे पवित्र नियम लादण्यांत आले होते. जर त्यानें ओंठावरून वस्तरा फिरवला तर तो देशाची किंवा खिलाफतीची सेवा करण्यास नालायक ठरावयाचा. त्यानें छायाचित्रासाठीं बसतां कामा नये. प्रमुख देशभक्त मोतीलालजींवर त्यांनीं आपली सर्व मालमत्ता देऊन टाकली नाहीं आणि ते मोठ्या सुखवस्तूपणें आणि थोडे ऐषआरामांत राहतात, म्हणून टीका होत असे. आज त्यांच्या मुलाविषयीं तीही टीका होत नाहीं असें नाहीं. तरी ते कित्येक वर्षें तुरुंगांत राहून आले आहेत म्हणून बरें ! ही टीका फक्त अशिक्षित, अडाणी आणि पुराणमतवादीच करतात असें नाहीं. सुशिक्षितसुद्धां अशा अविचारी गोंधळांत भाग घेतात. समाजसेवकांच्या झरणीवर, घड्याळावर, वस्त्र्यावर—जें जें कोणा एखाद्याला पुराणमतवाद्याच्या विरुद्ध किंवा अपवित्र आणि नवमतवादी किंवा सुधारणात्मक दिसेल त्या सगळ्या गोष्टीवर भरपूर टीका होते.

समाजसेवकानें जर त्या समाजाच्या अपेक्षांप्रमाणें वागण्याचें ठरविलें तर तो अर्धनग्न, अर्धपोटी, जगांतील आणि हिंदुस्थानांतील राजकीय आणि आर्थिक प्रश्नांची अर्धवट माहिती असलेला, कलात्मक आणि सौंदर्य दृष्टि नष्ट झालेला आणि भावना मेलेला असा प्राणि होईल. असा मनुष्य आदर्श देशभक्त ठरेल ! ज्याच्याबद्दल राष्ट्राला अभिमान वाटेल असा तो अत्यंत योग्य सेवक ठरेल ! !

साधारण हिंदवासीयाला कितीही सौम्य राष्ट्रसेवा करण्याबद्दल सांगा. त्याचें उत्तर तो ताबडतोब देईल कीं, मी अजून जगाला धिक्कारलें नाहीं. मी कुटुंबवत्सल आहे आणि मला अजून जीवनसुख भोगावयाचें आहे. साधारण माणसासारखें जीवन व्यतीत करणें राष्ट्रसेवेशीं सुसंगत नाहीं असें मानलें जातें. जर्मन, जपानी किंवा इंग्रज मनुष्य वेळ येतांच तोफेच्या समोर जाऊन उभा राहूं शकतो; नृत्यगृह, उपाहारगृह आणि बिलियर्डच्या टेबलापासून एकदम बाजूस होऊन ताबडतोब असेल तसा खंदकाकडे जाऊं शकतो आणि जातोहि ! परंतु हिंदवासीयाविषयीं मात्र,

त्यानें जर आध्यात्मिकता पूर्णपणें आत्मसात् केलेली नसेल तर त्याच्याविषयीं संशय वाढूं लागतो आणि ऐनवेळीं देशाचा घात करण्याइतका त्याचा स्वभाव फसवा असावा असें मानण्यांत येतें.

त्यामुळेंच राष्ट्रसेवेसाठीं विशेषतः तरुण पिढींतील फारच थोडे लोक पुढें येतात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. जेव्हां असला खोटा, असत्य आणि असामान्य दर्जा समाजांत आवश्यक होऊन बसतो, तेव्हां त्याची प्रतिक्रिया धर्मवेड आणि भोंदू लोक उत्पन्न होण्यांत व्हावी यांत आश्चर्य कसलें ? प्रामाणिक लोक शिक्षणानें, स्वभावानें किंवा मतानें योगी झाले नसतांनाही राष्ट्रसेवेस सुरुवात करतात आणि त्यांना असें आढळून येतें कीं प्रत्येक क्षणी त्यांना तडजोड करावी लागते. कांहीं वेळां तर ढोंगहि करावें लागतें. परंतु त्यानें असें सोंग आणणें नेहमींच भयंकर असतें. तो लोकांच्या सारखा दृष्टीसमोर असतो. आज ना उद्यां त्यानें केलेली प्रत्येक गोष्ट लोकांना कळतेच. आणि त्यावेळीं समाजाला आणि त्याच्या मित्रांना मोठा धक्का बसतो. एवढेंच असतें तर तो पुष्कळ स्वस्त सौदा झाला असता. परंतु वाईट गोष्ट अशी कीं, समाजाला मग सर्वांचाच संशय येऊं लागतो आणि राष्ट्रसेवकांवरील त्यांचा विश्वास आणि श्रद्धा उडते. राष्ट्रभक्तांविरुद्ध येणाऱ्या कागाळ्या याच स्वरूपाच्या असतात.

आणखी एक गोष्ट आहे. कॉंग्रेसमधील प्रत्येक राष्ट्रीय कार्यकर्त्यानें गांधींजींचें नेतृत्व स्वीकारलें आहे असें मानलें जातें. ते राष्ट्रसेवकांचे राजकीयच नव्हे तर आध्यात्मिक गुरूही मानले जातात. आपण गांधीजींचे फक्त राजकीय अनुयायी आहों असें सांगून पहा, लोकांचा तुमच्या शब्दांवर विश्वास बसणार नाहीं. गांधीजींच्या प्रायोगिक नीतीचेहि तुम्ही पालन करितां असें मानलें जाईल. गांधींजी स्वतः अंतिम स्वरूपाचें कांहीं मिळविल्याचें सांगत नाहींत. परंतु जनता आणि त्यांचे कांहीं अनुयायी मात्र त्यांना आपण होऊन तो मान देतात. जर तुम्हीं राजकारणांत अनत्याचाराचें पालन करावयाचें ठरविलें असेल तर तुम्ही सर्व मानवजातीवर प्रेम केलें पाहिजे, मग तुमची लायकी आणि अभ्यास

तितक्या उच्च दर्जाचा असो वा नसो. तुम्हीं स्वतःशीं ठरविलेलेच निर्बंध पाळावयाचे असतात असें नाहीं. तर गांधीजींनीं ठरविलेले किंवा खरें सांगावयाचें तर त्यांच्या निर्बंधांचें समाजानें केलेलें विकृत स्वरूपहि तुम्ही आचरणांत आणलें पाहिजे !

तरवारीच्या अथवा सत्याग्रहाच्या बळावर लढणारे सैनिक असले तरी जातीसाठीं किंवा एखाद्या वर्गासाठीं झगडणारे सैनिक राष्ट्रास परवडणार नाहींत. राष्ट्रीय कार्य उच्च नीच, गरीब, श्रीमंत या सर्वांनीं केलें पाहिजे. कारण सर्वांनीं निदान नागरिकाचें कर्तव्य केलेंच पाहिजे. त्यांना जर तें कर्तव्य करावयाचें असेल तर वर्तणुकीचा असामान्य दंडक त्यांच्यावर लादण्याचें कारण नाहीं. सभ्य गृहस्थाला शोभेशी वर्तणूक एवढाच अगदीं कठिणांत कठिण दंडक असावा. राजकीय जीवन आणि आध्यात्मिक जीवन यांचा गोंधळ होऊं देतां कामा नये वस्तुस्थिति अशी आहे कां, राजकारण कधींच आध्यात्मिक होऊं शकणार नाहीं. राजकारणाचा बहुतेक संबंध बाह्य कार्याशीं आणि सामूहिक चळवळीशीं असतो. अंतस्थ हेतू आणि वैयक्तिक न्यायान्यायतेचा हक्क यांना बरीच किंमत असली तरी आध्यात्मिक जीवनाइतकी ती राजकारणांत प्रधान नसते. आध्यात्मिक जीवन केवळ पद्धति आणि उत्सव एवढ्याचपुरतें नसतें. त्याचा प्रधान संबंध वैयक्तिक आणि अंतस्थ जीवनाशीं आणि जीवन हेतूंशीं असतो. तेथें मनुष्याच्या आंतरजीवनास फार महत्त्व असतें. समूहाला तेथं गौण स्थान आहे. अंतःप्रवृत्तीला बाह्यःप्रेरणेपेक्षां जास्त महत्त्व आहे. बाह्य जीवनांत उणीव आढळते त्या वेळीं वृत्तिदोष हाच मुख्यतः विचारांत घेतला जातो. जर राजनीति, कायदा आणि समाजजीवन हीं अंतःप्रवृत्तीवर प्रधानतः अवलंबून राहिलीं तर सामाजिक जीवन उच्चतेप्रत जाण्याऐवजीं त्यामध्यें कोलाहल माजेल आणि सगळा गोंधळ उडेल.

आध्यात्मिक जीवनाचा जर खरोखर कांहीं अर्थ असेल तर तो आध्यात्मिक जाणीव हा होय. राष्ट्राचें अथवा एखाद्या समाजाचें असें

उद्दिष्ट असणें क्वचितच संभवतें. ही दृष्टि येण्यासाठीं आवश्यक ती शिस्त निरनिराळ्या प्रकारची आणि स्वरूपाची आहे. कित्येक वेळां तर ती इतकी गुंतागुंतीची आणि परस्परविरोधी असते कीं, एखादा समूह जर एकदां तिच्या भोंवऱ्यांत सांपडला कीं, तो पार बुडालाच म्हणून समजावें. उदाहरणार्थ, सबंध राष्ट्र एखाद्या मूर्तीसमोर साष्टांग नमस्कार घालणारें किंवा समाधि लावून बसलेलें किंवा डोक्यावर उभे राहिलेलें, असें मोठें विचित्र दृश्य निर्माण होईल. वैयक्तिक जीवनांत असलीं उदाहरणें संयमासाठीं आणि आध्यात्मिक उन्नतीविषयीं स्वतःची खात्री पटावी म्हणून अवलंबिलेलीं आढळतात. आध्यात्मिक जीवनाचें केंद्र वैयक्तिक जीवन हें आहे. राजनीतीचा मुख्य संबंध समूहाशीं आहे आणि म्हणून बाह्य वर्तनाला त्यांत प्राधान्य आहे. धर्मांतसुद्धां जगाशीं असलेल्या सर्व संबंधांचा त्याग केलेला संन्यासी आणि नेहमींच्या जीवनांत राहणारा गृहस्थाश्रमी असा फरक केला गेला आहे. दोघांनाही एकच नियम सारख्याच कडकपणें अवलंबावे लागत नाहींत. बुद्धाच्या अनुयायांमध्यें दोन प्रकार होते. भिक्षु आणि इतर. दोघांच्याहीकरितां एकच नियम नव्हता. इतर अनुयायी गृहस्थी जीवन जगत तर भिक्षूंना ब्रह्मचर्यपालन करावें लागे आणि शारीरिक सुखोपभोगांचा त्याग करावा लागे. सामान्य आणि विशेष अनुयायांच्या आध्यात्मिक जीवनांमधील हा फरक सर्व धर्मांत पाळला जातो. गृहस्थाश्रमी आपल्या सामान्य जीवनांत कांहीं थोडे नियम पाळतो. ते विशेष कडक नसतात. गांधींजीदेखील हा फरक करतात. सत्याग्रहाश्रमांतील अनुयायांना लावण्यांत आलेले नियम काँग्रेसपुढें किंवा त्यांचें नेतृत्व स्वीकारणाऱ्या सर्वांपुढें ते ठेवीत नाहींत.

वस्तुतः गांधीजी जेव्हां राजनीतीच्या आध्यात्मीकरणाविषयीं बोलत असतात तेव्हां त्यांचा हेतु राजकारण नीतिशुद्ध असावें एवढाच असतो. साधारणतः राजकारणांत नीतीचे सामान्य नियम पाळले जात नाहींत. परंतु वैयक्तिक जीवनांत काय किंवा राजनैतिक जीवनांत काय, सभ्यतेचा मानदंड एकच असावा असा प्रयत्न हिंदुस्थानांत केला जात आहे.

तत्त्वज्ञानाची कांटेकोर भाषा जर वापरावयाचें ठरविलें तर कोणीही राजकारणाच्या आध्यात्मीकरणाविषयीं बोलणार नाहीं. उलट समाजांतून जे नैतिक नियम हकालपट्टी होऊन बाहेर गेले आहेत ते मानवी क्षेत्रांत परत आणण्याचीच भाषा करावी लागेल. अध्यात्माचा बराचसा भाग नीति आहे हें खरें; परंतु त्यांत अध्यात्माचा पूर्ण समावेश होत नाहीं. हा भेद जर लक्षांत ठेवला तर राजकीय क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांच्या वर्तनाविषयींचा चोखंदळपणा बराचसा नाहींसा होईल आणि राजकारणी मनुष्याचें आयुष्य अधिक सरळमार्गी होईल. त्यांतील ढोंग कमी होईल. नागरिकांच्या अगदीं कमी दर्जाच्या कार्याचाही, इतर राष्ट्रांत होतो तसा आपल्या राष्ट्रास फायदा होईल. अतिशय मोठ्या अपेक्षा बाळगल्यामुळें सध्यां त्याचा उपयोग होत नाहीं. कारण तेवढ्या उच्च दर्जाला व्यक्ति पोचूं शकत नाहीं. उलट त्या दर्जाला पोंचण्याची ज्यांची इच्छा असते ते मात्र जनतेच्या दृष्टीनें आध्यात्मिक न ठरतां हास्यास्पद ठरतात.

मार्च १९३७.

## गांधीजींचा मार्ग

## ३

मला 'गांधीवाद' या विषयावर लिहिण्यास सांगण्यांत आलें होतें, पण मी 'राजकीय आणि सामाजिक प्रश्नांकडे पहाण्याची गांधींची दृष्टि' किंवा 'गांधींचा मार्ग' हें नांव पसंत केलें. कारण 'गांधीवाद' अशी कांहीं चीज अस्तित्वांत आली आहे असें अद्याप मला वाटत नाहीं. सर्व 'वाद', ज्यांच्या नांवाखालीं त्यांचा प्रसार आणि प्रचार होतो त्यांनीं सुरुवात करतांच अस्तित्वांत येतात असें नाहीं; तर त्यांच्या मूळ कल्पनांवर त्यांचे अनुयायी ज्या मर्यादा लादतात त्यांचा परिणाम म्हणजे हे 'वाद' होत. मूळ कल्पनाशक्ति नसल्यामुळें अनुयायी एक पद्धत आणि संघटनेचा मार्ग अवलंबतात. असें करतांना ते अनुयायी मूळ तत्त्व अगदीं नियमबद्ध, अतिशय मर्यादित आणि एकांगी करून टाकतात. त्यामुळें त्याचा नवेपणा, प्रसंगानुरूप बदलण्याची शक्ति इत्यादि चैतन्याचीं लक्षणें नाहींशीं होतात. शिवाय गांधीजीहि कोणी तत्त्वज्ञानी नाहींत. त्यांनीं कुठलीही पद्धत तयार केलेली नाहीं. ते अगदीं सुरुवाती-

पासून एक व्यवहारी सुधारक आहेत आणि म्हणून जसजसे प्रश्न उद्‌भवतात तसतसा त्यांचा त्यांच्याशीं संबंध येतो, आणि त्यांवर ते लिहितात. ते प्रधानतः कार्यप्रवृत्त आहेत आणि म्हणूनच त्यांना कर्मयोगी म्हणणें बरोबर आहे. म्हणून त्यांच्या भाषणांत, लिखाणांत, आणि कृतींत एखादी ठराविक तर्कपद्धति किंवा तत्त्वज्ञान न सांपडणें शक्य आहे. या दृष्टीनें ते जुन्या धर्मप्रवर्तकांप्रमाणें आणि सुधारणावाद्यांप्रमाणें आहेत. त्यांचाही दैनंदिन प्रश्नांशीं वारंवार संबंध येई. ते सोडविण्याची त्यांची एक पद्धत होती. परंतु ते प्रश्न त्यांनीं एखाद्या पद्धतीनें बांधून टाकले नव्हते. मुख्य मानसशास्त्रीय तत्त्वें उल्लेखिलीं गेलीं होतीं. परंतु राहिलेला भाग प्रत्येक व्यक्तीनें आपापली परिस्थिति आणि गरजेप्रमाणें करावयाचा असे. तत्त्वज्ञान, पद्धति आणि मर्यादितपणा हीं कमी दर्जाच्या लोकांचीं कामें आहेत. कारण त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन आकुंचित असतो.

गांधी आपल्या मतांबद्दल निर्णायक विधान करीत नाहींत. आपल्या कार्याला ते सत्याचे प्रयोग किंवा शोध असें म्हणतात. हे प्रयोग अजून चालू आहेत. कोणी जर हे प्रयोगच सत्य असें मानलें तर त्यानें अवास्तव गोष्टी गृहित धरल्या असें होईल. त्यांचे कांहीं अनुयायी विवेकापेक्षां उत्साहाच्या भरांत त्यांचें मत हेंच:अखेरचें मत असें धरून चालतात. परंतु गांधी स्वतः असा हेका कधींच धरीत नाहींत. ते चुका कबूल करतात आणि त्यांत दुरुस्त्या करण्याचा प्रयत्न करतात. आपल्या सत्य आणि अहिंसा या दोनच मुख्य तत्त्वांनाच ते 'अचूक' असें विशेषण लावतात; इतर बाबतींत ते सत्य म्हणजे काय हें त्यांना जसें दिसतें तसें इतरांना शिकवायला जितके तयार आहेत तितकेच स्वतःला शिकावयासही तयार आहेत. तत्त्वेंसुद्धां व्यवहारांत आणतांना तितकीं कडक रहात नाहींत. निरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळ्या प्रसंगीं तीं निरनिराळ्या तऱ्हेनें लावतां येतील असें ते सपशेल कबूल करतात. या त्यांच्या वृत्तीमुळेंच त्यांच्या अनुयांना आणि इतरांना ते अमुक परिस्थितींत काय करणार या विषयीं कोडें पडतें. त्यांच्या ठिकाणीं वर्धिष्णु आणि प्रगम-

नशील व्यक्तित्व असल्यामुळें त्यांच्या विचाराचें आणि आचाराचें कायमचें असें स्वरूप असणें शक्य नाहीं. ज्यांनीं त्यांना अगदीं जवळून पाहिलें आहे त्यांना या गोष्टी कळतात. त्यांच्या बदलत्या कल्पना आणि बदलत्या गोष्टी यांत तें व्यक्तित्व वारंवार दिसून येतें. विचार, अंतःप्रवाह आणि तत्त्व हीं बदलत नाहींत. परंतु त्यांचें आविष्करण मात्र बदलतें. ह्याचमुळें त्यांच्या ठिकाणीं तारुण्याचा तजेला कायम आहे आणि काळाच्या पुढें ते जाऊं शकतात. त्यांचे कित्येक तरुण अनुयायी निष्क्रिय होऊन खंगून गेलेले आहेत. तरी गांधी पूर्वींइतकेच गतिमान्, चपल, आणि उत्साही आहेत. तरुण पिढीच्या असंतोषी वृत्तीबद्दल कित्येक लोक अधीर होतात. तर गांधीजी नेहमींच समजूतदारपणें, शांतपणें, पूर्वग्रहरहित मनानें आणि मोकळेपणानें नवीन तत्त्वांची परीक्षा करतात. म्हणूनच गांधीवाद अशी कांहीं चीज अद्याप आस्तित्वांत आलेली नसून फक्त गांधींची दृष्टि, दृष्टिकोण निर्माण झालेला आहे. तो दृष्टिकोण लवचिक आहे. अद्याप सिद्धांताचें अंतिम स्वरूप त्यास प्राप्त झालें नाहीं. बारीकसारिक गोष्टींची अंतिम चिकित्सा आणि त्रिकालबाधित असें कांहीं न सांगतां प्रस्तुत दिशा दाखविण्याचेंच कार्य गांधीजींच्या दृष्टिकोणानें होतें.

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांत गांधींचें पदार्पण आपल्या देशाच्या चमत्कारिक परिस्थितीमुळें घडलेलें आहे. देशबांधवांपैकीं कांहीं लोक जसे इतरांपेक्षां जास्त सुदैवी होते त्याप्रमाणेंच तेहि होते. म्हणून ते विलायतेला गेले, बॅरिस्टर झाले, आणि स्वतः आणि आपलें कुटुंब सुखा-समाधानानें राहावें म्हणून त्यांनीं पैसा मिळविण्याच्या हेतूनें धंदाहि सुरू केला. विवाह त्यापूर्वींच झाला होता. आपल्या धंद्याच्या कामासाठींच ते दक्षिण आफ्रिकेंत गेले. परिस्थितीमुळें आपल्या तेथील बांधवांबरोबर त्यांचे लढे लढण्यांत ते भागीदार झाले. त्यांच्यापैकीं बहुतेक गरीब आणि निरक्षर होते. जे कांहीं थोडे श्रीमंत होते ते स्वतःचा गल्ला भरण्याच्या उद्योगांत होते. त्यांच्यामध्यें सामाजिक हिताची आणि राजकीय भावनेची जागृति नव्हती. वंशाभिमान आणि आर्थिक मत्सर

करणाऱ्यांपासून स्वत:ची सोडवणूक करून घेण्यास त्या परकीय देशांतील बांधवांना नेतृत्व आणि मार्गदर्शन यांची गरज होती. निरनिराळ्या सामाजिक आणि राजकीय वैगुण्यांमुळें त्यांना त्रास होत असे आणि त्यांच्यावर कित्येक अपमानास्पद बंधनें लादलीं गेलीं होतीं. त्या लोकांनीं ज्याला आपली पितृभूमि मानलें त्या देशांत नष्टप्राय झालेल्या त्यांच्या हक्कांचें रक्षण करण्याच्या लढ्यांत गांधीजी ओढले गेले. एकदां आंत प्रवेश केल्यावर त्यांनीं आपला प्रामाणिकपणा, लायकी आणि उत्कटता संपूर्णपणें त्या कामीं लावली. त्यांनीं आपलें सर्व जीवन त्यास वाहून टाकलें. लौकरच दक्षिण आफ्रिकेंतील सर्व हिंदवासियांचे ते पुढारी आणि मार्गदर्शक बनले. त्या लढ्यांत त्यांनीं सामाजिक अन्याय दूर करण्याचें एक नवें धोरण अंमलांत आणलें आणि सत्याग्रहाचीं तत्त्वें शोधून काढलीं. नेहमींप्रमाणें प्रथम आचार करून नंतर नामकरण आणि तत्त्व हीं प्राप्त झालीं. या लढ्यांत त्यांना असें आढळून आलें कीं, सत्य आणि अहिंसा हीं वैयक्तिक आणि कौटुंबिक संबंधांतच हितावह आहेत असें नव्हे तर आंतरसामाजिक संबंध सुरक्षित राखण्यासहि तीं फार उपयुक्त अशीं शस्त्रें आहेत. मानवी इतिहासाला हीं तत्त्वें कांहीं अपरिचित नव्हतीं. त्यांचा आचार आणि प्रचार पूर्वींच्या कित्येक धर्मप्रसारकांनीं केला होता, परंतु राजकीय संबंध आणि संघर्ष यांच्या बाबतींत सामुदायिक स्वरूपांत त्यांचा उपयोग करण्याचा प्रयत्न यापूर्वीं कोणीच केला नव्हता. नैतिक आणि सभ्य आचरणाचे मानदंड वैयक्तिक संबंधांत कसे चांगले ठरतात हें मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष सिद्ध करण्याचें श्रेय गांधींना आहे. तसेंच सत्य आणि अहिंसा यांचा बाह्य आक्रमक शक्ति म्हणून संघटित स्वरूपांत उपयोग करतां येतो आणि त्या ठिकाणीं विरोधकाचें श्रेय दुबळें ठरतें हेंहि प्रथम गांधीजींनींच जगास दाखविलें. सत्कार्यासाठीं लढणारा, मनांत आणील तर हिंसेचा आश्रय न करतां आपल्यावरील अन्यायाची दाद लावून घेऊं शकतो आणि अन्याय आणि विषमता यांच्याशीं झगडतांना पूर्वापार चालत आलेल्या हिंसात्मक

शस्त्रांपेक्षां, सत्य आणि अहिंसा हीं जास्त चांगलीं आणि परिणामकारक शस्त्रें आहेत हें गांधीजींना आढळून आलें.

सगळ्या यशस्वी कार्यांच्या मुळाशीं सत्य आणि अहिंसा हीं आहेत हें सिद्ध करण्याकरितां गांधीजींनीं एक अगदीं साधा प्रयोग केला. सत्याला यशस्वी होण्यासाठीं असत्य आणि हिंसा यांची जरूर लागत नाहीं, परंतु असत्य आणि हिंसा यांना मात्र सत्याची जरूर लागते. जीवनांतील कोठलेंहि कार्य घ्या. तें स्वार्थी आणि समाजविरोधी असलें तरी त्यांत भाग घेणाऱ्यांनीं एकमेकांवर विश्वास टाकलाच पाहिजे. स्वार्थ व लोभ यांना इतरत्र मिळतो त्यापेक्षां भरपूर वाव देणारें व्यापार हें एक क्षेत्र आहे. व्यापारांतसुद्धां जर एका व्यापाऱ्यानें दुसऱ्यावर विश्वास टाकला नाहीं आणि त्याचे शब्द जर आश्वासनाप्रमाणें मानले नाहींत तर एकहि देवघेव होणार नाहीं. फार काय लुच्चेगिरीसुद्धां करतां येणार नाहीं! चोर आणि खुनी यांना एकमेकांवर विश्वास टाकावाच लागतो. कित्येक वेळां वैयक्तिक स्वार्थत्याग करूनहि हा विश्वास कायम ठेवावा लागतो. कितीहि मर्यादित प्रमाणावर कां होईना पण सत्याचा उपयोग केल्यावांचून कोणतीहि गोष्ट करणें शक्यच नाहीं आणि तसेंच अहिंसेचेंहि आहे. जे एखाद्या संघटित आणि सामूहिक हिंसामार्गाचा अवलंब करतात त्यांनीं एकमेकांशीं वागतांना जर अहिंसाव्रताचें पालन केलें नाहीं तर त्यांना आपल्या मार्गानें पुढें जातांच येणार नाहीं. या मूलतत्त्वावांचून त्यांना आपल्या शत्रूशीं लढा देतांच येणार नाहीं. जर एखाद्या सैन्यांतील लोकांचा फक्त हिंसेवर विश्वास असेल तर शत्रूशीं लढण्यापूर्वींच ते एकमेकांना ठार करून स्वतःचा नाश करून घेतील.

संघटित जीवनाचीं दोन प्रधान तत्त्वें आहेत हें ओळखून फसवणूक आणि हिंसा अतिशय उपयुक्त आहेत असें राजकारणांत, परिणामावरून ठरविण्यात आलें आहे. अशा क्षेत्रांतहि गांधीजींनीं या दोन तत्त्वांचा प्रयोग केला. त्यांच्या परिणामक्षमतेचाच स्वतः फक्त विचार करावयाचा आणि त्यांचा प्रत्यक्ष आचार वरिष्ठ शक्तीच्या हातीं सोपवून आपण स्वस्थ रहावयाचें असें

गांधीजी करीत नाहींत. विरोधकाचा हृदयपालट व्हावा ही जरी त्यांची इच्छा असली तरी तेवढ्यावरच ते स्वस्थ बसत नाहींत. विषमता आणि अन्याय यांच्याखालीं भरडल्या जाणाऱ्या लोकांना संघटित आणि बलिष्ठ करण्याचाहि ते प्रयत्न करतात हें विशेष होय. ते योग्य रीतीनें संघटित व्हावे म्हणून त्यांनीं सगळी विषमता, भेद, भय, स्वार्थी आणि कोते हितसंबंध, यांचा त्याग करावा असा त्यांचा आग्रह आहे. असें बल आणि संघटना यांचें संपादन झालें म्हणजे विषमतेला आणि गांजणुकीला जी मदत होत असते, ती काढून घ्यावी असें त्यांना वाटतें. थोडक्यांत म्हणजे दुष्ट शक्तींशीं असहकार करावयास पाहिजे असें गांधीजींचें सांगणें आहे.

पूर्वीं काय झालें असेल तें असो, आज जग जसें आहे त्या परिस्थितींत पाहिलें तर ज्यांची पिळणूक होत असते तेच स्वेच्छेनें वा इच्छा नसूनही, जाणून बुजून वा नकळत, स्वेच्छेनें वा जबरदस्तीमुळें, पिळणुकीला उत्तेजन देत असतात. जर त्यांनीं सहकार करण्याचें नाकारलें आणि त्याचा काय होईल तो परिणाम सोसण्याची तयारी दाखविली, तर विषमता आणि अन्याय यांना फार काळ टिकून राहणें अशक्य होईल. औद्योगिक लढ्यांमध्यें ही गोष्ट स्पष्टपणें दिसून येते. जेव्हां-जेव्हां कामगारांनीं परिणामकारकरीत्या असहकार पुकारला तेव्हां तेव्हां भांडवलदारांना शरणागति पत्करणें भाग पडलें. फक्त औद्योगिक क्षेत्रांतील हे परिणाम पाहून आजचे कामगार सार्वत्रिक संप करून राजकीय आणि क्रांतिकारक उपायांनीं अन्याय दूर करावे असें म्हणूं लागले आहेत. बाह्यतः पाहिलें तर संप म्हणजे असहकार,—सत्याग्रह याशिवाय दुसरें काय आहे? औद्योगिक लढ्याच्या मागील पार्श्वभूमिका गांधींच्या सत्याग्रहाच्या मागील कल्पनेपेक्षां निराळी आहे. ती निराळी असणें आवश्यक नसलें तरी सहकार काढून घेण्याची ही पद्धत दोन्हीकडे आहे. औद्योगिक क्षेत्रांत जर सहकार्यास नकार दिल्यानें स्पष्ट परिणाम दिसून येतो तर मग सत्या-

ग्रहाबद्दलच सर्वांनीं संशय कां व्यक्त करावा ? सत्याग्रह म्हणजे संप अधिक कांहींतरी. ह्या 'कांहींतरी'मुळें लढा चालविण्यांची नैतिक शक्ति अधिक वाढते. विरोधकांचें नैतिक धैर्य त्या 'कांहींतरी'मुळें जास्तच खचतें व तटस्थांकडून अधिक सहानुभूति मिळते. असहकाराच्या बाह्य शस्त्रांना मानसिक आणि नकळत होणाऱ्या परिणामांमुळें अधिक बल मिळून मदत होते. सत्याग्रही हा जास्त चांगला संप पुकारणारा अथवा असहकारी आहे आणि त्याची निर्णयशक्ति विकार, राग आणि द्वेष यांनीं झांकळलेली नसते. तो आपल्या विरोधकाला निःशस्त्र बनवितो. त्याला अधिक सहानुभूति मिळते. स्वेच्छेनें स्वीकारलेले त्याचे आत्मक्लेश त्याच्या उन्नतीस कारणीभूत होतात. श्रद्धेची भिंत त्याच्या भोंवतीं संरक्षणार्थ उभी असते. परंतु हे सर्व मानसिक आणि नैतिक घटक आणि त्यांची शक्ति एकाद्या ठिकाणीं नसली आणि फक्त सहकार्य काढून घेण्याच्या बाह्य कृतीवरच लक्ष केंद्रित केलें तरी जो मार्ग गेलीं दीडशे वर्षे कमी अधिक प्रमाणांत लढा मिटविण्याच्या कामीं उपयोगी पडला आहे आणि ज्याच्यावांचून सार्वत्रिक संप, समाजसत्तावाद, साम्यवाद हे सर्व वाद अस्तित्वांतच येऊं शकले नसते त्या मार्गांत गूढ असें काय आहे ? जर सत्याग्रह हा शब्द एकाद्या अज्ञात, अज्ञेय आणि अव्यवहार्य गोष्टीबद्दल उपयोगांत आणला तर तो गूढ आणि आध्यात्मिक होतो. परंतु सार्वत्रिक संप ही व्यवहार्य, प्रत्यक्ष आणि स्पष्ट अशी घटना आहे. मग सत्याग्रहच अज्ञेय कां वाटावा ? जेव्हां खरोखर मतभेद नसतात अशा वेळीं शब्द आणि शब्दसमुच्चय यांचा गोंधळ माजवून मतभेद उत्पन्न करणें ही गोष्ट लोकांना सहज साधते ! गांधींच्या भाषेंत सत्याग्रह शब्दाचा उपयोग केला कीं, लगेच एक प्रत्यक्ष आणि स्पष्ट असा लढा, एकदम गूढ, आध्यात्मिक, ध्येयवादी, आणि अर्थातच केवळ कल्पनारम्य होऊन बसतो. तेंच, 'सार्वत्रिक संप' म्हणा कीं, तीच गोष्ट एका क्षणांत शास्त्रीयच नव्हे ऐतिहासिक दृष्टीनें आवश्यक अशी होऊन बसते.

या सत्याग्रहाच्या बाबतींतच नव्हे तर सत्याचें राजकारणांत आवि-

करण करण्याच्या गांधीजींच्या तत्त्वांतील सार आधुनिक मनास उमगत नाहीं. आंतर्सामूहिक आणि आंतर्राष्ट्रीय संबंधांत सत्यपालन ही गोष्ट हल्लींच्या जगांत अतिशय महत्त्वाची गरज होऊन बसली आहे. मुत्सद्दीपणा हा पूर्वी होता तसा चालू राहिला तर हल्लींच्या सुधारणेचें सबंध यंत्र कोल-मडून पडून त्याचे तुकडे तुकडे होण्याचा धोका निश्चित आहे. डॉ. वुड्रो विलसन यांना व गेल्या युद्धांतील इतर व्यवहारज्ञ राजकारणी लोकांना ही गोष्ट स्पष्टपणें समजली होती. राजकारणांतलें सत्य म्हणजे ज्याची नेहमीं प्रशंसा होते आणि ज्याला मुत्सद्दीपणाचे खुले डाव म्हणतात त्याखेरीज दुसरें काय आहे? जेव्हां डॉ. वुड्रो विलसन यांनीं हें तत्त्व जगांतील राष्ट्रांपुढें मांडून त्यांना या तत्त्वावर राष्ट्रसंघ उभारण्याबद्दल सूचना दिली तेव्हां त्यांना कोणीही गूढवादी, आध्यात्मिक किंवा अव्यवहारी राजकारणी म्हटलें नाहीं. जेव्हां रशिया आणि समाज-वाद आणि साम्यवाद 'उघड मुत्सद्दीपणा'बद्दल बोलतात तेव्हां आधुनिक माणसाचा कोणी उपहास करीत नाहीं. त्याचा लोक खरोखर गंभीरपणें विचारच करीत नसतात म्हणून तर असें होत नाहीं ना ? परंतु जेव्हां राजकीय संबंधांत सत्याचा मार्ग चोखाळावा असें गांधी म्हणतात तेव्हां मात्र सगळे शिक्षित, शहाणे आपापले हात वर करून असा आक्रोश करूं लागतात कीं, मानवी मन जोंपर्यंत बदललें नाहीं आणि आजपर्यंत राजकारण जसें चालत आलें आहे तसेंच तें आजहि आहे तोंपर्यंत ही गोष्ट शक्य नाहीं. माथेफिरू लोक नेहमीं शब्दच्छल करीत असतात. आपल्याला याचें उदाहरण धर्मांत सांपडेल. कबूतराच्या रूपानें परमेश्वर अवतीर्ण झाला असें ख्रिस्ती माणूस म्हणाला तर तें विवेकास सुसंगत ठरतें पण ईश्वरी तत्त्व, अवताररूपानें प्रगट झालें असें एखाद्या हिंदूनें म्हटलें तर तो मात्र पौर्वात्य पद्धतीचा लोकभ्रम ठरतो. हिंदूनें जर एखाद्या मूर्तीची पूजा केली तर तो धर्मभोळेपणा पण जर एखादा ग्रंथ किंवा पोथी शेंकडो आवरणांत गुंडाळून दरवेळीं येतां जातां त्याचें चुंबन घेतलें तर तें मात्र विवेकशुद्ध ! जर एखाद्यानें 'उघड राजनीति' हे

शब्द वापरले तर तो व्यवहारी मुत्सद्दी पण राजकारणांत सत्यपालन व्हावें असें कोणीं म्हटलें तर तो मात्र लगेच गूढवादी, संत आणि म्हणून अव्यवहारी राजकारणी ठरतो. सार्वत्रिक संपाची भाषा बोललांत तर तुम्ही शास्त्रीय दृष्टिकोणाचे, पण सत्याग्रह म्हणा कीं, लगेच तुम्ही अशास्त्रीय आणि प्रतिगामी ठरलांच !

असो. गांधींना आपला लढ्याचा मार्ग दक्षिण आफ्रिकेंत सांपडला आणि तेथेंच त्याची त्यांनीं उत्क्रांति केली. त्यांनीं त्याचा तेथें परिणामकारकरीत्या उपयोग केला. येथेंही चंपारण्यांतील आणि असहकाराच्या तीन लढ्यांत त्यांनीं त्याच शस्त्राचा उपयोग केला. त्यांनीं आपलें वैयक्तिक अथवा राष्ट्रीय ध्येय साध्य केलें नसलें तरी या सर्व प्रयोगांत त्यांनीं बरेंच यश संपादन केलें आहे. सशस्त्र बंड देखील पहिल्याच उठावांत किंवा एकदांच प्रयत्न करून यशस्वी होत नाहीं. एखाद्या ध्येयासाठीं होणाऱ्या रणसंग्रामांत अनंत लढाया, चकमकी, युद्धें होतात. माघार आणि चढाई हीं घडत असतात. जर एखाद्या दलाचा युद्धांत जय झाला तर त्यानें स्वतःस यशस्वी समजावें आणि आपलें ध्येय कांहीं कालानंतर आपल्याला नक्की गांठतां येईल अशी साधार आशा बाळगण्यास तेथें कांहींच हरकत नाहीं. या लहान लहान लढ्यांत एखादे वेळीं पराजय झाला तरीसुद्धां, जर तें दल अप्रतिहतपणें पुढें जात असेल आणि त्याचें नैतिक बल कायम राहिलें असेल व त्याची प्रतिकारशक्ति वाढली असेल आणि पुढें पुढें अधिकाधिक चांगलें कार्य केल्याची ग्वाही देतां येणें त्याला शक्य असेल तर ध्येय साध्य झालें नसलें तरी त्यानें अमलांत आणलेला मार्ग योग्यच आहे असें मानलें पाहिजे. गांधींच्या नेतृत्वाखालीं केलेल्या लढ्यांतून ध्येय अद्याप साध्य झालें नसलें तरी त्याची प्रगति चालू आहे आणि प्रतिकारशक्ति वाढत आहे ही गोष्ट फारच थोड्यांना नाकबूल करतां येईल. या सत्याग्रहाच्या लढ्यांमुळें राष्ट्राची शक्ति, त्याग, संघटना, निर्भयता आणि नैतिक बल यांची वाढ झालेली आहे, असें फक्त

पूर्वग्रहदूषित लोकच नाकबूल करूं शकतील. प्रत्येक लढ्यानें अधिकाधिक कष्ट, आणि वाढती दडपशाही ओढवून घेतली; परंतु प्रत्येक वेळीं दडपशाहीला वाढत्या जोमानें प्रतिकार झाला आहे. १९३० मध्यें १९२०–२१ पेक्षां राष्ट्रानें अधिक चांगला लढा दिला. १९३२–३३ मध्यें त्याहीपेक्षां चांगला दिला. त्याचा बाह्य परिणाम १९३० च्या परिणामापेक्षां अधिक चांगला दिसला नाहीं तरी राष्ट्रानें जास्त काळपर्यंत लढा दिला आणि जास्ती प्रभावी प्रतिकार केला, दडपशाही अधिक निर्दयपणानें आणि अधिक कडकपणानें झाली; आणि राष्ट्राला जरी शत्रूच्या प्राबल्यामुळें आणि स्वतः दमून गेल्यामुळें लढा थांबवावा लागला तरी १९३० पेक्षां त्याची आत्मिक शक्ति अधिक वाढली होती. हें कायदेमंडळाच्या निवडणुकींतील राष्ट्राच्या संपूर्ण विजयांत प्रत्यक्ष दिसून आलें. त्यावेळीं आपल्या कष्टांत सत्याग्रहाच्या द्वारें अधिक भर टाकण्यास राष्ट्राची तयारी नव्हती, परंतु त्याचें हृदय कणखर झालें होतें आणि नैतिक बल अभंग होतें. त्या तीन लढ्यांतील पराजय, तह, आणि पुनः पराजय यांचा तात्कालिक असा परिणाम कांहींही झालेला असो, राष्ट्र ध्येयाच्या मार्गावर पुढें जात राहिलें हें निश्चित. अंतिम ध्येय काय तें एकदांच साध्य करतां येतें. कित्येक जयानंतरही आपल्याला ध्येय गांठतां येत नाहीं; परंतु बाह्यतः जय वा पराजय कांहींहि होवो तरी ज्यामुळें आपण जास्त बलसंपन्न होत असलों तर तें पर्यवसान तो जयच समजलें पाहिजे, कारण त्यामुळें आपण ध्येयाच्या अधिक जवळ आलेले असतों.

सत्याग्रहाच्या पूर्वीं असलेल्या मार्गानें हें ध्येय साध्य झालें असतें का, तें आपण आतां पाहूं या. ज्या लोकांनीं कशाही परिस्थितींत केवळ सनदशीर पद्धतींचा अवलंब करण्याचें ठरविलें आहे, त्यांच्याखेरीज बाकीचे पूर्वग्रहरहित दृष्टीनें पाहणारे लोक ही गोष्ट कबूल करतील कीं, सत्याग्रहाचा मार्ग हा सनदशीर चळवळ, अर्ज वा विनंत्या आणि निषेध या गांधीजींच्या आगमनापूर्वींच्या मार्गापेक्षां अधिक प्रगत असा मार्ग आहे.

टीकाकार आतां असें म्हणतील कीं, ही पद्धति जुन्या पद्धतीपेक्षां अधिक प्रगत असली आणि तिनें जरी राष्ट्राला थोडेंसें पुढें नेलें असलें तरी आतां तिचें कार्य संपलें आहे आणि हेतु साध्य झाला आहे. आतां यापुढें तिचा आपणास उपयोग नाहीं. असें जर असेल तर अशा टीकाकारांनीं नवीन आणि अधिक परिणामकारक पद्धति सुचविली पाहिजे. हें त्यांचें कर्तव्य ठरतें. संघटित प्रतिकाराची एखादी नवी पद्धति कोणीं टीकाकारानें आतांपर्यंत आपल्यापुढें ठेवली आहे काय ? उलटपक्षीं सर्व विचारवंत लोक, प्रागतिक म्हणविल्या जाणाऱ्या पक्षांचेही लोक, सध्यां जग आणि विशेषतः हिंदुस्थान ज्या परिस्थितींत सांपडलें आहे त्या परिस्थितींत युद्धाची पद्धत अनत्याचारीच असली पाहिजे हें मान्य करीत आहेत. सध्यांच्या युद्ध आणि विज्ञानाच्या शस्त्रास्त्राची सर्व मक्तेदारी सरकार आणि शासनसंस्थेकडे आहे. अशा स्थितींत बंदूक लाठीपेक्षां किंवा प्राचीन धनुष्यबाणापेक्षां श्रेष्ठ ठरत नाहीं. हवाई आणि रसायनशास्त्रीय युद्धाचीं हत्यारें सरकारच्या हातीं आहेत. अशा या युगांत शस्त्रास्त्रांनीं सज्ज असलेल्या लोकांनाही सरकारशीं दोन हात करणें कठीण आहे. मग हिंदुस्थानसारख्या शस्त्रविहीन देशाला तर तें किती अशक्य असेल ? पुन्हां लष्करी पद्धतीची संघटना उघडपणें करणें शक्य नाहीं. आपल्याला आपली संघटना फक्त अनत्याचारी मार्गांनींच करतां येईल. पुन्हां भौतिक युद्धांतही सरतेशेवटीं संघटना, शिस्त, एकी, शौर्य आणि त्याग या नैतिक गोष्टीच अतिशय महत्त्वाच्या ठरतात. सत्याग्रहांत हे सर्व गुण प्रामुख्यानें असतातच. शेवटला आघात अत्याचारी असो वा अनत्याचारी असो पण सध्यां गांधी-जींच्या नेतृत्वाखालीं राष्ट्र जे गुण संपादित आहे ते संगोपन करण्याच्या योग्यतेचे आहेतच. सर्व गुण शांतताप्रिय मार्गानेंच जास्त चांगले मिळवितां येतील. त्या सर्व गुणांनीं संपन्न असा एक लहानसा क्रांतिवादी गुप्त कट सिद्ध करणें शक्य आहे परंतु सबंध राष्ट्र किंवा त्याचा बराच मोठा भाग या गोष्टी गुप्तपणें करूं शकत नाहीं. म्हणूनच शेवटल्या

हिंसामय लढ्यासाठींसुद्धां सत्याग्रहानें हिंदवासीयांच्या मनांत उद्भूत झालेल्या ह्या नैतिक शक्ति हितावह आहेत; कारण लढ्याच्या दृष्टीनें त्या आधारभूत आहेत. मग तो लढा अहिंसामय असो वा हिंसामय असो. म्हणून कायमचा नसला तरी कांहीं वर्षेपर्यंत तरी सत्याग्रहाच्या मार्गाचा आपल्याला अवलंब करावा लागेल. अतिशय दूरच्या भविष्यकाळावर लक्ष ठेऊन वागणें एखाद्या व्यावहारिक सुधारणावाद्याला शक्य नसतें आणि योग्यहि नसतें. तसेंच तो फक्त आजचाच विचार करील तरी त्याची दिशाभूल होईल. या दोन टोकांमधला सुवर्णमध्य त्याला सांपडला पाहिजे. स्वातंत्र्यासाठीं चाललेल्या सत्याग्रहाच्या अनत्याचारी युद्ध-पद्धतीनें हा सुवर्णमध्य लाभला आहे. म्हणून राजसत्ता काबीज करण्याच्या आतां-पर्यंत झालेल्या सर्व प्रयत्नांत गांधीजींनीं सिद्ध केलेल्या सत्याग्रहाच्या मार्गा-ऐवजीं स्वीकारण्यासारखा दुसरा मार्ग, फार काय अशा एखाद्या मार्गाचें अगदीं ओझरतेंहि दिग्दर्शन दुसऱ्या कोठल्याही पक्षानें केलेलें नाहीं.

क्रांतिमय लढ्यांत प्रत्यक्ष लढ्याचा काळ आणि लढा करणें शक्य नसतें असा काळ हे दोन्हीहि सारख्याच महत्त्वाचे असतात. ज्यावेळीं राजकीय दडपशाहीमुळें किंवा राष्ट्राला थकवा आल्यामुळें राष्ट्र अधिक धोका स्वीकार-ण्यास आणि कष्ट सहन करण्यास तयार नसतें, असा काल म्हणजेच लढा करणें शक्य नसलेला काल होय. अशा वेळीं राष्ट्राला विधायक आणि उपयुक्त असें कांहीं तरी कार्य करावयास दिलें पाहिजे. असें केलें नाहीं तर लढणारे लोक विस्कळित होतील. सत्याग्रही सैनिक मधून मधून आपल्या शिबिरांत परत आलेच पाहिजेत. त्यांनीं त्यांना उत्साहमय आणि कार्यक्षम ठेवण्या-साठीं कांहींतरी कार्य दिलें पाहिजे. तात्पुरता शांततेचा काळही अशाच प्रकारें संघटना मजबूत करण्यांत खर्च झाला पाहिजे. या सर्व गोष्टींकडे जर दुर्लक्ष झालें तर नवीन लढ्याच्या सुरुवातीला राष्ट्राला आपण अगदींच विस्कळित झालों आहोंत असें आढळून येईल, अशा राजकीय निष्क्रियतेच्या आणि शांततेच्या काळांत गांधींनीं आपल्या 'विधायक कार्यक्रमा'चा प्रचार केला आहे. खादी, ग्रामोद्योग, ग्रामकार्य, राष्ट्रीय

शिक्षण, हरिजन कार्य, हिंदुस्थानीचा प्रचार या त्यांनीं उपदेशिलेल्या आणि सुव्यवस्थित स्थापन केलेल्या कार्यांच्या दिशा आहेत. ह्या गोष्टी मूलतः चांगल्या असून कार्यकर्त्यांच्या पक्षाला त्या कार्यव्याप्त ठेवतात. राष्ट्र देखील ह्या चळवळींत भाग घेऊन सामाजिक कार्याचें आणि जबाबदारीचें शिक्षण घेतें. एवढ्यानें संपलें असें नाहीं. जेव्हां सनदशीर कायदेभंग तहकूब होतो, तेव्हांसुद्धां सरकारशीं कांहीं विशिष्ट मुद्यांवर स्थानिक भांडणें चालूच राहूं शकतात. बार्डोली ही अशी एक लढाई होती.

ह्या विधायक आणि भागशः अमलांत येणाऱ्या चळवळींनीं, ज्यांचा प्रत्यक्ष राजकीय लढ्यावर विश्वास नसतो किंवा ज्यांचा राजकीय चळवळींपेक्षां सामाजिक चळवळींकडे अधिक ओढा असतो त्यांना एकत्र आणतां येतें. गांधी आणि त्यांचे सहकारी ह्या चळवळींकडे राजकीय आणि सामाजिक ह्या दोन्ही दृष्टींनीं पहातात. ते जेव्हां या कार्यांत मग्न असतात तेव्हां आपण स्वातंत्र्याच्या लढ्याचे सैनिक आहोंत ही गोष्ट ते कधींच विसरत नाहींत. म्हणून ह्या चळवळींकडे कोत्या सामाजिक सुधारणा किंवा कांहीं क्षुद्रकांची धरपड अशा दृष्टीनें पाहणें किंवा तशीं त्यांना 'नांवें' ठेवणें किंवा प्रतिगामी ठरविणें म्हणजे त्यांना विनाकारण बदनाम करण्यासारखें आहे, त्यामुळें मुख्य मुद्याविषयीं गोंधळ मात्र होतो. लढाऊ स्वरूप नसलेलीं सर्व कार्यें वरवर पाहिल्यास सुधारणावादीच दिसतात. तीं क्रांतिकारक वाटत नाहींत. परंतु उद्दिष्ट आणि ध्येय यांचा विसर पडूं न देतां जर पाहिलें तर ह्याच चळवळी सुधारणात्मक आणि क्रांतिवादीहि ठरतील. त्यांचे तात्कालिक परिणाम सुधारणात्मक असतील तरी जेव्हां कधीं प्रत्यक्ष क्रांति होईल तेव्हां तोहि त्यांचाच दूरगामी परिणाम होता असें आढळून येईल. जेव्हां युद्ध चालू नसतें आणि सैन्य आपल्या राहुटींत विश्रांति घेत असतें तेव्हां अनभिज्ञ माणसास त्यांच्या नित्यक्रमांत युद्धाशीं कांहींही संबंध नसलेला भाग पुष्कळसा आढळेल. त्या काळीं सैनिक जेव्हां खड्डे खणतात, पुनः भरतात, आणि लांब संचलनें करतात. परंतु ते बनावट लक्ष्यावर नेमबाजी करतात पण त्यामुळें

कोणीहि मरत नाहीं! ते लुटुपुटीच्या लढायाहि खेळतात. त्या सर्व कवायती आणि इतर कामें प्रत्यक्ष लढाईशीं त्यांचा तादृश कांहींच संबंध दिसत नाहीं म्हणून जर वर्ज्य ठरविल्या तर सर्व सैन्य विस्कळित होऊन प्रत्यक्ष लढाईच्या वेळीं निरुपयोगी ठरेल. क्रांतिकारक पक्षांनाहि सुधारणावादी असा दैनंदिन कार्यक्रम असतोच. परंतु या कार्यक्रमांवरून कोणी त्यांच्या-विषयीं मत बनवावयाचें नसतें. तसें तें बनविलें तर तें न्याय्य ठरणार नाहीं. शहरांतील जनतेला संघटित करणें आवश्यक आहे. तें कसें होईल? फक्त कामगारमंडळाच्याच द्वारां तें कार्य होऊं शकेल आणि कोण-तेंहि कामगार मंडळ—— तें कितीहि क्रांतिवादी असलें तरी—— केवळ क्रांतिकारक मार्गांनीं संघटित होऊं शकणार नाहीं. संघटनेचा पाया म्हणून कामगारांच्या दैनंदिन गरजांचा विचार केलाच पाहिजे. ह्या गरजांचा क्रांतिवादी ध्येयाशीं प्रत्यक्ष संबंध नसतो. कांहीं वेळपर्यंत कोणत्या ना कोणत्या तरी सुधारणात्मक कार्यावरच विसंबावें लागतें. थोडीफार पगारवाढ, कामाच्या वेळांत थोडी सूट, आणि थोडीं करम-णुकीचीं साधनें यांपुरतेंच कार्य चालतें. कोणतेंहि कामगार मंडळ केवळ क्रांतीच्याच पायावर संघटित होऊं शकत नाहीं. शेतकऱ्यांचे संघ देखील याचप्रमाणें कार्य करतात. त्यांचें दैनंदिन कार्य जरी सुधारणात्मक असलें तरी अंतिम ध्येय क्रांतिवादी असतें. सर्वच सुधारणात्मक कार्य प्रतिगामी आणि क्रांतिविरोधी असतें असा दोष त्याचे माथीं मारणें म्हणजे जी क्रांतिवादी चळवळ जीवनाच्या सर्व आघाडीवर कार्यमग्न ठेवावयाची असते तिच्या भिन्न भिन्न पैलूंकडे दुर्लक्ष करणें होय.

गांधींनीं पुरस्कार केलेला आणि काँग्रेसनें मान्य केलेला अशा कार्यक्रमा-खेरीज दुसरा एखादा अवलंबण्यासारखा कार्यक्रम कोणाही पक्षानें राष्ट्रापुढें ठेवल्याचें माझ्या नजरेस आलेलें नाहीं. क्रांतिमय आणि मूलग्राही कार्यक्रमाच्या गप्पा मी पुष्कळ ऐकल्या आहेत. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत त्या उतरलेल्या मला कधींच दिसल्या नाहींत.

गांधींच्या विधायक कार्यक्रमांपैकीं खादी-उत्पादन आणि खादी-विक्रीचेंच

उदाहरण घेऊं या. सामान्य गिऱ्हाइकाला गांधीमतानुकूल नसलेला क्रांतिवादी काय उपदेश करतो तो मला ऐकावयास मिळालेला नाहीं. परंतु खादी विकत घ्या असें तो म्हणणार नाहीं हें नक्कीच. कारण खादी तर त्याच्या मतें प्रतिगामी आहे. तो गिरणीचें कापड घ्या म्हणून सांगेल काय ? तसें तो सांगू शकत नाहीं; कारण तसें सांगितल्यानें दर क्षणीं पिळणूक करणाऱ्यांना मदत होईल. त्यांचें अपहार-कार्य आणि द्रव्य-लालसा यांवर तर गिऱ्हाइकाला कांहींच निर्बंध घालतां येत नाहींत. परदेशी कापड घ्या असें तरी तो सांगूं शकेल काय ? इतर कोणत्याही कारणांपेक्षां मानसिक दृष्ट्याच असें सांगणें राजकीय लढ्याचे कामीं फार अहितकारक ठरेल. अशा वेळीं तो स्वदेशी गिरणींचें कापड घ्या असें सांगणें पसंत करील असें मत नेहमीं मांडण्यांत येतें. कारण औद्योगिक जीवनाची वाढ झाली म्हणजे शहरांतील बहुजनसमाजाची संख्या वाढेल आणि ती वाढणें क्रांतीला पोषक आहे. ह्याविषयीं जर उपदेशकाची खात्री असली तरी तेवढ्यासाठींसुद्धां त्याचें मत योग्य समजण्यास हरकत नाहीं. परंतु त्यानें कितीही आणि कांहींही म्हटलें तरी हिंदी उद्योगधंद्यांची वाढ करणें त्याच्या हातांत नाहीं. परकीय सरकारनें हिंदी उद्योगधंद्यांची वाढ एका ठराविक मर्यादेपलीकडे कधींच जाऊं दिलेली नाहीं याबद्दल आपण त्यांना एका दृष्टीनें धन्यवादच दिले पाहिजेत. खानेसुमारीचे वेळीं असें दिसून आलें आहे कीं, ही उद्योगधंद्यांची वाढ, हिंदुस्थानच्या वाढत्या लोकसंख्येशीं समप्रमाणांत न राहिल्यामुळें जास्त जास्त लोकांना शेतीवरच अवलंबून राहावें लागत आहे. एकंदर लोकसंख्येशीं औद्योगिक क्षेत्रांतील लोकसंख्येचें मान कमी होत आहे.

दुसरा मुद्दा असा मांडण्यांत येतो कीं, हिंदी उद्योगधंद्यांना उत्तेजन दिल्यानें आपल्या आगामी औद्योगिक जीवनाच्या संघटनेला मदत होईल. पण हें म्हणणें टिकणारें नाहीं. रशियानें असें दाखवून दिलें आहे कीं, सत्ता हातांत आल्यानंतर पंच-वार्षिक किंवा दश-वार्षिक योजना आंखून

कोणताही देश संपूर्णपणें उद्योगप्रधान करतां येतो. आपल्या हातीं सत्ता आली म्हणजे हे जीर्ण आणि दुबळे उद्योगधंदे आपल्या औद्योगिक पुनर्रचनेला फारच मोठी मदत करूं शकतील. अर्थातच आज असलेला खात्रीचा फायदेशीर मार्ग सोडून संशयास्पद असा भावी मार्ग धरणें गरीबांना परवडणार नाहीं व तें सूज्ञपणाचेंही ठरणार नाहीं. पूर्वानुभवाचाही आपण फायदा घेतला पाहिजे. बंगालची फाळणी होण्यापूर्वींची स्वदेशीची चळवळ अयशस्वी ठरली; कारण राष्ट्रानें गिरणी-एजंटांवर विश्वास टाकला. त्यांनीं कापडाची किंमत वाढवली आणि राजकीय मुत्सद्यांचें तें उद्दिष्ट उध्वस्त केलें. या मुत्सद्यांनीं गिरणीमालकांची कृपा आणि राष्ट्रभक्ति यांवर पूर्ण विश्वास टाकला. त्याचा परिणाम अनर्थकारक घडला. आपल्याला जर स्वदेशीचा फायदा करून घ्यावयाचा असेल आणि अराष्ट्रीय आणि अदूरदृष्टि असलेल्या भांडवलदारांच्या कृपेवर अवलंबून रहावयाचें नसेल तर आपल्याला दुसरी कांहींतरी योजना हाताशीं ठेवली पाहिजे. आपल्या खादी आणि ग्रामोद्योगांच्या चळवळींच्या द्वारें गांधीजींनीं अशी योजना आपल्या हातीं दिली आहे. खेरीज यांच्याद्वारें शेतकऱ्यांना फावल्या वेळांत काम मिळतें तें वेगळेंच. मग ह्या योजना प्रतिगामी कशा ठरतात ? कांहीं तर्कवादी असेंही मानतात कीं, ह्या सुधारणांनीं गरीबांची परिस्थिति कांहींशी सुधारते आणि त्यांचा भार हलका झाला म्हणजे त्यांची क्रांतीची तळमळ मारली जाते. हें जर खरें आहे असें मानलें तर खादीच काय पण प्रत्येक कामगार चळवळ, इतकेंच नव्हे तर संपसुद्धां हेंच कार्य करीत असतो. आणि तो संपसुद्धां संपूर्ण क्रांतीसाठीं पुकारला जात नसून कांहीं तरी तात्कालिक सुधारणेसाठींच अवलंबिला जातो. त्यामुळें क्रांतीसाठीं जी 'तालीम' होते तें केवळ अनुषंगिक कार्य असतें.

खादी आणि ग्रामोद्योगाच्या बाबतींत महात्माजी संपूर्णपणें डोळे उघडे ठेवून वागत आहेत याबद्दल वाटेल तेवढा पुरावा देतां येईल. कमींत कमी जीवन-निर्वाह-वेतन निश्चित करणें—आणि तेंही राजकीय सत्ता हातीं नसतांना—यापेक्षां क्रांतिकारक असें आणखी काय आहे ? तरीपण गांधीनीं

आपल्या उपदेशानुरूप चालवलेल्या आणि चाललेल्या सर्व संस्थांमध्यें ही क्रांतिकारक गोष्ट घडवून आणिली आहे. कामगार आणि प्रचारक यांनीं व्यापाराचे आंकडे सादर करून कांहीं निराळें सिद्ध केलें आणि तज्ज्ञांनीं प्रतिकूल मत प्रदर्शित केलें तरीही त्यांनीं हें घडवून आणलें आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थिति बाजूस सारून त्यांनीं आपली क्रांतिकारक दृष्टि आणि उत्साह सिद्ध केला आहे. खादीचे जे कांहीं अवशेष शिल्लक आहेत तेसुद्धां नाहींसे होतील अशी त्यांना भीति दाखविण्यांत आली होती. परंतु संपूर्णपणें न्याय्य आणि क्रांतिकारक तत्त्वांचा अंमल करतांना आपली आवडती योजना नामशेष झाली तरी चालेल असें गांधीजींनीं ठरवलें. त्यांची दूरदृष्टि आणि विश्वास पूर्णपणें योग्य होता असेंच पुढें दिसून आलें. खादीचें ह्या नव्या प्रयोगांनीं कांहींसुद्धां नुकसान झालेलें नाहीं.

औद्योगिक क्षेत्रांतील कामगारांचें उदाहरण घ्या. गांधीजीपासून चैतन्य मिळालेला आणि त्यांच्या सूचनानुसार चाललेला एक कामगार-संघ आहे. ‘ अहमदाबाद मिल मजदूर युनियन ’ इतका सुशिस्त आणि सांपत्तिक सुस्थिति असलेला दुसरा संघ नाहीं. दुसऱ्या कोणत्याही संघाच्या सभासदांमध्यें इतकी सत्यता आणि आर्थिक व्यवहारांतील प्रामाणिकता आढळत नाहीं. सार्वजनिक बालमंदिरें, रात्रींच्या आणि दिवसाच्या शाळा, भोजनालयें, वसतिगृहें, हरिजन-संस्था, सहकारी पेढ्या वगैरे संस्थाचा संघाशीं जितका जास्त संबंध आहे तितका दुसऱ्या कोणत्याही संघाशीं नाहीं.

गांधीजी स्वराज्यासाठीं आतुर झालेले आहेत म्हणून ते आपल्या योजना भव्य प्रमाणावर, चिरंतन आधारावर आंखतात. ‘ एका वर्षांत स्वराज्य ’ अशा घोषणा करतांना देखील ते आपल्या योजना आणि संस्था कायम स्वरूपाच्या करण्याकडे लक्ष देत होते. राष्ट्रीय शिक्षण, खादी, हिंदुस्तानीचा प्रचार, हरिजन कार्य हें एका वर्षांत कधींच झालें नसतें. ह्या योजना आणि संस्था कित्येक वर्षे चालतील अशीच त्यांची

आंखणी होती. स्वराज्याचा तात्कालिन राजकीय हेतु सिद्ध झाला नाहीं खरा परंतु या संस्थांचें व योजनांचें कार्य चालूच राहिलें आणि त्या अधिकाधिक स्वयंपूर्ण होऊं लागल्या. त्यांमुळें क्रांतीचे निखारे विझले नाहींत. या सर्व पुरोगामी संस्था आहेत. त्या कदाचित् अयशस्वी ठरतील; कदाचित् रद्दहि कराव्या लागतील; नव्या, चांगल्या आणि मोठ्या योजना भविष्यकालांत आंखणें भाग पडेल. परंतु राष्ट्राला त्यांच्यामुळें झालेला फायदा आणि त्याची प्रगति या गोष्टी राष्ट्रीय चळवळीच्या अर्धवट अभ्यासकाखेरीज इतर सर्वजण मान्य करतीलच यांत शंका नाहीं.

टीका करणें आणि उपहास करणें हें फार सोपें आहे. पण जेव्हां टीकाकारच विधायक कार्य करूं लागतील आणि संघटित होतील तेव्हां त्यांना असें आढळून येईल कीं, विश्वव्यापी क्रांतीचीं त्यांचीं कार्यें हीं केवळ सुधारणावादी आहेत आणि ज्यांचा आपल्या ध्येयाशीं कांहीं संबंध नाहीं अशा दैनंदिन बारीक सारीक गोष्टीशींच आपला संबंध येत आहे. समजा एखाद्या क्रांतिकारक चळवळीच्या काळांत एखाद्या स्वयंसेवकास पत्रांना तिकिटें लावण्याचें काम नेमून दिलें आहे. त्याच्या पक्षानें ज्या क्रांतीचें ध्येय डोळ्यासमोर ठेविलें असेल त्या क्रांतीशीं त्या स्वयंसेवकास त्या अत्यंत क्षुल्लक आणि कंटाळवाण्या कामाचा संबंध कसा प्रस्थापित करतां येईल ? त्यानें व्यापक दृष्टिकोन आणि कांहीं श्रद्धा धारण केली तरच तें होऊं शकेल. आपलें कार्यहि क्रांतीसाठीं आवश्यकच आहे, त्याची त्याला अशा वृत्तीनेंच जाणीव होईल. गांधीजींच्या ठिकाणीं कोणत्याहि कामांतील हें अंतर्भूत तत्त्व समजण्यासारखा दृष्टिकोण आणि श्रद्धा आहे. धर्मप्रवण माणसाप्रमाणें त्यांना प्रत्येक जीवात्म्याच्या ठिकाणीं परमात्मा आढळून येतो. जी प्रत्येक सुधारणात्मक कृति ते स्वतः करतात किंवा इतरांस करावयास सांगतात तीमध्यें त्यांना स्वराज्यरूपी परमेश्वर दिसतो. मग ते ब्रिटिश सिंहाची आयाळ खेंचण्या-सारख्या कार्यांत मग्न असोत, लहान चरख्यांत कांहीं पूर्णत्व आणण्याच्या कामांत मग्न असोत किंवा आपल्या चिमुकल्या शेगांवची रस्ता-सफाई

करीत असोत. तें सगळें त्यांच्या मतें क्रांतिकारकच आहे. गरीबांस ज्यानें स्वप्रतिष्ठा लाभेल अशा स्वराज्याचें स्वप्न प्रत्यक्षांत आणण्याच्या कार्याचाच हा भाग आहे, असें त्यांना वाटतें. ते अशा श्रद्धेनें काम करीत असतां त्यांच्या अनुयायांमध्यें आणि सहकाऱ्यांमध्यें त्या श्रद्धेचें संक्रमण होत असतें.

जेव्हां राजकीय जीवनास विलक्षण वेग आलेला असतो अशा काळीं करावयाचें क्रांतिक्षम असें प्रत्यक्ष कार्य आणि ज्यावेळीं राष्ट्रीय जीवनौघ संथपणें वाहत असतो अशा, त्यांतल्यात्यांत शांततेच्या काळीं, करावयाचें कार्य असे दोन कार्यक्रम गांधीजींनीं शोधून राष्ट्रासमोर ठेविले आहेत. या आळीपाळीनें येणाऱ्या काळासाठीं यापेक्षां चांगला असा कार्यक्रम कोणत्याहि पुढाऱ्यानें वा पक्षानें सांगितला नाहीं. वरील दोन कार्यक्रम हे स्वातंत्र्यसंपादनासाठीं आहेत. श्रमजीवी वर्गाची सत्ता निर्माण करणें किंवा शेतकरी-कामकऱ्यांचें राज्य निर्माण करणें या हेतूनें हे कार्यक्रम योजिले नाहींत. परंतु गांधींचा कार्यक्रम आणि त्यांचें स्वराज्यसुद्धां देशांतील बहुजनसमाजाच्या दृष्टीनें आणि त्याच्या हितासाठींच आहे. गोलमेज परिषदेच्या वेळीं त्यांनीं जसें जाहीरपणें सांगितलें कीं, " परकीय सत्तेपासून सर्वस्वीं मुक्त होणें आणि तेंहि लक्षावधी मूक, दीन लोकांच्यासाठीं हेंच राष्ट्रीय सभेचें ध्येय आहे. "

केवळ कामगार वर्गाच्या सत्तेकडूनहि बहुजनसमाजाच्या हिताचें चांगलें रक्षण होणें अगदीं शक्य आहे. परंतु अशा तऱ्हेनें हिंदी बहुजनसमाजाचें कल्याण होईल असें अद्याप गांधीजींना वाटत नाहीं. दरम्यानच्या काळांत जे कामगार राज्याचा पुरस्कार करतात त्यांनीं आपण स्वतःचा दुहेरी कार्यक्रम आंखावा आणि त्याची केवळ तात्त्विक चर्चा करीत न बसतां राष्ट्रापुढें त्याचें प्रात्यक्षिक करावें. हा मार्ग त्यांना मोकळाच आहे. असे दुहेरी कार्यक्रम तात्त्विक आणि प्रत्यक्ष स्वरूपांत, त्यांतल्या त्यांत तात्त्विक स्वरूपापेक्षां प्रत्यक्ष स्वरूपांतच जास्त प्रमाणांत आपणापुढें येईपर्यंत आपण आपा-

पल्या ठिकाणींच स्वस्थ राहणें हेंच योग्य आहे. सत्य आणि अहिंसा यांच्या केवळ तात्त्विक आणि काल्पनिक कार्यासाठीं गांधीजींनीं जनतेस हांक मारिली नाहीं. तर त्याबरोबरच प्रत्यक्ष असा कार्यक्रमहि त्यांनीं जनतेपुढें ठेविला. जगाच्या मानानें त्यांची विचारसरणी कित्येक शतकें पुढेंहि असेल परंतु ती कल्पना हिंदी जनतेच्या ठिकाणीं संचालित होईपर्यंत गांधीजी थांबले नाहींत. एखाद्या कल्पनेचा प्रचार करण्याचासुद्धां उत्तम मार्ग म्हणजे त्या कल्पनेप्रमाणें जमेल तेवढें कार्य प्रत्यक्ष करूं लागणें हाच होय, हें गांधीजींनीं बरोबर ओळखलें. जर इतरांना आपापल्या कांहीं विशेष योजनाविषयीं उत्कटता वाटत असेल तर त्यांनींहि गांधीजींचाच मार्ग अनुसरावा. आपणसुद्धां गांधीजींच्या विचारसरणीशीं आणि कार्य-पद्धतीशीं अपरिचितच होतों. गांधीजींना जाऊन मिळण्यासाठीं आपला भूतकाळ, विचार आणि कार्य यांच्या दृढमूल संवयी, आपलीं मूल्यें यांच्याशीं आपणास किती झगडा करावा लागला! जर एखाद्या व्यक्तीनें, किंवा पक्षानें एखादा नवा जास्त चांगला व जास्त व्यवहार्य असा कार्यक्रम पुढें ठेविला तर त्याचा स्वीकार करतांनाहि आपणास असेंच झगडावें लागणार. गांधीजींनीं आपल्या अनुयायांपुढें फक्त दारिद्र्य आणि यातनांचा सवाल टाकला. जर सध्यांपेक्षां कमी यातायातीनें आणि कमी स्वार्थत्यागानें कांहीं निश्चित फलप्राप्ति होण्यासारखी असेल तर तो मार्ग स्वीकारण्याची संधि वाया घालविण्याइतके गांधीजींचे अनुयायी मूर्ख नाहींत! कांहींनीं आपले व्यवसाय सोडले, प्राप्ति सोडली आणि ते खादी आणि ग्रामोद्धार या कार्यांत मग्न झाले आहेत. जेव्हां प्रत्यक्ष सत्याग्रह-संग्राम चालू नसतो तेव्हां या कामानें गरीबाला फार तर २-४ आणे आणि बेकारांना थोडेसें काम मिळतें. रुपया मिळविण्याचा आणि त्याबरोबरच परकीय साम्राज्यशाहीशीं झगडण्याचा कांहीं चांगला आणि जास्त खात्रीलायक मार्ग कोणी दाख-विला तर तो झिडकारण्याइतके नादान नाहींत. जीवितांत अत्यंत महत्त्वाचें असें जें कांहीं मानण्यांत येतें तें म्हणजे व्यवसाय आणि प्राप्ति. त्यांचाहि या लोकांनीं त्याग केला आणि तो केवळ क्षुद्र गोष्टींसाठीं

जर याहीपेक्षां चांगल्या गोष्टी त्यांच्यापुढें ठेविल्या तर ते खात्रीनें याहीपेक्षां मोठा त्याग करण्यास तयार होतील. ज्या पद्धतींचा इतिहासांत कोठें दाखला नाहीं, ज्यांना कांहीं पूर्वपरंपराहि नाहीं अशा गांधीजींच्या अभिनव कार्यपद्धतींत ते सत्पात्र शिष्य ठरले आहेत.

जर यापेक्षां जास्त परिचित, रुळलेली आणि सुलभ अशी पद्धति निघाली तर तिचें स्वागतच होईल; परंतु खरें सांगावयाचें म्हणजे त्यांचा त्यांना मार्ग दिसतच नाहीं. त्यांना तसा कांहीं 'प्रकाश' लाभलाच तर ते, आज ज्यांच्याशीं त्यांचा मतभेद आहे, त्यांच्यांत तत्काल सामील होतील. तोंपर्यंत त्यांना आपल्या मार्गानें अनिर्बंधपणें जाऊं दिलें पाहिजे.

स्वत: ते इतर पक्षीयांना आपापल्या तत्त्वप्रणालीप्रमाणें कार्य करण्यास भरपूर वाव देतात.

परंतु असा प्रश्न निर्माण होतो कीं, कॉंग्रेसचें कार्यतंत्र कोणाच्या नियंत्रणाखालीं राहणार ? या बाबतींत गांधीजींचा पंथ आपणांस मार्गदर्शक होईल. चंपारण्याच्या लढ्याच्या वेळीं त्यांनीं कॉंग्रेसचें सहकार्य देऊं केलें होतें. परंतु त्यांनीं तें नाकारलें .ते म्हणाले, 'कॉंग्रेस ही एक भव्य आणि महत्त्वपूर्ण संघटना आहे. ह्या संघटनेस नवे आणि असिद्ध प्रयोग करतां येणार नाहींत. ज्या प्रश्नाचा गर्भितार्थ आणि पर्यवसान माहीत नाहीं अशा प्रश्नांत न कळत गोवलें जाऊन, सुबुद्धि आणि स्थैर्य याविषयींची आपली प्रतिष्ठा कॉंग्रेसला इरेस घालतां येणार नाहीं. म्हणून गांधीजींनीं कॉंग्रेसकडून फक्त नैतिक पाठिंब्याची अपेक्षा केली. कॉंग्रेसनें आपली परंपरा आणि प्रगति यांच्या वैशिष्ट्यालाच अनुसरावें अशी गांधीजींची इच्छा होती. १९२० सालींसुद्धां त्यांनीं खिलाफत प्रश्नाच्या बाबतींत सत्याग्रहानें आधींच सुरुवात केली होती. आपली योजना त्यांनीं कॉंग्रेसपुढें ठेविली. कॉंग्रेसनें हा एक विशिष्ट प्रश्न हातीं घ्यावा असें त्यांनीं सांगितलें. परंतु त्यांनीं असेंहि सांगितलें कीं, कॉंग्रेसनें तो प्रश्न हातीं घेतला नाहीं तरी ते आपल्या मार्गानें जाणारच. कॉंग्रेसनें स्वीकार केला तरच आपली योजना अंमलांत येईल असें गांधीजी

म्हणाले नाहींत. स्वराज्य-पक्षाच्या वेळीं पुन्हां असेंच झालें. जरी गांधींच्या बाजूनें निर्णय झाला तरी ते स्वतः बाजूस झाले आणि त्यांनीं स्वराज्यपक्षीयांना मार्ग मोकळा करून दिला. म्हणून सर्व पक्षांनीं आपापल्या योजना कॉँग्रेसपुढें मांडाव्यात परंतु जर कॉँग्रेसकडून त्यांचा स्वीकार झाला नाहीं तर त्यांनीं स्वतः त्या पार पाडाव्यात आणि प्रत्यक्ष परिणामानें खात्री पटवून कॉँग्रेस ताब्यांत घ्यावी. अर्थात् हे प्रत्यक्ष परिणाम यशाच्याच रूपानें व्यक्त व्हावयास पाहिजेत असें नाहीं. ज्या योगानें संघटना, प्रयत्न आणि अंतिम यशाविषयींची उत्कटता व्यक्त होईल असे ते परिणाम असावेत. ज्या योगानें संशयवादी माणसास पुढें कांहीं मार्ग दिसेल असें ते परिणाम असावेत. परंतु निरनिराळ्या कार्य-क्षेत्रांत असें कार्य करण्याऐवजीं जर केवळ कॉँग्रेसची वरिष्ठ ठिकाणची सत्ता जिंकण्याचीच यातायात कोणी करीत राहिला तर त्यास असें आढळून येईल कीं, आपण जास्तींत जास्त सोनें मिळविण्याच्या अधीरतेनें सोन्याचीं अंडीं घालणारी कोंबडीच ठार केली आहे. ज्यावर ताबा मिळविला कीं, सामर्थ्यहि आपोआपच प्राप्त होतें असें कॉँग्रेस हें कांहीं एखादें सरकाररूपी यंत्र नव्हे. आपणच जें सामर्थ्य निर्माण करूं त्या-पलीकडे कॉँग्रेसला निराळें सामर्थ्य नाहीं. आपलें देशकार्य, संघटना, त्याग आणि कष्ट यांतूनच तें सामर्थ्य निर्माण होतें. म्हणून कोणत्याहि पक्षानें कॉँग्रेसमधील वरिष्ठ सत्तेलाच एकदम हात घातला तर त्यापासून त्या पक्षाचें कल्याण होणार नाहीं. कॉँग्रेसला एक प्रभावी प्रतिष्ठा आहे हें खरें आहे, परंतु जे कार्य करतात, संघटना करतात आणि कष्ट सोसण्यास आणि त्यागास ज्यांची तयारी आहे त्यांना आणि त्यांनाच ती प्रतिष्ठा केव्हांहि मिळवितां येईल. इतरांना ती कधींच साध्य होणार नाहीं.

प्रत्यक्ष लढा आणि विधायक कार्यक्रम असा गांधीजींचा दुहेरी कार्यक्रम मी वाचकांपुढें ठेविला आहे. कॉँग्रेसकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण आणि पद्धति हींहि मी विशद केलीं आहेत. या सर्व गोष्टींना आपण

आपला पाठिंबा दिला आहे. या तीन पद्धतीपेक्षांहि चांगल्या पद्धती असतील. त्यांची आपण अपेक्षा करीत आहोंतच आणि अशा चांगल्या पद्धती आल्याबरोबर गांधीजींच्या पावलावर पाऊल टाकूनच आम्ही स्वातंत्र्य-युद्धाच्या अगदीं आघाडीवर जाऊन दाखल होऊं. कारण गांधीजी नेहमींच नव्या नव्या ज्ञानाचा स्वीकार करण्यास उत्सुक असतात. ते कोणत्याहि एकाच प्रकारच्या नियमांनीं स्वतःस बांधून घेत नाहींत. आपलें जीवन गांधीपंथास आपण त्याच दृष्टीनें समर्पण केलें आहे. कोणत्याहि एकाच तत्त्वाचे किंवा पंथाचे आम्ही गुलाम झालों नाहीं.

# ‘ बेसिक ’ शिक्षण आणि गांधीजींचें तत्त्वज्ञान   ४

संस्थांमध्यें मतभिन्नता निर्माण झाली, जरूरीपेक्षां जास्त सुधारणावादी होऊन त्यांमध्यें लांचलुचपतीसारख्या गोष्टींचा अंतर्भाव होऊं लागला; थोडक्यांत म्हणजे त्यांच्या ऱ्हासाला सुरुवात झाली म्हणजे पहिली गोष्ट घडते ती अशी कीं, ज्या तत्त्वांवर आणि उद्दिष्टासाठीं त्यांचा प्रथम जन्म झालेला असतो त्यांचें सामर्थ्य संपुष्टांत येतें. प्रधान गोष्टींचें महत्त्व कमी होतें आणि दुय्यम दर्जाच्या गोष्टींना प्राधान्य मिळून संस्थेचें सर्व लक्ष त्यांच्यावरच केंद्रित होतें. हिंदुस्थानांतच नव्हे तर जगांत सर्वत्र प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष वस्तुस्थिति, जें जें दिसतें तें सर्व आणि जें समजूं शकतें तें सर्व या सर्वांचा विचार शिक्षण-पद्धतीला करावा लागला आहे. प्रत्येक कार्यक्षेत्रांत आणि जीवनक्षेत्रांत लोकांनीं ‘ निसर्गाकडे जावें ’ असा, वस्तुजाताचा प्राथमिक अर्थच पहावा, असा स्पष्ट करणारा प्रचार करण्याची वेळ सुधारणावाद्यावर आली आहे. पोषाखांचें साधें उदाहरण घ्या. सुधारलेल्या समाजांत पुरुष आणि विशेषतः स्त्रिया त्याचा उपयोग श्रृंगाराकडे करतात.

पोषाखाची प्रथम सुरुवात कशी झाली ? हवामानामध्यें होणारे बदल मनुष्याला उपद्रवकारक होऊं नयेत, त्याच्या शरीराचा त्यांपासून बचाव व्हावा म्हणून त्याची प्रथम आवश्यकता भासली. आज श्रीमंत लोक त्याचा उपयोग शृंगार, दिखाऊपणा, भपका आणि फॅशन यांसाठीं करतात. मुख्य प्राथमिक उद्देश मागें पडला आहे. अन्नाचे बाबतींतही असाच बदल झालेला आहे. आपले सर्व कपडे आणि अन्न जर काढून घेण्यांत आलें तर थंडीवाऱ्यापासून स्वसंरक्षण करण्यासाठीं आणि भुकेची आग शमवण्यासाठीं मिळेल तें जाडें भरडें कापड आणि अन्न आपण उपयोगांत आणूं यांत मला शंका वाटत नाहीं. म्हणूनच पोषाख आणि अन्न यांची सुधारणा करूं पाहणाराच आपल्याला निसर्गाकडे जाऊन वस्तूंच्या खऱ्या आणि प्राथमिक उपयोगाकडे लक्ष द्यावयास सांगेल.

जग हें 'रूप' आणि 'नाम' यांचें बनलेलें आहे असें हिंदु तत्त्वज्ञानांत सांगितलें आहे. स्वरूपाला प्राधान्य असून नांवाला गौणत्व आहे. भौतिक वस्तू आणि त्यांविषयीं मनुष्यानें केलेली हालचाल नसेल तर नामाला अस्तित्व रहाणार नाहीं. नांवें आणि शब्द हीं अगोदर नसून वस्तूंच्या मागून अस्तित्वांत येतात. परंतु आपल्या शिक्षणपद्धतींत हा क्रम आपण उलटा केला असून तेथें नांवें आणि शब्दसमुच्चय प्रथम येतात आणि उद्दिष्ट मागून येतें. आपल्याला शब्द, वाक्प्रचार, निरनिराळ्या कल्पना प्रथम शिकवण्यांत येतात. लहान मुलांना निसर्गांतील वस्तू आणि त्यांचीं कार्यें यांचा फारच थोडा परिचय घडलेला असतो. आधीं पाहून मग त्यांनीं शिकावें इतका धीर आपल्याला न राहिल्यामुळें आपण शब्दांनीं त्यांना जलद शिकवूं पहातों. परंतु असें करतांना मानवी ज्ञानाची सर्व मदार प्रत्यक्ष प्रयोग आणि निरीक्षणावर आहे याचा आपल्याला विसर पडतो.

गांधीजींनीं जेव्हां आपल्या नवीन सुधारणा जाहीर केल्या तेव्हां ज्या सुशिक्षित लोकांनीं आपलें ज्ञान जुनाट पद्धतीनें शब्द आणि वाक्प्रचार यांच्याच आधारावर मिळविलें होतें त्यांनीं तिला विरोध केला.

त्यांना अत्यंत परिश्रमानें शब्दांच्या द्वारें जें ज्ञान मिळालें तें निसर्ग आणि हस्तव्यवसाय या मार्गानें कसें हस्तगत होऊं शकेल हेंच त्यांना कळेना. गांधीजींचें हें तंत्र त्यांना समजलें नाहीं म्हणून निदान मी तरी त्यांना दोष देणार नाहीं. त्यांना एका एकमेवाद्वितीय आणि मी तर म्हणतो एका 'विचित्र' व्यक्तीशीं झुंज द्यावयाची आहे. तात्त्विक विवेचन, अभ्यास आणि स्पष्टीकरण या पायरी पायरीनें गेल्यावांचून अलिकडच्या सुशिक्षितांना बोधच होत नाहीं. गांधीजींना व्यावहारिक सोप्या मार्गाची इतकी घाई झाली आहे कीं, त्या गोष्टी ते विसरून जातात. शिक्षितांच्या मार्गानें ते जात नाहींत. राष्ट्रापुढें ठेवण्याच्या आपल्या सूचना कां ग्राह्य आहेत यांविषयीं मोठें थोरलें विवेचन ते करीत बसत नाहींत. त्यांच्या प्रचंड कल्पनाशक्तीच्या जोरावर ते आपली योजना एकदम प्रत्यक्ष स्वरूपांतच कशी दिसेल तें पाहूं लागतात. आपली योजना ते एक लहानसें प्रास्ताविक जोडून जाहीर करतात. त्या योजनेपूर्वीं त्यामागील त्यांची विचारमालिका पहायला आपल्याला वाव नसतो. म्हणूनच गांधीजींच्या बाबतींत शिक्षितांची चूक झाली तर त्यांना दोष देतां येत नाहीं. गांधीजींच्या तीव्र बुद्धिमत्तेच्या खेळाला ते अजाणतेपणीं बळी पडतात.

आधुनिक युरोप अथवा अमेरिकेंतील वातावरणांत तयार झालेल्या एखाद्या सुधारणावाद्याला जर शिक्षणाची नवीन योजना सुचवायची असेल तर प्रथम तो शिक्षणाचा एकंदर इतिहास थोडक्यांत निवेदन करील. ज्ञानाची सुरुवात प्राचीन युगांत कशी झाली तें नमूद करील. शास्त्रीय, तत्त्वज्ञानविषयक, राजकीय, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक ज्ञानाची वाढ कसकशी होत गेली तें तो सांगेल. नंतर उत्क्रांतीच्या एका ठराविक टप्प्यानंतर ज्ञानाची वाढ कशी खुंटली आणि त्यापुढें फक्त अनुमान आणि केवळ अभ्यासूपणाच कसा शिल्लक राहिला; धर्मप्रचार आणि तत्त्वज्ञानी यांनीं उत्पन्न केलेल्या शाब्दिक जंजालांत आणि गोंड-बंगालांत ज्ञानाचा कोठेंच कसा पत्ता लागेनासा झाला; नंतर रूसो,

पेस्टलझी, हर्बर्ट, फ्रोबेल, जॉन ड्यूई वगैरे शिक्षणतज्ञांनीं शिक्षण-पद्धति सुधारण्यासाठीं काय प्रयत्न केले आणि कोणत्या योजना आंखल्या त्यांपैकीं किती कोणत्या मर्यादेपर्यंत यशस्वी झाल्या ? आणि कोणत्या अयशस्वी झाल्या; त्या कां अयशस्वी झाल्या, एखाद्या उत्पादनशील धंद्याभोंवतीं ज्ञानाचें जंजाल पसरणें, भांडवलशाही राष्ट्रांतील कारखान्यांत होणाऱ्या केंद्रीकृत प्रचंड उत्पादनामुळें कसें अशक्य झालें आहे हें सर्व तो विशद करून सांगेल. सोव्हिएट रशियांतील शिक्षण-पद्धतीचाही थोडफार उल्लेख केल्यावांचून त्याच्याच्यानें राहवणार नाहीं. हिंदी परिस्थितीला त्याची नवीन योजना किती योग्यपणें लागू पडते तें विशद करून तो आपलें विवेचन संपवील. तो सुचवीत असलेली योजना कशी आवश्यक आहे हेंही ऐतिहासिक अडाख्यावरून त्यानें स्पष्ट केलेलें असेल, ती योजना शिक्षणशास्त्रांतील आधुनिक तंत्राला धरून बनवलेली आहे हेंही तो ठांसून सांगेल. शिक्षित लोकांचें आपल्या तत्त्वज्ञानावर अति गाढ प्रेम असतें हें विसरून चालणार नाहीं.

शिक्षितांची दुसरी अडचण शब्दांच्या गौडबंगालामुळें उत्पन्न होते. कांहीं शब्दांचा जो अर्थ ते एकदां ठरवून टाकतात तोच कायम राहतो; तो ते बदलीत नाहींत. एखाद्या शब्दाचा उपयोग झाला कीं, तो त्याच्या ठराविक अर्थानेंच करण्यांत आला असला पाहिजे आणि त्यासाठीं इकडे तिकडे पहाण्याची मुळींच जरुरी नाहीं असें ते गृहीत धरून चालतात. उदाहरणार्थ, एकाद्या व्यक्तीला भांडवलदार अगर मध्यमवर्गीय असें म्हटलें कीं, शिक्षित समाजवादी त्याला एकदम निर्दय पिळवणूक करणारा समजणार ! तसें समजण्यापूर्वी दुसरी कांहींही माहिती तो विचारणार नाहीं. तसेंच एकाद्या सनातन्यासमोर समाजवादी हा शब्द काढला कीं, लगेच तो सामाजिक रूढींचा भंग करूं इच्छिणारा लाल क्रांतिवादीच आपल्यासमोर उभा आहे या दृष्टीनें विचार करूं लागेल. शिक्षणाची एक योजना वर्ध्याहून गांधीजींनीं पुरस्कृत केली आहे हें समजतांच शब्दांचे हे छळ करणारे अर्थच, तिच्यावर टीकाकार तुटून पाडण्यास कारणीभूत झाले. जणूं काय वर्ध्याहून कधींही

कांहीं चांगलें निष्पन्न होणें शक्य नाहीं. शिवाय शिक्षणक्षेत्रावर आक्रमण करण्याचा गांधीजींना काय अधिकार ? ते हिंदुस्थानांत अथवा परदेशांत कधींही कोठल्याही कॉलेजांत गेले नाहींत. त्यांना शिक्षणाची काय माहिती ? एवढें म्हटल्याबरोबर ती टीका योग्य ठरली ! अर्थातच जी योजना गांधीजींनीं पुरस्कृत केली आहे तिचा गंभीरपणें अभ्यास करण्याचा कोणींच प्रयत्न केला नाहीं. गांधीजींचें व्यक्तिमत्त्व आणि शिक्षणशास्त्रांतला त्यांचा अधिकार यावर भर न देतां त्यांनीं जी योजना मांडली आहे तिचाच जर अभ्यास करण्यांत आला असता तर या नव्या कल्पनेची खरी किंमत त्यांना कळली असती आणि मग जर तीवर टीका झाली असती तर ती अधिक चोखंदळपणें आणि म्हणूनच अधिक विधायक आणि उपयुक्त ठरली असती.

कारणांवरूनच परिणामाविषयीं निर्णय देण्यापूर्वीं शिक्षितांनीं जर या योजनेचा अभ्यास केला असता तर त्यांना ती नैसर्गिक, शास्त्रशुद्ध आणि मानसशास्त्राच्या दृष्टीनें सुसंगत आहे असें कळलें असतें. ज्ञानाची प्रगति निरीक्षण आणि प्रयोग या मार्गानें होते. प्रत्यक्षाकडून अप्रत्यक्षाकडे, आणि प्रायोगिकतेकडून तत्त्वचर्चेकडे असें तें जात असतें. प्रथम आपण निरीक्षण आणि प्रयोग करतों आणि मग अनुमानानें सामान्य तत्त्व शोधून काढतों. सामान्य तत्त्व निघालें म्हणजे त्याच्या परिणामांकडे आपण वळतों आणि कांहीं आडाखे बसवतों. ते आडाखे पुनः प्रयोगानें सिद्ध करावे लागतात. अर्थात् सर्व ज्ञानाची सुरुवात प्रयोगापासून होते आणि तें ज्ञान सत्य कीं असत्य आहे हेंही मानवी अनुभवानेंच सिद्ध होतें.

गांधीजी जेव्हां आपल्या नवीन योजनेचा विचार करीत होते तेव्हां ते या शास्त्रीय परिस्थितीचाही विचार करीत होते. बालमानसशास्त्राच्या दृष्टीनेंही ते विचार करीत होते. लहान मुलाला प्रत्यक्ष आणि स्पष्ट गोष्टींवरून कल्पनेकडे जाणें स्वाभाविक आणि सोपें असतें. विचारापेक्षां आचाराकडे असलेल्या त्याच्या प्रवृत्तीमुळें हातानें कांहीं तरी व्यवसाय करून ज्ञान मिळविणें त्याला अधिक सोपें जातें. सध्यांची शिक्षणपद्धति या बालमानस-

शास्त्राविरुद्ध आहे. ज्ञान त्याला आज कानांनीं ऐकून मिळतें आणि तो तें तोंडानें बडबडतो. लहानपणीं ज्या पुष्कळशा वस्तूंचीं नांवें मला पाठ करावीं लागलीं त्यांचा अर्थ कित्येक वर्षांनंतर, जेव्हां त्या वस्तूंशीं माझा प्रत्यक्ष व्यवहारांत संबंध आला तेव्हां कळला. त्या ऐवजीं जर प्रथमच मला त्या वस्तू दाखवण्यांत आल्या असत्या किंवा त्याहून उत्तम मार्ग म्हणजे प्रत्यक्ष 'हाताळावयास' मिळाल्या असत्या तर मी किती तरी चांगलें आणि जलद् शिकलों असतों असें मला खात्रीनें वाटतें.

ही झाली पद्धतीची गोष्ट. जर पद्धत नैसर्गिक आणि शास्त्रीय असेल तर शिक्षणाचें साध्य कांहींही असो तें हस्तगत करावयाला ती पद्धत जास्त सोयिस्कर पडेल. युरोप आणि अमेरिकेंतील आधुनिक शिक्षणाच्या इतिहासांत, सरकारला अथवा शिक्षणतज्ज्ञाला कोणतेंही शिक्षण द्यावयाचें असो त्यानें व्यावसायिक अथवा कृतिप्रधान पद्धतीचाच अवलंब करावा असें उपदेशिलें आहे. ही पद्धति व्यक्तिवादी अथवा भांडवलदारी आणि समाजवादी अशा सर्व समाजांकरितां सोयिस्कर आहे असेंही प्रतिपादण्यांत आलें आहे. धार्मिक संस्थांनींही तिचाच पुरस्कार केला आहे. एकंदरींत शिक्षणाचें उद्दिष्ट कांहींही असो ही पद्धति निश्चित चांगली ठरली आहे. एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवावयास हवी, ती अशी कीं, गांधीजींना व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाच्या इतर तत्त्वज्ञानाबरोबरच ही पद्धतीही सुचली. म्हणूनच अगदीं सारांशरूपानें कां होईना ज्या तत्त्वज्ञानाची गांधीजी शिफारस करतात त्याचा आढावा येथें घेणें अयोग्य ठरणार नाहीं. किंबहुना तो आढावा घेणें आवश्यकच आहे. कारण आपल्या शिक्षणाचा ऱ्हास जुनाट आणि सदोष पद्धतीपुढें तर झाला आहेच पण त्याहीपेक्षां अधिक ऱ्हास चुकीच्या आणि नादान ध्येयांमुळें झाला आहे.

गोऱ्या सरकारकरतां काळे कारभारी आणि कारकून स्वस्तांत तयार करण्यासाठींच सध्यांची पद्धति अमलांत आणली गेली असें मी म्हणतों. त्याहून अधिक वरच्या दर्जाचें ध्येय होतेंच असें ज्यांना म्हणावयाचें असेल त्यांना मेकॉलेच्या शब्दांत सांगावें लागेल कीं,

"—विचारसरणी आणि संस्कृति या बाबतींत अँग्लो-सॅक्सन लोकांचा एक असा वंश निर्माण करावयाचा कीं, जो फक्त त्यांच्या कातडीच्या रंगापुरता आणि त्यांच्या धमन्यांतील रक्तापुरताच हिंदी राहील." कांहीं अंशीं हें साध्य देखील साधलें असतें तर श्रेयस्कर वाटूं शकलें असतें. अँग्लो सॅक्सन लोक त्यांच्या स्वतःच्या देशांत फार चांगुलपणानें वागतात आणि त्यांच्या अंगांत तेथें दिसून येणारे कांहीं सद्गुण घेण्यासारखे असतात. हिंदी लोकांना जर त्या प्रकारचे अँग्लो-सॅक्सन बनवण्याची या शिक्षणाची खटपट असती तरी त्यांत फारसें वावगें कांहीं झालें नसतें. परंतु ती गोष्ट शक्य नाहीं असें आतां एक शतकानंतरही दिसून आलें आहे. सुशिक्षित हिंदी माणूस कांहीं ठराविक गोष्टींतच अँग्लो-सॅक्सन बनला आहे आणि त्या गोष्टी मोठ्याशा स्तुत्य नाहींत. त्याच्या पूर्वजांचे कांहीं चांगले गुण सोडून देऊन आपल्या मालकांचे कांहीं वाईट दोष त्यानें उचलले आहेत. कांहीं अपवाद असणें शक्य आहे पण ते थोडे आणि क्वचित् आढळणारे. परंतु हिंदुस्थानांतील बहुजनसमाजाचें (कोणत्याही दृष्टीनें) आंग्लीकरण होऊं शकेल असें म्हणणेंच अविचाराचें होतें. या शिक्षणाचा एकच परिणाम झाला तो म्हणजे शिकलेला हिंदी मनुष्य त्याच्या देशबांधवांपासून दूर गेला आणि अत्यंत कष्टानें त्यानें प्राप्त करून घेतलेलें थोडें-फार ज्ञान त्याच्याजवळच राहिलें; तें बहुजनसमाजापर्यंत पसरूं शकलें नाहीं. त्याच्या आणि इतरांच्या दरम्यान एक अभेद्य तट निर्माण झाला. हा तट अधिकाधिक मजबूत होत गेला असता परंतु एकाच ध्येयासाठीं झगडण्याच्या राष्ट्रीय चळवळीच्या संदेशानें वरचे वर्ग आणि सामान्य जनता यांना एकमेकांजवळ येणें भाग पाडलें. शिक्षणपद्धति बदलणें आवश्यक आहे असें जर आपल्याला वाटत असेल तर त्या शिक्षणाचें ध्येय उदात्त असणें त्याहूनहि आवश्यक आहे.

गांधीजींसारख्या सुधारणावाद्याचें तत्त्वज्ञान समजण्यासाठीं इतिहासाच्या पार्श्वभूमिकेवरून त्याकडे पाहिलें पाहिजे. सध्यांच्या परिस्थितींत ते सुचवीत

असलेल्या सुधारणा किती मूल्यवान् आहेत हें त्यांचा तसा अभ्यास केला तरच समजूं शकेल.

निसर्गत: जन्मलेला मनुष्य हळूहळू बदलून त्याचा नैतिक व आध्यात्मिक मानव तयार करून त्याला नैतिक आणि आध्यात्मिक प्रकृतीच्या समाजाचा घटक बनविणें हें इतिहासाचें उद्दिष्ट आहे. नैतिक व्यक्ति म्हणजे काय ? निरनिराळ्या दृष्टिकोनांतून निरनिराळ्या व्याख्या देतां येतील. नैतिक किंवा आध्यात्मिक मानव म्हणजे स्वतंत्र मनुष्य असें मी म्हटलें तर कोणाचा मतभेद होईलसें मला वाटत नाहीं. त्याला वाटेल ती प्रत्येक गोष्ट तो करण्यास स्वतंत्र आहे असा मात्र स्वतंत्र या शब्दाचा येथें अर्थ नाहीं. तें स्वातंत्र्य श्वापदांचें स्वैराचारी स्वातंत्र्य ठरेल. मानवी स्वातंत्र्य, मानवी जबाबदारीपासून विभक्त असें राहणें शक्य नाहीं. नैतिक मनुष्य आवडी-निवडीच्या बाबतींत जितका स्वतंत्र तितकाच संयमी आणि स्वैर तितकाच जबाबदार असतो. हें ध्येय गांठण्यासाठीं तो अशाच एका नैतिक समाजाचा घटक असला पाहिजे. हा परिणाम घडवून आण-ण्याकडेच इतिहासाचें पाऊल सारखें पडत आहे.

मानवतेची सुरुवात झगडा, हिंसा आणि त्यांच्याचबरोबर स्वाभाविक कावेबाजपणा यांनीं झाली. जीवन अशाश्वत आणि अस्थिर होतें. त्या गोंधळाच्या परिस्थितींतून एकदांचा कसाबसा मार्ग निघाला. मनुष्यानें कौटुंबिक संघटना केली, टोळ्या बनवल्या; पुढें जाति, वर्ग, देश आणि राष्ट्रें निर्माण झालीं. सामाजिक व्यवस्था आणि तिची नियमबद्धता आणि न्याय यांची उभारणी झाली. युद्ध आणि हिंसा यांना थोडें फार मागें हटविण्यांत आलें. परंतु या प्राथमिक संस्था मात्र युद्ध आणि हिंसा यांच्याच सहाय्यानें निर्माण झाल्या. सत्ताधारी व्यक्ति आणि वर्ग यांनीं आपली इच्छा आणि कायदे जितांवर आणि दुबळ्या लोकांवर लादले. प्रत्येक सामाजिक समूहाचे धनी आणि गुलाम; राज्यकर्ते आणि रयत, राजा आणि प्रजा, अमीर-उमराव आणि बहुजन-समाज, सरदार आणि दास अशा प्रकारचे विभाग पडले. या गटांत अंतर्गत

विभाग असले तरी बाह्यतः प्रत्येक गट दुसऱ्या सर्व गटांशीं शत्रुत्वाच्या नात्यानें वागे. समता आणि ऐक्य यांना विरोधक अशी ही भूमिका असूनही ही अन्याय्य आणि हिंसक नियमबद्धता प्रगतीच्या मार्गावरील एक टप्पा होती. बळी तो कान पिळी या नियमाला या टप्प्यानें कांहींसा पायबंद घातला. अशा समाजांत राजा हा ईश्वरी अवतार समजला जाई; कारण त्यानें मनुष्याच्या एका समूहांत तरी थोडीफार नियमबद्धता आणि न्याय यांची प्रस्थापना करण्यांत यश मिळविलें होतें. हा एक नैतिक फायदाच होता. कारण गडबड, गोंधळ आणि अनिश्चितपणापेक्षां कसल्याही प्रकारची कां होईना नियमबद्धता प्रस्थापित होऊन कोणत्या तरी प्रकारचें सामाजिक जीवन जगण्याची शक्यता उत्पन्न होणें अधिक श्रेयस्कर आहे हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. मात्र हा गडबडगोंधळ तात्पुरता किंवा अधिक चांगली नियमबद्धता प्रस्थापित होण्यापूर्वीं द्यावी लागणारी किंमत अशा स्वरूपाचा असला तरच बरें !

अतिमानवी अशी नैतिक आणि आध्यात्मिक प्रवृत्ति असलेल्या व्यक्तींच्या ठिकाणीं त्या मानवसमाजाची बंधुत्व, समता आणि न्याय यांची अपेक्षा पूर्ण झाली नाहीं. अधिक वरच्या दर्जाचा चांगुलपणा, न्याय आणि प्रेम यांची हांक त्यांना ऐकूं येऊं लागली. मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगाशीं एकरूप होण्याची त्यांची तहान त्यांनीं कशी भागवावयाची ? धनी आणि दास या दोन प्रकारचे तट असलेला समाज, ही अंतर्गत ओढ पूर्ण करूं शकत नव्हता. तेव्हां ही ओढ लागतांच संसाराचा त्याग करून ते जगापासून दूर दूर गेले आणि तेथें एकाकी जीवन कंठून आपल्या ध्येयमार्गानें जाण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. अंतःशोधक बनून त्यांनीं जगाशीं असलेला आपला संबंध तोडला. बुद्धानें संन्यास घेतला त्याचें मर्म हेंच. ह्या जगांत ईश्वरी राज्य प्रस्थापित करण्याचा नाद निराश होऊन सोडून देऊन येशू ख्रिस्ताला जाहीर करावें लागलें कीं, तें राज्य इहलोकांतलें नसून परलोकचें आहे. या धर्मसुधारकांनीं केलेला स्वमतप्रचार व्यक्तीच्या मोक्षसाधनासाठीं आणि व्यक्तींनाच उद्देशून

केलेला होता. जोंपर्यंत या जगांत एक तरी मुमुक्षु आहे तोंपर्यंत मला पुनः पुनः जन्म मिळावा अशी इच्छा बुद्धाला प्रकाशदर्शन झाल्यावर प्रदर्शित करावी लागली. मानवी समाज म्हणजे अनेक व्यक्तींचा समूह एवढीच त्याची व्याख्या. या समाजाचें बाह्यस्वरूप तावडतोब आणि इह-लोकांतच बदलण्याची त्याची मनीषा नव्हती.

आदर्श व्यक्तींनीं घालून दिलेलें उदाहरण आणि आदर्श यांचा थोडासा परिणाम अप्रत्यक्ष रीत्या सामाजिक जीवनावर होई. परंतु इत-रांच्या बाबतींत एका बाजूस धार्मिक जीवन आणि दुसरीकडे भौतिक आणि सामाजिक जीवन यांत अतिशय मोठें अंतर निर्माण झालें होतें. उत्तम अध्यात्मवाद्याला जगापासून दूर जाऊन मायामोहाचा त्याग करून, नैसर्गिक श्रमांपासूनही अलिप्त रहावें लागे. बुद्धानें, राजे आणि महाराजे यांनाही अहिंसेचे पाठ दिले, ते त्यांच्या व्यक्तिगत मोक्ष साधनासाठीं आणि जीवन-पूर्तीसाठीं. ख्रिस्ती धर्मातील ख्रिस्तप्रणीत वसुधैव कुटुंबकम् वृत्ति आणि विश्वबंधुत्वाचें नातें मान्य करणें राजनैतिक पुढारी आणि संघटक यांना संपूर्णपणें लागू नव्हतें. जैनांचा सर्वांत अधिक अहिंसक गट देखील राजे-रजवाड्यांना अहिंसेच्या तत्त्वाबाहेर रहाण्यास संमति देत होता. परंतु यांपैकीं कोणालाही वैयक्तिक मोक्षप्राप्तीला मज्जाव नव्हता. अशा रीतीनें धनी आणि गुलाम यांमध्यें विभक्त झालेला समाज, जगरहाटीप्रमाणें वागणारे आणि विरागी होऊन ईश्वरभक्तीच्या मार्गानें जाणारे अशा दोन प्रकारांनीं आणखी विभक्त झाला. बाह्यतः सुसंघटित समाजांतील व्यवहा-रामुळें जें स्वातंत्र्य, समानता आणि प्रेम मिळणें अशक्य होतें तें ईश्वर-भक्तीच्या मार्गानें गेलेल्यांना भौतिक सुखांचा त्याग केल्यानेंच मिळूं शके. जरी सामाजिक, राजनैतिक आणि आर्थिक व्यवहारांवर त्यांचा कांहींच अधिकार चालूं शकला नाहीं तरी व्यक्ति आणि तिच्या भोंव-तीच्या बिकट परिस्थितींतून तिला मिळणारें स्वातंत्र्य यांचें नैतिक मूल्य फार मोठें आहे हें त्यांनीं निःसंशय सिद्ध करून दाखविलें. सामान्य

जीवनाच्या मानानें ते उत्तुंग स्थानावर विराजमान झाले. मानवतेच्या दृष्टीनें हाही एक मोठा फायदा होता.

सुसंघटित समाजाकडून होणारा व्यक्तीविषयींचा अन्याय आणि क्रौर्य यांची मात्र वाढ होतच राहिली. शेवटीं सामान्य मनुष्य आपल्या कुंभकर्णी झोपेंतून एकदांचा जागा झाला आणि आपल्या धन्याविरुद्ध आपले हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करूं लागला. ह्या विरोधांतून लोकशाहीचा जन्म झाला. लोकशाहीनें व्यक्तीचें समाजांतील नैतिक स्थान मान्य केलें असून समतेचा पाया घालून दिला आहे. व्यक्तीच्या राजनैतिक पिळवणुकीला लोकशाहीनें तत्त्वतः तरी आळा खास घातला आहे. एखाद्या गोष्टीचा निर्णय माणसें मारून न करतां त्यांची मतमोजणी करून होत आहे. लोकशाहीनें राज्यकर्ते बदलण्याला वाव ठेवला आहे. तसेंच आज्ञापालनालाही स्थान दिलें आहे. स्वातंत्र्याबरोबरच जबाबदारीहि तिनें जोडून दिली आहे. लोकशाही हें भौतिक आणि राजकीय पातळीवर असलेलें नैतिक आणि आध्यात्मिक तत्त्व आहे. अशा परिस्थितींत ज्या कामकरी वर्गास 'स्वतःच्या शृंखला' फक्त तोडावयाच्याच आहेत ते आपले प्रश्न सोडविण्यासाठीं कम्युनिस्ट पद्धतीची सर्वंकष राजसत्ता मान्य करण्यास कदाचित् तयार होणार नाहींतहि. अत्यंत परिश्रमानें आणि कष्टानें त्यांनीं राजकीय समता प्राप्त करून घेतली आहे आणि तिच्या जोरावर त्यांना वैयक्तिक सन्मानस्थान प्राप्त झालें आहे व तें टिकण्याची शाश्वति आहे. हें नवें स्वातंत्र्य एका अज्ञात फलाच्या आशेनें क्रांतीच्या पायदळीं फेंकून देण्याचा धोका पत्करण्यास ते तयार होणार नाहींत.

हीं नवीन लोकशाहीचीं तत्त्वें वाढीस लागण्याला जर राष्ट्रांच्या राजनैतिक व्यवहारामध्यें पुरेसा वाव मिळाला असता तर आंतरराष्ट्रीय कलह नाहींसे होण्याला आणि कालांतरानें एकमुखी आणि एकजुटीची सामाजिक व्यवस्था निर्माण होण्यास त्यांची मदत झाली असती. समाजाची नीति आपोआप सुधारणेच्या मार्गास लागली असती. व्यक्तिगत मोक्ष-

साधनासाठीं जंगलाचा अथवा हिमालयाच्या शिखराचा रस्ता धरावा लागला नसता. परंतु समाजाची प्रगति कधींही सरळ रेषेंत होत नाहीं. तो मार्ग वेडावांकडाच असतो. प्रगति होत असते आणि कधीं पुच्छगति देखील होऊं लागते. मनुष्यानें लोकशाहीचा शोध लावला तेव्हांच त्याला वाफ, वीज आणि इतर नैसर्गिक शक्तीही सांपडल्या. त्याच वेळीं नवनवीन देश त्याच्या प्रवासाच्या कक्षेंत आले आणि यांत्रिक युग आणि आधुनिक साम्राज्यें यांची मुहूर्तमेढ रोंविली गेली. या नवीन गोष्टींमुळें घडून आलेले फरक नमूद करणें म्हणजे मोठा इतिहासच सांगावा लागेल. आजही तो संपूर्ण झालेला नाहीं. यांत्रिक युगाचे इतर कांहींही फायदे असोत. लोकशाहीचे सर्व फायदे मात्र त्यानें धुळीला मिळविले. जुने भेद आणि विषमता त्यानें नव्या आर्थिक दृष्टीनें पुनः निर्माण केली. समाजाचे नवीन तुकडे पडले. ज्यांच्याजवळ गडगंज आहे ते श्रीमंत आणि ज्यांच्याजवळ कांहीं नाहीं असे कफल्लक, यंत्रांचे मालक आणि हातावर पोट भरणारे मजूर, मध्यमवर्ग आणि बहुजनसमाज असे भेद असलेल्या समाजांत योग्य पातळीवर मनुष्याची समानता मान्य करणाऱ्या मताला कांहींच अर्थ उरत नाहीं. पूर्वीचेच विरोध आतां नव्यानें आर्थिक पातळीवर दिसून येऊं लागले. पूर्वी राजकीय सत्ता हातांत असली म्हणजे आर्थिक भानगडीवर ताबा ठेवतां येत असे; आतां आर्थिक सत्ता ताब्यांत ठेऊन तिच्या द्वारें राजनीतिशकट हांकतां येऊं लागला. अनैतिक समाजांत नैतिक मनुष्य सांपडावा असा प्रकार पुनः दिसूं लागला.

मनुष्यजातीच्या बचावासाठीं लोकशाहीव्यतिरिक्त आणखी नवें तत्त्व शोधून काढणें भाग झालें. ही नवी गरज आर्थिक होती. म्हणून आर्थिक समतेचें तत्त्व शोधून काढण्यांत आलें आणि समाजवादाचा पुरस्कार झाला. समाजवादांत मनुष्याच्या आर्थिक समतेला मान्यता देण्यांत आली आहे. खरें पाहतां तें नैतिक आणि आध्यात्मिक तत्त्व आहे. परंतु या तत्त्वाचे पुरस्कर्ते मात्र तें केवळ जडवादी मानूं लागले आणि नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांचें समाजांतून उच्चाटन झालें तरच आर्थिक

समता शक्य आहे असें प्रतिपादन करूं लागले. त्यामुळें लोकशाहीशीं त्याचा विरोध उत्पन्न झाला. शास्त्रीय, यांत्रिक, आणि केंद्रीकृत आर्थिक सत्तेच्या या युगांत जन्मलेल्या समाजवादाला आपल्याभोंवतालची परिस्थिति टाळतां येईना. भांडवलशाहीनें स्वतंत्र आणि जबाबदार व्यक्तीला मूठमाती देऊन लोकशाहीवर सर्वांत भयंकर आघात केला हें विसरून जाऊन समाजवादाच्या पुरस्कर्त्यांनीं भांडवलशाही म्हणजेच लोकशाही असें चुकीचें समीकरण बसवून टाकलें. मनुष्यजातीनें पूर्वीं केलेली प्रगति बाद करून या नवीन तत्त्वाचें प्रतिपादन सुरू झालें. तसेंच व्यक्तीचें स्वातंत्र्य हें देखील भांडवलशाहीच्या अनंत दुर्गुणांनच जमा होऊं लागलें. त्यामुळें अनियमित आणि अनिर्बंध वैयक्तिक जीवनाला आळा घालण्याऐवजीं वैयक्तिक जीवनच बरबाद करून टाकणें हा उपाय शोधण्यांत आला. मार्क्सवाद्याला व्यक्ति म्हणजे सामाजिक व्यवहार पार पाडणारा एक घटक एवढेंच समजतें. हा उपाय मूळ रोगापेक्षांही अधिक भयंकर आहे. त्यानें रोगाबरोबर रोग्याचीही वासलात लागत आहे. व्यक्तिजीवनाचा विनाश प्रतिपादन करणें तत्त्वतः देखील सोपें नव्हतें. म्हणून मार्क्सवादी क्रांतीनंतर व्यक्तिजीवनाचें नवीन स्वरूप अस्तित्वांत येईल असा विश्वास प्रगट करण्यांत आला. ज्यांचा आध्यात्मिक पुनरुत्थानावरील विश्वास उडाला होता ते भौतिक दृष्ट्या तीच श्रद्धा निर्माण करूं पहात आहेत.

या नवीन तत्त्वाचा परिणाम आपल्याला रशियांत दिसत आहे. तेथें आर्थिक पातळी कांहींशी समतोल आहे. परंतु त्यासाठीं वैयक्तिक स्वातंत्र्य आणि इच्छा यांची जवळ जवळ संपूर्ण नाकेबंदी करण्यांत आली आहे. अर्थात्‌च ह्या नवीन तत्त्वासाठीं समाजाव्यतिरिक्त वेगळें असें अस्तित्व व्यक्तीला उरतच नाहीं. या आणि इतर कित्येक बाबतींत कम्यूनिझम आणि फॅसिझम दोन्ही एकच आहेत. फॅसिस्टांना वाटतें कीं, व्यक्ति ही राष्ट्रांतील अथवा वांशिक राजकारणांतील एक घटक आहे; तर कम्यूनिस्टांना वाटतें कीं, ती सामूहिक जागतिक बहुजनसमाजाचा एक घटक आहे. जोंपर्यंत जागतिक बहुजनसमाज आपल्या हक्क व अधिकारांविषयीं

जागृत होऊन एकत्र येत नाहीं तोंपर्यंत रशियांतील व्यक्तीचें तेथील राजकारणांतील स्थान आणि जर्मनी किंवा इटालींतील व्यक्तीचें तेथील राजकारणांतील स्थान यांत फरक नाहीं. कम्यूनिस्ट आणि फॅसिस्ट या दोन्ही राष्ट्रांतील व्यक्तीस, शरीरांतील लहानलहान विभागांना संघटित स्वरूपांतील शरीराचे हुकूम पाळतांना जेवढें स्वातंत्र्य असतें तेवढेंच, आपल्या पक्षानें केलेले हुकूम पाळण्याचें राजनैतिक स्वातंत्र्य मिळणार. तेथें व्यक्तीला स्वतःचें जीवन अथवा इच्छा अशी कांहीं नाहीं.

आर्थिक क्षेत्रांतील समाजसत्तावादी समता मोठ्या केंद्रीभूत यंत्र-व्यवसायांवर आणि शेतीवर आधारलेली आहे. या केंद्रीकरणाचा परिणाम राजकीय क्षेत्रावरही झालेला आहे. त्याचा परिणाम नोकरशाही राज्य-व्यवस्थेंत झाला आहे. सत्ताधाऱ्यांना कोणतेही गैरवाजवी असे आर्थिक कायदे प्रत्यक्षपणें नाहींत (आणि तसें जर्मनी किंवा इटालींतही मिळत नाहींत.) परंतु अधिकाराची जागा ज्यांचें आर्थिक मूल्य बरेंच आहे असे फायदे त्यांना मिळवून देते. शिवाय गर्व आणि सत्ता यांवर नियंत्रण घालण्याचें साधन कोणतेंच नाहीं. बाह्य नियंत्रणें महत्त्वाचीं आहेत हें खरें; परंतु मनुष्याच्या स्वाभाविक गर्विष्ठ प्रवृत्तीच्या मुळाशीं घाव घालणें त्यांना शक्य होत नाहीं. राजकारणाच्या क्षेत्रांतील कांहीं ठराविक जागा नेहेमींच इतरांपेक्षां अधिक महत्त्वाच्या रहावयाच्या. नैतिक नियंत्रण जर आपण अमान्य केलें तर गर्व नियंत्रित करण्याला दुसरें कांहींच साधन नाहीं. आणि अर्थातच सत्तेचा आणि अधिकाराचा जाच थांबविण्यालाही उपाय नाहीं. पूर्वकालांतील साम्राज्यशाही, राजेशाही आणि हिटलरशाही यांनीं कांहीं ठराविक भाग आपल्या हातीं ठेवून बाकीच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांत स्वायत्तता दिली होती. अशीं स्वायत्त क्षेत्रें समाजसत्तावादांत संपूर्णपणें नष्ट करण्यांत आलीं हें आपणांस माहीत आहे. त्यामुळें अशा ठिकाणची परिस्थिति तर लोकशाही राष्ट्रांतल्यापेक्षांही अधिक असह्य झाली.

बराच बोलबाला झालेली रशियांतील स्वायत्तशासन पद्धति, व्यवहारापेक्षां

तत्त्वांतच अधिक दिसतें. सर्व कारखाने, धंदे, व्यवसाय, व्यापार, शेती आणि समाजाचें जीवन राष्ट्रीय दृष्टीनें संघटित करण्याचा प्रयत्न चालू आहे. तेथें स्थानिक संस्थांना नवीन योजना करण्याला आणि पार पाडण्याला वाव कोठून मिळणार ? त्यास आवश्यक तें ज्ञान, माहिती किंवा कौशल्य त्यांच्याजवळ कुठलें असायला ? क्रांतीच्या नेत्यांना स्टालिनच्या राजवटींत ज्या प्रकारें वागवण्यांत आलें त्यावरून तेथील राजकीय स्वातंत्र्याची कल्पना करतां येते. रशियाच्या सध्यांच्या परराष्ट्रीय धोरणावरून स्थानिक संस्थांना सरकारच्या प्रचंड राजकारणांत फेरबदल घडविण्याला कितपत वाव मिळूं शकतो तें समजतें. आंतरराष्ट्रीय राजकारणांत रशियाचें परराष्ट्रीय धोरण इतर भांडवलशाही आणि फासिस्ट देशांइतकेंच तापदायक आहे. खुल्या राजकारणाचें तत्त्व या हजारों गोष्टींतील इतर तत्त्वाप्रमाणें बाजूला पडलें. तरी पण भाबड्या माणसास तीं सर्व तत्त्वें फेकून दिल्यासारखीं न वाटतां पालन केल्यासारखीं वाटतात. कम्युनिझमनें निरनिराळ्या प्रश्नांवरील जे उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे त्यांत नैतिक बाजूचा मुळींच विचार केलेला नाहीं हें लक्षांत ठेवलें, म्हणजे वरील गोष्टीविषयीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

आधुनिक लोकशाहीचा उद्गम शास्त्रीय शोधांबरोबरच झाला. या यांत्रिक शोधांनीं नैतिक आणि आध्यात्मिक विचारसरणीला मागें रेटलें. अशा परिस्थितींत लोकशाही ही अधिक संघटित राजकारणाची कृति बनली. व्यक्तिस्वातंत्र्याच्या जोडीला नैतिक जबाबदारी न राहिल्यामुळें एकच गोंधळ झाला. त्यांत यांत्रिक सुधारणांनीं एक नवीन युग निर्माण करून माकडाच्या हातीं कोलीत दिलें. स्वतंत्र मनुष्याला बंधन असें केवळ कायद्याचें तेवढें राहिलें. ह्या कायद्याच्या बंधनानें गरीब लोक कोंडींत सापडले. हा “ बळी तो कान पिळी ” या शास्त्रीय तत्त्वाचा विजय होय. जर लोकांना फक्त स्वार्थच प्रिय वाटत राहिला तर सर्वांचा स्वार्थ एकत्रित केल्यानें परार्थ आपोआप कसा साधणार होता, कोणास ठाऊक !

मनुष्य ही जीवनसंपन्न अशी व्यक्ती न रहातां ती सर्वस्वी आर्थिक बनली आहे. मार्क्सवादानें त्याला सामाजिक व्यवहारांतील फक्त एक दुवा बनवून टाकलें.

लोकशाहीचें तत्त्व धोक्यांत आलें आहे असें लोकांना जेव्हां नीटपणानें नुकतेंच दिसून आलें तेव्हां तिच्या पुरस्कर्त्यांना ती केवळ राजकीय क्लृप्ति नसून तें एक प्रचंड नैतिक आणि आध्यात्मिक तत्त्व आहे याची अंधुकशी कल्पना येऊं लागली. ह्या तत्त्वाचा त्याग केल्यास मानवतेची पिछेहाट होईल असे विचार आतां सुचूं लागले. लोकशाहीचेंच नव्हे तर समाजसत्तावादाचें तत्त्वही एक नैतिक तत्त्व आहे ही गोष्ट आतां पटूं लागली आहे. दोन्हींचाही उपयोग मनुष्याचा भौतिक पातळीवरील दर्जा योग्य रीतीनें प्रस्थापित करण्यासाठींच आहे. हीं केवळ तत्त्वेंच न राहातां त्यांची पूर्ति व्हावयास हवी असेल तर सामाजिक, राजकीय आणि आर्थिक या तीन्ही क्षेत्रांत त्यांची प्रस्थापना झाली पाहिजे.

गांधीजी आपल्या जीवनविषयक तत्त्वज्ञानानें हेंच करूं पाहत आहेत. मनुष्याचा उदय आणि त्याचें भवितव्य नीतिसंपन्न आहे असा त्यांचा विश्वास आहे. आपलें अंतिम ध्येय मनुष्यमात्रानें स्वतः नैतिक समाजांत राहून साध्य करावयाचें असतें. व्यक्ति आणि समाज, अंतर्गत जीवन आणि बाह्य व्यवहार या गोष्टी अहिंसा, सत्य आणि न्याय या तत्त्वांना ग्राह्य धरूनच केल्या पाहिजेत. आणि एवढ्याचसाठीं सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवहारांत साधनें साध्याइतकींच पवित्र आणि शुद्ध हवींत. जग जिंकण्यासाठीं आपला आत्मिक ऱ्हास करणें एकाद्या व्यक्तीलाहि हितावह नाहीं किंवा एखाद्या राष्ट्रालाहि नाहीं. नैतिक समाजाला योग्य अशा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संस्था निर्माण झाल्या पाहिजेत. या व्यवस्थेंत लोकशाही आणि समाजसत्तावाद यांनीं प्राप्त करून दिलेले फायदे टिकविण्याची गांधीजींची खटपट आहे. मार्क्सप्रणीत समाजसत्तावादानें व्यक्तीला कितीहि भौतिक सुख मिळवून दिलें तरी आंतकेंद्रीकरण आणि साधन आणि साध्य यांच्यांतील नैतिक तफावती-

मुळें व्यक्तीचा कोंडमाराच होतो. भुकेनें तळमळणारे लोक कांहीं काल नैतिक ध्येय साधनाकडे लक्ष न देतां दोन वेळच्या जेवणाकडे डोळे लावून बसतील खरे. परंतु व्यक्ति अथवा समाज केवळ क्षुधाशमनावर संतोष मानून जास्त काळ राहणें शक्य नाहीं. क्षुधाशमक राहणी-व्यतिरिक्त अधिक उच्च विचारसरणीकडे त्यांचा रोख वळल्यावांचून रहाणार नाहीं.

ग्रामोद्योग आणि घरगुती धंदे यांचा गांधीजींनीं शेती आणि व्यापार यांच्या विकेंद्रीकरणाबरोबर केलेला पुरस्कार समाजसत्तावादी अतिकेंद्रीकरणाचे तोटे टाळण्यासाठीं आहे. विकेंद्रीकरणाचें तत्त्वही त्यांच्या दृष्टीनें नैतिक आहे. त्यामध्यें अनेक क्षेत्रांत निवड करण्याला वाव आहे. वैयक्तिक इच्छेला भरपूर क्षेत्र मिळावें अशीही सोय त्यांत आहे. स्वतंत्र मत तयार होण्याला आणि तें बोलून दाखवण्याला तेथें संधि मिळते. भौतिक सुखसोयींची समतेच्या तत्त्वावर केलेली वांटणी, हें समाजसत्तावादी दिखाऊ चित्र गांधीजींना मोहित करूं शकत नाहीं. अशा वांटणीनें व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा होणारा नैतिक ऱ्हास भरून निघूं शकत नाहीं. परंतु आधुनिक सुधारणेच्या दृष्टीनें केंद्रीकरणाला मुळींच मान्यता न देण्याइतके गांधीजी अव्यवहारीही नाहींत. असें असलें ती यंत्रानें मनुष्याचें स्वतंत्र व्यक्तिमत्वही नाहींसें करून टाकावें हेंही त्यांच्या नैतिक आणि मानवहितदक्ष बुद्धीला पटत नाहीं. म्हणून जेव्हां जेव्हां केंद्रीकृत उत्पादन आवश्यकच असेल तेव्हां तेव्हां तें समाजाच्या हातीं आणि समाजाच्या नियंत्रणाखालीं ठेवण्यास ते तयार आहेत.

अंतर्गत आणि आंतर्राष्ट्रीय राजकीय जीवन सत्य आणि अहिंसा यांच्यावंर आधारलेलें पाहिजे. गुप्त राजकारण आणि शस्त्रसाधना चालू राहता कामा नये. राजकीय सत्ताधारी आपापल्या राष्ट्रांतील लोकांचे सच्चे सेवक असले पाहिजेत. त्यांचें आर्थिक जीवन राष्ट्रांतील सर्वसामान्य सुखसोयींच्या कल्पनांशीं सुसंगत असलें पाहिजे. कोणतेंही काम अथवा व्यवसाय नीच किंवा उच्च मानूं नये. मात्र प्रत्येक व्यवहारांत आपलें सामाजिक

उद्दिष्ट पार पाडलें पाहिजे. प्रत्येक कामगार, मग तो कितीही सामान्य असो, त्याचें आर्थिक मूल्य तर समर्थनीय असतेंच परंतु त्याची प्रतिष्ठाहि तितकीच समर्थनीय आहे.

अशा रीतीनें राजकारण आणि अर्थकारण आध्यात्मिक करून टाकण्याचा गांधींचा प्रयत्न आहे आणि त्यायोगें राजकीय लोकशाही आणि आर्थिक समाजसत्तावाद यांच्या बुडाशीं असलेल्या न्याय आणि समता या तत्त्वांचा मानवजातीसाठीं समन्वय घडवून आणावयाचा आहे. त्यांचे सर्व प्रत्यक्ष कार्यक्रम नैतिकसमाजांत नैतिकमानव रहावा या दृष्टीनें आंखलेले आहेत. त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान राजकीय लोकशाही आणि आर्थिक समाजसत्तावाद यांतील नैतिक, भौतिक आणि संघटनात्मक फायदे एकत्रित करण्यासाठीं आहे. आधुनिक मानवी इतिहासाचीं विविध अंगें त्यांत एकत्रित करण्यांत आलीं आहेत. एका नवीन अहिंसक क्रांतीसाठीं त्यांचें कार्य चालू आहे आणि त्यामुळें इतिहासांत एका नवीन युगाची सुरुवात झाली आहे.

व्यक्ति आणि समाज यांना या नव्या क्रांतीच्या तत्त्वांचें योग्य ज्ञान व्हावें या हेतूनें त्यांनीं आपली नवीन शिक्षणयोजना पुरस्कारिली आहे. त्यांनीं आपल्याला स्वाभाविक आणि सशास्त्र अशी शिक्षणपद्धति सुचविली असून या पद्धतींत व्यक्ति आणि समाज दोन्हींच्या दृष्टीनीं उच्च ध्येय समाविष्ट केलें आहे. ह्या दृष्टीनेंच त्यांच्या शिक्षणयोजनेचा बरेवाईटपणा ठरविला पाहिजे.

REFBK-0006825
ग्रं. क्र. ६८२५

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

१ फुलें आणि दगल (आ.दु.) ३
२ घरट्याबाहेर ( " ) ३
३ पहिली लाट ( " ) ३
४ स्त्री आणि पुरुष ( " ) २
५ सूर्यकमळें ( " ) २॥
६ कालचीं स्वप्नें ३
७ आजचीं स्वप्नें ३
८ चंदेरी स्वप्नें ३
९ कलिका २।
१० सोनेरी सांवल्या
११ मृगजळांतील कळ्या २॥
१२ सुवर्णकण २।
१३ मंजिऱ्या २।
१४ सायंकाल ( आ. दु. ) २॥
१५ अविनाश ( " ) १॥
१६ मंदाकिनी ( " ) १॥
१७ चांदण्यांत ( " ) २
१८ कल्पलता ३
१९ आगरकर व्यक्ति आणि विचार ३॥
२० सहा भाषणें २
२१ तीन संमेलनें २॥
२२ फुलें आणि कांटे २।
२३ मराठीचा नाट्यसंसार ३
२४ हिरवा चांफा (आ. तिसरी) ५
२५ दोन ध्रुव ( " ) ५
२६ उल्का ( " ) ४॥
२७ पहिलें प्रेम ( आ. दुसरी ) ३
२८ क्रौंचवध ( " ) ५
२९ पांढरे ढग ( " ) ४।
३० जळलेला मोहर ३
३१ तुरुंगांतील पत्रें २

## साने गुरुजी

१ पुनर्जन्म ( आ. दुसरी ) २
२ आस्तिक ( ,, ) ३
३ संध्या ५
४ ना खंत ना खेद ५
( कृष्णा हाथीसिंग )
५ सोन्या मारुति (आ. दुसरी) २
६ निळा पक्षी ( ,, ) २॥
७ गोड निबंध ( भाग पहिला) ३
८ गोड निबंध ( भाग दुसरा ) ३
९ गोड निबंध (भाग तिसरा) ३

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ अवशेष २
२ व्यक्तिरेखा २।
३ माझी नभोवाणी २
४ नवे संसार ( जप्त ) ४
५ चंदनवाडी ६॥
६ नागकन्या २
७ दोन तपें ५

## ना. धों. ताम्हनकर

१ तात्या भा. १ला (आ.दुसरी) ४
२ तात्या भा. २ रा ३
३ निवाडे भा. १ ला २॥
४ निवाडे भा. २ रा ४
५ संतु २
६ चकमकी १॥
७ कुच्चा भंवरा १॥
८ अनेक आशीर्वाद ३॥
९ दाजी भा. १ला (आ. ति.) ३॥
१० बळीभाऊ ॥।

## भाई वैके

१ रॉयचरित्र १॥

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

**वा. म. जोशी**

१ स्मृति–लहरी २
२ विचार–लहरी २।
३ विचार–विहार ४।

**चिं. वि. जोशी**

१ आणखी चिमणराव(आ.२री)४
२ वायफळाचा मळा ( ,, ) ५
३ नवें भारूड २
४ स्टेशनमास्तर २
५ नटश्रेष्ठ ·।।।·

**दत्तु बांदेकर**

१ सख्या हरि ( आ. दुसरी ) २
२ नवी आघाडी १॥
३ तूं आणि मी २।
४ नजरबंदी २॥

**प्र. के. अत्रे**

१ साखरपुडा ( आ. दुसरी ) २
२ ललित वाङ्मय ३॥
३ दूर्वा आणि फुलें २।

**ना. म. पटवर्धन**

१ हितपत्रें ३
२ वा. म. जोशीचरित्र ४।

**द. र. कवठेकर**

१ अपुरा डाव ३
२ रेशमाच्या गांठी ३
३ आभाळाची सांवली ८

**अनंत काणेकर**

१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ( आ. दुसरी ) ३
२ पिकलीं पानें (आ. दुसरी) १॥
३ उघड्या खिडक्या १॥

**काकासाहेब कालेलकर**

१ ब्रह्मदेशाचा प्रवास १॥
२ भक्ति-कुसुमें ३
३ सामाजिक प्रश्न ३

**य. दि. पेण्ढरकर**

१ प्रापंचिक पत्रें ३
२ घायाळ २

**ना. ह. आपटे**

१ फसगत १॥
२ साजणी ५

**पु. य. देशपांडे**

१ नवें जग ?– २॥

**वि. स. खांडेकर** (परिचय-लेखक)

१ काव्यज्योति ( आ. दुसरी) १

**आनंदीबाई जयवंत**

१ पारंब्या २

**रा. वि. फडतरे**

१ मृगया ४

**लक्ष्मणराव सरदेसाई**

१ ढांसळलेले बुरूज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

१ व्यक्तिचित्रें २॥

**शकुंतलाबाई परांजपे**

१ भिल्लिणीचीं बोरें ३

**कृष्णाबाई मोटे**

१ मीनाक्षीचें जीवन २।

**र. गो. सरदेसाई**

१ चलतीं नाणीं २

**संपादक आचार्य भागवत**

१ वर्धा शिक्षण योजना ४।

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

**रा. श्री. जोग**

१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

**वि. वि. बोकील**

१ मेवीची बहीण ३

**सत्याग्रही**

१ ग्रह आणि तारे ४॥

**वि. म. भुस्कुटे**

१ स्टॅलिन ३॥

२ आई ( मॅक्झिम गॉर्की ) ७

**कमलाबाई टिळक**

१ आकाशगंगा २॥

**रामतनय**

१ साखरगोटी ५

**ह. रा. महाजनी**

१ आपलें आर्थिक नियोजन ५

**पं. क्षमा राव**

१ देणगी २॥

**गोपीनाथ तळवलकर**

१ मंगलधाम ३॥

**श्री. किनरे**

१ प्रकृतिदर्शन ५

**प्रो. हेरॉल्ड लास्की**

१ राज्यशास्त्र प्रवेश २

**बाबुराव गोखले**

१ वारा फोफावला २

**प्रो. एम्. एल्. दांतवाला**

१ आपली राहणी १॥।

**बापू गोखले**

१ निवड ३

**अरविंद गोखले**

१ उन्मेष २॥

**रमातनय**

१ समाजजीवन ५

**बिवलकर**

१ नाना पाटील चरित्र १

**एस. एन्. आग्रवाल**

१ विद्यार्थ्यांसाठीं विधायक कार्यक्रम २

**कुसुमावती देशपांडे**

१ मोळी २॥

**सौ. मालतीबाई दांडेकर**

१ वज्रलेख ४॥

**पट्टाभि सीतारामय्या**

१ गांधी आणि गांधीवाद ४

**वियोगहरी**

१ अंतरीचे बोल २॥

**नेताजी सुभाषचंद्र बोस**

१ लाल किल्ला ३।

**आचार्य कृपलानी**

१ गांधीदर्शन ४

**कॅ. लिमये**

१ विलायतची सफर ३

★

# देशमुख आणि कंपनीचीं

## आगामी प्रकाशनें

**द. र. कवठेकर**

१ अपुरा डाव ( आ. दुसरी )

**चिं. वि. जोशी**

२ गुंड्याभाऊ

**कुसुमाग्रज**

३ समिधा

**वि. स. खांडेकर**

४ संमेलनें

**महात्मा गांधी**

५ तेजस्वी तरुणी

**वि. स. खांडेकर**

६ वटपत्रें

**ना. धों. ताम्हनकर**

७ वडिलांचें सेवेसी

**चिं. वि. जोशी**

८ लंका वैभव

**ग. त्र्यं. माडखोलकर**

१० स्वप्नांतरिता

**अनंत काणेकर**

११ रूपेरी वाळू

★

देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार,
पुणें २

किंमत ४ रुपये

पुढील प्रकाशन

नवें शिक्षण
—प्रा. कामत